लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१, ३.६, ३.७, ३.८ व ३.९) यावरील

त्रेचाळीसावा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक नोव्हेंबर, २०१८ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
नोव्हेंबर, २०१८

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१, ३.६, ३.७, ३.८ व ३.९) यावरील

त्रेचाळीसावा अहवाल

एचबी १३७१—१

लोकलेखा समिती

२०१७-२०१८

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश **ऊर्फ** बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

*(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

**(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

***(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक **ऊर्फ** भाई जगताप, वि.प.स.

निमंत्रित

****(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

*** श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

**** श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

***** श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे जागा रिक्त झाली.**

****** श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.**

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४- २०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१, ३.६, ३.७, ३.८ व ३.९) यावर विचार करून लोकलेखा समितीचा **त्रेचाळीसावा** अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १० व १७ एप्रिल तसेच दिनांक १५ व २३ मे, २०१८ रोजी प्रधान सचिव, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचेदेखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट " अ " मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट " ब " मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशींवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर,
दिनांक २९ ऑक्टोबर, २०१८.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	(पाच)
(१)	**सार्वजनिक बांधकाम विभाग**	१
	(परिच्छेद क्र. ३.१)	१
	(परिच्छेद क्र. ३.६)	१३
	(परिच्छेद क्र. ३.७)	१६
	(परिच्छेद क्र. ३.८)	१९
	(परिच्छेद क्र. ३.९)	२३

सार्वजनिक बांधकाम विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र. ३.१ " राज्य निधीतून शासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्ती "** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

१.१ परिच्छेद क्रमांक- ३.१ राज्य निधीतून शासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्ती

योग्य आणि समयोचित देखभाल इमारतींना टिकवून ठेवून त्यांची आयु वाढविते आणि त्यांच्या संरचनेच्या शेवटपर्यंत रचना क्षमता अथवा कार्यक्षमतेनुसार त्यांचा वापर होणे सुकर करते.

महाराष्ट्रात सार्वजनिक बांधकाम विभाग शासकीय इमारती सुस्थितीत ठेवण्यासाठी जबाबदार आहे. या इमारती पुढील प्रवर्गात मोडतात : (i) मुख्य शीर्ष २२१६-गृहनिर्माण अंतर्गत निवासी इमारती आणि (ii) मुख्य शीर्ष २०५९-सार्वजनिक बांधकाम अंतर्गत प्रशासकीय इमारती (अनिवासी). सार्वजनिक बांधकाम विभागाने इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली (१९९१) ज्यात प्रस्तावांचे नियोजन आणि मांडणी, आर्थिक आणि मानवी साधनांचे पाखरण, तांत्रिक बाबी, पर्यवेक्षण, संनियंत्रण आणि मूल्यांकन या बाबी मांडल्या आहेत.

लेखापरीक्षेने सात मंडळांतर्गत असलेल्या १३ सार्वजनिक बांधकाम विभागांच्या १२० इमारतींची निवड ज्या इमारतींना तातडीने दुरुस्ती करावयाची गरज आहे त्यांचेकडे लक्ष देण्यात आले होते काय? कामे विवेकशीलतेने आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने जारी केलेल्या देखभाल व दुरुस्ती बाबतच्या मार्गदर्शक तत्त्वांनुरुप निष्पादित करण्यात आली होत काय आणि आंतरिक नियंत्रण भक्कम आहे का, या सर्व बाबींची खात्री करण्यासाठी केली. १३ विभागांनी २०१०-११ ते २०१४-१५ दरम्यान १२० इमारतींपैकी ७१ इमारतींच्या देखभाल व दुरुस्तींची एकूण १,४४४ कामे केली होती आणि त्यावर रुपये ५५.०७ कोटी खर्च करण्यात आला होता. उर्वरित ४९ इमारतींमध्ये उपयोगकर्त्यांच्या तक्रारी असूनसुद्धा अनेक कारणांमुळे जसे निधीची कमतरता, देखभाल व दुरुस्ती कामांस प्राधान्य न देणे, नियोजनातील अपर्याप्तता इत्यादींमुळे देखभाल व दुरुस्तीचे कामे करण्यात आली नाहीत. लेखापरीक्षणांतील निष्कर्ष पुढील परिच्छेदांत चर्चिले आहेत.

१.२ परिच्छेद क्रमांक ३.१.१ - वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार न करणे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने १९९१ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार, अधीक्षक अभियंता हे मंडळ प्रमुख आणि कार्यकारी अभियंता हे विभाग प्रमुख असून त्यांनी उपयोगकर्ता विभागाच्या प्रमुखासह आगामी वर्षासाठी इमारती दुरुस्तींच्या कार्यक्रमाबाबत चर्चा करण्यासाठी तिमाही बैठक घ्यावयास पाहिजे. या संदर्भात, मंडळाने इमारतींचे मुद्रित रजिस्टर राखावयास पाहिजे आणि एखाद्या वर्षात दुरुस्तीसाठी नियत असलेल्या इमारतींची पुरेशी माहिती (जसे बांधकामाचे वर्ष आणि किमत, बांधकाम क्षेत्र (built-up area), ठळक नोंदी (specification) इत्यादी विभागाने द्यावयास पाहिजे. संबंधित अधीक्षक अभियंत्याने उपयोगकर्ता विभागाच्या प्रक्षेपित गरजा आणि निधीच्या उपलब्धतेच्या आधारावर वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार करावयास पाहिजे.

लेखापरीक्षेस असे आढळले की ७१ इमारतींची १,४४४ कामे संबंधित अधीक्षक अभियंता यांचे द्वारे वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार केल्याशिवाय निष्पादित केली गेली. तसेच, इमारतींचे मुद्रित रजिस्टर सुद्धा देखभाल व दुरुस्तीसाठी नियत असलेल्या इमारतींची माहिती दर्शविण्यासाठी अद्यावत ठेवण्यात आले नव्हते. निधी उपलब्धता विचारात न घेता आणि ज्या इमारतींस दुरुस्ती अत्यंत आवश्यक आहे त्यांस प्राधान्य न देता संबंधित अधीक्षक अभियंत्याने वर्षभर देखभाल व दुरुस्तींची कामे मंजुर केली होती. या वस्तुस्थितीवरून साधार स्पष्ट होते की, १३ विभागांपैकी चार विभागांमध्ये २३७ शासकीय निवासस्थाने मागील एक ते पाच वर्षापासून देखभाल व दुरुस्तीची कामे जसे गळती, तडकलेल्या भिंती, तुटलेले दार आणि तावदान, बुजलेले आणि तुटलेले गटार पाईप इत्यादी कामे न झाल्यामुळे रिकामी पडली होती.

महाराष्ट्र शासनाने असे नमूद केले (डिसेंबर २०१५) की उपयोगकर्ता विभागाने केलेल्या तक्रारींची ऑन-लाईन नोंदणी करण्याची एक पद्धती विकसित करण्यात आली आहे आणि त्या तक्रारींचे प्राधान्य ठरविण्यात आले आहे. तसेच, इमारतींच्या मुद्रित रजिस्टरचे संगणकीकरण करण्याबाबतही सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना जून २०१५ मध्ये दिल्या आहेत. महाराष्ट्र शासनाने पुढे असेही नमूद केले की २३७ पैकी १९९ निवासस्थाने लेखापरीक्षणानंतर दुरुस्त करण्यात आली आणि ३८ निवासस्थाने लवकरच दुरुस्ता केल्या जातील.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सर्व उपभोक्ता विभागाची बैठक घेऊन एकत्रितपणे देखभाल दुरुस्ती बाबतचा कार्यक्रम तयार करण्यात येत आहे.आता शासनाने देखभाल दुरुस्तीसाठी सुधारीत प्रमाणके सुनिश्चित करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित केली आहे व कामासाठी मंजुरी देण्याबाबत समिती व संगणक प्रणाली तयार केली आहे. भविष्यात उपभोक्ता विभागाकडील मागणी, निधी (पुरवठा) याबाबत समतोल राखण्यासाठी उचित कार्यवाही सा.बां.विभागाकडून करण्यात येत आहे.

उस्मानाबाद, बीड व लातूर जिल्ह्याकरिता विविध उपभोक्ता खात्याच्या इमारती दुरुस्ती विषयक आढावा बैठक घेण्यात येते.मंडळस्तरावर बैठक संपन्न न झाल्यास विभागीय स्तरावर या प्रकरणी बैठक आयोजित करून इमारत दुरुस्ती विषयक बाबींची प्राधान्यक्रमाने कामे हाती घेण्याबाबतची सूची करण्यात येते.त्यानुसार विभागीय स्तरावर इमारत दुरुस्तीच्या कामाकरिता जॉब क्रं. मिळण्याकरिता प्रस्ताव मंडळ कार्यालयात सादर केले जातात.विहित निकषानुसार अत्यावश्यक दुरुस्तीच्या बाबीकरिता मंजुरी प्रदान करण्यात येते. उदाहरणादाखल या मंडळांतर्गत २०१५ साली घेण्यात आलेल्या बैठकीचे सूचनापत्र व बैठकीचे इतीवृत्त सोबत जोडण्यात येत आहे. त्या प्रमाणेच शासकिय इमारतींच्या देखभाल दुरुस्तीबाबत कार्यक्रम तयार करून त्या कार्यक्रमास मंजुरी देण्यात येत आहे. मंडळाने इमारतींचे मुद्रित रजिस्टर (PRB)अद्यावत ठेवलेले आहे.

(अ) या मंडळांतर्गत लातूर येथील ९६ निवासस्थाने रिक्त असल्याबाबत आक्षेप असून,यामधून साधारण रुपये ३२.२५ लक्ष इतका महसूल प्राप्त न झाल्याचे नमूद आहे.आजमितीस ६७ निवासस्थानाच्या दुरुस्तीनंतर मागणीनुसार व प्रतिक्षा यादीप्रमाणे निवासस्थान वाटप करण्यात येत आहे. लातूर हे जिल्ह्याचे ठिकाण असल्याने या ठिकाणी १० % HRA प्राप्त होत असल्याने विविध बँकांकडून गृहकर्ज प्राप्त करून, त्यानुसार कर्जाचे हप्ते भरण्याचा अधिकारी/कर्मचाऱ्यांचा कल आहे.

(ब) या मंडळांतर्गत सा.बां. विभाग, बीड येथील गृह, आदिवासी, आरोग्य विभागाची ८३ निवासस्थाने रिक्त असल्याबाबत आक्षेप असून, यामधून साधारण रुपये १९.०७ लक्ष इतका महसूल प्राप्त न झाल्याचे नमूद केले आहे.

सदर निवासस्थाने संबंधित खात्याच्या ताब्यात असून या बाबतची माहिती उपभोक्ता खात्याकडून प्राप्त होणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, ही कार्यान्वयीन यंत्रणा असल्याने या इमारतींमधील दुरुस्तीची कामे, उपभोक्ता खात्याच्या मागणीनुसार व निधी उपलब्धतेच्या अधिन पूर्ण करण्यात येतात. या विभागाकडून लेखाशिर्ष २२१६ अंतर्गत अत्यंत तुटपुंजा निधी प्राप्त होतो. शासकीय निवासस्थानांच्या दुरुस्ती व देखभाल संदर्भातील शक्य ती अत्यावश्यक कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

१.३ परिच्छेद क्रमांक ३.१.२ - जादा कामांच्या मंजुरीमुळे दायित्वाची निर्मिती.

आर्थिक वर्षाच्या सुरूवातीला देखभाल व दुरुस्ती कामांच्या काम-निहाय प्रस्तावांना कार्यकारी अभियंता यांनी प्राधान्य क्रमानुसार लावून संबंधित अधीक्षक अभियंता यांचेकडे मंजुरीसाठी सादर करावयास पाहिजे. जर, पुरेसा निधी उपलब्ध नसेल तर सर्वोच्च प्राधान्य असलेली काम/ कामे सर्वप्रथम हाती घेण्यात यावी.

लेखापरीक्षा पडताळणीत असे आढळले की, २०१०-१५ दरम्यान १३ पैकी ११ विभागांनी उपलब्ध तरतुदीपेक्षा जास्त प्रमाणात देखभाल व दुरुस्तीची कामे मंजुर करून निष्पादित केली. परिणामी, कंत्राटदारांच्या मागील वर्षाच्या प्रलंबित देयकांच्या (परिशिष्ट-३.१) प्रदानाचे रुपये ३४८.७२ कोटीचे (एकूण मार्च २०१५ पर्यंत) दायित्व सार्वजनिक बांधकाम विभागावर लादले गेले होते. या ११ विभागांच्या मागील पाच वर्षाच्या (२०१०-१५) एकूण वार्षिक सरासरी खर्चापेक्षा हे दायित्व जास्त होते. यावरून असे दिसून येते की, जर हे दायित्व निर्धारित करून अदा करावे लागले तर हे ११ विभाग पुढे एक वर्ष देखभाल व दुरुस्तीची कोणतीही कामे हाती घेण्यास सक्षम राहणार नाहीत. लेखापरीक्षेस असे आढळले की, प्रलंबित देयकांचे रुपये ३४८.७२ कोटीचे मोठे दायित्व असल्यावरही सार्वजनिक बांधकाम विभागाने २०१३-१४ मध्ये रुपये १९ कोटी निधी प्रत्यर्पित केला होता.

महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की प्रत्येक वर्षी देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी मागवलेला निधी हा मोठ्या प्रमाणात अपर्याप्त होता आणि प्रत्येक वर्षी आवश्यकता पूर्ण न करता येऊ शकल्यामुळे देयके प्रलंबित राहिली. तातडीची दुरुस्ती आवश्यक असल्यामुळे पुढे ढकलता येऊ शकत नव्हती आणि म्हणूनच निष्पादित करण्यात आली. जसजसा निधी उपलब्ध होत होता तसे तसे देयके चुकती करण्यात येत होती. महाराष्ट्र शासनाने असेही नमूद केले की डिसेंबर २०१५ पर्यंत प्रलंबित देयकांचे एकूण दायित्व रुपये ३४८.७२ कोटी वरून रुपये १६४.९२ कोटी पर्यंत कमी झाले आहे.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

उपभोक्ता विभागाची मागणी व पुरवठा (निधी) यामधील व्यस्त प्रमाणामुळे मंजुर केलेली कामे ही उपलब्ध निधीपेक्षा जास्तीची दिसून येतात. मुळातच उपभोक्ता विभागांच्या मागण्या ह्या प्रत्येक वर्षी पूर्ण करणे शक्य नसते. काही महत्वपूर्ण उपभोक्ता विभागांच्या मागण्या पूर्ण करणे अत्यंत गरजेचे असते. कामाची मंजुरी व निधी उपलब्धता यामध्ये तफावत निर्माण होऊन, दायित्व जास्तीचे दिसते. तथापी यापुढे संगणक प्रणालीद्वारे Job No. देणे, उपभोक्ता विभागामार्फत उपलब्ध निधीमध्ये प्राधान्यक्रम निश्चित करून घेणे इत्यादी बाबी प्राधान्याने हाती घेण्यात येत असून त्याद्वारे दायित्व आटोक्यात राहून, उपभोक्ता विभागाच्या प्रमुख गरजा पूर्ण होतील यादृष्टीने सर्वंकष प्रयत्न करण्यात येत आहेत.

१.४ परिच्छेद क्रमांक ३.१.३ देखभाल व दुरुस्तीच्या मानदंडाची सुधारणा न करणे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने शासकीय इमारतींच्या (निवासी व प्रशासकीय दोन्ही) देखभाल व दुरुस्तीसाठी भौतिक आणि आर्थिक मानदंड विहित केले होते (मार्च १९९१). आर्थिक मानदंड प्रत्येक पाच वर्षानंतर आढावा घेऊन सुधारित करावयाचे होते. परंतु लेखापरीक्षेस असे आढळले की, आर्थिक मानदंड फक्त एकदाच नोव्हेंबर २००५ मध्ये सुधारित केल्या गेले. तसेच कालानुरुप आणि बांधकामामध्ये आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात येऊ लागल्यामुळे नविन उपकरणे वापरात आली आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दर अनुसूचीत वेळोवेळी समाविष्ट करण्यात आली. परंतु, देखभाल व दुरुस्तीचे भौतिक मानदंड मागील २४ वर्षापासून सुधारित करण्यात आले नाही.

प्रेसिडेंसी (Presidency) विभाग, मुंबई यांच्या दस्तावेजांच्या तपासणीत असे आढळले की २०१०-१५ दरम्यान १५ निवासी इमारतींच्या प्रत्यक्ष देखभाल व दुरुस्तीवर झालेला खर्च २००५ च्या आर्थिक मानदंडांच्या (लेखापरीक्षेद्वारे २०१४-१५ पर्यंत १० टक्के प्रति वर्ष वाढवून) सहा ते २० पट जास्त होता. तसेच, या १५ निवासी इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी २०१०-१५ दरम्यान झालेला प्रत्यक्ष खर्च मुख्य अभियंता, मुंबई क्षेत्र यांनी जानेवारी २०१४ मध्ये विहित केलेल्या रुपये २८,५०० प्रति चौरस मीटर दराने तेवढेच बिल्ट-अप क्षेत्र असलेल्या नविन इमारतींच्या बांधकाम किमतीच्या एक ते तीन पटीत होता. दुसऱ्या शब्दांत व्यक्त केले तर या १५ इमारती, ज्यांच्या देखभाल व दुरुस्तीवर रुपये ५२ कोटी खर्च करण्यात आला, त्या इमारती केवळ रुपये ३७ कोटी खर्चून बांधता येऊ शकल्या असत्या. याबाबतचे तपशील परिशिष्ट ३.२ मध्ये दर्शविले आहे.

महाराष्ट्र शासनाने मान्य केले की, तांत्रिक प्रगती आणि आवश्यकतेनुसार मानदंड सुधारित करावयाची आवश्यकता आहे आणि नमूद केले की, देखभाल व दुरुस्तीचे मानदंड सुधारणेसाठी एक समिती गठित करण्याबाबत शासन निर्णय नोव्हेंबर २०१५ मध्ये निर्गमित करण्यात आला आहे.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शासन निर्णय क्र. बीडीजी २०१५/ प्र.क्र.१८९/इमा.३, दिनांक ३० नोव्हेंबर २०१५ अन्वये शासनाच्या विविध विभागांचे अनिवासी व निवासी इमारतींचे बांधकाम व देखभाल दुरुस्तीसाठी जसे की, किरकोळ दुरुस्ती, विशेष दुरुस्ती, विविक्षित दुरुस्ती इत्यादी जुन्या बाबींचा आढावा घेऊन ज्या बाबींचे साहित्य बाजारात उपलब्ध होत नाहीत त्या बाबी वगळणे व तसेच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नव्याने बाजारात आलेल्या बाबींचा अभ्यास करून इमारती देखभाल व दुरुस्तीसाठी सुधारीत प्रमाणके ठरविणेसाठी श्री. एस. एस. मोमीन, सेवानिवृत्त सचिव (बांधकामे), सा.बां.विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची नियुक्ती करण्यात आली आहे व त्याचा अहवाल प्राप्त झाला असून मानके निश्चित करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

१.५ परिच्छेद क्रमांक ३.१.४ - मंजुर झालेली कामे रद्द करणे.

दोन विभागांतील (प्रेसिडेंसी आणि उत्तर मुंबई) दस्तावेजांच्या तपासणीत असे आढळले की रुपये ६५.४८ कोटी किमतीची, १११८ कामे ज्यांना आधीच जॉब क्रमांक नेमून दिले होते. डिसेंबर २०१० ते फेब्रुवारी २०१४ दरम्यान रद्द करण्यात आली. तसेच, रद्द झालेल्या १,११८ कामांपैकी २५ कामांमध्ये मोजमाप पुस्तिका क्रमांक नोंदविण्यात आले होते, ज्याद्वारे असे दिसून येत होते की, ही २५ कामे निष्पादित करण्यात आली होती आणि त्यांची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदविली गेली होती. वारंवार विनंती करूनही संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी ह्या २५ कामांच्या प्रत्यक्ष स्थितीची पडताळणी करण्यासाठी मोजमाप पुस्तिकेच्या प्रती लेखापरीक्षेला प्रस्तूत केल्या नाही.

महाराष्ट्र शासनाने नमूद केले की, मंजुर प्रस्तावांचा आढावा घेऊन निधीच्या कमतरतेमुळे कार्यकारी अभियंत्यांनी काही कामे स्थगित/रद्द करण्याबाबत अधीक्षक अभियंत्याकडे प्रस्ताव मांडले. पुढे असेही नमूद केले की दक्षता आणि गुणवत्ता नियंत्रण मंडळ (VQCC) यांना रद्द करण्यात आलेल्या २५ कामांची स्थिती तपासण्याचे आदेश देण्यात आले आहेत (नोव्हेंबर २०१५) आणि पुढील कारवाई त्यांच्या शिफारशींच्या आधारे करण्यात येईल.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर २५ कामांची सद्यःस्थिती अधीक्षक अभियंता, मुंबई यांनी व्यक्तिशः लक्ष घालून शासनास १ महिन्यात सादर करावी, असे त्यांना आदेशित केले आहे.

१.६ परिच्छेद क्रमांक ३.१.५ अवास्तववादी मागणी आणि निधीचे संवितरण.

कार्यकारी अभियंता यांच्याद्वारे देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी वार्षिक मागणी करण्यात येते जी अधीक्षक अभियंता यांचे स्तरावर एकत्रिकृत करण्यात येऊन मंडळाची एकत्रिकृत मागणी सचिव (इमारती), सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे तपासणी आणि मंजुरीसाठी पाठविण्यात येते.

लेखापरीक्षेस असे आढळले की २०१०-१५ दरम्यान १३ पैकी चार विभागांनी सर्व इमारतींचे बिल्ट-अप क्षेत्र, जरी दुरुस्तीयोग्य असो वा नसो ते विचारात घेऊन त्यांना अनुज्ञेय असलेल्या अधिकतम निधी पेक्षाही जास्त निधीची मागणी (रुपये १,२८१ कोटी) केली होती. २०१०-१५ दरम्यान चार विभागांनी केलेली जादा निधीची मागणी आणि वितरित केलेल्या निधीची स्थिती संक्षिप्तपणे तक्ता ३.१.१ मध्ये खाली दर्शविली आहे :–

विभागाचे नांव	सर्व इमारतींचे (दुरुस्ती योग्य असो वा नसो) बिल्टअप क्षेत्र विचारात घेऊन अनुज्ञेय असलेला अधिकतम M&R निधी	विभागाद्वारे मागणी केलेला निधी	विभागाला वितरीत केलेला निधी	विभागाद्वारे जादा मागणी केलेला निधी (रकाना ३ – रकाना २)	विभागाला अनुज्ञेय निधी पेक्षा जास्त वितरित केलेला निधी (रकाना ४ – रकाना २)
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
प्रेसिडेंसी मुंबई	२३९.४६	१२४४.८७	६८४.५३	१००५.४१	४४५.०७
उत्तर मुंबई	३२८.७६	५१४.००	२६०.७१	१८५.२४	-६८.०५
नाशिक	५०.८५	१३६.८६	११०.६७	८६.०१	५९.८२
नाशिक (पूर्व)	१०.९३	१४.७८	११.०८	३.८५	०.१५
एकूण . .	**६३०.००**	**१९१०.५१**	**१०६६.९९**	**१२८०.५१**	

तक्ता ३.१.१ वरून असे दिसून येते की सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन विभागांना (प्रेसिडेंसी आणि नाशिक) अनुज्ञेय असलेल्या अधिकतम निधीपेक्षा रुपये ५०५ कोटी जास्त निधी वितरित केला.

महाराष्ट्र शासनाने नमूद केले की प्रेसिडेंसी विभाग, मुंबई यांचेकडे मूलत: अत्यंत महत्वपूर्ण व्यक्ती आणि अति महत्वपूर्ण व्यक्ती (VVIP & VIP) यांच्या निवासस्थानासह वारसा (Heritage) इमारती आहेत ज्यांना जास्तीत जास्त देखभालीची आवश्यकता आहे. तसेच, या सर्व इमारती समुद्रकाठी स्थित असून अति पाऊस आणि क्षारयुक्त हवा सोसत असल्यामुळे त्यांची देखभाल व दुरुस्तीची गरज मानदंडापेक्षा जास्त आहे. पुढे महाराष्ट्र शासनाने असेही नमूद केले की लेखापरीक्षेने चार विभागांतील इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी अनुज्ञेय असलेल्या अधिकतम निधीची परिगणना करतांना बिल्ट-अप क्षेत्राऐवजी फक्त चटई क्षेत्र विचारात घेतले. बिल्ट-अप क्षेत्र चटई क्षेत्रापेक्षा २० टक्क्याने जास्त आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने जोर दिला की बांधकाम (बिल्ट-अप) क्षेत्राच्या आधारावर आणि २०१०-१५ दरम्यान नाशिक आणि नाशिक (पूर्व) विभागांसाठी लागू असलेल्या मानदंडानुसार देखभाल निधी लेखापरीक्षेद्वारे काढण्यात आलेल्या रुपये ५०.८५ कोटी आणि रुपये १०.९३ कोटी ऐवजी अनुक्रमे रुपये १००.९५ कोटी आणि रुपये १२.५९ कोटी असावयास पाहिजे.

महाराष्ट्र शासनाने सादर केलेले उत्तर खालील कारणांमुळे मान्य नाही :—

- चार विभागांस अनुज्ञेय असलेल्या अधिकतम देखभाल व दुरुस्ती निधीची परिगणना संबंधित मंडळाच्या अधीक्षक अभियंत्याने लेखापरीक्षेस सादर केलेल्या बिल्ट-अप क्षेत्राच्या आधारावरच करण्यात आली आहे,
- बिल्ट-अप क्षेत्रासाठी २० टक्के अतिरिक्त वाढ दिल्यावरही नाशिक आणि नाशिक (पूर्व) विभागांच्या २०१०-१५ दरम्यान देखभाल आणि दुरुस्तीच्या निधीत मामूली वाढ होऊन तो अनुक्रमे रुपये ६१.०१ कोटी (रुपये ५०.८५ कोटी वरून) आणि रुपये १३.१९ कोटी (रुपये १०.९३ कोटी पासून) वर जाईल, आणि
- महत्त्वाचे असे की चार विभागांच्या २०१०-१५ दरम्यान देखभाल व दुरुस्तीच्या निधीच्या मागणीचा अंदाज बांधण्यासाठी लेखापरीक्षेने सर्व इमारती (दुरुस्तीयोग्य असो किंवा नसो) विचारात घेतल्या. फक्त दुरुस्तीयोग्य इमारती विचारात घेतल्या असत्या तर देखभाल व दुरुस्ती निधीसाठी असलेली जादा मागणी (रुपये १,२८१ कोटी) आणखीनच वाढली असती.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

प्रेसिडेंसी विभागाच्या सन २०१०-२०१५ या ५ वर्षांच्या कालावधीचा सरासरी खर्च एकूण रुपये १४२.५८ कोटी इतका आहे. त्या पैकी अटळबाबी वरील सरासरी खर्च रुपये २६.५३ कोटी इतका आहे. त्यामुळे प्रत्यक्षात देखभाल व दुरुस्ती (किरकोळ दुरुस्ती, विशेष दुरुस्ती, विविक्षित स्वरूपाची दुरुस्ती) वरील सरासरी खर्च रुपये ११६.०५ कोटी इतका आहे. खर्चित जादा निधी मागील कारणे खालीलप्रमाणे आहेत.

(१) प्रेसिडेंसी विभाग यांचेकडे प्रामुख्याने अति महत्त्वाच्या व्यक्ती आणि उच्च पदस्थ अधिकारी (VVIP and VIP) यांच्या निवासस्थानासह वारसा (Heritage) इमारती आहेत, ज्यांना जास्तीत जास्त देखभालीची आवश्यकता असते. त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालय, एशियाटीक सोसायटी, ओल्ड कस्टम हाऊस, सिडनहॅम कॉलेज, एलफिस्टन कॉलेज इत्यादी १०० वर्षांपेक्षा जास्त आयुर्मान झालेल्या इमारती देखभाल व दुरुस्तीसाठी आहेत. या व्यतिरिक्त, प्रशासकीय इमारत, सारंग, अवंती, अंबर, विधी, निलांबरी, सुरूची, सुनिती, बेल हेवन सारख्या (multi storyed) बहुमजली इमारतीची देखभाल दुरुस्ती केली जाते. त्याचप्रमाणे मंत्रालय, आमदार निवास, जे.जे. रुग्णालय, सेंट जॉर्ज रुग्णालय, कामा रुग्णालय, जी.टी. रुग्णालय अशा शासकीय इमारती देखभाल दुरुस्तीकरिता आहेत.

(२) वरील सर्व शासकीय इमारती समुद्रकाठी स्थित असल्याने या भागातील अति पाऊस आणि क्षारयुक्त हवा यांचा सतत परिणाम या इमारतींवर होत असतो. ज्यामुळे देखभाल व दुरुस्तीची वारंवार गरज भासते.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागाने शासकीय इमारतीच्या (निवासी आणि प्रशासकीय दोन्ही) देखभाल व दुरुस्तीसाठी भौतिक आणि आर्थिक मानदंड मार्च १९९१ मध्ये विहित केले आहे.आर्थिक मानदंड प्रत्येक पाच वर्षानंतर आढावा घेऊन सुधारित करावयाचे आहेत. तथापि, आर्थिक मानदंड फक्त एकदाच नोव्हेंबर २००५ मध्ये सुधारण्यात आलेले आहेत.

(४) देखभाल व दुरुस्ती कामांकरिता दरवर्षी मिळणारा निधी पुरेसा नसल्याने उपलब्ध निधीच्या मर्यादेत कामे केली जातात. तथापि, आवश्यक असणारी देखभाल व दुरुस्ती पूर्ण होऊ शकत नसल्याने इमारतीच्या झीज (Detoration) च्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

(५) बाजारात आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित विविध प्रकारचे साहित्याचे अद्यावत नमुने/प्रकार उपलब्ध असल्याने अशा अद्यावत साहित्य बसविण्याची मागणी उपभोक्ताकडून वारंवार केली जाते.

(६) सर्वसाधारणपणे रंगकाम २ ते ३ वर्षानंतर केले जाते. तथापि, नवीन (occupant) वहिवाटदार/उपभोक्ता यांचेकडून मागणी होत असल्याने Hygenic आणि Humanity च्या दृष्टीने उपभोक्त्याच्या मागणीप्रमाणे रंगकाम करावे लागते.

(७) दक्षिण मुंबई भागात डेब्रिजची विल्हेवाट मुंबईबाहेर करावी लागत असल्याने, त्यामुळे खर्चात वाढ होते. तसेच या भागात वेळेचे बंधन असल्यामुळे सुीच्या दिवशी (VVIP & VIP च्या) निवासस्थानी कामे करता येत नाही.

(८) मा. उच्च न्यायालय, एशियाटीक सोसायटी, ओल्ड कस्टम हाऊस, सिडनहॅम कॉलेज तसेच एलफिस्टन कॉलेज या सारख्या इमारतींचे आयुर्मान १०० वर्षांपेक्षा अधिक झालेले आहे, अशा हॅरिटेज इमारतींचा वारसा जतन करण्याकरिता वारंवार देखभाल व दुरुस्तीची गरज भासते.

(९) निवासी व अनिवासी शासकीय इमारतींकरीता तयार करण्यात आलेली मानके ही G + २ किंवा G + ३ अशाप्रकारच्या इमारती गृहीत धरून तयार करण्यात आलेली आहेत. तथापि, प्रशासकीय इमारत, सारंग, अवंती, अंबर, विधी, निलांबरी, सुनिती, सुरूची, बेलहेवन या सारख्या बहुमजली इमारतींकरीता आवश्यक असणारी देखभाल व दुरुस्तीची मानके (floor rise १.५%) विचारात घेण्यात आलेली नाहीत.

(१०) वरील बाबी निदर्शनास आल्यावर शासन स्तरावरून श्री. एस.एस. मोमीन, सेवानिवृत्त सचिव (बांधकामे),सा.बां.विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

१.७ परिच्छेद क्रमांक ३.१.६ – मंजुरीशिवाय कामांचे निष्पादन.

जॉब क्रमांक मिळाल्याशिवाय देखभाल व दुरुस्तीच्या कोणत्याही कामाचे निष्पादन अनधिकृत मानले जाते. लेखापरीक्षेस असे आढळले की १३ पैकी तीन विभागांनी २०१०-१५ दरम्यान रुपये ५५.५८ कोटी किमतीची ४,००७ कामे जॉब क्रमांक मिळाल्याशिवाय निष्पादित केली.

महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि असे नमूद केले की वरील अनियमितता क्षमापित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे आणि त्याच बरोबर, दोषी कार्यकारी अभियंत्या विरुद्ध कारवाई सुरू करण्यात आली आहे.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जॉब क्रमांक मिळाल्याशिवाय देखभाल व दुरुस्तीच्या निष्पादन केलेल्या इलाखा शहर विभागातील रुपये २०.७५ कोटी रक्कमेचा कार्योत्तरकार्यक्रमाचा क्षमापन प्रस्ताव मुंबई सा.बां.प्रादेशिक विभाग कार्यालयाचे पत्र क्र.मुअ(मुं)/का.२(१)/५९९२, दिनांक २४ नोव्हेंबर २०१५ अन्वये शासनास सादर केलेला आहे. या संदर्भात शासनाचे पत्र दिनांक २८ मार्च २०१२ अन्वये श्री. एस. व्ही. चोबे, तत्कालिन कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांच्या विरुद्ध दोषारोपपत्रे बजावून विभागीय चौकशी सुरू केली आहे.

लेखा परीक्षेने सदर बाब निदर्शनास आणण्यापूर्वी विद्युत सा.बां. अंतर्गत जॉब क्रमांक प्राप्त करावयाची पद्धत अवलंबली जात नव्हती. जॉब क्रमांकास मान्यता देण्याची पद्धत सन कार्यकारी अभियंता (विद्युत) कार्यालयामध्ये २०१६-१७ मध्ये सुरू करण्यात आली आहे.

श्री. संजय सोलनकर तत्कालीन कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी यांच्याविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केलेले आहे. याप्रकरणी श्री. संजय सोलनकर याची विभागीय चौकशी प्रगतीत आहे.

१.८ परिच्छेद क्रमांक ३.१.७ – तातडीच्या दुरुस्तीची गरज असलेल्या इमारती दुर्लक्षित राहिल्या.

सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे १९९१ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार (परिच्छेद २.१.८) मोडकळीस आलेल्या आणि असुरक्षित इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीस प्राधान्य दयावयास पाहिजे. लेखापरीक्षेस असे आढळले की दुरुस्तीची अत्यंत आवश्यकता असलेल्या इमारती उपयोगकर्ता विभागाद्वारे वारंवार तक्रारी करूनही दीर्घ कालावधीसाठी दुर्लक्षित होत्या. काही प्रकरणे उदाहरणादाखल खाली मांडली आहेत.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

तातडीच्या दुरुस्तीची गरज असलेल्या इमारतींची कामे हाती घेण्यात आली असून निविदा मागविण्यात आल्या आहेत.

प्रेसिडेंसी विभाग, मुंबई.

१. पोलीस क्वार्टर्स, पीकेट रोड

जून २०१३ पासून ऑफिसर्स क्वार्टर्सचे निवासी तक्रारी करत आहे की तिसऱ्या मजल्यावरील क्वार्टर्सची बाल्कनी मोडकळीस आली आहे आणि रस्त्याच्या बाजूने झुकलेली आहे. यामुळे इमारतीतील निवासी आणि इतर ये-जा करणाऱ्यांसाठी ते धोकादायक आहे. कार्यकारी अभियंता यांच्या द्वारे प्रस्तावित (डिसेंबर २०१३) रुपये २५.५० लक्ष रक्कमेच्या दुरुस्ती कामांच्या प्रस्तावाला मुख्य अभियंता, मुंबई यांनी या आधारावर मान्यता दिली नाही की ती इमारत जुनी असून तीची रचना गॉथिक (gothic) प्रकारची असल्यामुळे संरक्षण वास्तुशास्त्रज्ञ यांच्या अभिप्रायाची आवश्यकता आहे. त्यामुळे खिळखिळी बालकनी असलेले क्वार्टर्स तसेच डळमळीत अवस्थेत राहिले (डिसेंबर २०१५) महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि दुरुस्तीची कामे लवकरच करण्यात येतील, असे नमूद केले.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरील क्वार्टर्सच्या बाल्कनीचे काम हाती घेऊन पूर्ण करण्यात आलेले आहे.

२. जे.जे. रुग्णालयातील स्वस्तिक इमारत

जे.जे. रुग्णालय, मुंबई येथील स्वस्तिक इमारतीतील रहिवाशांच्या अनेक तक्रारी आहेत (मार्च २०१३) की सहाव्या मजल्यावरील बालकनीच्या छप्पराच्या प्लास्टरचे मोठे-मोठे तुकडे पडले आहेत. कार्यकारी अभियंता यांनी दुरुस्ती ऐवजी मोडकळीस आलेल्या भागावर एक तात्पुरती सुरक्षित जाळी (safety net) लावलेली आहे आणि रहिवासी व वाहनांसाठी दोन वर्षांपासून हा धोका कायम आहे. महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि दुरुस्तीची कामे लवकरच करण्यात येतील, असे नमूद केले.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

वेळोवेळी अत्यावश्यकतेप्रमाणे कामे/दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. विशेष दुरुस्ती अंतर्गत " स्वस्तिक " इमारतीकरिता रुपये ८७.०० लक्ष च्या कार्यक्रमास मंजुरी मिळाली असून सदर कामाची निविदा प्रगतीत आहे.

३. लघुवाद न्यायालय इमारत

ऑगस्ट २०१३ पासून लघुवाद न्यायालय इमारतीतील दोन उद्‌वाहन यंत्र (lifts) बंद आहे, त्यामुळे अभ्यागत (visitors) आणि कर्मचारीवर्ग यांना ये-जा करण्यासाठी बळजबरीने पायऱ्यांचा वापर करावा लागतो. तसेच, इमारतीच्या छप्पराचे प्लास्टर आणि स्तंभ (pillars) कोसळले आहेत, त्यामुळे लोखंडी सळाका बाहेर निघाल्या आहेत व इमारतीची रचना कमकुवत झाली आहे. तसेच पाचव्या मजल्यावरील बालकनीची पॅरापेट भिंतही कोसळलेली आहे. त्यामुळे तळमजल्यावर असलेल्या पोलीस स्टेशनला अडथळे निर्माण होत आहे. पॅरापेट भिंतीची दुरुस्ती करण्याऐवजी कार्यकारी अभियंता यांनी बालकनीत तात्पुरती लोखंडी जाळी आणि पोलीस स्टेशनवर तात्पुरती जाळी बसविली आहे. महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की दुरुस्तीची कामे लवकरच करण्यात येईल.

ज्ञापन :–

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

इमारतीच्याआतील बाजूने जिन्यामध्ये तसेच व्हरांड्यामध्ये M.S.Props लावण्यात आले आहेत आणि काम चालू असल्याबाबतचे सा.बां.खात्यामार्फत Safetyसाठी बोर्ड बसविण्यात आले आहेत. त्यामुळे न्यायालयामध्ये येणाऱ्या अभ्यांगत, न्यायाधीश तसेच कर्मचाऱ्यांच्या सुरक्षितेसाठी दक्षता घेण्यात आली आहे. नवीन लघुवाद न्यायालय, मुंबई येथील इमारती लघुवाद न्यायालयीन इमारतीच्या पोलीस स्टेशन बाजूची संरचनात्मक दुरुस्ती करून बाह्यभागाचा गिलावा पूर्ण करण्यात आला आहे. नवीन न्यायालय,मुंबई येथील पोलीस स्टेशन बाजू व उद्‌वाहन क्र.७ व ८ येथील बाह्यभागाचे आर.सी.सी. स्तंभ, तुळ्या व स्लॅब इ.च्या संरचनात्मक दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. जुने लघुवाद न्यायालय, मुंबई येथील उदवाहन क्र. २ चे बाह्यभागाचे आर.सी.सी. स्तंभ, तुळ्या व स्लॅब इ.चे संरचनात्मक दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून सद्यःस्थितीत उदवाहन चालू आहे. जुने लघुवाद न्यायालय इमारतीमधील न्यायालयीन कक्षाचे व व्हरांड्यातील पॉलीमर गिलाव्याचे काम करून रंगरंगोटीचे काम प्रगतीपथावर आहे. नवीन लघुवाद न्यायालयातील कमकुवत झालेला गिलावा पाडून घेण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने ४, ५ व ६व्या मजल्यावरील व्हरांडा, जीना, पडदी, बाहय भागातील फुगलेला कमकुवत गिलावा पाडून घेण्यात आला आहे. इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती, न्यायालयीन कक्ष/व्हरांडा येथील फरशी नूतनीकरण, प्रसाधनगृहाचे नूतनीकरण, दरवाजे/खिडक्या, पाईपलाईन इ.चे नूतनीकरण तसेच पार्किंग जागेमध्ये काँक्रीट व पेव्हर ब्लॉक बसविणे. कंपाऊंड वॉलची दुरुस्तीइ.कामांना शासन निर्णय क्र.संकीर्ण-०३१६/२४७/५१३८/का.११, दिनांक १५ मार्च २०१७ अन्वये एकूण रुपये १३,४५,३५,०८७ इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर प्रशासकीय मान्यतेमध्ये स्थापत्य कामासाठी रुपये ९,२८,३०,६४० व विद्युत कामासाठी रुपये ४,१७,०४,४४७ इतकी तरतूद केली आहे. सदर कामाची निविदा प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.

४. जे.जे. रुग्णालयाची शांती इमारत

शांती इमारतीतील रहिवाशांनी तक्रार केली (मार्च २०१४) की जास्त गळतीमुळे छप्पराचे प्लास्टर कोसळले आहे आणि त्यातून लोखंडी सळाका बाहेर निघाल्या आहेत. समस्येकडे तातडीने लक्ष देण्याऐवजी अभियंत्यानी छप्पर कोसळू नये यासाठी छप्पराला तात्पुरता आधार लावलेला आहे. महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की दुरुस्तीची कामे लेखापरीक्षणानंतर करण्यात आली.

ज्ञापन :–

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

आवश्यक स्वरूपाची दुरुस्तीची कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात आलेली आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर

५. मुलींसाठी प्रमाणित वसतिगृह

महिला व बालविकास विभागाद्वारे मुलींसाठी प्रमाणित वसतिगृह चालविल्या जाते ज्यात सहा ते १८ वर्षाच्या १०० अनाथ मुली राहत आहेत. ऑगस्ट, २०१० पासून वसतिगृह अधीक्षक यांच्या बऱ्याच तक्रारी आहेत जसे दारे (चारही दारे) आणि वसतिगृहाच्या प्रवेशद्वाराचे लोखडी जाळी दार तुटलेले आहे. गळती, तुटलेले शौचालय, तुटलेली गटारलाईन इत्यादी. मे, २०११ मध्ये तीन मुली तुटलेल्या लोंखडी गेट मधून पळून गेल्या. १० शौचालयांपैकी फक्त एक शौचालय वापरण्यायोग्य आहे आणि मुलींना (एकूण १००) जबरीने फक्त एकाच शौचालयाचा वापर करावा लागत आहे (दुसरे शौचालय एकतर बुजलेले आहेत किंवा वापरण्यास योग्य नाही). तथापि, कार्यकारी अभियंता यांनी कोणतीही दुरुस्तीची कामे निष्पादित केली नाहीत. महाराष्ट्र शासनाने नमूद केले की, लेखापरीक्षेने निदर्शनास आणून दिल्यावर तुटलेले लोखंडी दार दुरुस्त करण्यात आले आणि उर्वरित देखभाल व दुरुस्ती कामे निष्पादित केल्या जातील असे आश्वासन दिले.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदरहू वसतिगृह हे सन १९८५ साली बांधण्यात आलेले आहे. याच प्रकारचे नागपूर शहरामध्ये याशिवाय संत मुक्ताबाई व सरस्वती वसतिगृह, काटोल रोड, नागपूर अशा दोन वसतिगृहांची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी विभागाकडे आहे. सन २०१४-१५ मध्ये या दोन्ही वसतिगृहांची दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली. त्यानुसार प्रमाणक मुलींचे वसतिगृहामध्ये नवीन सेप्टीक टँक व सांडपाण्याची व्यवस्था अस्तित्त्वातील प्रसाधनगृहांची दुरुस्ती व गडर लाईन इत्यादीची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तसेच सदयि वसतिगृह अधीक्षक यांच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे निदर्शनास येत नाही.

सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड

६. शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सुरूडी

सार्वजनिक बांधकाम विभागाने १९९१ मध्ये निर्गमित केलेल्या देखभाल व दुरुस्तीच्या तत्त्वानुसार आश्रमशाळा ह्या सुदूर क्षेत्रात स्थित आहे.त्यामुळे जीर्णावस्थेत असलेल्या अशा शाळांच्या देखभाल व दुरुस्तीस सर्वाधिक प्राधान्य द्यावयास पाहिजे. शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सुरूडीचे मुख्याध्यापक जून २०१४ पासून कार्यकारी अभियंता, बीड विभाग यांना आश्रमशाळेच्या तुटलेल्या छप्पराचे आणि भिंतीच्या डागडूजी बद्यल विनंती करीत आहेत. तथापि, डिसेंबर, २०१५ पर्यंत तुटलेले छप्पर आणि भिंत दुरुस्त न केल्यामुळे विद्यार्थ्यांचे जीवन धोक्यात होते. महाराष्ट्र शासनाने याबाबत उत्तर दिले नाही.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखाशिर्ष २०५९ अंतर्गत प्राधान्याने इतर विभागाची जसे की न्याय विभाग, महसूल, पोलीस व आरोग्य विभागाच्या दुरुस्तीच्या कामांचा पाठपुरावा असल्याने या विभागाची कामे हाती घेण्यात आली.

तसेच सार्वजनिक बांधकाम मंडळांतर्गत सा.बां.बीड विभागाचे लेखाशिर्ष २०५९ अंतर्गत इमारतीचे क्षेत्रफळ ११४७५९ चौ.मी. असून मानकाप्रमाणे, अंदाजे प्रतिवर्षी रुपये ३४६.०० लक्ष निधीची आवश्यकता असताना, २०१४-१५ या वर्षात एकूण रुपये २३८.०० लक्ष निधी प्राप्त व खर्च करण्यात आला आहे.

निधीच्या या व्यस्त प्रमाणामुळे व शासकीय आश्रमशाळा,सुरूडी येथील नमूद इमारत बांधकामास बरीच वर्षे झाली असल्यामुळे व इमारत जीर्ण झालेली असल्याने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले नाही.

यातच दिनांक ४ जून २०१४ रोजी झालेल्या वादळी वाऱ्यामुळे आश्रमशाळा इमारतीचे पत्रे उडून गेल्याचे व पडझड होऊन मोठे नुकसान झाल्याचे, कळवून सदर इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत, असे मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा, सुरूडी यांनी त्यांचे पत्र. क्र. १३१, दिनांक ७ जून २०१४ अन्वये कळविले असता, कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, बीड यांनी रुपये २९.०० लक्ष किमतीचे दुरुस्तीचे अंदाजपत्रक मान्यतेसाठी व निधी उपलब्धतेसाठी सादर केले होते.या कामासाठी त्यावेळी मंजुरी व निधी प्राप्त झाला नसल्यामुळे दुरुस्तीचे काम करण्यात आले नाही.

तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद यांचे पत्र. क्रं. २६७० दिनांक ०२.०७.२०१४ अन्वये सदरील इमारत जीर्ण झाल्याचे नमूद असल्याने व दुरुस्तीच्या कामांची किमत जास्त, देखभाल व दुरुस्तीच्या मानकात बसत नसल्याने सदर कामाची अंदाजपत्रके उपभोक्ता खात्यास सादर केली होती.

तसेच प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, औरंगाबाद यांचे पत्र. क्र. २३९०, दिनांक ९ जून २०१४ नुसार सदर इमारतीची पाहणी करून दुरुस्तीचे अंदाजपत्रक तात्काळ सादर करण्याच्या सूचना प्राप्त झाल्यानंतर सदर कामे सा.बां.विभागाच्या लेखाशिर्ष २०५९ अंतर्गत हाती घेण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही.

मुख्य अभियंता, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचे पत्र, जा. क्र. बांव्यक-२०१६/प्र.क्रं.१३/बांव्यक दिनांक २२ डिसेंबर २०१६ अन्वये सूचित केल्यानुसार " मार्च, २०१७ " पासून आश्रमशाळा, सुरूडीची इमारत, आदिवासी विकास विभागाकडे हस्तांतिरत करण्यात आली असून, या इमारतीची दुरुस्ती व देखभाल त्यांच्यांकडून होणे अपेक्षित आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणी

७. जिल्हा कारागृह, परभणी

अधीक्षक, जिल्हा कारागृह, परभणी हे डिसेंबर, २०११ पासून सतत तक्रार करत आहेत की कारागृहाचे छप्पर आणि कुंपणाची भिंत मोडकळीस आलेली आहे. तथापि, त्याची दुरुस्ती करण्याऐवजी छप्पर कोसळण्यापासून वाचविण्याकरिता कार्यकर्ता अभियंता यांनी त्याठिकाणी तात्पुरता छप्पराचा तिरका वासा बसविला आणि कुंपण भिंतीस कोणतीही दुरुस्ती केली नाही. महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली आणि नमूद केले की मार्च, २०१६ पर्यंत काम पूर्ण करण्यात येईल.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

परिच्छेदाच्या अनुषंगाने सादर करण्यात येते की, परभणी वि भागात जुन्या व देखभाल दुरुस्ती आवश्यक असलेल्या अनेक महत्त्वाच्या इमारती आहेत. विशेषत: विधी व न्याय विभागाच्या प्रशासकीय इमारती, पोलीस, गृह विभागाच्या इमारती मोठ्या प्रमाणावर असून त्यांची दुरुस्ती हाती घेणेबाबत संबंधित विभागाकडून पाठपुरावा होत असतो. कारागृह इमारतीच्या सोबतच्या उक्त विभागांची महत्त्वाची कामे ? प्रस्तावित करून ती कामे तातडीने हाती घेण्यात आली.

परभणी कारागृह इमारतीची मूळ इमारत सन १९९२ मध्ये बांधण्यात आलेली आहे. इमारत जुनी असून कारागृहाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील कॉरीडोअरच्या छताचे पुनर्बांधकाम नव्याने करणे आवश्यक होते. त्यानुसार गृह निर्माण, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय एएमए-१३१२/ प्र.क्र. २५७/तुरुंग/२, दिनांक ८/२०१३ अन्वये रुपये २५.१३ लक्ष किमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

कारागृह इमारतीच्या कामास प्रशासकीय मान्यतेनुसार अर्थसंकल्पात पुरेशी तरतुद होईपर्यंत काम हाती घेतले नव्हते.

आता सदर कामास निधी उपलब्ध झालेला असून विभागामार्फत निविदा प्रक्रिया निविदा निश्चितीच्या अंतिम स्तरावर असून दिनांक २० फेब्रुवारी २०१८ पर्यंत कार्यारंभ आदेश देऊन मार्च अखेरपर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

१.९ परिच्छेद क्रमांक ३.१.८ - देखभाल अनुदानातून भांडवली कामांचे निष्पादन.

सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे १९९१ मध्ये निर्गमित देखभाल व दुरुस्तीच्या (M&R) मार्गदर्शक तत्वांनुसार देखभाल अनुदानातून मूळ कामे नित्यक्रम म्हणून हाती घेण्यात येऊ नयेत. तथापि, खालील प्रकरणांमध्ये भांडवली खर्च देखभाल व दुरुस्ती निधीतून करण्यात आला, जे मार्गदर्शक तत्वांच्या विरुद्ध आहे.

१. मंत्रालय इमारतीचे मोठ्या प्रमाणात नूतनीकरण

जून, २०१२ मध्ये मंत्रालय इमारतीला (४ ते ७ मजला) मोठ्या प्रमाणात आग लागली ज्यात इमारतीच्या संरचनेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. डिसेंबर, २०१२ पासून इमारतीच्या नूतनीकरणाचे मोठे काम रुपये २४२.२५ कोटी अंदाजित किमतीवर हाती घेण्यात आले. हाती घेण्यात आलेली सर्व कामे भांडवली प्रकारची होती, जसे इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती, प्लंबिग, अग्नि प्रतिबंधक उपाययोजना कामे, मध्यवर्ती वातानुकूलित यंत्रणा (Heating, Ventilating and Air Conditioning (HVAC), आठ मित्सुबिशी उद्वाहक (elevators), १४ एस्केलेटर्स (सरकते जीने), आग विझवण्याची यंत्रणा बसविणे इत्यादिनांक तथापि, हे मुख्य शीर्ष-४०५९ (सार्वजनिक बांधकामावर भांडवली खर्च) ऐवजी मुख्य शीर्ष-२०५९ (प्रशासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्ती) अंतर्गत मंजुर करण्यात येऊन निष्पादित करण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने वस्तुस्थिती मान्य केली की नूतनीकरणाचे काम देखभाल व दुरुस्ती कामांच्या प्रवर्गात मोडत नाही. परंतु जेथे राज्य प्रतिष्ठा धोक्यात आहे अशा आकस्मिक स्थितीमध्ये ही कामे देखभाल व दुरुस्ती अंतर्गत करण्यात आली. तथापि महाराष्ट्र शासनाने असेही नमूद केले की महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने (HPC) मंत्रालयाच्या नूतनीकरणाचे काम मुख्य शीर्ष-२०५९ अंतर्गत करण्याचा निर्णय जाणीवपूर्वक घेतला.

महाराष्ट्र शासनाचे उत्तर वस्तुस्थितीनुरुप नाही कारण उच्चाधिकार समितीने जुलै, २०१२ मध्ये आयोजित केलेल्या त्यांच्या पहिल्या बैठकीत एकमताने मंत्रालयाच्या नूतनीकरणाचे काम स्वतंत्रपणे वेगळ्या निधीतून करण्यात येईल असा निर्णय घेतला होता.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

नूतनीकरणाचे काम जरी देखभाल व दुरुस्ती कामांच्या प्रवर्गात मोडत नसले तरी, जेथे राज्य प्रतिष्ठा धोक्यात आहे अशा आकस्मिक स्थितीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने (ज्यामध्ये मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य, सचिव-वित्त विभाग, तसेच सचिव- सा.बां.विभाग यांचा समावेश आहे.) मंत्रालयाच्या नूतनीकरणाचे काम मुख्यशिर्ष-२०५९ अंतर्गत करण्याचा निर्णय जाणीवपूर्वक घेतला आहे

प्रेसिडेंसी विभाग, मुंबई.

२.१. सारंग इमारत

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम क्षेत्र, मुंबई यांनी सारंग इमारतीतील दोन फ्लॅटस्चे रुपांतर विश्रांतीगृहात करण्याचे काम देखभाल व दुरुस्तीच्या शिर्षांतर्गत रुपये १.०१ कोटी किमतीत मंजुर केले (जून २०१४). महाराष्ट्र शासनाने नमूद केले की उच्च न्यायालय/सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांचेसाठी नेमून दिलेल्या शिष्टाचारास विचारात घेऊन या कामाचे निष्पादन करणे भाग पडले.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

' सारंग ' इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅटचे रूपांतर विश्रांतीगृहात करण्याचे काम पूर्ण झाले असून त्यांचा वापर मा. सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यांचेकडून होत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग, हिंगोली

३. औंढा येथील विश्रांतीगृह

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम क्षेत्र, औरंगाबाद यांनी औंढा हिंगोली येथे स्थित असलेल्या विश्रामगृहाच्या रुपये १९५ लक्ष किमतीच्या देखभाल आणि दुरुस्तीच्या कामाला मान्यता दिली (ऑक्टोबर, २०१२) कार्यकारी अभियंता, यांनी जुन्या विश्रामगृहाच्या दुरुस्तीच्या कामाऐवजी त्याच्या शेजारीच एक नवीन विश्रामगृह बांधण्याचे ठरविले. मार्च, २०१४ पर्यंत नवीन विश्रामगृहाचे रुपये ७८.३९ लक्ष किमतीचे बांधकाम निष्पादित करण्यात आले आणि त्यानंतर निधीच्या कमतरतेमुळे काम बंद करण्यात आले. महाराष्ट्र शासनाने मूळ मंजुर कामातील फेरबदलाबाबत कोणतेही उत्तर दिले नाही.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मुख्य अभियंता, औरंगाबाद यांनी एकूण रुपये १९५.०० किमतीचे विवक्षीत दुरुस्तीच्या एकूण ५ कामांना मंजुरी प्रदान केली होती. तथापि, निधी अभावी त्यापैकी केवळ ३ कामेच हाती घेता येऊ शकली. उर्वरित २ कामे हाती घेणे शक्य झाले नाही. तसेच शासकीय इमारतींच्या देखभाल व दुरुस्ती अंतर्गत केवळ विश्रामगृह नूतनीकरणाचेच काम हाती घेण्यात आलेले आहे. या लेखाशिर्षात रुपये २२.१२ लक्ष इतर खर्च माहे सप्टेंबर, २०१३ पर्यंत झालेला आहे.

तद्वतच, येथे सादर करण्यात येते की, ४०५९ सा.बां. भांडवली खर्च जिल्हा वार्षिक योजना (डी.पी.डी.सी.) या शिर्षात १८७.९१ लक्ष किमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त करून औढा नागनाथ येथे नवीन विश्राम गृहाचे काम हाती घेण्यात आले असून काम जवळपास पूर्ण झालेले आहे. या कामावर जिल्हा वार्षिक योजनांतर्गत रुपये १५१.२३ लक्ष खर्च झालेला असून सद्यःस्थितीत इमारतीचे काम पूर्ण झाले असून फर्निचरची कामे पूर्ण होताच नजीकच्या काळात वापर शक्य आहे.

१.१० परिच्छेद क्रमांक ३.१.९ - निवास करण्यास अयोग्य ठरविण्यांत आलेल्या इमारतीवर झालेला अनावश्यक खर्च.

मॅजेस्टीक आमदार निवास, कोलाबा, मुंबई ह्या इमारतीचे बांधकाम १९०९ मध्ये करण्यात आले आणि ती इमारत हेरिटेज (heritage) इमारत म्हणून घोषित करण्यात आली. प्रेसिडेंसी विभाग, मुंबई यांच्या दस्तावेजांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले की आय.आय.टी., मुंबई आणि एका खाजगी बांधकाम रचना सल्लागार (शशांक मेहेंदळे आणि असोसिएटस्) द्वारे ही इमारत निवास करण्यास अयोग्य, धोकादायक आणि

असुरक्षित आहे असे घोषित करण्यात आले (मे आणि जून २०१०), महानगरपालिका बृहन्मुंबई (MCGM) यांनी सुद्धा ही इमारत भग्नावस्थेत आहे आणि त्यात निवास करणे किंवा त्याचा वापर करणे धोकादायक आहे अशी धोक्याची सूचना प्रदर्शित केली (ऑक्टोबर, २०१३) असे असूनसुद्धा कार्यकारी अभियंता, प्रेसिडेंसी विभाग, मुंबई यांनी एप्रिल, २००९ आणि डिसेंबर, २०१५ दरम्यान या इमारतीच्या देखभाल आणि दुरुस्तीवर रुपये ९.२० कोटी खर्च केले.

महाराष्ट्र शासनाने नमूद केले की आमदारांकडून खोल्यांकरिता करण्यात आलेल्या जोरदार मागण्यांमुळे आणि मुंबईतील निवासव्यवस्थेच्या कमतरतेमुळे मॅजेस्टीक इमारतीतील खोल्या जरी ती इमारत वास्तव्य करण्यास अयोग्य घोषित करण्यात आली असती तरी तात्पुरत्या काळाकरिता आमदारांना वास्तव्यास देण्याशिवाय दुसरा विकल्प नव्हता. म्हणून, प्रेसिडेंसी विभाग, मुंबई यांना आमदारांच्या सूचनेवरून मॅजेस्टीक इमारतीतील नियमित दुरुस्ती कामे करावी लागली. महाराष्ट्र शासनाने असेही नमूद केले की डिसेंबर, २०१५ पर्यंत ९० टक्के इमारत रिकामी करण्यात आली असून इमारत पाडावयास सुरूवात करण्यात आली आहे.

इमारत बाजारात गर्दीच्या ठिकाणी उभी आहे ह्या वस्तुस्थितीमुळे जागा रिक्त करण्यात आणि इमारत पाडण्यात आणखी विलंब घोर आपत्तीजनक ठरू शकतो.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

आमदारांकडून खोल्यांकरिता करण्यात आलेल्या जोरदार मागण्यांमुळे आणि मुंबईतील निवासव्यवस्थेच्या कमतरतेमुळे मॅजेस्टीक इमारतीतील खोल्या जरी ती इमारत वास्तव्य करण्यास अयोग्य घोषित करण्यात आली असली तरी, तात्पुरत्या काळाकरिता आमदारांना वास्तव्यास देण्याशिवाय दुसरा पर्याय / विकल्प उपलब्धनसल्यामुळे प्रेसिडेंसी विभाग, मुंबई यांना आमदारांच्या सूचनेवरून मॅजेस्टीक इमारतीतील नियमित दुरुस्तीची कामे करावी लागली आहेत. इमारत बाजारात गर्दीच्या ठिकाणी स्थित असल्याने सदरील जागा रिक्त करण्यात आणि इमारत पाडण्यात अडचणीची व आपत्तीजनक बाब ठरू शकते.

माहे डिसेंबर, २०१६ मध्ये सदरील इमारतीतील कक्ष सन्माननीय सदस्यांकडून खाली करून घेण्यात आले आहेत. इमारतीमध्ये एकूण २३ व्यसायिक गाळे असून सदर गाळे रिक्त करण्याची कार्यवाही चालू आहे. त्यापैकी काही गाळेधारकांनी निष्कासन प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यांबाबत मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त होणाऱ्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१.११ परिच्छेद क्रमांक ३.१.१०- रंगलेप कामांच्या निष्पादनात संशयास्पद फसवणूक.

घाटकोपर येथील पोलीस क्वार्टर्स येथे १७ इमारती (९८० क्वार्टर्स) आहेत ज्यात रेल्वे पोलीस कर्मचारी राहतात. कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई विभाग यांनी सप्टेंबर, २०१२ ते मार्च, २०१४ (१९ महिने) दरम्यान सर्व ९८० क्वार्टर्सच्या आतील भागाच्या रंगलेपाची कामे केली. तथापि, यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या सात इमारतींच्या (४२० क्वार्टर्स) मोजमाप पुस्तिकेच्या छाननीत असे निदर्शनास आले की या क्वार्टर्स मध्ये एकाच कालावधीत दोन वेळा रुपये ६२.०६ लक्ष किमतीची रंगलेपाची कामे निष्पादित करण्यात आली. लोहमार्ग पोलीस मुख्यालय, घाटकोपर द्वारे करण्यात आलेल्या (फेब्रुवारी २०१५) आंतरिक सर्वेक्षणातही असे आढळले की ४२० पैकी २२२ क्वार्टर्स मध्ये रंगलेपाची कामे प्रत्यक्षात करण्यातच आली नाही. परंतु मागील पाच वर्षांत (२०१०-१५) यावर रुपये ३२.७८ लक्ष खर्च करण्यात आल्याचे दर्शविले आहे. १९ महिन्यांच्या कालावधीत रंगलेपाचे काम दोन वेळा केल्यामुळे शासकीय इमारतीच्या आतील बाजूच्या रंगलेपाच्या कामाकरिता नेमून दिलेल्या कालावधीचे (जे १९९१ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या परिशिष्ट 'F' प्रमाणे तीन वर्षांतून एकदा आहे) उल्लंघनच होत नाही तर सर्वेक्षणाच्या निष्कर्षावरून पोलीस क्वार्टर्सच्या रंगलेपाच्या कामात संशयित फसवणूक झाल्याचे दिसते. कंत्राटदाराला भुगतान करण्यापूर्वी जर उपयोगकर्त्याकडून फीड बॅक घेण्यात आला असता तर सर्वेक्षणाचा उद्देश्य योग्य प्रकारे सफल झाला असता.

महाराष्ट्र शासनाने नमूद केले की ही बाब तपासणीकरिता दक्षता आणि गुणवत्ता नियंत्रण मंडळास कळविण्यात आली आहे.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सदर कामांची चौकशी करण्याचे निर्देश मुख्य अभियंता स्तरावरून दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन यांना दिलेले असून चौकशीची कार्यवाही प्रगतीत आहे.

१.१२ परिच्छेद क्रमांक ३.१.११ - कमकुवत आंतरिक नियंत्रण आणि संनियंत्रण.

प्रभावी आंतरिक नियंत्रण चुकीची आणि अनियमिततेची जोखीम कमी करते आणि उधळपट्टी, दुरुपयोग आणि गैरव्यवस्था यामुळे होणाऱ्या हानिस रोखून साधनसंपत्ती टिकविण्यास मदत करते. सार्वजनिक बांधकाम विभागातील आंतरिक नियंत्रण आणि संनियंत्रणाच्या पद्धतीत खालील कमकुवतपणा आढळला :–

- सात पैकी चार मंडळांनी देखभाल व दुरुस्ती कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्याकरिता २०१०-१५ दरम्यान उपयोगकर्ता विभागासोबत त्रैमासिक बैठक आयोजित केली नाही.

- मंडळाचे अधीक्षक, अभियंता देखभाल व दुरुस्तीची कामे सुरू असतांना त्यांचे प्रत्यक्ष निरीक्षण नियमितपणे करत होते परंतु विभागीय स्तरावर १३ पैकी फक्त तीनच विभागांच्या कार्यकारी अभियंत्यांनी २०१०-१५ दरम्यान देखभाल व दुरुस्ती कामांचे नियमितपणे निरीक्षण केले. महाराष्ट्र शासनाने नमूद केले की निरीक्षण नियमितपणे करण्यात आले परंतु निष्कर्षाचे दस्तावेज तयार करण्यात आले नाही. निरीक्षण प्रक्रियेचे दस्तावेज तयार न केल्यामुळे प्रभावी संनियंत्रण आणि देखभाल व दुरुस्तीच्या कामांच्या निष्पादनात दाखविण्यात आलेल्या त्रुटींचा पाठपुरावा करणे यात अडथळा निर्माण होऊ शकतो.

- निविदेच्या अटींनुसार, बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची गुणवत्ता कंत्राटदाराद्वारे शासकीय प्रयोगशाळेत तपासून घ्यावयास हवी. दक्षता आणि गुणवत्ता नियंत्रण मंडळाद्वारे कंत्राटदारास प्रमाणपत्र देण्यात येते जे कंत्राटदाराच्या चालू लेखा देयकासोबत दाव्यांचा निपटारा करण्याकरिता जोडलेले असावयास हवे. उत्तर मुंबई विभागात, चालू लेखा देयकांसोबत जोडलेल्या २९ गुणवत्ता प्रमाणपत्रांच्या लेखापरीक्षा पडताळणीत असे आढळले की २९ पैकी २५ प्रमाणपत्र दक्षता आणि गुणवत्ता नियंत्रण मंडळाद्वारे जारी करण्यात आली नव्हती, यावरून कामाच्या गुणवत्तेत तडजोड करण्यात आली आहे असे निदर्शनास येते. महाराष्ट्र शासनाने लेखापरीक्षेस सूचित केले की या गंभीर चुकीमुळे १९ अभियंत्यांना सप्टेंबर, २०१५ मध्ये निलंबित करण्यात आले होते आणि संबंधित संशयित कंत्राटदारांची नावे काळ्या यादीत टाकण्यासाठी कारवाई सुरू करण्यात आली आहे.

- सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मे, १९८८ च्या परिपत्रकाप्रमाणे, सर्व अधीक्षक अभियंत्यांनी प्रत्येक देखभाल दुरुस्तीच्या कामांना प्रदान केलेले जॉब क्रमांक दर्शविणारी नियंत्रण नोंदणी पुस्तिका ठेवणे आवश्यक होते. ही नियंत्रण पुस्तिका कामाच्या प्रगतीवर संनियंत्रण आणि वाटप केलेल्या निधीतून केलेल्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की २०१०-१५ दरम्यान सात पैकी चार मंडळांनी नियंत्रण नोंदणी पुस्तिका ठेवलीच नाही. जॉब क्रमांकाकरिता नियंत्रण नोंदणी पुस्तिका न ठेवणे हे जादा कामांना मंजुरी दिल्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक दायित्व जमा होण्यामागील एक कारण आहे, जे परिच्छेद ३.१.२ मध्ये चर्चिले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मे २००६ च्या परिपत्रकाप्रमाणे, देयकांचे प्रदान करतांना पारदर्शितेची खात्री करण्याकरिता आणि प्रदान करतेवेळी कंत्राटदारांच्या पक्षपाती वागणूक देण्याच्या अनावश्यक तक्रारी टाळण्याकरिता, सर्व विभागांनी, एक प्रलंबित देयक पुस्तिका ठेवावयास पाहिजे ज्यात कंत्राटदाराच्या चालू लेखा देयकाची नोंद घ्यावयास पाहिजे. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की २०१०-१५ दरम्यान १३ पैकी सात विभागांद्वारे प्रलंबित देयक पुस्तिका ठेवण्यात आल्या नाही.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीतील कामांचे निरसन करण्यात आले असून भविष्यात निरसनाबाबतच्या योग्य त्या टिप्पण्या व त्यांचे अनुपालन याबाबत दक्षता घेण्यात येईल.

मुंबई सा.बां. मंडळांतर्गत दरवर्षी जानेवारी/एप्रिल/जुलै/ऑक्टोबर मध्ये उपभोक्ता विभाग प्रमुखासमवेत त्रैमासिक बैठका घेऊन देखभाल व दुरुस्तीबाबत समन्वय राखण्यात येतो.

शासकीय निवासी/अनिवासी इमारतींच्या दुरुस्ती कामांबाबत उपभोक्ता खात्याच्या प्रतिनिधींसोबत दिनांक २६ मे २०१५ रोजी सा.बां. मंडळ, नांदेड येथे बैठक घेण्यात आली असून विभागीय स्तरावर देखील अशा बैठकांचे आयोजन करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, मंडळ स्तरावर अशा बैठका नियमितपणे होणे बाबत दक्षता घेण्यात येत आहे.

मंडळ कार्यालयाच्या अधिनस्त सर्व विभागीय कार्यालयांना शासनाच्या विहित नियमानुसार Pending bill Register च्या ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मंडळ कार्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या दुरुस्ती कामाच्या मंजुरीबाबतचे Job No Register मंडळ कार्यालयात ठेवण्यात आले आहे.

दक्षता आणि गुणनियंत्रण मंडळाद्वारे साहित्याच्या चाचणीपोटी देण्यात येणारे चाचणी निष्कर्ष कंत्राटदाराच्या चालू /अंतिम देयकासोबत जोडण्याबाबतच्या सूचना सर्व विभागीय कार्यालयांना देण्यात आले आहेत.

सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर अंतर्गत सन २०१० ते २०१५ दरम्यान उपभोक्ता विभागांसोबत दिनांक ३१/०७/२०१३ रोजी बैठक घेण्यात आलेली होती. याशिवाय अन्य बैठका दिनांक ०५.०८.२०१४, दिनांक २२.०६.२०१५ व दिनांक १६.०७.२०१५ ह्या दिनांकास कार्यकारी अभियंता स्तरावर बैठकी घेण्यात आल्या आहेत.

सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर अंतर्गत सद्य:स्थितीत संगणकाचा वापर करण्यात येत असल्याने देखभाल व दुरुस्तीच्या मंजुर कामांना प्रदान केलेले जॉब क्रमांक दर्शविणारी पुस्तिका ही नस्तीमध्ये संलग्न करण्यात येते. विभागनिहाय कामांच्या नस्त्या कार्यालयात उपलब्ध आहेत. नवीन जॉब क्रमांक देताना यापूर्वी मंजुर केलेल्या जॉब नंबरच्या दायित्वाचा विचार करूनच प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यात येतात. यामुळे आर्थिक दायित्व मर्यादित ठेवण्यात येते. सन २०१६ पासून प्रभावी नियंत्रणासाठी बी.डी.एस. प्रणालीतच दुरुस्तीचे कामनिहाय जॉब क्रमांक व खर्चाचा तपशिल ठेवण्यात येतो.

या मडळांतर्गत उस्मानाबाद, बीड व लातूर जिल्ह्याकरिता विविध उपभोक्ता खात्याच्या इमारती दुरुस्ती विषयक आढावा बैठक घेण्यात येते.मंडळस्तरावर बैठक संपन्न न झाल्यास विभागीय स्तरावर या प्रकरणी बैठक आयोजित करून इमारत दुरुस्ती विषयक बाबीची प्राधान्यक्रमाने कामे हाती घेण्याबाबतची सूची करण्यात येते.त्यानुसार विभागीय स्तरावर इमारत दुरुस्तीच्या कामाकरिता जॉब क्र.मिळण्याकरिता प्रस्ताव मंडळकार्यालयात सादर केले जातात.विहित निकषानुसार अत्यावश्यक दुरुस्तीच्या बाबीकरिता मंजुरी प्रदान करण्यात येते.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र. ३.६ " कामाच्या अतिरिक्त बाबींना अनियमित मंजुरी "** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

१.१३ परिच्छेद क्र. ३.६ कामाच्या अतिरिक्त बाबींना अनियमित मंजुरी

निविदेतील अटींच्या विरुद्ध मुख्य अभियंता, नाशिक यांनी नंदुरबार जिल्ह्यातील हातोडा येथील तापी नदीवर मोठा पूल बांधण्याचे रुपये ४.४८ कोटीचे काम अतिरिक्त बाब म्हणून मंजुर केले, जे अनियमित होते.

निविदेतील अटींच्या विरुद्ध मुख्य अभियंता, नाशिक यांनी नंदुरबार जिल्ह्यातील हातोडा येथील तापी नदीवर मोठा पूल बांधण्याचे रुपये ४.४८ कोटींचे काम अतिरिक्त बाब म्हणून मंजुर केले, जे अनियमित होते. मार्गावरील हातोडा येथे तापी नदीवर मोठा पूल रुपये ३०.१९ कोटी अंदाजीत खर्चात बांधण्याच्या कामासाठी लम्पसम तत्वावरील निविदा मागविली होती (सप्टेंबर २००८). कामाची जागा गुजरात तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये व्यापलेली होती. गुजरात राज्यातील उकाई धरणाच्या १२० कि.मी. सखल भागातील बँकवॉटर आणि तापी नदीच्या उर्ध्व भागाकडील हतनूर धरण आणि सूलवाडा, सारंगखेडा आणि प्रकाशा बंधाऱ्या मधून होणाऱ्या उत्सर्जनाचा परिणाम या स्थानावर होत होता. उपरोक्त धरण/ बंधाऱ्या मधून होणाऱ्या अनियमित उत्सर्जनामुळे पुलाचे काम करण्यासाठी पाण्याची न्यूनतम पातळी निश्चित करणे कठीण होते. अत:, रेखांकने ही ढोबळ स्वरूपाची व दर्शक स्वरूपाची असून कंत्राटदाराने त्याचे काम त्यानुसार नियोजित करावे असे निविदेतील अटींमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. तसेच, काम प्रगतीपथावर असताना पाण्याच्या न्यूनतम पातळीत बदल झाल्यास त्यासाठी कामाच्या अतिरिक्त बाबीचा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नव्हता. कामाच्या जागेच्या स्थितीनुसार पाण्याच्या प्रवाहात देखील काम केले जाईल अशाप्रकारचे स्वाक्षांकीत घोषणापत्र कंत्राटदाराने देण्याची अट देखील निविदेमध्ये नमूद केली होती.

EE नी रुपये ३४.४० कोटी खर्चाचे मोठा पूल बांधण्याचे लम्पसम (lump sum) कंत्राट राजदीप बिल्टकॉन प्रायव्हेट लिमिटेड (कंत्राटदार) यांना दिले (फेब्रुवारी २००९) जे फेब्रुवारी २०११ पर्यंत पूर्ण करावयाचे होते. कंत्राटदाराला मार्च २०१६ पर्यंत चार वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. डिसेंबर २०१५ रोजी काम प्रगतीपथावर होते आणि सप्टेंबर २०१५ पर्यंत त्यावर रुपये ४२.१९ कोटी खर्च करण्यात आला होता. निविदेतील अटींनुसार कंत्राटदाराने त्याला कामाच्या जागेच्या परिस्थितीविषयी आणि काम प्रत्यक्ष पाण्यात करावे लागणार असल्याविषयी जाणीव असल्याचे स्वाक्षांकीत घोषणापत्र देखील दिले होते.

EE कडील दस्तावेजांच्या छाननीमध्ये (जानेवारी २०१५) असे आढळून आले की जानेवारी २००९ मध्ये किमतीविषयी वाटाघाटी करताना कंत्राटदाराने हे स्पष्टपणे नमूद केले की, सदर पूलाची जागा अशा ठिकाणी आहे की जेथे प्रस्तावित जागेवरील उर्ध्व तसेच सखल बाजूस धरण असल्याने संपूर्ण काम हे पाण्याच्या प्रवाहात करावे लागणार आहे. या जागेची परिस्थिती लक्षात घेता तेथे तात्पुरता बंधारा (cofferdams) बांधणे तसेच पाण्याचा उपसा करणे, कामाच्या जागेवर तात्पुरत्या पायऱ्या बांधणे आणि जागेपर्यंत पोहोचणे यावरील खर्च मोठ्या प्रमाणात होणार

होता. कंत्राटदाराने पुढे असे मत व्यक्त केले की रुपये ३४.४० कोटीची बोली/प्रस्ताव सर्वात योग्य आणि अंतिम होता कारण, तो एका तज्ज्ञ संरचना सल्लागाराने निश्चित केलेल्या प्रमाणाच्या आणि सध्याच्या बाजारातील परिस्थितीनुसार केलेल्या दर विश्लेषणाच्या आधारावर करण्यात आला होता.

निविदेतील अटींच्या तसेच किमतीच्या वाटाघाटी दरम्यान कंत्राटदाराने दिलेल्या स्पष्टीकरणाच्या विरुद्ध, मुख्य अभियंता, नाशिक यांनी पाण्याची पातळी वाढल्यामुळे P2, P3 आणि P4 पीयर्सच्या ठिकाणी विहीरीचा पाया खणण्यासंबंधीच्या कामासाठी बंधारा, तात्पुरता पूल, कामासाठी फलाट इत्यादींचे बांधकाम करण्यासाठी कंत्राटदाराने केलेल्या विनंतीमुळे (नोव्हेंबर, २०१३) रुपये ४.४८ कोटीची अतिरिक्त बाबींची दरयादी (EIRL) मंजुर केली (डिसेंबर २०१३)

पूलाचे बांधकाम लवकर पूर्ण होण्यासाठी होत असलेली जनतेची मागणी लक्षात घेऊन, तसेच P2, P3 आणि P4 पीयर्ससाठी पाण्याची पातळी खूपच जास्त असल्यामुळे EIRL ला मंजुरी देण्यात आली असे क्कनी सांगितले (जानेवारी २०१५).

अशाप्रकारे, कंत्राटदाराला रुपये ४.४८ कोटीच्या EIRL ची मंजुरी देणे अनियमित होते.

हे प्रकरण शासनास कळविण्यात आले (जुलै २०१५); त्यांचे उत्तर प्रतिक्षित आहे (डिसेंबर २०१५).

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

नंदुरबार तळोदा रस्त्यावर तापी नदीवर हातोडा गावाजवळ नंदुरबार सज्जीपुर तळोदा रस्त्यावर मोठ्या पूलाचे बांधकाम करणे [पूर्वीचा प्रजिमा.५९ व आजचा राष्ट्रीय महामार्ग क्र.७५३ (ए)] या कामाची " क " नमुन्यातील निविदा (Lump sum Contract) (निविदा किमत रुपये ३०.९० कोटी) रक्कमेची निविदा बोलविण्यात आली होती. या कामासाठी रुपये ३४.४० कोटी इतक्या रकमेची निविदा स्विकृत करण्यात आली होती. कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, नंदुरबार यांनी पत्र क्र.निविदा/१५५२/२००९ दिनांक २८/०२/२००९ रोजी या कामास कार्यारंभ आदेश दिलेला आहे. सदरील कामाची मूळ मुदत २ वर्ष म्हणजेच दिनांक २७/०२/२०११ पर्यंत होती. या पूलाचे ६२.५० मीटर चे प्रत्येकी १० गाळे असून, पूलाची लांबी ६२५ मीटर इतकी आहे. या पूलाच्या पीयर्सला तळोदा गावाकडून P.1, P.2, P.3, P.4, P.5, P.6, P.7, P.8, P.9 असे क्रमांक देण्यात आलेले होते.

मंजुर निविदेत नदी पात्रातील पाण्याची पातळी (Lowest Water Level) मार्ग प्रकल्प विभाग, धुळे यांचेकडून व नंदुरबार रेल्वे स्टेशनच्या Plat Form ची RL फीक्स धरुन तापी नदी पात्रापर्यंत सर्वे केला आहे. त्यानुसार तापी नदीची २००६ मध्ये सर्व्हे करत असतांना तापी नदीच्या पाण्याची न्युन्यतम RL ८९.२० मीटर आली आहे. त्याच वेळेस उकई धरणाच्या बुडीत क्षेत्राचे गेल्या ३४ वर्षांच्या न्यूेन्यतम पाण्याची पातळी ८६.८८० मी. इतकी येते ती तापी नदीच्या RL पेक्षा २.३२ मी. ने कमी येते. परंतु पूलाच्या साईटवर (Lowest Water Level) RL ८९.२० मी येत असल्याने जर उकई धरणाचा विचार केला तर उकई धरणाचे पाणी सरासरी ८.०० कि.मी. आधीच आटून जाईल व पूलाच्या साईटवर पाणीच शिल्लक राहणार नाही. कारण उकई धरणाचे बुडीत क्षेत्राच्या न्युनतम पाण्याची पातळी ही प्रकाशा बॅरेज पर्यंत असते आणि प्रकाशा बॅरेज हा पुलाच्या अस्तित्वातील upstream बाजुस तब्बल १३.०० कि.मी. अंतरावर आहे. त्यावर पुलाच्या ठिकाणी घेतलेले RL ८९.२० मी. ही योग्य आहे व आपल्या RL मध्ये उकई धरणाच्या RL मध्ये किमान २.३२ मी. इतका फरक येतो.

पुलाच्या Downstream बाजुस कुकुरमुंडा पुल हा १०.०० कि.मी. अंतरावर आहे व त्याचे अंदाजपत्रक करतांना देखील पाण्याची पातळी ९२.५० मी. घेण्यात आली होती. त्यानुसार सन २०१० मध्ये तापी नदीच्या पात्रामध्ये RL ८६.९३६ + २.३२ मी. म्हणजे ८९.२५६ मी. पाण्याची पातळी असल्याने P.1, P.2, P.3, P.4, P.5, P.6, P.7, P.8, P.9 ही सर्व Well Foundation करण्यात आली व P.2, P.3, P.4 ही Well Foundation ऑगस्ट-२०१० मध्ये तापी नदीच्या पुरात बुडुन गेली व मागील ३० वर्षांचा अनुभव पहाता पुढील वर्षी ही Well Foundation एप्रिल ते जून-२०११ दरम्यान काम करण्यास उपयोगात येतील हा अंदाज होता. या दरम्यान उर्वरीत Well Foundation व Abutment जसे की, A-1, P-1, P-5, P-6, P-7, P-8, P-9 व Abutment A-2 ही करण्यात आली. परंतु सन २०१० नंतर पाण्याची पातळी काही कमी झाली नाही. असे करत असतांना सन-२०११ ते २०१३ या वर्षात पाण्याची पातळी कमी न होता, पाण्याची पातळी खालीलप्रमाणे आढळून आली. ही माहिती कार्यकारी अभियंता, उकई विभाग, क्र.१, उकई यांनी त्यांच्या पत्र जा.क्र. उकई-१/पीबी-४/तापी/हातोडा पुल/२२० दिनांक २७/१०/२०१४ नुसार देण्यात आली आहे व त्यात हातोडा पुलाच्या RL चा फरक नमूद करून पुलाच्या साईट वरील पाण्याच्या पातळीची RL नमूद केली आहे व Water level मध्ये फरक होऊ शकतो व उकई डॅमच्या Water level व आपल्या साईटवरील RLमध्ये फरक

होऊ शकतो, आशयाचे पत्र कार्यकारी अभियंता, उकई विभाग क्र.१, उकई त्यांचे पत्र जा.क्र. उकई-१/पीबी/ हातोडा ब्रिज/१२७७, दिनांक २८/४/२०१७ अन्वये दिले आहे.

	अस्तित्वातील पाण्याची उंची				
वर्ष	उकई धरणाचे RL	तापी नदीचा RL चा फरक	खरोखर	कामावरील RL	L.W.L.
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
२०११	९३.५८२	२.३२	९५.९०२	८९.२०	६.७०२
२०१२	९१.५०६	२.३२	९३.८२६	८९.२०	४.६२६
२०१३	९३.३३८	२.३२	९५.६५८	८९.२०	६.४५८
		सरासरी	९५.१३० मी.		५.९३ मी.

सन २०११ ते २०१३ पर्यंत P.2, P.3, P.4 ही Well Foundation हाती न घेतल्याने ठेकेदाराचे उर्वरीत सर्व काम पूर्णत्वाच्या टप्प्यात आणुन ठेवले होते व P.2, P.3, P.4 या Well Foundation वर सरासरी ५.९३ मी. पाणी असल्याने ही Well Foundation हाती घेता येत नव्हती व S.E., Design Circle (Bridge) यांनी मंजुरी केलेल्या Well Foundation च्या Well Cap Top ची RL ९०.७० मी एवढी होती. त्यामुळे सदर Well Foundation वर ९५.१३ + १.०० मी. म्हणजे ९६.१३ मी ऐवढे मातीकामाचा Coffer Dam केला असता तरी Well Sinking करतांना RL ९०.७० मी. ही ९६.१३ मी. पेक्षा कमी असल्याने संपूर्ण मातीकाम वाहून गेले असते. त्यामुळे Earthen Coffer Dam करणे ही संकल्पना या Well Foundation साठी कदापी चालली नसती. तसेच उकई धरणाच्या बुडीत क्षेत्राचा सन १९७५ ते २०१३ पर्यंतचा Lowest Water Level व Maximum Water Level चा Data सोबत जोडला आहे. वरील उकई धरणाची बुडीत क्षेत्राच्या पाण्याची RL ही जून ते जुलै अखेरची असल्यामुळे पाण्याची पातळी कमी आहे. परंतु मार्च ते जून पर्यंत असे एकूण ४ महिने एका वर्षात काम करता येते. म्हणजेच मार्च महिन्यात याच पाण्याची पातळी सरासरी ३.०० मी. ने जास्त असते. जी कमी होता होता जून महिन्यापर्यंत ८९.२० मी. २००६ पर्यंत दिसते व २०१० साली काम करतांना प्रत्यक्षात आली नाही. परंतु सरासरी जुलै च्या पहिल्या आठवड्यात तापी नदीस पूर येतो तेव्हा काम पूर्णत: बंद होते. सदर अंदाजपत्रक करतेवेळेस P.2, P.3, P.4, P.5 या Foundation ची सरासरी RL ९५.१३० मी. घेतली असती तर Well Cession Foundation करणे गरजेचे राहिले असते. त्यानुसार अंदाजपत्रकाची किमत बऱ्याच प्रमाणात वाढली असती व त्या अंदाजपत्रकाच्या किमतीवर आजतागायत किंवा काम पूर्ण होईपर्यंत त्या रक्कमेवर कंत्राटदारास प्राईज एसक्सलेशन देणे देखील बंधनकारक राहिले असते. ती किमत आजच्या Complication of Project cost पेक्षा जास्त राहिली असती.

या सर्व बाबींचा विचार करून मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांना ठेकेदाराकडून पत्र क्र. आरबीपीएल/०६६८ दिनांक १/११/२०१३ रोजी P.2, P.3, P.4 ही Foundation कशा रितीने बाहेर काढता येईल, या बाबत खालील पर्याय सुचविण्यात आले :–

(१) पर्याय क्र. १ :- मंजुर संकल्पनेप्रमाणे Well Foundation करण्या ऐवजी Well Foundation करून त्यावर Pile Cap करणे.

(२) पर्याय क्र. २ :- मंजुर संकल्पनेप्रमाणे Well Foundation करावे तथापि, यासाठी Foundation भोवती लोखंडी Water tight Well Caisson करणे तसेच Foundation च्या जागेवर Crane व बांधकाम साहित्य पाहोचविण्यासाठी नदी काठापासून ते P.1, P.2, P.3 व P.4 या Well Foundation पर्यंत Temporary Bridge & Platform तयार करणे.

(३) पर्याय क्र. ३ :- या तीनही पीयर्सच्या Well Foundation चे काम इतर पीयर प्रमाणेच, परंतु पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर करणे.

वरील ३ पर्यायावर निर्णय घेण्यासाठी मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, नाशिक, अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, धुळे, अधीक्षक अभियंता, संकल्पचित्र मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई, कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, नंदुरबार व कार्यकारी अभियंता, संकल्पचित्र विभाग, नाशिक यांनी सविस्तरपणे चर्चा करून खालील निर्णय घेतला.

(१) पर्याय क्र. १ प्रमाणे काम केल्यास मूळ मंजुर पूलाच्या GAD मध्ये बदल होणार होता व हा नवीन पर्याय या पूर्वी काम पूर्ण झालेल्या Well Foundation शी हे काम सुसंगत होणार नव्हते. त्यामुळे सदर पर्याय नामंजुर करण्यात आला. या पर्यायासाठी कंत्राटदाराने रुपये ७.८६ कोटी इतक्या जादा रकमेची मागणी केली होती.

(२) पर्याय क्र.३ प्रमाणे मातीचा बांध (Coffer Dam) तयार करून काम करण्यासाठी या तीनही पीयर्सच्या ठिकाणी पाण्याची पातळी कमी होण्याची वाट पहावी लागणार होती. सदरील पूलाची जागा ही उकई धरणाच्या बुडीत क्षेत्रात येते व धरणातील पाणी कमी झाल्यानंतर पूलाच्या बांधकामाच्या जागेवरील पाण्याची पातळी कमी होणार होती. तसेच पूलाच्या वरच्या बाजुस हतनुर धरण, सुलवाडे, सारंगखेडा, प्रकाशा बॅरेज असून, यातून पाण्याचा विसर्ग वेळोवेळी सोडण्यात येत होता. या कारणामुळे पाण्याची पातळी कमी होण्यास किती कालावधी वाट पहावी लागेल हे सांगता येत नव्हते. त्यामुळे हा पर्याय सुद्धा स्विकारण्यात आला नाही. या पर्यायासाठी कंत्राटदारास अनिश्चित कालावधीसाठी मुदतवाढ लागली असती व त्यासाठी भाववाढी पोटी (Escalation) मोठी रक्कम अदा करावी लागली असती.

(३) पर्याय क्र.२ मध्ये Well Foundation करण्यासाठी पीयर्सच्या सभोवताली Watertight लोखंडी Well Caisson तयार करून Well Foundation करणे व या ठिकाणी अवजड क्रेन तसेच बांधकाम साहित्य पोहचविण्यासाठी नदी काठावरून लोखंडी पूल व Platform तयार करून काम केल्यास, मूळ मंजुर संकल्पने प्रमाणे काम करणे शक्य होणार होते. त्यामुळे सदरील पर्याय मान्य करण्यात आला.

वरील मान्य करण्यात आलेल्या पर्याय क्र. २ प्रमाणे काम करण्यासाठी कंत्राटदाराने रुपये ४.४८ कोटी इतक्या अतिरिक्त रकमेची मागणी नोंदविली होती व ती वाजवी असल्याने निविदेतील CSD नुसार मान्य करण्यात आली आहे.

सदरील पुलाचे संकल्पनेस संकल्पचित्र मंडळ (पूल) कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडून मंजुरी मिळण्यासाठी लागलेला अवधी तसेच Standing Water मुळे काम पूर्ण करण्यासाठी लागलेला अवधी विचारात घेऊन कंत्राटदारास एकूण ५ वेळा मुदतवाढ (दिनांक ३१/०३/२०१७ अखेर पर्यंत) द्यावी लागली आहे. आता काम पूर्णत्वास आले आहे.

पर्याय क्र.२ नुसार काम केले नसते तर हे काम पूर्ण करण्यासाठी अनिश्चित कालावधी लागला असता व पूल वाहतुकीस उपलब्ध करून देता आला नसता. त्यामुळे सदरील रुपये ४.४८ कोटी हा वाढीव खर्च अनावश्यक नसून पूलाचे काम पूर्ण करण्यासाठी व जनहितार्थ आवश्यक होता.

या संदर्भात महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचे अभिप्राय :–

Reply is not acceptable as there is no provision of sanctioning extra items under lump sum contract. Moreover, the contractor had given the signed declaration that he is aware of site condition and that the work may have to be carried out in standing water. Therefore, sanctioning of extra item of Rs 4.48 crore to the contractor was irregular.

The present status of the bridge and the total cost incurred on the bridge including EIRL sanctioned may be included in the reply to PAC.

महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचे अभिप्रायावर विभागाचे स्पष्टीकरण :-

पुलाचे हाती घेण्यात आलेले काम पूर्ण व्हावे या हेतूने EIRLचे काम मंजुर करण्यात आले होते. स्विकृत करण्यात आलेल्या निविदेमध्ये EIRL चे काम मंजुर नव्हते.

या कामावर एकूण रुपये ४६.०८ कोटी इतका खर्च झालेला आहे. यामध्ये मूळ कामावरील खर्च रुपये ४१.६० कोटी असून यामध्ये EIRL वरील खर्च रुपये ४.४८ कोटी देखील अंतर्भूत आहे. सदर पुल दिनांक १५.०७.२०१७ रोजी वाहतुकीस खुला करण्यात आला आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र. ३.७ " आकस्मिक कामांसाठी तदतूद अनधिकृत वळविणे "** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

१.१४ परिच्छेद क्र. ३.७ आकस्मिक कामांसाठी तदतूद अनधिकृत वळविणे.

अधीक्षक अभियंता (SE) सार्वजनिक बांधकाम मंडळ, रायगड, यांनी लोक लेखा समिती (PAC) च्या शिफारशींचा आणि महाराष्ट्र सार्व. बांधकाम नियम पुस्तिकेमधील तरतुदींचा भंग करून नवे नगर, महाड, जि. रायगड येथे भांडारगृह आणि अभिलेख कक्ष बांधण्यासाठी २५ कामांतील आकस्मिक खर्चासाठी रुपये १.४५ कोटींची तरतूद अनधिकृत वळविली. या मुद्याबाबत शासनाचा खुलासा खालीलप्रमाणे करण्यात येत आहे :-

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंडळातील कार्यालये, विभाग आणि उप-विभागात अतिरिक्त बांधकामे करणे, फेरफार करणे, दुरुस्ती करणे, नूतनीकरण करणे तसेच शासकीय विश्रांतीगृहांची दुरुस्ती करणे यासाठी सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे येथे रुपये १.५५ कोटीची आकस्मिक कामांसाठीच्या तरतूदींची रक्कम वळविण्यात आल्याविषयी मार्च, २००८ रोजी संपलेल्या वर्षासाठीच्या भारताचे नियंत्रक आणि

महालेखापरीक्षक यांच्या अहवालात (नागरी) परिच्छेद ४.४.२ मध्ये उल्लेख करण्यात आला होता. राज्य विधानमंडळाला सादर केलेल्या (ऑगस्ट, २०१३) राज्य लोक लेखा समितीच्या (PAC) १३ व्या अहवालात अशी शिफारस करण्यात आली होती की, निधी अशाप्रकारे वळविणे अनियमित असल्याने ज्या कामांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद केली गेली नसेल किंवा ज्या कामांना राज्य विधानमंडळाची मान्यता प्राप्त झाली नसेल त्यावरील कोणताही खर्च मंजुर केला जाऊ नये.

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम (MPW) नियमपुस्तिका, १९८४ च्या परिच्छेद १४५ नुसार कामाच्या अंमलबजावणी दरम्यान अचानक उद्‌भवणाऱ्या आकस्मिक बाबींसाठी स्वतंत्र उपशीर्ष आकस्मिकता अंतर्गत कामाच्या अंदाजित किमतीच्या पाच टक्के इतकी तरतूद करावी. अशी तरतूद खर्चाच्या ज्या बाबीसाठी अंदाजपत्रकात तरतूद केली नसेल व ती बाब त्या कामाशी कितीही निगडित असेल तरी त्या नवीन बाबीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मंजुरी प्राप्त केल्याशिवाय तरतूद वळविण्यात येऊ नये. (MPW) नियम पुस्तिकेच्या परिशिष्ट ४२ (अनु. क्र. १४) नुसार आकस्मिकता अंतर्गत अंदाजपत्रकामध्ये केलेली तरतूद त्याच अंदाजपत्रकात तरतूद न केलेल्या एखाद्या नवीन बाबीसाठी वळविण्याचे संपूर्ण अधिकार अधीक्षक अभियंता यांना देण्यात आलेले आहेत. कार्यकारी अभियंता (EE) सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड , जिल्हा रायगड यांच्या कार्यालयातील दस्तावेजांच्या तपासणीत (डिसेंबर, २०१४) असे आढळून आले की अधीक्षक अभियंता (SE) सार्वजनिक बांधकाम मंडळ, रायगड, नवी मुंबई यांनी लोक लेखा समिती (PAC) च्या शिफारशीचा आणि MPWA नियम पुस्तिकेमधील तरतुदींचा भंग करून नवेनगर महाड, जिल्हा रायगड येथे भांडार गृह आणि अभिलेख कक्ष बांधण्यासाठी २५ कामांतील आकस्मिक खर्चासाठी रुपये १.४५ कोटींची तरतूद वळवण्यास मंजुरी दिली (फेब्रुवारी, २०१२ ते फेब्रुवारी, २०१४ दरम्यान) योगायोगाने EE ने त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मंजुरी प्राप्त करणे टाळण्यासाठी हे काम १४ उप-कामांमध्ये विभागले होते आणि फेब्रुवारी, २०१२ ते मार्च, २०१४ दरम्यान दोन कंत्राटदारांना सोपविले होते. ही १४ कामे रुपये १.४५ कोटी खर्चात जानेवारी, २०१३ ते मे, २०१४ दरम्यान पूर्ण करण्यात आली. हे प्रकरण शासनास कळविण्यात आले (मे, २०१५) त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे (डिसेंबर, २०१५)

ज्ञापन :-

यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :— अधीक्षक अभियंता, रायगड सा. बां. मंडळ, नवी मुंबई यांचे अभिप्राय :–

महालेखापाल लेखा परिक्षण अहवालाप्रमाणे ज्या कामांची आकस्मिक खर्चाची तरतूद वापरून नवेनगर, महाड येथे बांधलेले स्टोअर शेड व रेकॉर्ड रुम यांचे काम केले आहे. त्याचा मूळ अंदाजपत्रकाशी जरी प्रत्यक्ष संबंध नसला तरी प्रशासकीय दृष्टीकोनातून त्या सर्व कामांचा बांधलेल्या स्टोअर शेड व रेकॉर्ड रुम यांचेशी निश्चितपणे संबंध येत आहे व त्याचा खुलासा खालीलप्रमाणे आहे :–

सन २०१२, २०१३ व २०१४ या आर्थिक वर्षात सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांचे कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी नवीन ग्रामीण रुग्णालयाची कामे, प्रशासकीय इमारतींची कामे तसेच नवीन रस्त्यांची कामे करावयाची होती व सर्व कामांची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याने ती तातडीने पूर्ण करण्याची कार्यवाही होणे क्रमप्राप्त होते व त्या सर्व कामांची अंदाजपत्रके तयार करणे, निविदा तयार करणे, रेकॉर्ड ड्राईंग व इतर महत्त्वाचे अभिलेख तयार करून सुरक्षित ठेवणेकरिता तसेच कामासाठी लागणारे अभियांत्रिकी उपकरणे, संगणक व इतर महत्त्वाचे कागदपत्रे ठेवण्याकरिता पुरेशी सुरक्षित जागा उपलब्ध नव्हती.

वरील सर्व कामे योग्यरित्या तातडीने पूर्ण करण्याकरिता सुरक्षित व कायम स्वरूपी पायाभूत सुविधा विभागीय कार्यालयाकडे उपलब्ध नव्हती व अस्तित्वातील कार्यालयीन इमारत ३२ वर्षापूर्वीची जुनी असल्याने जागोजागी छप्पर गळती होत होती व सदरचे इमारतीच्या वरच्या मजल्यावर लेखाशाखा, आस्थापना शाखा व निविदा शाखा कार्यरत होत्या तिथे गळतीचे प्रमाण जास्त होते, कारण इमारतीचे छप्पर जुन्या ए.सी. शिट्‌सचे जिर्ण असल्याने व बऱ्याच ठिकाणी पाईप गंजल्याने असुरक्षित होते व सदरची दुरुस्ती वारंवार करूनही काही उपयोग होत नव्हता त्यामुळे लेखाशाखेचे, आस्थापना शाखेचे, प्रकल्प शाखेचे व निविदा शाखा यांचे महत्त्वाचे बरेच रेकॉर्ड (रजिस्टर फाईल्स, निविदा, मोजमाप पुस्तके इत्यादी) पूर्णपणे व कांही रेकॉर्ड अंशतः खराब झाले होते. तसेच पावसाळ्यात माहे जून ते सप्टेंबर मध्ये गळतीची समस्या असल्यामुळे विभागीय कार्यालयीन कर्मचारी यांना अभिलेख सुरक्षित स्थळी ठेवण्याकरिता वेळोवेळी कसरत करावी लागत होती व ज्या वेळी पावसाचे प्रमाण खूप जास्त (मुसळधार पाऊस) होते तेव्हा गळतीची समस्या ठिकठिकाणी जास्त असल्याने विभागीय कार्यालयातील कर्मचारी यांच्या कामाचेवेळी त्यांचे महत्त्वाचे रेकॉर्ड व संगणक संभाळण्याकरिता जास्त त्रास सहन करावा लागत होता त्यामुळे दैनंदिन कामावर मोठा परिणाम होत होता.

त्याशिवाय विभागातील इमारत जुनी असल्यामुळे फर्निचर व भिंती, कपाटे इत्यादी ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाळवीची लागण झाल्याने बरेच महत्त्वाचे अभिलेख नष्ट होण्यास सुरूवात झाली होती त्यामुळे विभागीय कार्यालयातील प्रत्येक शाखेतील शाखा प्रमुख व कर्मचारी यांनी वरील नमूद केलेल्या कारणांमुळे त्यांचे महत्त्वाचे अभिलेख नष्ट झाल्याची तक्रार कार्यालयीन प्रमुखांकडे वारंवार केली होती.

वरील दोन्ही बाबींची दुरुस्ती व उपाययोजना कायम स्वरूपी व योग्य रितीने करण्याकरिता विभागीय कार्यालयातील रेकॉर्ड व कर्मचारी इतर ठिकाणी हलविणे गरजेचे होते व त्याकरिता स्वतंत्र जागा किंवा इमारत खात्याकडे उपलब्ध नव्हती तसेच तात्पुरती गळतीची दुरुस्ती व वाळवी प्रतिबंधक उपाययोजनेचा काही उपयोग होत नव्हता. सदरची बाब खूप गंभीर असल्याने त्याचे निराकरण तातडीने करणे गरजेचे असल्याने सदर विषयावर वरिष्ठ अधिकारी (अधीक्षक अभियंता) यांचेशी कार्यालयीन प्रमुख यांनी प्रत्यक्ष चर्चा केली व अधीक्षक अभियंता यांचे महाड दौयाचे वेळी व मंडळ कार्यालयाद्वारे झालेले निरीक्षण (तपासणी) चे वेळी ही बाब प्रत्यक्ष निदर्शनास आणून दिली होती.

वरील नमूद केल्याप्रमाणे विभागीय कार्यालयाचे अभिलेख व्यवस्थित ठेवण्याकरिता व नवीन मंजुर झालेली आरोग्य इमारत, प्रशासकीय इमारत व नवीन रस्त्याची कामे सुरू करण्याची प्रक्रिया तातडीने हाती घेण्याकरीता व त्यांचे रेकॉर्ड व इतर महत्त्वाचे अभिलेख जतन करून ठेवण्याकरिता विभागांतर्गत चालू असलेल्या कामांचे अंदाजपत्रक नमूद केलेल्या आकस्मिक बाबींचे तरतूदीमधून स्टोअर शेड व रेकॉर्ड रुम बांधणेकरीता प्रस्ताव मा. अधीक्षक अभियंता (सक्षम अधिकारी As per Para 145 PW Manual) यांचे मंजुरीसाठी सादर करण्यात आला व सदर प्रस्ताव मा. अधीक्षक अभियंता यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र जा.क्र. ५४८ दिनांक ०८/०२/२०१२, ९६२, दिनांक १४/०२/२०१३ व १११ दिनांक २०/०२/२०१४ अन्वये मंजुरी दिल्याप्रमाणे काम करण्यात आले.

वरील नमूद केल्याप्रमाणे नवेनगर येथे बांधलेले स्टोअर शेड व रेकॉर्ड रुमचे काम पूर्ण करतांना ज्या कामांची अंदाजपत्रकातील आकस्मिक खर्चाची तरतूद वापर केलेली आहे ते मा. अधीक्षक अभियंता यांचे परवानगी केलेले आहे व संबंधित कामाचे अभिलेख (Plans, Estimates, Record Drawing, Bill Files, Tender Files, Correspondence Files etc.) तेथे सुरक्षितपणे ठेवण्यांत आलेले आहेत, तसेच जो निधी वापरण्यांत आलेला आहे त्यातून शासनाची/ विभागाची एक कायमस्वरूपी मालमत्ता (Asset) तयार झालेली आहे व ज्या उद्देशाने नवेनगर येथे रेकॉर्ड रुम व स्टोअरशेड बांधलेले आहे तो उद्देश पूर्णपणे सफल झालेला आहे. जर खात्याने वरील निर्णय घेतला नसता तर सदरचे स्टोअरशेड व रेकॉर्ड रुमचे बांधकाम केले नसते तर वरील नमूद केल्याप्रमाणे गळतीची व वाळवीची समस्या यामुळे विभागाचे महत्त्वाचे उपलब्ध असलेले रेकॉर्ड जतन करणे शक्य झाले नसते व आणखीन काही महत्त्वाचे रेकॉर्ड वरील कारणाने नष्ट होण्याची शक्यता होती त्यामुळे विभागीय कार्यालयास रेकॉर्डअभावी महालेखापाल कार्यालयाकडील शेरे पुर्तता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळाने जारी केलेले पाहणी अहवालाचे पुर्तता, विधानसभा/विधानपरिषद यांचेकडून प्राप्त होणारे तारांकित/अतारांकित प्रश्नाची उत्तरे व अहवाल वेळेवर योग्यरित्या वरिष्ठ स्तरावर सादर करणे शक्य झाले नसते व त्यात खूप गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता होती. तसेच आर.टी.आय. कलम अंतर्गत अर्जदार/ अपिलार्थी यांना आवश्यक असणारी माहीतीही वेळेवर पुरवठा करणे शक्य झाले नसते व त्याकरिता विभागीय कार्यालयातील सर्व रेकॉर्ड कमीत कमी ७ वर्षाचे कालावधीकरिता सुरक्षित ठिकाणी सांभाळून ठेवणे गरजेचे आहे.

सदर परिच्छेदाचे अंतिम भागामध्ये तीन काम मा. अधीक्षक अभियंता यांचे विभागणी प्रस्ताव मंजुरीशिवाय पूर्ण केल्याचे नमूद केले आहे. तथापी याबाबत खुलासा करण्यात येतो की, मंडळ कार्यालयाने त्यांचेकडील पत्र क्र. २८२ दिनांक १७/१/२०१२ अन्वये रुपये ५९,९१,४१/-इतक्या रक्कमेचे आर.सी.सी. कामाचे अंदाजपत्रक तांत्रिक मान्यता दिली आहे व सदर कामाची निविदा अधीक्षक अभियंता सक्षम प्राधिकारी असल्याने सदरचे काम तातडीने पूर्ण करण्या करीता तीन भागामध्ये निविदा प्रक्रियासाठी मंडळ कार्यालयीन पत्र क्र. ३७७ दिनांक २५/१/२०१२ अन्वये मान्यता दिली आहे.

वर विस्तृतपणे नमूद केलेल्या स्पष्टीकरणानुसार बांधलेली इमारत याची प्रशासकीय कामाचे दृष्टीने विभागांतर्गत चालू असेलेले सर्व काम यांचे रेकॉर्ड व इतर अभिलेख सुरक्षित ठेवण्याकरिता सा. बां. नियमावली परिच्छेद १४५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मा. अधीक्षक अभियंता यांची मान्यता प्राप्त करून कामाची आकस्मिक खर्चाची तरतूद वापरून केलेले काम योग्य त्यामध्ये खात्याकडून कोणतीही वित्तीय अनियमितता झालेली नाही. तरी विनंती करण्यात येते की, सदरचा प्रारुप परिच्छेद बंद करावा ही विनंती.

या संदर्भात महालेखाकार यांचे अभिप्राय :–

अधीक्षक अभियंता सार्व. बां. मंडळ, रायगड, नवी मुंबई यांनी लोक लेखा समितीच्या शिफारशीचा आणि एमपीडब्लूए नियम पुस्तिके मधील तरतुदींचे उल्लंघन करून नवेनगर महाड, जिल्हा रायगड येथे भांडारगृह आणि अभिलेख कक्ष बांधण्यासाठी २५ कामांतील आकस्मिक खर्चासाठी रुपये १ .४५ कोटींची तरतूद वळविण्यास मंजुरी दिली.

अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां. मंडळ, नवी मुंबई यांचा खुलासा :–

नवेनगर महाड, जिल्हा रायगड येथे भांडार गृह आणि अभिलेख कक्ष बांधण्यासाठी २५ कामांतील आकस्मिक खर्चासाठी रुपये १ .४५ कोटींची तरतूद वळविणे यासंदर्भात कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभागाने केलेली कार्यवाही व अधीक्षक अभियंता, रायगड

सा.बां.मंडळ, नवी मुंबई यांनी दिलेली मंजुरी लोक लेखा समिती (PAC) च्या शिफारशीचा आणि MPWA नियम पुस्तिकेमधील परिच्छेद १४५ मधील तरतुदींचे उल्लंघन करीत नाही. संबंधित उच्चाधिकार प्राधिकारांनी केलेली कार्यवाही योग्य असल्याचे नमूद करून यासंदर्भातील अनुपालन अहवाल कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग यांनी सा.बां.मंडळास सादर केला आहे. रायगड सा.बां. मंडळ, नवी मुंबई कार्यालय कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग यांनी सदर परिच्छेदाबाबत दिलेल्या खुलाशा शी सहमत आहे. तरी खुलासा मान्य करण्यात यावा.

शासनाने केलेली कार्यवाही

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका सहावी आवृत्ती १९८४ मधील प्रकरण ३ , परिच्छेद क्र. १४५ मधील तरतूदी पहाता सदर प्रकरणी या तरतूदींचे उल्लंघन करीत नाही. अधीक्षक अभियंता, रायगड सा.बां.मंडळ, नवी मुंबई यांनी सदर परिच्छेदाबाबत दिलेल्या खुलाशाशी शासन सहमत आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र. ३.८ " कंत्राटदारास अनियमित प्रदान "** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत :–

१.१५ परिच्छेद क्र. ३.८ कंत्राटदारास अनियमित प्रदान

सार्वजनिक बांधकाम विभाग, परभणीने कंत्राटातील अटींचे उल्लंघन करून एका कंत्राटदाराचे दोन कामांसाठी, जी आधीच पूर्ण करण्यात आली होती व ज्यांची अदायगी आठ वर्षांपूर्वीच करण्यात आली होती, रुपये १.०७ कोटींचे अनियमित अतिरिक्त दावे स्वीकृत केले.

कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, परभणी यांनी बंका कन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स ड कॉन्ट्रॅक्टर्स (कंत्राटदार) यांना ऑक्टोबर, १९९७ आणि जानेवारी, १९९९ मध्ये खालील दोन कामे बहाल केले :–

(१) रुपये १.६७ कोटी किमतीवर परभणी जिल्ह्यातील फाळागावाजवळ गोदावरी नदीवर बुडीत पुलाचे बांधकाम (ऑक्टोबर, १९९७ मध्ये बहाल) आणि,

(२) रुपये ४.५० कोटी किमतीवर परभणी जिल्ह्यातील धनगरटाकळी गावाजवळ गोदावरी नदीवर मुख्य पुलाचे बांधकाम (जानेवारी, १९९९ मध्ये बहाल केले) .

पहिले काम मे, २००१ मध्ये पूर्ण करण्यात आले व फेब्रुवारी, २००६ मध्ये त्यांचे अंतिम देयक अदा करण्यात आले, तसेच दुसरे काम डिसेबर, २००२ मध्ये पूर्ण करण्यात आले. आणि त्यांचे अंतिम देयक डिसेंबर, २००५ मध्ये अदा करण्यात आले.

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या दस्तावेजांच्या तपासणीत (एप्रिल, २०१५) असे आढळले की, कंत्राटदार ऑक्टोंबर-२०१३ मध्ये परत आला (म्हणजे अंतिम देयकाच्या अदायगीच्या सुमारे ७ वर्ष आणि १० महिन्यानंतर) आणि त्याने रुपये १.०९ कोटी अतिरिक्त देयाची मागणी या आधारावर केली. दोन्ही कंत्राटात त्याने अतिरिक्त कामे (पाया, रेती भराव, काँक्रिट काम, सिंकिंग इत्यादीकरिता कठीण आणि मृदु खडकाचे खोदकाम) निष्णादित केली होती. व त्या संबंधिचे दावे ऑक्टोंबर, १९९८ (पहिल्या कामाचे) आणि मार्च २००० (दुसऱ्या कामाचे) मध्ये प्रस्तूत केले होते.

परंतु त्याला ही दोन्ही कामे पूर्ण केल्यानंतरही त्याबाबतची अदायगी करण्यात आली नव्हती. मुख्य अभियंता, औरंगाबाद यांनी कंत्राटदाराची अतिरिक्त दाव्याची मागणी मान्य केली व त्याला डिसेंबर, २०१३ मध्ये रुपये १.०७ कोटी प्रदान केले.

मुख्य अभियंता, औरंगाबाद यांचेद्वारे कंत्राटदाराचा अतिरिक्त दावा सुमारे आठ वर्षानंतर स्वीकृत करणे हे खालील कारणांमुळे अनियमित होते :–

- दोन्ही कंत्राट लम्पसम (Lump Sum- एकमुश्त) असल्यामुळे (कंत्राटदाराच्या स्वतःच्या संकल्पन व रेखाचित्रावर आधारित) कंत्राटदाराने प्रत्यक्ष कार्यस्थळाच्या परिस्थितीनुसार कामाच्या परिमाणाचे अंदाज ठरवून त्यानुसार निविदा भरणे अपेक्षित होते. काम पूर्ण झाल्यावर अशा प्रकारचे अतिरिक्त दावे स्वीकृत केल्याने कंत्राटाचे मूळ स्वरूपच जे लम्पसम आधारावर आहे, बदलते.

कार्यकारी अभियंत्याने डिसेंबर, २०१३ मध्ये नोंदविलेले आणि प्रमाणित केलेले दोन्ही कामांचे नवीन मोजमाप अगदीच असंभवनीय भासतात कारण उत्खनन आणि भरणा कामाचे मोजमाप कार्य निष्पादनाचे वेळीच घेता येऊ शकते आणि काम पूर्ण झाल्यावर नाही.

विभागीय लेखाधिकारी यांनीसुद्धा निषेध म्हणून मोजमाप पुस्तिकेवर हस्ताक्षर केले नाही आणि नमूद केले की एकदा अंतिम देयक कंत्राटदारास प्रदान करण्यात आल्यावर आणि काम संपल्यावर कंत्राटदाराचे अतिरिक्त दावे स्वीकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तथापि कार्यकारी अभियंता/ मुख्य अभियंता यांनी संभाव्य कायदेशीर कार्यवाही आणि नंतर कंत्राटदाराच्या दाव्यावर व्याजाची अंदायगी टाळण्याकरिता विभागीय लेखा अधिकाऱ्याचे आक्षेप फेटाळून लावले. कार्यकारी अभियंता/मुख्य अभियंता यांची शंका चुकीची होती. कारण कंत्राटात कोणतेही लवाद खंड अंतर्भूत नव्हते. आणि जर एखादा बाबतीत वाद असेल तर कंत्राटदाराने त्याबाबत अंतिम देयक प्रदान केल्यापासून ३० दिवसांत सचिव सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे अपील दाखल करून त्याचा निषेध नोंदवावयास हवा होता जो की या प्रकरणी करण्यात आला नव्हता.

ही बाब जून, २०१५ मध्ये शासनास कळविण्यात आली त्यांचे उत्तर प्रतीक्षित आहे. (डिसेंबर, २०१५) तथापि, कार्यकारी अभियंता यांनी नमूद केले (एप्रिल, २०१५) की मुख्य अभियंता, औरंगाबाद यांच्या मंजुरीनुसार कंत्राटदाराचे अतिरिक्त दावे स्वीकारण्यात आले.

अशा प्रकारे कंत्राट अटींचे उल्लंघन करून कंत्राटदाराचे अतिरिक्त दावे स्वीकृत करणे व त्यावर १.०७ कोटी प्रदान करणे अनियमित होते.

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापालांच्या आक्षेपात नमूद दोन्ही कामाचा सविस्तर **परिशिष्ट ' (१) '** प्रमाणे सोबत सलग्न केला आहे. (विवरणपत्र क्रमांक १)

महालेखापरिक्षकांनी, मे. बंका कंन्स्ट्रक्शन इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स (कंत्राटदार) हे कामाचे अंतिम देयक पारित केल्यानंतर सन ऑक्टोबर, २०१३ मध्ये म्हणजे अंतिम देयक पारित केल्यानंतर सुमारे ७ वर्ष १० महिन्यांनी परत येऊन त्यांनी अतिरिक्त केलेल्या कामाचा दावा सादर केल्याने अतिरिक्त कामाचा दावा करारातील तरतुदीनुसार नसल्याचा आक्षेप घेतला आहे. तथापि सदर आक्षेप हा वस्तुस्थितीवर आधारीत नाही.

या संदर्भात खालील बाबी सादर करण्यात येत आहेत.

प्रश्नाधिन कामे करतांना पुलाच्या बांधकामाच्या आवश्यकतेनुसार व कामाच्या परिस्थितीनुसार कंत्राटदारास करारातील अट क्र. ५ आणि ६ च्या तरतुदीप्रमाणे अतिरिक्त कामे करावी लागली. त्यानुसार कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाच्या तपशिलासह देयक सादर केले होते.

तथापि, केलेली अतिरिक्त कामे करारातील तरतुदीनुसार देय ठरत नसल्याने सदर अतिरिक्त कामे "अतिरिक्त दावे" या संज्ञेत येत होती. त्यामुळे कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाचे दावे धावत्या देयकात किंवा अंतिम देयकात समाविष्ठ करता आले नाही. पुढील कंत्राटी गुंतागुंत टाळण्यासाठी संबंधित कार्यकारी अभियंता यांनी, कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाचे दावे प्रलंबित ठेऊन करारातील तरतुदीच्या मर्यादेत अंतिम देयक पारित भाग पडले.

(२) तद्‌नंतर कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त दाव्याच्या प्रदानासाठी करारातील संबंधित निविदाशर्तीनुसार वेगवेगळ्या स्तरावरून पाठपुरावा/ अपील केले. त्यानुसार अंतिमतः कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाचे दावे प्रादेशिक कार्यालयाचे पत्र दिनांक १०/०५/२०१० (फाळा गावा-जवळील पुलाचे) व दिनांक १२/०५/२०१० अन्वये (धनगर टाकळीजवळील पुलाचे) दावे शासनास सादर केले.

(३) सदर अतिरिक्त कामाचे दावे शासनाचे पत्र दिनांक ०३/११/२०१० (फाळा गावाजवळील पुलाचे) व दिनांक ०६/१०/२०१० अन्वये (धनगर टाकळी जवळील पुलाचे) अन्वये मंजुरी दिली. त्यानंतर सदर दाव्याच्या रकमेस विधि मंडळाची मान्यता मिळून सन २०११-१२ च्या अर्थसंकल्पात बाब क्र. ८७१३ अन्वये रुपये ११.७६ आणि ८७१५ अन्वये रुपये ९७.५० लक्ष एवढी किमतीसाठी ५०५४ (०४) जिल्हा व इतर मार्ग या लेखाशिर्षात समाविष्ठ करण्यात आले. निधीच्या उपलब्धतेनुसार कंत्राटदाराच्या अतिरिक्त कामाच्या दाव्याची रक्कम दिनांक ७/१२/२०१३ रोजी प्रदान करण्यात आली.

(४) कंत्राटदारांने केलेल्या अतिरिक्त कामाचे दावे कराराच्या तरतुदीबाहेरील असल्याने अशा अतिरिक्त कामाचा समावेष सक्षम प्राधिकाऱ्याच्या मंजुरीशिवाय देय ठरत नसल्याने कोणत्याही परिस्थितीत विभागाने पारित केलेल्या अंतिम देयकात सदर अतिरिक्त कामाचा समाविष्ठ करता येत शक्य नव्हते. तसेच कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाच्या दाव्यास शासनाची मंजुरी मिळेपर्यंत अंतिम देयक अपारित ठेवल्यास कंत्राटी गुंतागुंत निर्माण होण्याची शक्यता असल्याने अंतिम देयक पारित करण्यात आले. शासनाची मंजुरी प्रदान झाल्यानंतरच कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त दाव्याची रक्कम अदा करण्यात आली. ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे कामाचे अंतिम देयक पारित झाल्यानंतर कंत्राटदाराचे अतिरिक्त कामाचे दावे मंजूर केले हा आक्षेप अमान्य आहे. तसेच कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाच्या दाव्यास शासनाचे पत्र क्र. ०३/११/२०१० व दिनांक ०६/१०/२०१० अन्वये मंजूर केलेले असून आक्षेपात नमूद केल्यानुसार मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांनी मंजूर केलेले नाहीत.

दोन्ही कामाचे कंत्राट लम्पसम (ठोक रक्कमी) असल्यामुळे कंत्राटदाराचा देकार प्रत्यक्ष कायर्स्थळाच्या परिस्थितीनुसार कामाच्या परिमाणाचे अंदाज ठरवून त्यानुसार निविदा देकार दिलेला असल्यामुळे कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाचे दावे स्विकृत होत नाहीत असा आक्षेप आहे.

या बाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे नमूद करण्यात येते :—

(१) कंत्राटदाराने प्रश्नाधीन दोन्ही कामाचे संकल्पन कार्यस्थळाच्या परिस्थितीनुसार, निविदेत पुरविलेल्या पुरक माहिती, भुस्तराच्या Deta (गृहित गोष्टी), डिझाईन क्रायटेरीया, निविदेसोबतच्या पुलाच्या General Arrangement Drawing मधे नमूद केलेल्या पुलासंबंधित तांत्रिक बाबी या सर्व पायाभूत बाबीनुसार येणारे कामाचे परिमाणाची गणणा करून कंत्राटदाराने देकार दिला होता.

(२) कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाच्या दाव्यातील ज्या बाबी करारनाम्याच्या व्याप्तीत अंतर्भूत नव्हत्या त्या बाबीसंबंधाने कंत्राटदारने अतिरिक्त कामाची मागणी / दावा मागणी केली होती.

(३) कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाच्या दाव्यांची मागणी करारनाम्याच्या तरतुदीत अंतर्भूत होती किंवा कसे? याची तपासणी, उप विभागीय स्तर, विभागीय स्तर, मंडळ स्तर व प्रादेशिक स्तर या विविध स्तरावर करण्यात आली व ज्या बाबी करारनाम्याच्या व्याप्तीत अंतर्भूत नाहीत अशाच बाबीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला व शासनाची व विधी मंडळाची मान्यता घेऊनच कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाचा दावा मंजूर करण्यात आला.

उदा.—

(१) सुपरस्ट्रक्टर च्या गर्डरच्या तळातील सॉलीड स्लॅबचे अतिरिक्त काम.

(२) अंत्यपादात वाळू भरण्याचे अतिरिक्त काम.

(३) बांधकाम प्रगतीत असतांना आलेल्या पुरामुळे, स्तंभ व अंत्यपादाचे काम करण्यासाठी बांधण्यात आलेले आर.सी.सी. कॉपर डॅम चे जास्तीचे काम.

(४) अचुक स्ट्रटा निश्चित करण्यासाठी करावे लागलेले डबल ट्युब बोअर चे अतिरिक्त काम.

(५) भुस्तरात सॉफ्ट रॉक ऐवजी हार्ड रॉक लागल्यामुळे करावे लागलेले अतिरिक्त काम.

(६) स्ट्राटा क्लासिफिकेशन मधील बदलामुळे करावे लागलेले अतिरिक्त काम.

(७) फाऊंडेन लेव्हल बदलामुळे करावे लागले अतिरिक्त काम.

(८) अंत्यपादात वाळू भरण्याचे अतिरिक्त काम.

मोजमापे :- उत्खनन (Excavation) व भरणा (Filling) कामाचे मोजमापे कार्य निष्पादनाचे वेळीच घेता येऊ शकतात व काम पूर्ण झाल्यनंतर नाही, असे असतांना कार्यकारी अभियंता यांनी डिसेंबर, २०१३ मध्ये कामाची मोजमापे नोंदवली व प्रमाणित केली असा आक्षेप आहे. तथापि सदर आक्षेपही वस्तुस्थितीवर आधारीत नाही.

या संबंधीची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :–

(१) कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामासह सर्व कामाची मोजमापे प्रत्यक्ष काम करतांनाच रितसर मोजमाप नोंदवहीत record enrty नोंदविण्यात आली होती. तसेच तत्कालीन शाखा अभियंता यांनी वेळीच नोंदविलेली होती व तत्कालीन उप अभियंता यांनी १०० टक्के तपासणी दर्शविलेली होती.

(२) करारनाम्याच्या व्याप्तीनुसार देय बाबींचे भुगतान करण्यात आले. अंतिम देयक प्रदान करताना निविदेत तरतूद नसलेल्या अतिरिक्त केलेल्या जादा कामाची रक्कम प्रदान करण्यात आली नव्हती.

(३) कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाच्या दाव्यास शासनाकडून व विधी मंडळाकडून मंजुरी मिळाल्यानंतर कंत्राटदाराने केलेल्या जादा कामांच्या मोजमापांची, प्रत्यक्ष काम करतांना नोंदविलेल्या मोजमापवरून पुन्हा नव्याने केवळ रि-राईट (पुनर्रलिखित) करण्यात आली. त्यामुळे कार्यकारी अभियंता यांनी डिसेंबर, २०१३ मध्ये कामाची मोजमापे नोंदवली व प्रमाणित केली असा आक्षेप अमान्य करण्यात येतो.

(४) विभागीय लेखाधिकारी यांनी कंत्राटदाराने केलेल्या जादा कामाच्या देयकाच्या तपासणीत उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांचे निराकरण त्यांच वेळी करण्यात आले व विभागीय लेखाधिकारी यांनी उपस्थित मुद्यांचे निराकरण समाधानकारकरित्या झाल्यामुळे विभागीय लेखाधिकारी यांनी धनादेशावर स्वाक्षरी केली आहे.

विभागीय लेखाधिकारी यांचे आक्षेप फेटाळुन कंत्राटदाराने केलेल्या जादाकामाचे देयक अदा केल्याचा आक्षेप मान्य नाही.

कंत्राटदाराने अंतिम देयक प्रदान केल्यापासून ३० दिवसांत सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे अपील दाखल करून त्याचा निषेध नोंदविणे आवश्यक होते तथापि, प्रस्तुत प्रकरणी असे करण्यात आले नाही. असाही आक्षेप आहे. या संदर्भातील वस्तुस्थिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे :–

(१) करारनाम्यात कुठेही " कंत्राटदाराने अंतिम देयक प्रदान केल्यापासून ३० दिवसांत सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे अपील दाखल करून त्याचा निषेध नोदवावा " अशी अट समाविष्ट नाही.

(२) निविदेतील पृष्ठ क्र.१२४ वरील अट क्र. ३७ **(प्रत सोबत सादर)** मध्ये कंत्राटदारास दावा करण्याची तरतूद असून सदर तरतुदीनुसार कंत्राटदारास काम चालू असतांना, किंवा पूर्ण झाल्यानंतरही अधीक्षक अभियंता यांच्याकडे अतिरीक्त कामाचा दावा दाखल करण्याची तरतूद आहे. सदर अपीला संदर्भात अधीक्षक अभियंता यांनी दिलेला निर्णय कंत्राटदारास मान्य नसल्यास, पुढे मुख्य अभियंता यांच्याकडे अपील करण्याची व मुख्य अभियंता यांनी दिलेला निर्णयही कंत्राटदारास मान्य नसल्यास पुढे शासनास अपील करण्याची तरतुद आहे. त्यानुसारच कंत्राटदाराने त्यांनी केलेल्या अतिरिक्त कामाचा दावा निविदेतील शर्तीनुसारच केला आहे. (विवरणपत्र क्र. ५)

(३) करारातील वरील तरतुदीनुसार मे. बंका कंस्ट्रक्शन, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. २७/११/२००४, अन्वये प्रथम अधीक्षक अभियंता यांच्याकडे अपील केले होते व त्यानंतर सदर तरतुदींच्या अनुषंगाने मुख्य अभियंता यांच्याकडे अपील केले.

(४) सदर अपीलाद्वारे त्यांनी वरील अतिरिक्त केलेल्या कामाचे देयके मिळण्याचा दावा (व्याजासह) केला होता. तथापि कंत्राटदाराचा दावा मंजूर करण्यास केवळ शासनच सक्षम असल्याने प्रादेशिक कार्यालयाने कंत्राटदाराचा अतिरिक्त कामाच्या मंजुरीचा दावा, शासनास सादर करण्यात आला होता.

(५) या संदर्भात शासनाचे पत्र दिनांक १८/०९/२००६ अन्वये उपस्थित केलेल्या मुद्यांची पुर्तता करून पुन्हा प्रादेशिक कार्यालयाचे पत्र क्र. शासनास सादर करण्यात आला. त्यानंतर शासन पत्र दिनांक १२/१०/२००६ अन्वये मागविण्यात आलेला काही बाबींचा अतिरिक्त खुलासा प्रादेशिक कार्यालयाचे पत्र दिनांक १०/०५/२००६ अन्वये सादर केला व त्यानुसार शासनाचे पत्र दिनांक ०६/१०/२०१० अन्वये कंत्राटदाराने केलेल्या कामाचा अतिरिक्त दावा मंजूर केला.

(६) शासनाने मंजुर केलेल्या दाव्याची रक्कम विधी मंडळात मान्यतेसाठी सादर करून अर्थसंकल्पात समाविष्ठ करण्यात आली व त्यानंतर सन २०१३ मध्ये कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त कामाच्या दाव्याची रक्कम मंजुर करण्यात आली.

(७) कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त मंजुरीचा दावा मंजुर करतांना, निविदेसोबतच्या पुलाच्या General Arrangement Drawing मध्ये पुरविलेल्या बाबी, निविदेमध्ये पुरविलेल्या भूस्तराच्या Deta (गृहित गोष्टी) निविदेसोबतच्या पुलाच्या General Arrangement Drawing मधे नमूद केलेल्या पुलासंबंधित तांत्रिक बाबी ह्यापेक्षा वेगळा व स्वतंत्र असल्याची खात्री विभागीय स्तर, मंडळ स्तर, प्रादेशिक स्तर व शासन स्तर अशा विविध स्तरावर करण्यात येऊन, कंत्राटदाराने केलेले अतिरिक्त काम न्याय व निविदेतील तरतुदीनुसार अतिरिक्त / जादा काम असल्याची खात्री करूनच मंजूर केलेला आहे.

तत्वतच, येथे सादर करण्यात येते की, कंत्राटदाराने केलेल्या अतिरिक्त दाव्याच्या रक्कमेची मागणी व्याजासह केली होती. तथापि, शासनाचे त्यांचे पत्र दिनांक ६.१०.२०१० (धनगर टाकळी जवळील पुलाचे) व पत्र दिनांक ३.११.२०१० अन्वये **(फाळा गावा जवळील पुलाचे)** कंत्राटदाराची मागणी (क्लेम) विनाव्याज मंजुर केले.

अतिरिक्त कामाच्या दाव्याची रक्कम निविदेतील अटी शर्तीनुसार व नियमानुसार अदा करण्यात आलेली आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन वरील स्पष्टीकरण मान्य करण्यात यावे व सदर परिच्छेद वगळण्यात यावा.

यासंदर्भात महालेखाकार कार्यालय, नागपूर यांचे अभिप्राय :–

Following remarks are offered on Government reply :—

1. Copies of claim for extra work raised by contractor from time to time may be furnished. It may also be stated whether the claims were verified/inspected. The date of

verification/inspection and entries made in MB along with copies of concerned pages may also be furnished.

2. The final bill was passed without considering extra work done and the contractor has accepted without recording his protest/disagreement in the MB. Please state reasons for not recording extra work done even if it was not paid in the final bill.

3. It was replied that the claims of extra work done by the contractor were submitted to Government by the CE PW Region, Aurangabad in May, 2010 i.e. after 8 years from the date of completion of work. Reasons for taking action on claims of extra item and submission to Government after a long period of 8 years may be stated.

4. Reply that measurement of work executed along with extra work executed by the Contractor has been recorded at the time of actual execution of work is not acceptable as it was noticed from first and final bill for payment of extra work that the measurement was done by Shri P.S. Bhoskar, Sectional Engineer on 05-01-2013 in M.B. No. 4847 (Big) Page No.351 to 365. This indicated that the extra work done was not recorded in the MB earlier. In such case the basis on which measurement was recorded in 2013 may be stated as the measurements of excavation and filling works can be done concurrently at the time of execution of works and not after the works had been completed.

5. The Sr. Divisional Accounts Officer (DAO) had submitted office note dated 03-05-2013 pointing out seven observations on which he opined that scrutiny by Executive Engineer (EE) was necessary. EE too agreed with his view and gave remark that explanation be called for from Sub-Division, Purna. The same was submitted to SE for approval. SE stated that though the explanation was still awaited, the claim was approved by CE. Reasons for not obtaining explanation may be stated.

महालेखाकार कार्यालय, नागपूर यांचे अभिप्रायावर विभागाचे स्पष्टीकरण :–

१. कंत्राटदाराने केलेल्या जादा कामाचा दावा वेळेत सादर केलेला आहे. यासंदर्भात कंत्राटदाराच्या पत्राच्या प्रती सोबत सादर केलेल्या आहेत. तसेच कंत्राटदाराने या दाव्यासंदर्भात वेळोवेळी पत्रव्यवहारही केलेला आहे. त्याबाबतची नोंद वेळोवेळी मोजमाप पुस्तिकेत घेण्यात आली असून त्याच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. सदर प्रमाणे कंत्राटदाराच्या जादा कामांच्या दाव्याचा प्रस्ताव सक्षम प्राधिकाऱ्यांनी मंजुर केल्यानंतर कंत्राटदारास देयकाची अदायगी करण्यात आली आहे.

२. कंत्राटदाराने जादा कामाचा दावा वेळोवेळी दाखल केलेला आहे. त्यामुळे त्याने मोजमाप पुस्तिकेबाबत निषेध नोंदविला नाही किंवा असहमती दर्शविली नाही.

३. कंत्राटदाराने दाखल केलेल्या जादा कामाच्या दाव्यांसंबंधातील कागदपत्रांची तपासणी निविदा शर्तीनुसार करणे आवश्यक होते तसेच दावा तपासणीसाठी क्षेत्रिय स्तरावर वारंवार बैठका घेण्यात आल्या व सर्व तपासणी पूर्ण करून शासनाकडे दावा मंजुरीसाठी दाखल करण्यात आला.

४. मोजमाप पुस्तिकेतील नोंदणीनुसार असे स्पष्टपणे दिसून येते की काम सुरू असताना जादा कामांची नोंद करण्यात आलेली आहे.

५. विभागीय लेखाधिकारी यांनी सर्व वस्तुस्थिती विचारात घेऊन व खातरजमा केल्यानंतर जादा कामांसाठीच्या अदायगी करिता सहमती दिली आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र. ३.९ " पुलाची निष्क्रियता "** यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

१.१६ परिच्छेद क्र. ३.९ पुलाची निष्क्रियता

महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम पुस्तिका, १९८४ च्या नियम २५१ नुसार संबंधित नागरी अधिकाऱ्याचे जमिनीबाबत पूर्ण ताबा घेतल्याशिवाय त्या जमिनीवर कोणतेही काम सुरू करू नये. तसेच जेथे कामाच्या निविदा स्विकारण्यात आल्या आहेत. परंतु त्या कामासाठी लागणारी जमीन अद्याप संपादित करण्यात आली नसेल ते काम सुरू करावयाचे आदेश जारी करण्यापूर्वी जमीन संपादनासाठी लागणारा कालावधी जिल्हाधिकाऱ्याकडून

निश्चित करून घ्यावयास पाहिजे. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, भंडारा यांनी एका कंत्राटदारास रुपये ३.२१ कोटी किमतीवर हे काम बहाल केले (ऑगस्ट २०११) जे की १५ महिन्यांच्या कालावधीत (नोव्हे. २०१२) पूर्ण करावयाचे होते. कार्यकारी अभियंता, भंडारा यांच्या दस्तावेजाच्या तपासणीत असे निदर्शनास आले की काम बहाल करते वेळी पुलाच्या दोन्ही बाजुस (भुगावच्या बाजुस ०.४० हेक्टर रस्ते बांधकामास लागणारी खाजगी जमीन (०.९७ हेक्टर) विभागाच्या ताब्यात नव्हती. काम बहाल केल्यानंतर जवळपास एक वर्षाचा कालावधी लोटल्यानंतर भुसंपादन अधिनियम, १८९४ च्या तरतुदीनुसार विभागाने भुसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्याकरिता जिल्हाधिकारी, भंडारा यांचेशी संपर्क साधला (जून, २०१२) कंत्राटदाराने रुपये ३.०५ कोटीत पुलाचे बांधकाम पूर्ण केले (मार्च, २०१४) तथापि, पोच रस्त्यांच्या बांधकामाकरिता लागणारी जमीन उपलब्ध नसल्यामुळे पोच रस्त्याचे बांधकाम निष्पादित करता येऊ शकत नाही. अशा प्रकारे रुपये ३.०५ कोटी रक्कम खर्चुन बांधलेले पुल १.५ (दिड वर्ष पेक्षा) जास्त कालावधी पासुन लोकांच्या उपयोगासाठी चालू करण्यात आला नव्हता. (डिसेंबर, २०१५) महाराष्ट्र शासनाने नमूद केले (जानेवारी) कि भुसंपादनाचे काम जवळपास पूर्ण झाले आहे आणि पोच रस्त्याचे काम मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करावयाचे लक्ष्य आहे. अशा प्रकारे पोच रस्त्यासाठी जमीनीच्या जोडण्याचा उद्देश विफल झाला. उपलब्धतेची खात्री न करता पुलाचे काम बहाल करण्यात आल्यामुळे रुपये ३.०५ कोटी खर्च करूनही पुल डिसें. २०१५ पर्यंत निरुपयोगी राहिला या शिवाय या दोन गांवाना (भुगाव आणि विहिरगांव).

ज्ञापन :-

महालेखाकारांच्या उपरोक्त परिच्छेदासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मुख्य अभियंता यांचे अभिप्राय :–

उर्वरित कामांच्या दुसऱ्या स्वीकृत निविदेच्या रुपये ७५.९६ लक्ष करारनामा किमतीच्या तुलनेत रुपये ४९.९५ लक्ष किमतीचा खर्च झालेला आहे. त्यामुळे या कामाची रुपये २६.०१ लक्ष इतकी बचत झाली आहे. ही बचत टोवॉल व पिचिंगची कामे कार्यान्वित न झाल्यामुळे झालेली आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा पुलाचे पोचमार्गाचे बांधकामाकरिता अतिरिक्त खर्च झालेला नाही. प्रशासकीय मंजुरी आणि तांत्रिक मंजुरीच्या आर्थिक वावातच पूलाचे बांधकाम, पोचमार्ग व सीडी वर्क या कामाची किमत रुपये ३६५.४२ लक्ष असुन ती प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मंजुरीच्या आर्थिक वावाच्या आतच आहे. त्यानुसार तांत्रिक मंजुरीच्या रुपये ३९४.५८ लक्षच्या तुलनेत रुपये २९.१६ लक्षची बचत झालेली आहे. त्यामुळे कामावर कोणताही अतिरिक्त आर्थीक भार पडलेला नाही. पुलाचे बांधकाम व पोच मार्गाचे काम सुद्धा पूर्ण झालेले आहे. सद्य:स्थितीत पूल वाहतुकीस खुला झालेला असून पूल चांगल्या स्थितीत आहे.

विभागाचे स्पष्टीकरण :-

सदर परिच्छेदाच्या मु.अ.,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्या रकाना क्र. ५ मधील अनुपालनाशी शासन सहमत आहे. तरी परिच्छेद निकाली काढण्याबाबत समितीस विनंती करण्यात येत आहे.

साक्ष :-

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील **परिच्छेद क्र.३.१ राज्य निधीतून शासकीय इमारतीची देखभाल व दुरुस्ती परिच्छेद क्र. ३.६ " कामाच्या अतिरिक्त बाबींना अनियमित मंजुरी ", परिच्छेद क्र. ३.७ " अकस्मिक कामाची तरतूद अनधिकृतपणे वळविणे ", परिच्छेद क्र. ३.८ " कंत्राटदारास अनियमित प्रदान " व परिच्छेद क्र. ३.९ " पुलाची निष्क्रियता "** यासंदर्भात समितीने दिनांक १० व १७ एप्रिल, तसेच दिनांक १५ व २३ मे, २०१८ रोजी विभागीय सचिव व प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी परिच्छेद क्रमांक ३.१.१. यामध्ये महालेखापाल कार्यालयाने जे आक्षेप नोंदविले आहेत त्याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी अवगत केले की, उरलेल्या ३८ पोलीस क्वॉर्टरच्या दुरुस्तीची सद्यःस्थिती विचारल्याप्रमाणे यासंबंधीचे अंदाजपत्रक पोलीस हाऊसिंग विभागाकडे पाठविण्यात आले आहे. त्यांनी त्यास प्रशासकीय मान्यता मार्च, २०१६ मध्ये दिली असली तरी पोलीस गृहनिर्माण विभागाने आजपर्यंत निधी दिलेला नाही. त्यामुळे २३७ पैकी ३८ क्वार्टर्सची दुरुस्ती होऊ शकली नाही. त्यामुळे त्या ३८ क्वॉर्टर्सची दुरुस्ती विभागाला अद्याप करता आलेली नाही.

"Non-preparation of Annual repair program" च्या बाबतीत विभागाचे काय मत आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, यासंबंधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून विविध विभागाच्या मागण्यांप्रमाणे कार्यक्रम तयार करण्यात येतो. याबाबतच्या बैठका साधारणपणे दिनांक १० एप्रिल आणि प्रत्येक तिमाहीच्या शेवटी होतात. त्यांच्या मागण्यांच्या आधारे विभाग एसएलआर आणि एसडीआर यामध्ये वर्गीकरण करून तो कार्यक्रम तयार करण्यात येतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांचे मत असे आहे की, विभागाने असा वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार केला नाही. ते न करता विभागाने या सर्व दुरुस्त्यांची कामे हाती घेतली आहेत जी without program आहेत तर त्याबाबत विभागाचे मत काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, प्रतिनिधिक स्वरूपामध्ये अधीक्षक अभियंता, यवतमाळ यांनी आढावा घेतल्याचे इतिवृत्त विभागाकडे रेकॉर्डवर आहे. प्रत्येक जिल्ह्याचे असे इतिवृत्त विभागाने मागविले असून ते समितीला सादर करण्यात येणार आहे. जुलै २०१६ मध्ये त्यांनी अशी बैठक घेतली होती आणि त्या बैठकीमध्ये मंजुर करण्यात आलेले इतिवृत्त समितीला सादर करण्यात येईल. प्रत्येक वेळेला अशी बैठक होते आणि त्यामध्ये जुन्या कामांचा आढावा घेतला जातो आणि उपभोक्ता विभागाच्या गरजेनुसार नवीन कामांचाही त्यामध्ये समावेश केला जातो.

त्याबाबत बैठक झाली किंवा नाही हे याबाबत महालेखापालांचा आक्षेप नाही. प्रश्न असा आहे की वार्षिक दुरुस्तीचा जो कार्यक्रम तयार करण्यात येतो तसा कार्यक्रम तयार करून शासनाला सादर करण्यात आला नाही असा महालेखापालांचा आक्षेप आहे ? असे समितीने निदर्शनास आणले असता, २२१६ आणि २०२९ ही निवासी इमारती आणि अनिवासी इमारतींची विभागाची लेखाशीर्षे आहेत. या लेखाशीर्षांतर्गत कार्यक्रम मंजुरीच्या अधिकारामध्ये किरकोळ दुरुस्ती करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना आहेत.तएसएलआर म्हणजे विशेष दुरुस्तीचे अधिकार अधीक्षक अभियंता यांना आहेत. विवक्षित दुरुस्ती ज्याला कॅपिटल टाईप ऑफ एक्सपेंडीचर करून कामे करणे, जसे गळती थांबविणे, कॉलमच्या स्ट्रक्चरची दुरुस्ती करणे किंवा संरचनात्मक दुरुस्ती करणे ही कामे निधीच्या उपलब्धतेनुसार मुख्य अभियंता मंजुर करतात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखापालांचे असे मत आहे की, ७१ इमारतींची १४४४ कामे संबंधित अधीक्षक अभियंता यांच्याद्वारे वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार केल्याशिवाय निष्पादित केली गेली या आक्षेबाबत समितीने विचारणा केली असता, ज्यावेळी संबंधित अधीक्षक अभियंता अशी बैठक घेतात त्यावेळी उपभोक्ता विभागाचे अधिकारी उपस्थित असतात. त्यामध्ये जुनी कामे जर अपूर्ण असतील तर त्यासंबंधी चर्चा होते आणि नवीन कोणती कामे घ्यावयाची असतील तर ती ठरविण्यात येतात. प्राधान्यक्रमानुसार त्याचा कार्यक्रम तयार करण्यात येतो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

या ७१ इमारतींची १४४४ कामांसंबंधी महालेखापालांचा जो आक्षेप आहे त्यासंबंधी स्पष्टीकरण करण्यास समितीने सांगितले असता, २३७ निवासस्थानांच्या दुरुस्तीचा हा कार्यक्रम होता. या २३७ निवासस्थानांपैकी १९९ निवासस्थाने दुरुस्त करण्यात आली आहेत हा दुरुस्तीचा कार्यक्रम क्षेत्रीय स्तरावर करण्यात आला होता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या कामांना जरी अधीक्षक अभियंता यांनी मान्यता दिली असली तरी याबाबतचा संपूर्ण नियोजनाचा आराखडा अधीक्षक अभियंता यांनी तयार केला नव्हता. वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार केल्याशिवाय या कामांना अधीक्षक अभियंता यांनीच मान्यता दिली आहे. त्यामुळे असा कार्यक्रम तयार न करता थेट कामांना मंजुरी देण्यात येते, त्या कामाला जॉब नंबर दिला जातो अशा प्रकारे जे काम सुरू आहे त्याऐवजी वार्षिक दुरुस्तीचा कार्यक्रम तयार झाला पाहिजे अशी समितीची अपेक्षा आहे. १-२ कामे वेळेवर घ्यावी लागली तरी ठीक आहे. पण या ठिकाणी सरसकट मर्जीनुसार त्यानुसार कामे करण्यात आली आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यामुळे आता आपण या कामाच्या पद्धतीमध्ये अमुलाग्र बदल केला आहे. हा बदल असा आहे की आता हे काम नीड बेस काम करण्याऐवजी Annual maintenance contract of a campus or building असे काम आता करण्यात येणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यावेळी अधीक्षक अभियंता यांनी या कामाला मंजुरी दिली त्यापूर्वी या कामाचा वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार झाला पाहिजे होता असे महालेखापालांचे मत आहे. त्यासंबंधी एकदा बैठक घेऊन त्या बैठकीमध्ये तसे ठरायला हवे होते, त्याचे प्रस्ताव यायला हवे होते व ते मंजुर करून विभागाकडे पाठवायला हवे होते. विभागाकडून without planning प्रस्ताव तयार करून त्यांना मान्यता देण्यात आली असे महालेखापालाचे मत आहे असे समितीने निदर्शनास आणले असे असता, प्रस्ताव तयार करणे म्हणजे तो नियोजन करून केलेला असतो. प्रस्तावाला अधीक्षक अभियंता यांनी मंजुरी दिली म्हणजे कार्यक्रमाला मंजुरी दिली असे असते. हे त्यावेळी जर जॉब नंबरसह त्यांनी व्यवस्थित महालेखापाल कार्यालयातील लेखापरीक्षकांना दाखवून दिले असते तर बरे झाले असते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

कार्यक्रम तयार करणे हा वेगळा विषय आहे आणि एखादे काम तयार करून ते प्रस्तावित करणे हा वेगळा विषय आहे.ज्यावेळी कार्यक्रम निश्चित करण्यात येते त्यावेळी तो संपूर्ण वर्षात होणाऱ्या कामांची यादी तयार करून केला जातो असे मत समितीने व्यक्त केले असता, पूर्वी संपूर्ण वर्षाचा कार्यक्रम तयार करण्यात येत नव्हता. याचे मूळ कारण म्हणजे विभागाला या कामांसाठी जो निधी मिळत असतो त्याची निश्चित उपलब्धता जून-जुलै किंवा डिसेंबरमध्ये होत होती. त्यामुळे वर्षाच्या सुरूवातीला एप्रिल-मे मध्ये कोणती कामे करायची याबाबत विचार करणे गरजेचे असल्याचे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम प्राधान्यक्रमानुसार तयार करण्यास म्हणजे कोणते काम प्रथम प्राधान्याने करायचे किंवा त्यानंतर कोणते काम करायचे याबाबत निधीशिवाय कार्यक्रम आखण्यास ठरविण्यात येईल हरकत काय आहे? विभागाकडे जर जितका निधी मिळेल त्यानुसार विभागाकडून कार्यक्रम ठरविण्यात येईल असे असेल तर त्या कामाची लायबिलीटी ५०० कोटीपर्यंत वाढत जाते असे समितीने निदर्शनास आणले असता, या बाबतीत सूचना अशा आहेत की साधारणत: विभागाला मागच्या वर्षीचे एफ.एम. म्हणजे Final Modified Grant जी मिळणार आहे त्याच्या आधारे दीडपट वजा स्पील क्वॉस्ट अशा पद्धतीचा कार्यक्रम त्या अधीक्षक अभियंत्यांना मंजुर करता येतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचा मुद्दा एवढाच आहे की वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार केला पाहिजे आणि त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंत्यांच्या कामाला जॉब नंबर देण्याचे काम त्या त्या अधीक्षक अभियंता यांनी करावे.मागच्या पाच वर्षामध्ये असे झालेले नसल्याचे दिसून येत आहे आणि त्याला विभागाकडून संरक्षण देण्यात येत आहे की जे काम झाले आहे ते वार्षिक कार्यक्रम आहे असे होऊ शकत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, सन २०११-१२ ते २०१८-१९ पर्यंत विभागाला मिळालेल्या ऑफिस आणि निवासी इमारतींच्या अनुषंगाने त्यासाठी प्राप्त झालेल्या तरतुदींची टक्केवारी किती आहे ती तक्त्यामध्ये आहे. (परिशिष्ट) सन २०१० पासून ते २०१५ पर्यंत एकूण ४० टक्के निधी मिळाला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले. (विवरणपत्र क्र. २)

विभागाला जे कार्यक्रमाचे नियोजन करायला पाहिजे होते ते न करता विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या विवेक बुद्धीने जे प्रस्ताव सादर केले आणि अधीक्षक अभियंता यांनी त्यांना मान्यता दिली. त्यामुळे without planning अशा पद्धतीने ही कामे केली आहेत. म्हणून इमारतीच्या बांधकामाऐवजी दुरुस्तीवरील खर्च जास्त होतो. नवीन इमारत बांधली असती तर त्यापेक्षा कमी खर्चामध्ये झाली असती. त्यामुळे विभागाने सांगितलेला खुलासा मान्य करण्यासारखा नाही असे मत समितीने व्यक्त केले.

सक्षम अधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता त्यांच्या कार्यक्रमांना निधीच्या उपलब्धतेनुसार मंजुरी देतात.त पूर्वीची अशी पद्धत होती. त्यानुसार त्यांनी या कार्यक्रमांना मंजुरी दिली आहे ही वस्तुस्थिती आहे. जर अशी पद्धत होती तर मग महालेखापालांनी आक्षेप कसा घेतला ? हे काम नियमानुसार झाले नाही म्हणूनच महालेखापालांनी आक्षेप घेतला असेललवार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार केला नाही याचे विभागाकडून समर्थन करण्यात येते काय, एखाद्या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये सुधारणा करणे ही वेगळी बाब आहे आवश्यकतेनुसार काम निश्चित करावे आणि त्याला जॉब नंबर द्यावा याबद्दल सन २०१० पासून ते २०१५ पर्यंत जी कामे झाली आहेत त्यांचे विभागाकडून समर्थन करण्यात येत आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार न करता कामे करणे या बाबीचे समर्थन नाही. परंतु वर्षाच्या सुरूवातीला सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ज्या उपभोक्ता विभागाच्या मागण्या असतात त्याची यादी तयार करून तो कार्यक्रम विभागाकडून मंजुर करण्यात येत असतो. दरम्यान पाच सहा महिने झाल्यानंतर सुद्धा दुरुस्तीच्या कामांची मागणी सातत्याने येत असते. त्यामुळे वर्षाच्या सुरूवातीला विभागाकडून एस.डी.आर. किंवा एस.एल.आर. निश्चितपणे मंजुर करण्यात येतात. त्यानंतर ज्या मागण्या येतात त्यांचा स्कोप विचारात घेऊन त्या कामांना सब-सिक्वेंटली मंजुरी देणे सुरू ठेवण्यात येते. त्यामुळे वर्षाच्या सुरूवातीला कार्यक्रम केला आणि मधल्या काळामध्ये कामांच्या मागण्या आल्या तर त्या तयार केलेल्या कार्यक्रमामध्ये नाहीत असे त्याचे इंटरप्रिटेशन होते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाकडे प्लॅन आणि नॉन प्लॅन अशा दोन्ही बाबी असतात.तत्यामुळे विभागाने आराखडा तयार केल्यानंतर १०-१५ टक्क्यांपर्यंत वेळेवर कामे घेण्यासाठी तरतूद करणे शक्य आहे. याचा अर्थ आराखडा तयारच करू नये असे होत नाही. विभागाने वस्तुस्थिती मान्य केली तर समितीला पुढच्या विषयावर चर्चा करता येईल. एक तर महालेखापालांनी जो आक्षेप घेतला आहे तो चुकीचा आहे. विभागाची पद्धत बरोबर आहे महालेखापालांनी असे म्हणणे असेल तर महालेखापालांना विचारण्यात येईल असे समितीने स्पष्ट केले असता, महालेखापालांचा आक्षेप बरोबर आहे. पण कार्यक्रम मंजुर केल्यानंतर वर्षाच्या सुरूवातीला त्यामध्ये काही कामांचे जॉब नंबर समाविष्ट होतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक ३.१.१ मध्ये महालेखापालांनी जे आक्षेप घेतले आहेत ते बघितले तर लक्षात येईल की हे काम कोणत्या पद्धतीने व्हायला हवे होते. त्यामध्ये कशी प्रक्रिया असायला हवी होती. रजिस्टर मेन्टेन्ड करणे, इमारतीच्या बांधकामाचे वर्ष, तक्रारी कोणाकोणाच्या आहेत, हे सर्व दुर्लक्षित करून ५५ कोटी रुपये १२० इमारतींपैकी ८९ किंवा ७१ कामांवर खर्च केले आहेत.तविभागाने उत्तरामध्ये संगणकीय प्रणाली आता सुरू केली आहे आणि ज्या ज्या विभागांनी मागणी केली त्यांचा समतोल राखून निधी पुरवठा कसा करता येईल ते सांगितले. सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड अंतर्गत लातूर येथील ९६ निवासस्थाने रिक्त असल्याबाबत आक्षेप असून यामधून साधारणपणे ३२.२५ लक्ष इतका महसूल प्राप्त न झाल्याचे नमूद आहे. आजमितीस ६७ निवासस्थानांच्या दुरुस्तीनंतर मागणीनुसार प्रतिक्षा यादीप्रमाणे निवासस्थानांचे वाटप करण्यात येत आहे. परंतु यामध्ये निवासस्थानांच्या वाटपासंदर्भात कुठे काही दिसत नाही. सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड अंतर्गत बीड येथील गृह, आरोग्य विभागाची ८३ निवासस्थाने रिक्त असल्याबाबत आक्षेप असून यामधून १९.०७ लक्ष निधी प्राप्त न झाल्याचे नमूद केले आहे. महालेखापालांनी या ठिकाणी काढलेले आक्षेप आणि या उत्तराचा संबंध काय आहे. यामध्ये मूळ आक्षेप छापून आले नाहीत काय ? अशी पद्धत असते काय, विभागाकडून आता काय सुधारणा करण्यात येणार आहेत त्याबद्दल सांगण्यात येते. परंतु यामध्ये जे ५५ कोटी रुपये खर्च झाले आहेत आणि ज्यांची वारंवार मागणी असून त्यांच्या ज्या अडचणी आहेत ४९ इमारतींना बाजूला केले आहे आणि ७१ इमारती ठरविण्याचा निकष काय असतो. कारण तक्रारी तर सर्वांच्याच असतील. कारण यामध्ये प्राधान्यक्रम ठरविण्यात येतो असे मत समितीने व्यक्त केले असता, या बाबतीत महालेखापालांचे जे मूळ आक्षेप आहेत ते समितीसमोर मराठीमध्ये आहेत. त्यांच्या इंग्रजी प्रतीमध्ये खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

"As per guidelines issued by PWD in 1991, the Superintending Engineer (SE) being the Circle head and Executive Engineer (EE) being the division head.." त्यांनी ९ डिव्हीजन, ९ सर्कल आणि १६ डिव्हीजनचे ऑडीट केले होते. "..were required to hold quarterly meetings with the heads of the user Departments to discuss the programme of repair of buildings for the ensuing year. In this regard, the Printed Register of Buildings (PRB) maintained by the Circles and the Divisions were to throw sufficient information (such as, year and cost of construction, built up area, specifications etc.) on the buildings due for repairs in a particular year. Based on the availability of funds and projected needs of the user Departments, the annual repair programmes were to be framed by the concerned SEs..." त्यामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "...Audit observed that all the 1,444 works taken up in 71 buildings were executed without preparing any Annual Repair Programmes by the concerned SEs. Further, the PRB was also not updated to indicate the buildings due for M & amp; R. The M & amp; R works were being sanctioned throughout the year by the concerned SEs without taking into account the availability of funds and prioritizing the buildings in dire need of repairs. ज्या इमारतींना दुरुस्तीची अत्यंत आवश्यकता असताना त्या न घेता प्राधान्यक्रम निश्चित केला नाही "...This gets substantiated by the fact that 237 Government quarters in 4 out of 13 Divisions were vacant for the last one to five years for want of M & R works such as, seepages, cracked walls, broken doors and window panes, choked and broken drainage pipes etc. The Government of Maharashtra stated (December 2015) that a system of online registration of complaints by the user Departments is being developed and their prioritization would be worked out. Also, instructions have been issued in June 2015 to the field officers regarding computerisation of PRBs. The Government of Maharashtra further stated that ofu 237 quarters, 199 have been repaired post audit and 38 quarters would be repaired soon." असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ते या ठिकाणी सर्व नमूद आहे. यामध्ये विभागाचा महसूल किती प्राप्त होणे बाकी आहे आणि त्याच्यासमोर १० टक्के एचआरए प्राप्त होत असल्यामुळे विविध बँकांकडून गृह कर्ज प्राप्त करून त्यानुसार कर्जाचे हप्ते भरणे. यामध्ये दोनच मूळ आक्षेप आहेत. एक म्हणजे विभागाने वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार केला नाही. जे काम संबंधित विभागाकडून प्रस्तावित करण्यात आले ते काम सर्कलने मान्य केले. प्राधान्यक्रम बघितला नाही. तसेच सन २०१५ मध्ये ३८ क्वॉर्टर्स रिकामे असताना विभागाने अद्यापपर्यंत त्यांची दुरुस्ती केली नाही. As on today, after a period of three years the status is same. म्हणजे पाच वर्षापासून ही निवासस्थाने रिक्त होती त्यामध्ये आणखी तीन वर्षे तशीच गेली आहेत. जुन्या इमारती पाडून नवीन बांधणे हे करण्याऐवजी जुन्या इमारती दुरुस्त करणे योग्य नाही. पण तशी परिस्थिती या ३८ क्वॉर्टर्सची आहे काय? कारण विभागाकडून ५-५ किंवा ८-८ वर्षे ही निवासस्थाने दुरुस्त करण्यात येत नाहीत. महालेखापालांनी विशेषत: या ३८ क्वॉर्टर्सबद्दल सांगितले आहे. परंतु विभागाने ते अद्याप दुरुस्त केले नाहीत. महालेखापालांनी सांगितले की

विभागाने वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार केला पाहिजे. कामाचा प्राधान्यक्रम निश्चित केला नाही किंवा कामांचे वार्षिक नियोजन केले नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, सार्वजनिक विभागामध्ये सन २०१०-११ ते सन २०१५-१६ पर्यंत जी पद्धत होती त्याबाबत वरीलप्रमाणे माहिती दिली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

पद्धत व नियम या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. विभागाची पद्धत अशी होती की, आलेला निधी खर्च करा परंतु नियम असे सांगतो की, विभागाने वार्षिक नियोजन (Annual Plan) तयार केला पाहिजे. तातडीच्या कामांसाठी १० ते २० टक्के निधी खर्च केला पाहिजे. यादृष्टीने कामांचे नियोजन केले नाही, असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. तसेच एक ते पाच वर्षांपर्यंत या क्वार्टर्स रिकाम्या होत्या. त्यापैकी १९९ क्वार्टर्सची दुरुस्ती करण्यात आली. परंतु प्रश्नाधिन विषय असलेल्या ३८ क्वार्टर्सच्या दुरुस्तीचे काम अजूनही पूर्ण केलेले नाही, ही परिस्थिती आहे. न्युअल मेन्टेनन्सचा प्लॅन विभाग किती वर्षांपासून बनविला नव्हता अशी विचारणा समितीने केली असता, ॲन्युअल मेन्टेनन्सचा नाही. परंतु विभागाचा मेन्टेनन्सचा प्लॅन तयार असायचा. तो नीड बेस्ड असायचा. म्हणजे विभागाला जेवढा निधी मिळालेला आहे, त्यापैकी पहिल्या तिमाहीत मिळणाऱ्या निधीची कामे हातामध्ये घेऊन पूर्ण करण्यात येत असत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन १९९१ साली विभागाने धोरण ठरविले की, दरवर्षी मेन्टेनन्सचा कृती आराखडा ठरवायचा. त्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे फक्त २०१४-१५ वर्षांमध्येच कृती आराखडा केला नाही की, सन १९९१ पासून प्रत्येक वर्षी विभागाकडून ॲडहॉक बेसिसवर कार्यवाही करण्यात येत आहे? अशी विचारणा समितीने केली असता, मार्गदर्शक तत्त्वांबाबत माहिती देताना त्यामध्ये कृती आराखडा ठरविताना बैठक घ्यावी. प्रादेशिक स्तरावर असेल तर त्या ठिकाणी मुख्य अभियंता, विभागीय स्तरावर असेल तर तेथे कार्यकारी अभियंता व सर्कलच्या ठिकाणी अधीक्षक अभियंता यांनी सर्व विभागप्रमुखांना बैठकीस बोलावून त्यांच्या समवेत दुरुस्तीचा कार्यक्रम तयार करावा. त्यामध्ये तीन कॅटॅगरीज कराव्यात, करन्ट रिपेअर्स, स्पेशल रिपेअर्स आणि एस.डी.आर. ज्याला कॅपिटल टाईप रिपेअर्स असे म्हणतात त्याला जास्त पैसे लागतात.त भांडवली खर्चाचा भाग मुख्य अभियंता यांना पाठवावा. त्यासाठी प्राप्त होणाऱ्या निधीमधून मुख्य अभियंता यांनी कार्यक्रम मंजुर करावा.ाअधीक्षक अभियंता यांच्याकडे प्राप्त झालेल्या निधीपैकी प्रूडन्टनेस नुसार ५० टक्के किंवा ४० टक्के निधी सी.आर. साठी वितरित करावा. उरलेला निधी एस.एल.आर. किंवा विशेष दुरुस्तीसाठी म्हणून त्यांच्याकडे ठेऊन त्यामधून कामे मंजुर करावीत. या पद्धतीनेच कामे मंजुर झालेली आहे. सी.आर., एस.एल.आर. आणि एस.डी.आर. यांचा एकत्रित कार्यक्रम तयार करून तो रेकॉर्डवर ठेवणे व त्याला वार्षिक कार्यक्रम म्हणून घोषित करणे ही अपेक्षित बाब आहे. अशा रीतीने घोषणापत्र विभागाच्या रेकॉर्डवर कुठेही उपलब्ध नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याचा अर्थ सन १९९१ च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार जी कार्यवाही करणे अपेक्षित होते ते सन २०१५ पर्यंत कधीही केलेले नाही. विभागाने सन १९९१ ची मार्गदर्शक तत्त्वे मानलीच नाहीत. उत्तरामध्ये असे नमूद आहे की, सुधारित प्रमाणके सुनिश्चित करण्यासाठी संगणक प्रणाली... सुधारित प्रमाणके म्हणजे काय? अशी विचारणा समितीने केली असता, न्युअल मेन्टेनन्स कार्यक्रम केला नाही. सन १९९६ साली बिल्डींग मेन्टेनन्सचे नॉर्म्स ठरविण्यात आले. काय करायचे आहे, किती दुरुस्ती करावी लागेल व त्यासाठी किती खर्च लागेल याबाबतचे ते नॉर्म्स होते.परंतु नॉर्म्सप्रमाणे पैसे मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. हे नॉर्म्स अद्ययावत करणे आवश्यक होते, परंतु ते झाले नव्हते. त्यामुळे महालेखापालांच्या सूचनेनुसार या नॉर्म्सच्या अद्ययावतीकरणासाठी व सर्वंकष दुरुस्तीच्या कार्यक्रमासंदर्भात काय मानके असावीत किंवा त्याची फ्रिक्वेन्सी काय असावी यासंदर्भात श्री. एस. एस. मोमीन, बांधकाम क्षेत्रातील तज्ञ व माजी सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती तयार करण्यात आली. त्यामध्ये बाहेरील देखील काही तज्ञ होते. या समितीच्या शिफारशी आता प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार मानके बदलणे आणि त्यानुसार मेन्टेनन्सचा कार्यक्रम हाती घेण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर समितीच्या शिफारशी विभागाने स्विकारल्या आहेत का ? यामुळे खर्चामध्ये किती फरक पडणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, या समितीच्या शिफारशींपैकी बहुतांश शिफारशी स्वीकारुन पायलट बेसिसवर त्याची अंमलबजावणी करून काय परिणाम होतो हे पाहणे विभागाने सुरू केले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यामुळे खर्चामध्ये वाढच होणार आहे. कारण मानके वाढविली याचा अर्थ खर्चामध्ये वाढ होणार असाच आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, ही पद्धत अतिशय चांगली आहे. याबाबत विभागाने गृह विभागाच्या नाशिक येथील महाराष्ट्र पोलीस अकादमी पासून सुरूवात केली आहे. तेथे सुमारे १ हजार पोलीस उपनिरीक्षकांना प्रशिक्षण दिले जाते. या कॅम्पसच्या संपूर्ण दुरुस्तीचा खर्च पूर्वी पिस मिल पद्धतीने म्हणजे जशी गरज पडेल तसा केला जात होता. कुठे तरी हे थांबले पाहिजे यासाठी विभागाने याचे सर्वंकष एकच अंदाजपत्रक तयार केले व ते अधीक्षक अभियंता यांनी मंजुर केले. त्याचे एकत्रित १ कोटी ३७ लाख रुपयांचे एक वर्षासाठीचे टेंडर मागविले. हीच पद्धत सर्व ठिकाणी विभागाकडून अवलंबिण्यात येत आहे. त्यामुळे विभागाला निश्चित डेटा माहिती राहील. यामुळे वर्षभरासाठी येणाऱ्या खर्चाची वर्षाच्या सुरूवातीलाच माहिती असेल व त्याप्रमाणे वित्त विभागाकडे मागणी करता येईल. ज्या कामांसाठी पैसे उपलब्ध होतील ती अनुषंगिक कामे विभागाकडून पूर्ण करण्यात येतील. ज्या ठिकाणी पैसे उपलब्ध होणार नाहीत तेथे काम करण्यात येणार नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागीय प्रतिनिधींनी अगोदरच्या तीन कॅटॅगरीजबाबत माहिती दिली. त्यामध्ये तात्पुरते काम, भांडवली काम व मेजर दुरुस्ती यांचा समावेश होता. या तिन्ही कॅटॅगरीज नवीन पद्धतीमध्ये देखील तशाच कायम ठेवल्या आहेत का ? अशी विचारणा समितीने केली असता या तिन्ही कॅटॅगरी तशाच राहतील. त्यामध्ये बदल होऊ शकत नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने कितीही समर्थन केले तरीही पूर्वीच्या परिपत्रकाचे यामध्ये पालन झालेले नाही. तसेच विभाग अजूनही या कामांबाबत गंभीर नाही.१४०० कामे आराखड्या शिवाय मंजुर करून घेतली. याचबरोबर नवीन सिस्टीम पायलट प्रोजेक्ट म्हणून सुरू केली असल्याचे देखील सांगण्यात येत आहे. विभागाने उत्तरामध्ये नमूद केले आहे की, यासाठी नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल विभागाने पूर्णत: मान्य केला आहे. परंतु तोंडी उत्तर देताना सांगितले की, " शिफारसी पार्टली मान्य केल्या आहेत ". लेखी उत्तरामध्ये लिहिले आहे की, विभागाने हा अहवाल मान्य केला आहे व याचा सखोल अभ्यास होऊन याच्या ऑर्डर्स निघत आहेत. ही विसंगती समितीने निदर्शनास आणली असता, त्याच परिच्छेदापुरती किंवा कन्टेन्टपुरती समितीची शिफारस विभागाने मान्य केलेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन १९९१ सालच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार याबाबत कार्यवाही होत नाही. सन १९९१ ते २०१५ म्हणजे सुमारे २२ ते २४ वर्षे याबाबत कार्यवाही झालेली नसेल. कधी-कधी सुरूही केली असेल. एका वर्षामध्ये ५५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत.तयामधून काम देखील झाले असेल.ल परंतु प्राधान्यक्रम चुकला असेल, पाहिजे त्यांना दुरुस्ती करून मिळाली नसेल, ज्यांना आवश्यकता नाही त्यांची दुरुस्ती झाली असेल.ल कारण याचा काहीही मापदंड नाही. हम करे सो कायदा, असे अधिकाऱ्यांचे आहे. काहीही कायदा बनवा, नियम काहीही बनवा, काहीही शेरे मारा, परिपत्रके काढा विभागाला त्याच्याशी काहीही देणेघेणे नाही. हम करे सो कायदा किंवा आम्ही करणार तो कायदा, असे आहे. सन २०१४-१५ मध्ये झालेला ५५ कोटी रुपये खर्चाबाबत सन १९९१ सालच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार बैठक न घेता, कृती आराखडा तयार न करता, नियोजन न करता, प्राधान्यक्रम न ठरविता हा निर्णय मनस्वीपणाने घेतलेला आहे, हे मान्य आहे काय ? असे असेल तर या अधिकाऱ्यांचा शोध घेऊन त्यांची विभागीय चौकशी लावून किती कालावधीमध्ये कारवाई करणार ? नाही तर एवढा एक्सरसाईज कशाला करायचा आहे ? हम करे सो कायदा, असे आहे. आता येथून बोलून जातील व नंतर पुढे काय करायचे ते तेच करतील. ही कार्यवाही नियमानुसार किंवा शासनाने ठरवून दिलेल्या रुपरेषेनुसार झालेली नाही, हे खरे आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, शासनाने एक रुपरेषा आखून दिली होती. अतिशय चांगली परिस्थिती असेल तर रुपरेषेनुसार काम देखील करता येईल. परंतु त्यावेळची परिस्थिती लक्षात घेताा सन २०११-१२ साली विभागाने रिपेअर्ससाठी वित्त विभागाकडे कार्यालयीन व रहिवासी इमारतींसाठी ११८४ कोटी रुपयांची मागणी नोंदविली. परंतु कार्यालयीन इमारतींसाठी १६५ व रहिवासी इमारतींसाठी १०५ असे एकूण २७० कोटी रुपये मिळाले असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यासाठीच सन १९९१ साली ही मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत. कारण त्याकाळी देखील अशीच परिस्थिती असेल.ल त्याकाळी देखील ३०० कोटी रुपयांची मागणी केल्यानंतर ११२ कोटी रुपयेच दिले असतील. त्यामुळे मागदर्शक तत्त्वे काढली की, " एकत्रित बैठक आयोजित करा. विभागप्रमुखांना बोलवा व त्यांच्या ज्या इमारती वाईट अवस्थेत आहेत त्यांची माहिती घ्या, प्राथमिकता विचारा व समितीने निर्णय घ्यावा ". त्यासाठीच ही व्यवस्था करण्यात आलेली आहे. सन २०१४-१५ या वर्षासाठी या प्रकारच्या समितीची बैठक झाली होती का ? अशी विचारणा समितीने केली असता, अशा समितीची बैठक झाली व त्याचे इतिवृत्त विभागाकडे आहेत. तसेच अधीक्षक अभियंता यांनी नीड बेस्ड् कार्यक्रम मंजुर केलेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जर वार्षिक नियोजनाप्रमाणे कृती आराखडा तयार केला नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर विभाग कोणत्या प्रकारची कारवाई करणार आहे ? कारण काही तरी जरब बसली पाहिजे, शिस्त पाहिजे. ११०० कोटी पैकी २७० कोटी रुपये दिले म्हणजे एखाद्या विभागाला १२ कोटी, दुसऱ्याला ८७, तिसऱ्याला १०३ कोटी व एकतर्फी निर्णय करण्यात येतो म्हणून ५ कोटी रुपये जास्त असे चालत नाही. समितीला केवळ सन २०१०-१५ दरम्यानची माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, सन २०११-१२ या वर्षी वार्षिक कार्यक्रम मंजुर करण्यात आला असता तर ११८४ कोटी १९ लाख रुपये लागले असते. त्या अनुषंगाने अर्थसंकल्पीय पुस्तकामध्ये छापून मिळाल्याप्रमाणे प्रत्यक्ष अर्थसंकल्पीय तरतूद २७१ कोटी रुपये एवढी होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उपलब्ध निधीच्या दीडपट वार्षिक कार्यक्रम तयार करता येतो. त्यामध्ये विभागाने प्राथमिकता ठरवून घेतली पाहिजे व ती घेतली नाही, हाच आक्षेप आहे. विभागाने वार्षिक नियोजन आराखड्याशिवाय जी कामे केली ती योग्य झाली, आवश्यक होती व इतर आवश्यक नव्हते हे ठरविता येत नाही. कदाचित त्यापेक्षा जास्त आवश्यक कामे डावलली गेली असतील. विभागाने कोणताही वार्षिक आराखडा मंजुर केल्याशिवाय कार्यवाही केलेली आहे. मुद्दा एवढाच आहे की, जे झाले ते काम त्यांच्या स्वमर्जीने झालेले आहे. याबद्दलच महालेखाकारांनी आक्षेप काढलेला आहे. याबाबत ज्यांनी कार्यवाही केली नाही त्यांच्यावर विभागाकडून काय कारवाई करण्यात येणार ? समितीला बैठकीचे इतिवृत्त सादर करण्यात येत आहे. परंतु त्या अगोदरच्या तीन वर्षांच्या इतिवृत्तांमध्ये असे कित्येक प्रकरणे असतील ज्यामध्ये त्या-त्या

विभागाचे प्रमुख दुरुस्तीबाबत वारंवार मागणी करीत असतील परंतु ते विभागाच्या या २७० कोटी रुपयांमध्ये समाविष्ट नसतील. एखादे प्रकरण असेही असेल की, त्याच वर्षी मागणी झाली व त्याच वर्षी मंजुरी मिळाली. ही संपूर्ण पाच वर्षांची इतिवृत्ते मागितली तर त्यामध्ये अशी प्रकरणे निघतील. याबाबतची पद्धती पाळण्यात आली नाही, असे विभागाने कबूल केले आहे.यासाठी जबाबदार व्यक्ती कोण आहे व त्यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे ? विभागाचे एकंदरीतच म्हणणे असे आहे की, एकूण खर्चाच्या अगेन्स्ट खूपच कमी रक्कम मिळते त्यामुळे वार्षिक आराखडा तयार न करतो गरजेनुसार कामे करतो. सन २०११-१२ मध्ये सुमारे ११०० कोटी रुपयांच्या अगेन्स्ट २७१ कोटी रुपये मिळाले. हे २७१ कोटी रुपये कुठे खर्च करायचे याचा निर्णय कोण करते व तो कोणत्या स्तरावर केला जातो ? अशी विचारणा समितीने केली असता, २७० कोटी रुपये मिळाल्यानंतर हा निधी साधारणतः मागील वर्षी मिळालेल्या निधीएवढासाठी लागणाऱ्या निधीचे तर अधीक्षक अभियंता त्यांच्या स्तरावर त्या-त्या जिल्ह्यांमध्ये दुरुस्ती वितरण करून तेवढया रकमेचा कार्यक्रम मंजुर करतात. त्याला वार्षिक आराखडा म्हणता येणार नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मिळालेल्या २७१ कोटी रुपयांचे शिर्ष केवळ देखभाल दुरुस्ती एवढेच होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, २२ (१६) व २० (५९) असे विभागाचे दोन लेखाशिर्ष आहेत. त्यामध्ये अधीक्षक अभियंतानिहाय निधी दिला जातो. त्या अर्थसंकल्पीय पुस्तकामध्ये छापलेल्या असतात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

वित्त विभागाने २७१ कोटी रुपयांची देखील अधीक्षक अभियंता निहाय विभागणी करून दिली का ? अशी विचारणा केली असता, प्रत्येक जिल्ह्यामध्ये इमारतींच्या क्षेत्रानुसार प्रमाणबद्ध पद्धतीने पैशांचे वितरण केले जाते. माननीय अर्थमंत्री अर्थसंकल्पीय पुस्तकामध्ये अधीक्षक अभियंतानिहाय तरतूद छापून देतात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यामध्ये ७१ इमारतींची १४४४ कामे केलेली आहेत. ही केलेली कामे व त्यावर करण्यात आलेल्या खर्चाची यादी समितीला सादर करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता सदर माहिती सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. तसेच ३८ इमारतींचे बद्दल माहिती देताना संबंधित वर्षामध्ये निधी अपुरा होता. त्यामुळे या ३८ इमारतींच्या दुरुस्तीच्या कामांसाठी लागणाऱ्या निधीचे अंदाजपत्रक उपभोक्ता विभागाला पाठविले आहे. त्यांनी त्यास मार्च, २०१६ मध्ये प्रशासकीय मंजुरी देखील दिली आहे. परंतु त्यासाठी लागणारा निधी अद्यापपर्यंत दिलेला नाही. जेव्हा विभागाच्या लक्षात आले की, निधी कमी मिळाला आहे त्यावेळी उपभोक्ता विभागाला सदर मागणी पाठविली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जेवढी कामे करण्यात येतात त्यासाठी उपभोक्ता विभागाकडून पैसे घेण्यात येतात की सार्वजनिक बांधकाम विभाग स्वतः ही कामे करतो ? अशी विचारणा समितीने केली असता, सर्वसाधारणपणे घेतलेल्या तक्रारी किंवा मागण्या सार्वजनिक बांधकाम निधीमधून पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येतो. परंतु ज्यावेळी लक्षात येते की, विभागाकडे केवळ ३५ ते ४० टक्के निधी आहे व तातडीच्या काही मागण्या असतील तर तसे यूजर डिपार्टमेंटला कळविण्यात येतो. त्यांच्याकडून पैसे देखील मिळतात. या प्रकरणी प्रशासकीय मान्यता दिली मात्र निधी दिला नाही. त्यामुळे सदर कामे प्रलंबित आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार का, असा प्रश्न समितीने विचारला. परंतु त्याबाबत उत्तर दिले नाही. त्यामुळे याबाबत समितीच शिफारस करेल असे मत समितीने व्यक्त केले असता, मोमीन यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या ज्या शिफारशी स्विकारल्या आहेत त्याचे विभागाकडून यापुढे काटेकोरपणे पालन करण्यात येईल. याबाबत कसोशीने पूर्णपणे अंमलबजावणी करण्यात येईल. याला सुरूवात देखील केलेली आहे असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

लोकलेखा समितीने दिलेल्या निर्देशांची विभाग अंमलबजावणी करीत नाही. त्यामुळे समितीने विचारलेल्या प्रश्नावर अंमलबजावणीबाबत दिलेल्या उत्तराचे कुठपर्यंत पालन होईल याबाबत शाश्वती वाटत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, सन २०१८-१९ मध्ये इमारत दुरस्तीचा वार्षिक कार्यक्रम विभागाकडून नक्की तयार करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१८-१९ साठी किती निधी मिळालेला आहे? सन २०१८-१९ चा वार्षिक कार्यक्रम आणखी तयार केला नाही का ? या समितीच्या प्रश्नांबाबत वार्षिक कार्यक्रम तयार करण्याची कार्यवाही याच दिवसांमध्ये सुरू असते. याच्या बैठका साधारणतः एप्रिल-मे महिन्यामध्ये होतात व जून महिन्यामध्ये पूर्णपणे हा कार्यक्रम तयार होतो. यावर्षीच्या अधीक्षक अभियंतानिहाय अर्थसंकल्पाची आकडेवारी उपलब्ध नाही. परंतु वित्त विभागाकडे २४८८ कोटी रुपयांची मागणी केली होती. त्याच्या अगेन्स्ट कार्यालयीन इमारतींसाठी ५६१ कोटी रुपये व निवासी इमारतींसाठी प्रधान सचिवांनी खूप आग्रह धरल्यामुळे ५० कोटी रुपयांची वाढ होऊन १५६ कोटी रुपये मिळाले आहेत. असे एकूण ७१८ कोटी रुपये मिळाले आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

याचा अर्थ विभागाच्या पूर्वीच्या तर्काप्रमाणे यावर्षी देखील ॲन्युअल मेन्टेनन्स प्लॅन तयार करण्याची गरज नाही. अधिकारी या नात्याने विभागीय सचिवांनी निदान हा कार्यक्रम तरी तयार करायला पाहिजे होता. प्रशासनाने प्लॅन तयार केला परंतु बजेटमध्ये पैसे मिळाले नाहीत व त्यामुळे नीड बेस्ड् केले हे तरी रेकॉर्डला राहिले असते असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत एक प्लॅन तयार करून एक्झीक्युशन नीड बेस्ड् करण्यात येईल. अधीक्षक अभियंता जो कार्यक्रम मंजुर करतात त्यावर वार्षिक मंजुरी लिहिले असेल तर उत्तर देता आले असते. परंतु तसे लिहिलेले नाही. ' दुरुस्तीचा कार्यक्रम ' असे लिहिलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रस्ता तयार करताना विभागाकडून रस्त्यांचे संपूर्ण बजेट काढले जाते. राज्यातील संपूर्ण रस्ते करायचे असतील तर विभागाला सुमारे २३ हजार कोटी रुपये लागतील याप्रमाणे त्याच्या देखभाल दुरुस्तीचे काही तरी नियोजन केले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, मोमीन समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने वार्षिक कार्यक्रम तयार करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २०१४-१५ मध्ये हा लेखापरिक्षण परिच्छेद आला आहे. त्यानंतर सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये वार्षिक आराखडा तयार केला का ? प्रस्थापित नियमांचे पालन करण्याबाबत आपल्या लक्षात आल्यानंतर देखील ते केले जात नाही. ॲन्युअल प्लॅन तयार करण्याचा नियम आहे की नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, दुरुस्तीचे जे निकष असतात त्यांची एक सिस्टिम आणि फ्रिक्वेन्सी असते. त्यामध्ये कालानुरुप बदल झालेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मागणीपेक्षा कमी रक्कम मिळत असल्यामुळे वार्षिक दुरुस्ती आराखडा तयार करण्यात येत नाही, असे म्हणणे चुकीचे होईल. विभागाला मार्च महिन्यामध्ये निधी मिळत असतो. त्यामुळे पुढील आराखडा एप्रिल, मे, जून या महिन्यामध्ये तयार करता येऊ शकतो. ३१ मार्च रोजी पुढील वर्षाच्या आराखड्याचा निधी मिळत असतो असे मत समितीने व्यक्त केले असता, आर्थिक वर्ष संपेपर्यंतच पैसे खर्च करावे लागतात. यावर्षी अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च महिन्यामध्ये झाले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाचा हा मुद्दा योग्य नाही. विभागाचा आराखडा मार्च, एप्रिल, मे महिन्यामध्ये तयार करावा. मार्चमधील अधिवेशनामध्ये जर अर्थसंकल्पामधून जर १०० कोटी रुपयांचा निधी मिळत असेल तर १५० कोटी रुपयांचे नियोजन करावे. परंतु असे न करता विभागीय प्रतिनिधी स्वत:चे स्पष्टीकरण देत आहेत. सन २०१८-१९ चा आराखडा मार्च महिन्यापूर्वीच तयार करावयास पाहिजे असे समितीने सूचित केले असता, या महिन्यामध्ये ७१८ कोटी रुपये प्राप्त झालेले असल्यामुळे विभागांतर्गतच्या उप विभागांची मागणी आणि बैठक घेऊन या रकमेचा वार्षिक कार्यक्रम घेऊन तो प्रसिद्ध करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाला १०० रुपयांची आवश्यकता असताना ४० रुपये मिळाले आहेत. तर मिळालेले ४० रुपये कोणत्या ठिकाणी खर्च करावयाचे ? हे कोण ठरवीत असतो. विभागाच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये असे म्हटलेले आहे की, जर विभागाला ४० रुपये मिळालेले असतील आणि जर समजा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दुरुस्तीसाठी दहा रुपये खर्च लागणार असेल तर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा करून सदर ४० रुपयांमधील प्राधान्याने कोणती कामे घ्यावयाची ? याची खात्री विभाग करून घेत असते काय? अशी विचारणा समितीने केली असता, अधीक्षक अभियंतानिहाय आणि जिल्हानिहाय याचे वाटप संबंधित लेखा शिर्षकाखाली केले जाते कामाबाबत संबंधित विभागासोबत बैठक घेऊन तसेच ठरविण्यात येत असते. जर समजा कामाबाबत संबंधित विभागासोबत बैठक घेऊन तसे ठरविण्यात येत असते.

अशा प्रकारची कार्यवाही होत नाही. जर विभागाकडे अशा प्रकारच्या बैठका घेतल्याचे इतिवृत्त असल्यास ते समितीला सादर करावे असे समितीने सूचित केले असता, एस.व्ही. सोनटक्के, अधीक्षक अभियंता यांच्यासोबत घेण्यात आलेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त सध्या उपलब्ध आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्यातील सर्व मंडळांमध्ये अशा प्रकारच्या बैठका घेण्यात आलेल्या आहेत काय? जिल्हाधिकारी कार्यालयाचा १० रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला असेल आणि त्यासाठी विभागाला जर समजा ४ रुपये द्यावयाचे आहेत. परंतु या रुपयांमध्ये दहा कामे करावयाची असतील तर त्यामध्ये प्राथम्याने कोणती कामे करावयाची आहेत ? याची यादी विभागाने तयार केलेली आहे काय ? कनिष्ठ अभियंत्यांनी जी कामे सांगितली तीच कामे करण्यात येतात असे मत समितीने व्यक्त केले असता, राज्यातील १५ मंडळामध्ये याबाबत विचारणा करण्यात आली होती. त्याबाबतचे इतिवृत्त उपलब्ध आहे. कनिष्ठ अभियंत्यानुसार काम केले जात नाही. विभागाकडे जून २०१५ चे एक रेकॉर्ड आहे. ते समितीला सादर करण्यात येत आहे. नांदेड जिल्ह्यामध्ये विभागनिहाय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पी.आर.पी. रजिस्टरनुसार इमारतींची संख्या, एकूण बांधकाम क्षेत्रफळ, सन २०१५-१६ साठी विभागनिहाय निवासी व अनिवासी इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मंजुर वितरित अनुदान याबाबतची माहिती आणि त्या अनुषंगाने मंजुर करण्यात आलेली कामे, या सर्वांचा आराखडा सदरहू बैठकीमध्ये घेण्यात आलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर आराखडा सन २०१५-१६ ला करण्यात आलेला आहे. विभागाने करावयाची कामे ठरविली असतील तर त्या कामांची यादी संबंधित विभागाकडून प्राथम्याने मंजुर करून घेतली काय ? अशी विचारणा समितीने केली असता, दरवर्षी अशा प्रकारचा आराखडा तयार करण्यात येत असतो. परंतु या आराखड्याला वार्षिक आराखडा असे संबोधण्यात येत नाही. संबंधित विभागाकडून प्राथम्य क्रमाने करावयाच्या कामांची मंजुरी घेण्यात येत असते. पोलीस अधीक्षक कार्यलय, जिल्हाधिकारी कार्यालय या कार्यालयाची कामे होतच असतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जेवढ्या मंडळांचे लेखा परिक्षण झालेले आहे त्यांचे वार्षिक योजना तयार करण्याचे इतिवृत्त देण्यात यावे असे समितीने सूचित केले असता, विभागाने जो कार्यक्रम मंजुर केला आहे, त्याला " वार्षिक कार्यक्रम " असे म्हणता येणार नाही. यासाठी उदाहरणादाखल मुंबईमध्ये मॅजेस्टिक आमदार निवास आहे. सदर आमदार निवासाची दुरुस्ती करावयाची होती. शासनाने विशिष्ट रक्कम त्यासाठी मंजुर केली होती. परंतु सदरहू आमदार निवासाची दुरुस्ती अद्यापपर्यंत विभागाला करता आली नाही. यासाठीची कारणे वेगवेगळी आहे. पहिले कारण असे आहे, की विभागाला एम.सी.झेड.एम.ए. ची परवानगी मिळालेली नाही. दुसरे असे की सदर इमारत कोसळण्यास आली आहे, असे विभागाने घोषित केले असूनदेखील तेथील ऑक्युपेंसीबाबत माननीय न्यायालयात प्रकरण सुरू आहे. तिसरे कारण असे की त्या ठिकाणी सन्माननीय लोकप्रतिनिधी राहत असतात. अशा अनेक ठिकाणी जसे की, ज्या ठिकाणी दुरुस्ती करावयाची आहे ते ठिकाण रिक्त करण्यासाठी इतर कार्यालयाने किंवा लोकांना राहण्यासाठी घर देता येत नाही, ते ठिकाण दुरुस्तीविना राहत असते. ज्यावेळी त्या ठिकाणी रहाणारा व्यक्ती बदली होऊन दुसऱ्या ठिकाणी गेला तर त्या इमारतीची दुरुस्ती करणे शक्य होते. महालेखापालांनी केलेली सूचना विभागाला मान्य आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे वार्षिक कार्यक्रम घोषित करण्यात येईल. तसेच, उपलब्ध निधीच्या मर्यादेत राहून त्याबाबत तंतोतंत पालन करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाचा कार्यक्रम एकाच वेळी ठरविण्यात येत असतो काय ? अशी विचारणा समितीने केली असता यासाठीचा ताळेबंद तयार करण्यात येतो. विभागाला अर्थसंकल्पातून २७० कोटी रुपयांची मूळ तरतूद मिळालेली आहे. त्यानंतर पुरवणी मागण्याच्या माध्यमातून १००-१०० कोटी रुपयांच्या अतिरिक्त मान्यता मिळाल्या आहेत. अशा प्रकारे एकूण ४७० कोटी रुपये मिळाले आहेत. अशा प्रकारचे अधिकचे पैसे मिळणार आहेत, असे विभागाला जर माहिती असते तर तशा प्रकारचा कार्यक्रम विभाग तयार करु शकलो असतो. त्या कार्यक्रमाला " वार्षिक कार्यक्रम " घोषित करता आला असता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

उपलब्ध निधीच्या प्राथम्यानुसार काम केले पाहिजे. विभागाच्या कार्यक्रमाची आवश्यकता, त्याचा प्राथम्यक्रम आणि त्या अनुषंगाने उपलब्ध निधीप्रमाणे काम करण्याची पद्धत अवलंबावयास पाहिजे होती. परंतु अशा प्रकारची कार्यवाही विभागाने केलेली नाही. विभाग आता असे सांगत आहे, की पुरवणी मागण्याच्यांद्वारे दोन वेळा निधी मिळालेला असून त्यानुसार काम करण्यात आलेले आहे. विभागाकडे ४०० कोटी रुपयांची जबाबदारी आहे. त्यामुळे विभागाने प्रथम्याने तयार करावयाच्या कामांची यादी तयार करावयास पाहिजे. त्यामध्ये कोणती काम सुरूवातील करावयाची ? कोणती कामे नंतर करावयाची ? अशा प्रकारचा आराखडा तयार केल्याशिवाय विभागाकडून लोकांना न्याय मिळणार नाही. त्यामुळे अशा प्रकारे काम विभागाने केलेले नाही. विभागाने केवळ निधी मिळण्याची प्रतिक्षा केलेली आहे. विभागाला मिळालेले २७० कोटी रुपये किंवा ७०० कोटी रुपयांमधील रक्कम यावर्षीच्या नियोजनावर खर्च करण्याऐवजी जुन्या वेतनावरच खर्च होईल असे समितीने सूचित केले.

२.२ परिच्छेद क्रमांक ३.१.१ वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार न करणे

या परिच्छेदाबाबत समितीची अशी अपेक्षा आहे, की ज्या लोकांनी नियमांचे पालन केले नसेल त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. मागील परिच्छेदामध्ये वार्षिक कार्यक्रम तयार करण्यात आला नाही, याबाबत विभागाने सहमती दर्शविली आहे. परंतु या विषयाबाबत ज्या काही चुका करण्यात आल्या आहेत, त्यासाठी विभागाने कारवाई केली पाहिजे. जेणेकरून विभागामध्ये शिस्तीचे वातावरण तयार होईल असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत विभागाची परिस्थिती विषद करताना जर विभागाने असे ठरविले की, सर्व मंडळाच्या कार्यालयाकडून ज्या काही मागण्या असतील त्या ताबडतोब त्यांच्याकडून घेण्याचे ठरविले तर त्या त्वरीत प्राप्त होतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाच्या दायित्वासाठी जर ७०० कोटी रुपये मिळाले आणि त्यापैकी ३०० कोटी रुपये जर विभागाच्या दायित्वावर खर्च होणार असतील तर ४०० कोटी रुपये विभागाकडे शिल्लक राहतील असे मत समितीने व्यक्त केले असता, उर्वरित चारशे कोटी रुपयांच्या दिडपट कामे घेता येतील. विभागाच्या मागणीप्रमाणे जर वार्षिक कार्यक्रम घोषित केला आणि त्या कामांसाठी जर तेवढया प्रमाणात निधी मिळाला नाही तर ती सर्व कामे शेवटी अनुत्तरीत राहत असतात. प्रशासनाचे नुकसान होणार नसून यामध्ये प्राथम्यक्रम बदलत असतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये विभाग सुरक्षित राहील. विभाग शासनाने ठरवून दिलेल्या ९१ मार्गदर्शक तत्वानुसार काम करीत असतो. जोपर्यंत आवश्यक निधी मिळणार नाही, तो पर्यंत तेवढया निधीची कामे होणार नाहीत. विभागाने हँड ओव्हर प्लॅनचा शासन निर्णय रद्द करावा. यावरून माननीय अर्थमंत्र्याना किमान कळेल की, येणाऱ्या पुढील पाच वर्षांतील कामासाठी किती खर्च लागणार आहे ? त्यामुळे विभागाने पाच वर्षाचा आराखडा तयार केला पाहिजे असे समितीने सूचित केले असता, विभागाला पुढील पाच वर्षांच्या कालावधीचा आराखडा तयार करता येणार नाही. त्यापेक्षा वार्षिक आराखडा निश्चितपणे तयार करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

२.३ परिच्छेद क्रमांक ३.१.२ जादा कामाच्या मंजुरीमुळे दायित्वाची निर्मिती :–

सदरहू परिच्छेदामध्ये असे नमूद आहे की, विभागाला निधी कमी मिळत असतो. असे असताना पुनर्नियोजनाद्वारे १९ कोटी रुपयांचा निधी समर्पित करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर निधी समर्पित करण्याची कारणे काय आहेत ? विभागाचे ३४८.७२ कोटी रुपयांचे दायित्व आहे आणि सन २०१३-१४ मध्ये १९ कोटी रुपयांचा निधी विभागाने समर्पित केलेला आहे. कोणत्या विभागाने किंवा मंडळाने सदर निधी समर्पित केलेला आहे ? याबाबतचे अभिप्राय विभागाने दिलेले नाहीत. जर विभागाला कमी निधी मिळत असेल तर सदरहू रक्कम समर्पित करण्याची कारणे काय आहेत ? विभागाने अभिप्रायामध्ये असे नमूद केले आहे की, ३४८ कोटी रुपयांची मागणी प्रलंबित होती आणि दुसऱ्या बाजुला १९ कोटी रुपयांचा निधी समर्पित करण्यात आला आहे हि बाब समितीने निदर्शनास आणली असता, सदर निधी कोणत्या मंडळाने समर्पित केला आहे, त्याची माहिती घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखापालांनी उपस्थित केलेल्या आक्षेपाच्या मुद्यांमध्ये सदर निधी समर्पित का झाला आहे, त्याबाबत माहिती सांगितलेली आहे. विभागाचे आधिकारी या पुर्वीच्या परिच्छेदामध्ये असे सांगत होते, की विभागाला कमी निधी मिळत होता. सदर बाब विभागाने एक्झिट कॉन्फरन्समध्ये मान्य केली आहे. त्यामुळे सदर १९ कोटी रुपये समर्पित करण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली व विभागाने स्पील वर्कचे दायित्व देखील घेतले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, कोणत्या मंडळाने १९ कोटी रुपये समर्पित केले आहेत ? त्याची माहिती घेऊन समितीला सादर करण्यात येईल. समितीने सूचना केल्याप्रमाणे वार्षिक आराखडा पूर्ण करण्यात येईल. जरी निधी कमी मिळाला तरी समितीने सांगितल्याप्रमाणे एकूण मागणीपैकी जी कामे प्राथम्य क्रमाने करावयाची आहेत, त्यांची अंमलबजावणी त्वरीत करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

विभागाने समर्पित केलेल्या १९ कोटी रुपयांची माहिती समितीला देण्यास सांगितले असता, रेसिडेंसी मंडळाकडून किंवा मुंबई मंडळाकडून सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ या वर्षात असे समितीने निदर्शनास आणले असता, ज्यावेळी मंत्रालय दुरुस्त करावयाचे होते, असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, मंत्रालय दुरुस्तीचे काम सन २०१२-१३ चे आहे. मंत्रालयास सदर विषय हा सन २०१३-१४ चा आहे. सन २०१२ मध्ये आग लागली होती. त्याच्या दुरुस्तीचे काम सन २०१३ मध्ये करण्यात आले होते असे समितीने निदर्शनास आणून दिले त्यावेळी, मंत्रालयाच्या दुरुस्तीसाठी विभागाच्या नॉन-प्लॅनमधून विवक्षित निधी ईयर मार्क ठेवला होता आणि तो निधी मंजुर करतेवेळी वित्त विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला सांगितले होते की, सदर निधी याच कामासाठी खर्च करावयाचा आहे. त्यावेळी त्या आर्थिक वर्षात जेवढे काम झाले होते तेवढे पैसे वापरण्यात आले आणि उर्वरित निधी परत पाठविण्यात आला होता असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मंत्रालयाचे बरेचसे काम करणे शिल्लक होते. असे असताना विभागाला मिळालेला निधी विभाग खर्च करु शकला नाही, ही विभागाची अकार्यक्षमता आहे. मंत्रालयाच्या दुरुस्तीच्या कामासाठी कंत्राटदाराने विभागाकडे त्यांची देयके कधी दाखल केली ? ३१ मार्च रोजी मंत्रालयाचे किती रुपये देणे विभागाकडून प्रलंबित होते. कंत्राटदाराची देयके विभागाला मंजुर केली आहेत, परंतु वेतन दिलेले नाही. असे ३१ मार्च रोजी किती रकमेची देयके प्रलंबित होते अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने यासाठी कोणत्याही प्रकारची अकार्यक्षमता दर्शविलेली नाही. कंत्राटदाराचे वेतन देण्यात आलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. आजही कंत्राटदाराचे विवादित देयके देण्यात आलेली नाहीत. कारण त्यामध्ये अपेक्षिततेप्रमाणे काम केले नसेल तर आणि शासनाने नियुक्त केलेले जे सल्लागार होते त्यांचे प्रमाणिकरण होत नाही, तो पर्यंत कंत्राटदाराची देयके अदा करावयाची नव्हती. त्यामुळे त्या मंडळाने सदर खर्च केलेला नाही, असे उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

एवढया मोठ्या प्रमाणात विभागाचे दायित्व वाढण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, साधारणपणे असे होते की, एखादा अधिकारी बदलून गेल्यानंतर त्यांचे निवासस्थान बदलून द्यावे, अशी मागणी येते. काही ठिकाणी व्ही.व्ही.आय.पी. लोक असतात. सदर बाब ही मुंबई विभागाशी संबंधित आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर ३४८ कोटी रुपये मुंबई मंडळाचे आहेत काय ? ज्या ठिकाणी उच्च पदस्थ अधिकारी राहतात त्याच ठिकाणी पैसे खर्च करण्याचे काम विभाग प्राथम्याने करत असते असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाचे बहुतेक दायित्व हे चार ठिकाणचे आहे. मुंबई, पूर्णे, नागपूर आणि औरंगाबाद. औरंगाबाद येथे जास्त प्रमाणात दायित्व नाही. ज्या ठिकाणी एस. आर.पी.एफ. आणि गृह विभागाची निवासस्थाने मोठ्या प्रमाणात आहेत, त्या ठिकाणी अशा प्रकारचे दायित्व झालेले असते. मध्यंतरी सर्व इमारती ताबडतोब दुरुस्त करण्यात याव्यात, असे सांगण्यात आले होते. सदर कामे सुरू करण्यात आली होती. त्यासाठी गृह विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाला स्वतंत्र निधीदेखील दिलेला होता. त्यांनी नंतर दुरुस्तीची प्रशासकीय मान्यता देऊन आणि त्या विभागाच्या वाटपामधून निधी देण्याचीही व्यवस्था केली होती असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

गृह विभागाने केलेल्या व्यवस्थेची या ठिकाणी चर्चा करण्यात येत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाला मिळालेल्या अनुदानाच्या खर्चाची चर्चा या ठिकाणी करण्यात येत आहे. विभागाला मिळालेल्या निधीमधून जो खर्च करण्यात आलेला आहे, त्याबद्दल चर्चा करण्यात येत आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने समर्पित केलेल्या १९ कोटी रुपयांचे कारण वरीलप्रमाणे असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर बाब समितीने मान्य केली. परंतु इतर दायित्व वाढविण्याची कारणे काय आहेत ? दर वर्षी विभागाला जो निधी प्राप्त होतो, त्याच्या दीडपट खर्च करण्याचे नियोजन विभाग करीत असतो. जर विभागाला ३०० कोटी रुपये मिळाले असतील तर जवळपास ४५० कोटी रुपये खर्च करण्यात येईल. ३०० कोटी रुपयांची तरतूद विभागाने केली आहे. परंतु त्यापैकी किती रक्कम मिळणार हे विभागाला माहिती नाही. पुरवणी मागण्यांमध्ये काही रक्कम मिळते किंवा नाही, याचीही विभागाला माहिती नाही. अशा प्रकारे अनुषेश वाढवित तो ३४८ कोटी रुपये झालेला आहे. त्यामुळे जो नियतव्यय ठरविण्यात आलेला आहे त्यापेक्षा दिडपट रक्कम खर्च करण्यात येईल. त्यामुळे दीडपट खर्च करण्यासंदर्भात तो खर्च केल्यानंतर जर खर्च केलेली रक्कम जर वाढली तर पुढील वर्षी दिडपट रक्कम खर्च न करता, जेवढी रक्कम मिळते तेवढीच रक्कम खर्च करण्यात यावी आणि मागील दिडपट रकमेचे वेतन अदा करण्यात यावे असे समितीने सूचित केले असता, सदर दायित्व आता कमी होत आहे. या वर्षी अशा प्रकारची अंमलबजावणी करण्यात येत आहे की, स्पील किमत वजा करून उर्वरित जी रक्कम शिल्लक राहते त्या रकमेच्या दीडपट कार्यक्रम तयार करण्यात यावा, जेणेकरून पुढील वर्षात विभागाचे दायित्व कमी होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

स्पीलचा निधी कमी करून नियतव्ययामधील रक्कम दीडपट करण्यात यावी. विभागाला जर मागील वर्षी १०० कोटी रुपये मिळाले तर मागील वर्षीचे स्पील वर्क जर ५० कोटी रुपयांचे असेल तर उर्वरित ५० कोटी रुपयांच्या दिडपट म्हणजेच ७५ कोटी रुपयांचे नियोजन करण्यात यावे, अशा प्रकारचा नियम आहे. दिडपट स्पील निधी कमी करून खर्चच करण्यात यावा, एखाद्या अधिकाऱ्याने अशा प्रकारचा नियम केल्यानंतर तो अधिकारी बदलून दुसरीकडे गेला आणि त्या ठिकाणी नवीन अधिकारी रुजू झाल्यानंतर त्यांनी जे नियम केले असतील ते नियम दुसरा अधिकारी बदलून टाकतो असे मत समितीने व्यक्त केले असता अशा प्रकारे नियम बदलता येत नाहीत. सन १९९१ चे नियम पुस्तक अजूनही बदलले नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

संसदेमध्ये प्रत्येक विभागाची वित्तीय समिती आहे. त्या समितीमध्ये सन्माननीय खासदारांचा समावेश असतो. त्यामुळे त्या त्या विभागाचे खर्च, नियोजन, खर्चावरील महालेखापालांचे अभिप्राय हे सर्व त्यामध्ये अंतर्भूत असते. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग, आदिवासी विकास विभाग, समाजकल्याण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग अशा प्रकारच्या ज्या ज्या विभागांना राज्य सरकारकडून नियतव्ययामधून निधी दिला जातो त्या त्या विभागांची सर्व पक्षीय माननीय विधानसभा सदस्यांसह वित्त समिती तयार केली पाहिजे. तशी शिफारस समितीच्या अहवालात केली पाहिजे. तरच विभागाला शिस्त लागेल असे मत समितीने व्यक्त केले.

पूर्वी राज्यामध्ये माननीय कै. विलासराव देशमुख यांच्या कार्यकाळात एक वर्षाकरिता स्टँडींग कमिटी सुरू केली होती. मात्र त्या वेळी अधिकाऱ्यांना काम करण्यात अडचण येऊ लागली. त्यांनी असे सांगितले की, त्यांचा वेळ समित्यांच्या बैठकीत जातो व कामासाठी वेळ मिळत नाही. या नंतर स्टँडींग कमिटी बरखास्त करण्यात आल्या. या ठिकाणी १९ कोटी रुपयांचा मुद्दा आहे. ह्या बाबत उत्तरामध्ये खुलासा दिलेला नाही. हेड २०५९, भांडवली खर्च या अंतर्गत हा खर्च केलेला आहे. हा निधी वळता (Divert) करता आला असता असे महालेखापालांचे मत आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, मंत्रालय दुरुस्तीचा निधी वळता (Divert) जाणीवपूर्वक विभागाने डायव्हर्ट केला नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

त्या हेडला कमी निधी मिळाला असता व विभागाचे जे दायित्व प्रलंबित आहे ते कमी झाले असते हे करण्यात चूक झालेली आहे हे मान्य करावे. तसेच केलेल्या कामांची यादी पाठवावी. कोणत्या कामावर कोणत्या वर्षी किती खर्च केला याची माहिती द्यावी. तसेच एक टीम तयार करून ५ वर्षात एकाच कामावररदोन वेळा खर्च झाला आहे काय, हे तपासावे व त्याचा अहवाल समितीला द्यावा असे समितीने सूचित केले असता, १,४४४ कामांची यादी समितीला हवी आहे. किती खर्च झाला व सद्य:स्थिती काय आहे ही माहिती देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.४ परिच्छेद क्र. ३.१.३ देखभाल व दुरुस्तीच्या मानदंडाची सुधारणा न करणे :-

सदर परिच्छेदासंदर्भात माहिती देताना हा विषय मानदंडाबाबतचा आहे. मोमीन समितीचे मानदंड स्वीकारणे व त्याची अंमलबजावणी करण्यास सुरूवात झाली आहे. शासन निर्णय लवकरच तयार करण्यात येणार आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

याची अंमलबजावणी यापूर्वीच का केली नाही ? २४ वर्षांपासून अद्याप हे केलेले नाही. याचे कारण देताना समितीचे डेलिबरेशन बरेच झाले. संगणकीकरण करताना तक्रार ऑनलाईन रजिस्टर केली जाईल. ऑनलाईन व्हेरीफिकेशन व काम झाल्यानंतर ऑनलाईन रिपोर्टींगग करून बिल पेमेंट केले जाईल. वित्त विभागाच्या बिम्सशी हे कसे रिलेट करावयाचे या बाबत काही प्रश्न होते. श्री. नवले, अधीक्षक अभियंता या कामामध्ये रस घेऊन वित्त विभागाच्या बिम्सशी कामाचे रिलेटींग केले आहे. पब्लिक डोमेनमध्ये दुरुस्तीचे काम कोणीही बघू शकते. संगणकीकरणाची प्रक्रिया क्लिष्ट असून त्याला वेळ लागलेला आहे. ही वस्तुस्थिती आहे. हे करायला ३ वर्ष लागली असून या कालावधीमध्ये पुन्हा काही नवीन इमारती झाल्या. त्यांचा देखील डेटा अपडेट करायचा आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

दरवर्षी इमारती एड होणार आहेत. २४ वर्ष विभागाने काहीही केले नाही. मोमीन यांची समिती नोव्हेंबर, २०१५ मध्ये नियुक्त केली होती. त्याचा अहवाल कधी आला ? अशी विचारणा समितीने केली असता, ऑक्टोबर, २०१७ मध्ये अहवाल आलाा असून दीड महिन्यात मानके निश्चित करण्यात येतील. वित्त व नियोजन विभागाकडून मंजुरी घेण्यात येईल तसेच कार्यपालनाचा एक अहवाल असून तो लवकरच पूर्ण केला जाणार आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

१५ निवासी इमारतींच्या देखभाल दुरुस्तीकरिता प्रत्यक्षात झालेला खर्च मुख्य अभियंता, मुंबई क्षेत्र यांनी जानेवारी, २०१४ मध्ये विहित केलेल्या २८,५०० रु प्रति चौ.मी ... या खर्चात नवीन इमारत झाली असती असा महालेखापालांचा आक्षेप आहे, हे तपासले काय ? अशी विचारणा समितीने केली असता, हेरिटेज इमारती पाडता येत नाहीत. यातील बहुतांश इमारती हेरिटेज आहेत. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

हेरिटेज इमारतींच्या व्यतिरिक्त इतर इमारतींकरिता जो खर्चच झाला तो मान्य आहे काय ? आता मनोरा इमारत पाडली जात आहे असे विभागाच्या निदर्शनास आणले असता, निवासस्थानाच्या दुरुस्तीची आवश्यकता होती. या इमारतीचे काम केले असते तर तेथे राहणाऱ्यांची दुसरीकडे सोय करावी लागली असती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तेथील रहिवाशांना तेथून स्थलांतरीत करावे लागले असते, त्यांना त्रास झाला असता म्हणून इमारत बांधण्यापेक्षा दुरुस्तीकरिता जास्त खर्च केलाहे योग्य आहे काय ? सारंग या इमारतीमध्ये उच्च न्यायालयाचे न्यायाधीश राहत होते. सारंग ही इमारत पाडून तेथे नवीन इमारत बांधावी असा शासनाचाा प्रस्ताव प्राप्त झाला होता. तेथे राहणाऱ्या न्यायाधीश यांनी तो प्रस्ताव मान्य केला नाही.

सर्व इमारती हेरिटेज नाहीत. देवगिरी, मेघदूत, रामटेक, सेवासदन, शिवगिरी, जेतवन, अग्रदूत, चित्रकुट, मुक्तागिरी, नंदनवन, पर्णकुटी, पुरातन, शिवनेरी, सारंग या इमारती आहेत. सारंगमध्ये मंत्री महोदय राहतात. तसेच काही जजेस देखील आहेत १५ इमारतींपैकी एकही हेरिटेज नाही. असे समितीने व्यक्त केले असता, ही इमारत जीएडीच्या अंतर्गत असल्याने सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांसोबत बैठक घेतली. त्यांनी असे सांगितले की, इमारतीचे बांधकाम करण्याऐवजी रिपेअर करावे. ही इमारत दुरुस्त करणे प्रुडंट वाटते व विभागाने तसे करावे असे सांगण्यात आले. पुरातन नावाची इमारत पाडण्याचा निर्णय झाला. तेथे जागा असून १३ मजली इमारत बांधावी असाही शासन निर्णयय झाला. निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन कार्यारंभ आदेश द्यावयाचे होते`त्यावेळी निर्णय घेण्यात आला की, ही इमारत आता पाडू नका. जुन्या इमारतीमध्ये मंत्री महोदयांची राहण्याची व्यवस्था करावी. सार्वजनिक बांधकाम विभागाला टेंडरचे श्रम करावे लागले व त्या नंतर थांबावे लागले. सन २०१४-१५ मध्ये निर्णय झाला असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव यांची भेट झाली त्यावेळी त्यांना विभागाने कल्पना दिली होती का, दुरुस्तीचा खर्च नवीन इमारत बांधण्यापेक्षा जास्त होणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, याासंबंधी महालेखापाल यांनी जे आक्षेप घेतले होते त्याचे नंतर निराकरण करण्यास सचिवांना सांगितले. दुरुस्ती करणे हे दिलेल्या आदेशांचे पालन करणे आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सारंगची सद्य:स्थिती काय आहे, पुढे देखील असेच केले जाणार काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सारंग इमारतीच्या देखभाल दुरुस्तीचे काम करावेच लागणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या इमारतीचा दरवर्षी दुरुस्तीचा खर्च अमुक आहे व नवीन इमारत बांधण्याचा खर्च अमुक आहे. मेन्टेनन्सपेक्षा नवीन इमारत बांधली तर ते परवडेल असे विभागाने शासनाच्या व मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणावे अशी सूचना समितीने केली व जज साहेबांचे मत आपण

धारिकेत नोंदवले होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, मिनिट्समध्ये अशी नोंद आहे की, " It is prudently instructed to repair the building." १६६ मान्यवरांना त्याच दर्जाचे फ्लॅट्स इतरत्र शोधून देणे ठराविक कालावधीत इमारत पाडून नवीन बांधणे या पेक्षा आहे त्याच ठिकाणी इमारत बाहेरून रिपेअर करता आली तर १६ मान्यवरांना कॅबिनेट दर्जाचे निवासस्थान उपलब्ध करून देणे याला लागणारे कष्ट पाहता इमारत रिपेअर करणे सोयीचे होईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या इमारतीच्या दुरुस्तीला जास्त खर्च झाला. रिपेअरच्या खर्चापेक्षा नवीन इमारत स्वस्तात बांधून झाली असती. ५२ कोटी रुपये खर्च झाला. ३७ कोटी रुपयांमध्ये नवीन इमारत बांधली असती. सचिवांचे काम सल्ला देण्याचे आहे. प्रुडन्टली सचिवांनी सल्ला देण्याचे काम केले होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणामध्ये सल्ला दिलेला नाही. मात्र नंतर माझगाव कोर्टाच्या इमारती बाबत असाच आग्रह होता. त्यावेळी विभागाने हे कटाक्षाने लक्षात आणून दिले की, दुरुस्तीचा खर्च ४०-४५ टक्क्यापेक्षा जास्त होईल. तो करु नये. ८ मजली इमारत आहे. त्याऐवजी १६ मजली इमारत बांधली तर जास्त व्यक्तींना निवासस्थान उपलब्ध करून देता येतील. त्याकरिता ५-६ महिने प्रयत्न करावे लागले. या नंतर परवानगी मिळाली असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यामध्ये मुलभूत फरक असा आहे की, ती न्यायालयाची इमारत होती या ठिकाणी शासनाची इमारत आहे. शासन मालक आहे. माननीय न्यायाधीश यांनी अशी सूचना केल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला अशी नोंद केलेली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व याचे निगोशिएटेड टेंडर काढण्यात आले होते. फाईलवर जे लिहिले आहे ते आता उपलब्ध नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्याची प्रत समितीला द्यावी. खर्च जास्त झालेला आहे. जे कोणी जज्ज होते त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे शासनाचे किती नुकसान झाले याची माहिती पाठवावी. अशा निर्णयात या पुढे त्यांनी हस्तक्षेप करु नये असे समितीने सूचित केले असता या संबंधी समितीने शिफारस द्यावी असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.५ परिच्छेद क्र. ३.१.४ मंजुर झालेली कामे रद्द करणे :—

२५ कामाचे एमबी रेकॉर्ड दिले नाहीत. २५ कामे रद्द केली असे महालेखापालांचे या परिच्छेदानुसार आक्षेप असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, हे रेकॉर्ड नंतर व्हिजीलन्स कमिटीला सादर केले आहेत. त्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. ९ कामे झाली असून त्याचे पेमेंटही झालेले आहे. इतर १६ कामे नंतर रद्द करण्यात आली असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रद्द केलेल्या कामांचे एमबी रेकॉर्ड कसे झाले ? काम न करता एमबी रेकॉर्ड करणे हा गुन्हा आहे. या बाबत पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला काय ? याची चौकशी करण्याची आवश्यकता नाही. संबंधितांना तातडीने निलंबित केले काय, आज ते कोणत्या हुद्यावर आहेत. सन २०१५ मध्ये चौकशीचे आदेश दिले. अद्याप एफआयआर, निलंबन काहीच झाले नाही. रद्द झालेल्या कामाचे एमबी रेकॉर्ड झाले. कार्यकारी अभियंता यांनी २५ कामांच्या प्रत्यक्ष स्थितीची पडताळणी करण्यासाठी मोजमाप पुस्तिकेच्या प्रती लेखापरीक्षणाकरिता प्रस्तुत केल्या नाहीत. त्यांच्यावर काय कारवाई केली ? याबाबत समितीने खुलासा करण्यास सांगितले असता, हे खरे आहे. हे काम संशयास्पद वाटल्यामुळे व्हिजीलन्स क्वालिटी कंट्रोल, नवी मुंबई यांच्याकडे तपासायला दिले. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

निष्पन्न झाल्यानंतर काहीच कारवाई केली नाही. इक्युसीसी यांच्याकडे दिनांक १ मार्च २०१८ रोजी दिलेले आहे. तत्कालीन अधिकाऱ्याचे नाव काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सध्या श्री. इंदूरकर हे कार्यकारी अभियंता कार्यरत असून त्या वेळी श्री. के. पी. पाटील कार्यरत होते. सध्या ते कार्यकारी कार्यकारी अभियंता या पदावर आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उक्त प्रकरणी सन २०१५ मध्ये कारवाई प्रस्तावित केल्याचे नमूद केले असून अद्याप काहीही केले नाही. आता सन २०१८ आलेले आहे. या काळात चौकशी समितीला पाठवले नाही. या संबंधी विभागाची काय भूमिका आहे ? अशी विचारणा समिती केलेली असता, यामध्ये जी काही अनियमितता झाली आहे, ती दुर्लक्षित करावी किंवा कोणाला संरक्षण द्यावे अशी विभागाची भूमिका नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

अशी भूमिका नाही, याचा अर्थ काय आहे अशी भूमिका असते का ? भ्रष्टाचाराला पाठिशी घालायचे नाही, ही विभागाची भूमिका आहे, म्हणजे नमके काय ? त्यावरच आक्षेप आहे. २५ कामांची तपासणी करून घेतली आहे. पाटील नावाचे कार्यकारी अभियंता आहेत, त्यांना वारंवार ताकीद देऊनही, त्यांनी २५ कामांचा अहवाल दिला नाही, या संदर्भात पाटील यांच्यावर कोणती कारवाई केली, महालेखापालांच्या कॉन्फरन्समध्ये विभागाच्या निदर्शनास आले, त्यांना वारंवार सांगूनही त्यांनी झालेल्या २५ कामांच्या मोजमापांचा अहवाल दिला नाही, हे विभागाच्या लक्षात सन २०१५ मध्ये आले, हे खरे आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, २५ कामांची तपासणी करून घेतलेली आहे परंतु मोजमापांचा अहवाल दिला नाही ही बाब एक्झिट कॉन्फरन्समध्ये लक्षात आली, हे खरे आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

त्यावेळी लक्षात आल्यानंतर, तपासणीचे काम दिनांक १ मार्च, २०१८ पर्यंत का थांबवण्यात आले हे सन २०१८ पर्यंत व्हीक्युसीसीकडे का पाठविले नाही, हे पाठविण्याची जबाबदारी कोणाची होती, माननीय मंत्री होते की विभागाचे प्रधान सचिव होते ? अशी विचारणा समितीने केली असता, यास जबाबदार सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग हे होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मग त्यांनी का पाठविले नाही ? याचा अर्थ ते गुन्हेगार आहेत. ही मोडस् ऑपरेंडी आहे, कनिष्ठ स्तरापासून खालपर्यंत हे रॅकेट आहे. या संदर्भातील कारणे सांगावीत. पत्र दिनांक १ मार्च, २०१८ ला पाठविले, याचा अर्थ, विभागीय सचिवांनी साक्षीला यायेचे होते म्हणून पाठविले, नाही तर हेही पाठविले नसते. या प्रकरणात वरिष्ठ अधिकारी जबाबदार आहेत. अधिकारी महालेखापाल कॉन्फरन्समध्ये जातात, त्यावेळी त्यांना लक्षात आणून दिल्यानंतरही काहीही होत नाही. ३ वर्षे ज्यांनी या कामामध्ये दिरंगाई केली, त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस करावी असे मत समितीने व्यक्त केले.

पाटील यांच्यावर काही कारवाई करणार की नाही, या समितीच्या प्रश्नाबाबत कागदपत्रे महालेखाकारांना दिली नाहीत, याबाबतीत कारवाई करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कारवाई म्हणजे काय करणार कागदपत्रे दिली नाहीत इतकीच चूक आहे का ? काम न करता रेकॉर्ड केली आहेत. हा तर फौजदारी गुन्हा आहे. हे प्रकरण पोलिसांकडे पाठवावे. एसआयटीची शिफारस करण्यात यावी. काम झाले आहे का ? हे प्रकरण संशयास्पद आहे, असे विभागाचे मत असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, एकूण १६ ठिकाणी काम केलेले आढळले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

९ ठिकाणी आढळले आहे, असे नमूद केल्याचे समितीने सांगितले असता, ९ ठिकाणी काम केलेले आढळले आहे. ज्या ठिकाणी काम केलेले आढळले नाही, त्या संदर्भात विभागाकडून कारवाई करण्यात येणार आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

१६ ठिकाणी कामेच दिसत नाहीत. या संदर्भात एफआयआर दाखल केलाच पाहिजे होता आता त्यांची विभागीय चौकशी काय करणार? आणि ती विभागीय चौकशी संबंधित व्यक्ती निवृत्त होईपर्यंत चालणार आहे. रेकॉर्ड करणारे शाखा अभियंता, ऑर्डर पास करणारे उप अभियंता, मंजुर करणारे कार्यकारी अभियंता, संबंधित अकाऊंटंट या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे, सर्व निलंबित झाले पाहिजेत. एका बाजूला झालेल्या ९ कामांचा विचार करण्यात येईल. मात्र न झालेल्या कामांचे काय करायचे ? ही फॉर्ज्युरी, फ्रॉड आहे. विभागाने किमान या विषयाच्या बाबतीत अत्यंत कॅज्युअली घेतले आहे. उत्तरात नमूद आहे की, याबाबतीतील सविस्तर विवेचन खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे. सविस्तर विवेचन म्हटले आहे आणि ३ ओळीतच विवेचन दिले आहे की, विभागाने दक्षता समितीकडे सगळी कागदपत्रे पाठविली आहेत. ही कागदपत्रे कधी पाठविली आहेत ? सर्व कागदपत्रे दिनांक १.३.२०१८ ला पाठविली आहेत. विभाग समितीला खूपच घेत आहे. हे सविस्तर विवेचन आहे का ? महालेखाकारांचा परिच्छेद आल्यावर, तत्संदर्भात साक्ष लागल्यावरही विभाग कार्यवाही करीत नाही, हे अत्यंत गंभीर आहे, चिंतेची बाब आहे. महालेखाकारांना आक्षेपासंदर्भात कागदपत्रेच देत नाहीत, याचा अर्थ काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, या संदर्भात घ्यावयाच्या कार्यवाही संदर्भातील प्रस्ताव माननीय मंत्र्यांकडे सादर करण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी विदित केले.

याबाबत काय कार्यवाही करणार, पहिल्यांदा एफआयआर दाखल करणार का ? हा फ्रॉड आहे, हे विभागाला मान्य आहे. जी कामे झाली नाहीत, त्या संदर्भात समिती सांगत आहे. ९ कामे झाली आहेत, नंतर ती रद्द झाली आहेत, मात्र ती कामे झाली आहेत. त्या संदर्भात क्षमापित करणे शक्य आहे. पण जी कामे झालीच नाहीत, त्या संदर्भात विभाग ३ वर्षे कोणतीच कारवाई करीत नाही आणि याचे समर्थन करीत आहे, हे बरोबर नाही. आजही ते अधिकारी कामावर आहेत, या संदर्भात समितीचा भावना अत्यंत तीव्र आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी एमबी घेतले आहे, रेकॉर्ड केले आहे, असे दाखवून पैसे उचलले आहेत, हे शासनाला, प्रशासनाला माहीत होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, त्या पैशांचे प्रदान झालेले नाही, फक्त रेकॉर्ड झाले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रेकॉर्ड झाले आहे, प्रदान झालेले नाही, असे कसे काय? महालेखाकारांच्या लक्षात आले म्हणून ते प्रदान झाले नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीचे मत बरोबर आहे. प्रदान झाले नाही तरी रेकॉर्ड झाले आहे. रेकॉर्ड प्रदानासाठी आले असते या संदर्भात पेमेंट झालेले नाही पेमेंटच्या संदर्भात मागच्याच परिच्छेदात उल्लेख केला आहे, दायित्वाची रक्कम मोठी असल्यामुळे बरीच देयके प्रलंबित आहेत. त्यातील हे प्रलंबित देयक असेल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मान्यता मिळाली असेल. कोणत्या वर्षाचे देयक आहे ? दायित्व किती वर्षे बाकी आहे? अशी विचारणा समितीने केली असता, देयक मान्य झालेले नाही. आता त्याचे तपशील नाहीत. २५ कामांची माहिती उपलब्ध नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

देयक मान्य झाले, मात्र त्यासाठी जास्त पैसे लागत आहेत आणि ते पैसे नव्हते म्हणून देयक अदा केले नाही, असे झाले आहे का ? या समितीच्या प्रश्नाबाबत देयक मान्य झाले नसून देयक रेकॉर्ड झाले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

रेकॉर्ड झाले आहे म्हणजे मान्य झाले आहे. एमबी झाल्याशिवाय रेकॉर्ड कसे होईल ? देयक मान्य म्हणून रेकॉर्ड होते. काम झाले नाही आणि त्यामुळे देयक रेकॉर्ड केले. देयक एमबीमध्ये रेकॉर्ड केले, मग त्याचे रुपांतर देयकात केले असेल आणि देयक प्रस्तावित झाले असेल की, यांना अमूक एवढे देय आहे. जे देय आहे, ते मान्य झाले होते का ? पैसे नाहीत, हे समजणे शक्य आहे, पण देयक ॲप्रूव्ह झाले होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, यातील सर्व स्टेप्स तपासून संबंधितांविरुद्ध एफआयआर लाँच करण्यात येईल देयक मंजुर झाले आहे की नाही, हेच तपासण्यात येणार आहे.

तपासण्यात येणार असे विभागीय प्रतिनिधी सांगत आहेत विभागाने महालेखाकारांना कागदपत्रे दाखविली नाहीत, विभाग त्यामध्ये काय तपासणार आहे? अशी विचारणा समितीने केली असता, महालेखाकारांना देयक दाखविले नाही. त्याबद्दलही ॲक्शन घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

हे सन २०१४ च्या अगोदरचे प्रकरण आहे. आता सन २०१८ आहे. या संदर्भात विभागीय प्रतिनिधी अजून तपासणी करणार असे सांगत आहेत? साक्षीला अभ्यास करून आले पाहिजे होते. साध्या प्रश्नाला तपासतो, पाहून सांगतो, असे उत्तर असेल तर बरोबर नाही. समितीचा यामुळे अवमान होत आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये जो वेगळा मुद्दा आहे, त्याची फक्त खात्री करून घेण्यात येईल आणि एफआयआर लाँच करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

देयके मंजुर झाली आहेत का, देयके मंजुर झाली तर त्याचे पेमेंट का झाले नाही, तसेच श्री.पाटील यांच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे, आतापर्यंत त्यांच्यावर का कारवाई करण्यात आली नाही आणि त्याला कोण जबाबदार आहे? अशी विचारणा करून एफआयआर दाखल करावा आणि त्यांना निलंबित करावे असे समितीने सूचित केले असता, सदर मोजमापे शाखा अभियंता यांनी मोजमाप पुस्तिकेत नोंदविल्याचे आढळून येते, मात्र नोंदविलेली मोजमापे उप अभियंता किंवा कार्यकारी अभियंता यांनी तपासलेली नाहीत, असे आहे. वैयक्तिक व्यक्ती जेथे असेल तेथे देयक पास झाले असेल तर तेथे कार्यकारी अभियंता असतात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मोजमापे तपासली नाहीत, एवढेच लिहिले आहे. आलेली देयके मान्य झाली आहेत की नाहीत ? मोजमापांच्या संदर्भात समितीने विचारलेले नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, कार्यकारी अभियंत्यांनी तपासली नाहीत, याचा अर्थ, ती पुढे प्रोसेसच झाली नाहीत. दिनांक १.३.२०१८ ला तपासण्यास दिले होते, त्याचा हा अहवाल आहे. कार्यारंभ आदेश दिनांक २७.१२.२०११ ला दिला होता. सन २०११-१२ चे काम आहे. काम पूर्ण करण्याचा दिनांक २४.१.२०१२ होता, म्हणजे सन २०१२-१३ मध्ये काम झाले पाहिजे होते. लेखा परिच्छेद त्याच कालावधीतील होता असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २०१२ ला काम पूर्ण झाले, त्याच्या एमबी भरून देण्यात आल्या, सन २०१२ नंतर त्याचे पेमेंट कधी झाले पाहिजे होते ? त्या कामाचे पेमेंट सन २०१३, सन २०१४ मध्ये झाले पाहिजे होते. एमबी रेकॉर्ड तपासले की नाही ? तपासले असेल तर कार्यकारी अभियंत्यांनी त्यावर लिहिले का की, त्यांना हे काम आढळत नाही किंवा त्यांना यामध्ये संशय आहे. मग असे काही लिहिलेले नसताना पेमेंट का झाले नाही ? एमबी रेकॉर्डवरून सर्व काही समजेल. सर्व कामे रद्द होती, २५ कामे महालेखाकारांच्या नजरेस कशी आली ? एमबी मिळाली नाही म्हणून विषय उपस्थित झाला आहे. विभागाने सांगितले आहे की, त्यातील ९ कामे झाली आहेत, १६ कामांमध्ये विभागाला संशय आहे. मग एमबी रेकॉर्ड कोणी केले ? ते उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी तपासले नाही आणि ॲप्रूव्ह केले नाही, असे विभागाचे म्हणणे आहे का ? यामध्ये शाखा अभियंत्यांना गुंतवायचे असेल. शाखा अभियंत्यांनी एमबी रेकॉर्ड केले आहे. तसे अहवालामध्ये लिहिले आहे याबाबत आता अहवालातील नमूद आहे ते सन २०१८ चे आहे. घटना सन २०१२ च्या अगोदर झाली आहे. सन २०१३ ला पेमेंट झाले पाहिजे होते, मात्र ते का निघाले नाही, त्यावेळी देऊ नका, असे कार्यकारी अभियंत्यांनी लिहिले असेल, असे काही आहे का ? पेमेंट का झाले नाही, अशी विचारणा समितीने केली असता, त्याचे देयक उप अभियंत्यांनी किंवा कार्यकारी अभियंत्यांनी तपासले नाही, तपासले नाही म्हणजे त्यांना काही शंका वाटली असेल की, हे खोटे देयक असेल. रेकॉर्ड तपासून सांगता येईल. रेकॉर्ड तपासावे लागेल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २०१५ पासून विभागाने कोणतीच कार्यवाही केलेली नाही. हे प्रकरण सीआयडीकडे दिले पाहिजे. यामध्ये फक्त शाखा अभियंत्यांची सही आहे, त्यांच्या वरिष्ठांची सही नाही. कोणाची सही नाही, हे व्हीक्युसीसीच्या अहवालात आहे. समितीला सर्व कागदपत्रे हवी आहेत. मूळ कागदपत्रे समितीसमोर आणावीत, एमबी आणावी. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ॲप्रूव्ह केले नाही तर ते दोषी नाहीत. समितीला निर्दोषांवर कोणताही अन्याय करायचा नाही. ज्यांनी चुकीची एमबी रेकॉर्ड केली असेल त्यांच्यावर विभागाने कारवाई केली नाही, ही विभागीय

अधिकाऱ्यांची जबाबदारी आहे. Purposely the Department has avoided to take action against the responsible officers, according to your mind. विभागीय अधिकारी तेही करण्यास तयार नाही. हे स्पष्ट होत आहे. समितीला स्पष्ट उत्तर हवे आहे. पाटील नावाचे कार्यकारी अभियंता आहेत, त्यांनी महालेखाकारांना या संदर्भातील माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे, त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे. तसेच एक्झिट कॉन्फरन्समध्ये ही बाब नजरेस आल्यानंतरही पाटील यांच्यावर का कारवाई करण्यात आली नाही आणि त्यासाठी कोण जबाबदार आहे, या संदर्भातील माहितीही समितीच्या समोर आली पाहिजे. कारण हे खूप गंभीर आहे. महालेखाकारांना माहिती देण्यात येत नसेल तर संपूर्ण सिस्टिमलाच आव्हान देण्यात येत आहे. या समितीसमोर आल्यावर चुकलेले असेल तर मोकळेपणाने कबूल करावे असे मत समितीने व्यक्त केले असता, आता जर स्टेटमेंट केले तर योग्य होणार नाही. चुकून स्टेटमेंट केले की, संबंधित कार्यकारी अभियंत्यांवर ॲक्शन घेण्यात येईल आणि तेथे त्यांची सही नसेल आणि त्यांनी पारित करू नये, असे लिहिले असेल तर ते जबाबदार होऊ शकत नाहीत. त्यामुळे या संदर्भात पडताळणी करून कारवाई करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचे तेच मत आहे की, विभागीय अधिकारी या प्रकरणाचा अभ्यास करूनच येथे आलेले असतील. त्यामुळे ही फॅक्ट आहे, असे विभागीय अधिकाऱ्यांनी सांगितले पाहिजे. व्हीक्युसीसीमध्ये शाखा अभियंत्यांचे नाव घेण्यात येत आहे आणि सांगण्यात येत आहे की, त्यांनी तपासले आहे, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपासलेले नाही. कार्यकारी अभियंत्यांकडे वारंवार मागणी केली आहे. कार्यकारी अभियंत्यांना माहीत असेल की या सर्व गोष्टींमध्ये ते सहभागी नाहीत तर त्यांनी पेपर दिले असते. ही सीआयडीचे प्रकरण आहे. कार्यकारी अभियंत्यांना जर माहीत असेल की त्या प्रकरणात असे घडले आहे तर त्यांनी कागदपत्रे दिली असती. वारंवार मागणी करून कागदपत्रे दिली नाहीत, याचा अर्थ, ते सुद्धा त्यामध्ये आहेत. समितीचा विभागाच्या व्हीक्युसीसीवरही संशय आहे. व्हीक्युसीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही बैठकीत बोलवण्यात यावे. व्हीक्युसीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही विभागाच्या प्रधान सचिवांबरोबर बैठकीसाठी बोलवावे असे समितीने सूचित केले.

यदि हमें विभाग में रिकार्ड नहीं मिलता है, पहले तो विभाग के ही वरिष्ठ अधिकारी के माध्यम से सचिव स्तर के अधिकारी के ध्यान में यह बात लायी जाती है. उसके बाद भी यदि हमें जानकारी प्राप्त नहीं होती है तो हम सीएजी अहवाल में इस बारे में लिख देते है. असे महालेखाकारांनी सांगितले.

२५ कामांचे एमबी रेकॉर्ड मागितले आहे, त्यांनी ते दिले नाहीत, व्हीक्युसीसीचे दक्षता व गुणनियंत्रण मंडळ यांच्या महालेखाकारांनी वारंवार मागणी करूनही माहिती दिली नाही, असे यामध्ये नमूद आहे. अशा वेळी महालेखाकारांची भूमिका काय असते, त्यांना कोणते अधिकार असतात ? अशी विचारणा समितीने केली असता, वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही बैठकीसाठी बोलवावे, कारण त्यांचा रिपोर्ट त्यांच्याकडे आला आहे. आपण त्या रिपोर्टची कॉपी द्यावी असे समितीने सूचित केले त्यास विभागीय सचिवांनी संमती दर्शविली.

या संदर्भात समितीने निदर्शनास आणले की, काम न करता एमबी रेकॉर्ड करण्यात आली या संदर्भात विभागाकडे कागदपत्रे सादर करण्यात येणार होती. तसेच, २५ कामांची यादी महालेखाकारांना सुद्धा दाखविण्यात आलेली नाही याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे ? या कामांच्या संदर्भात सर्व गोष्टी अनियमित असताना कोणत्या ज्युनिअर इंजिनिअरने एमबी रेकॉर्ड केली, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. १६ कामे झालेलीच नाहीत. एमबी रेकॉर्ड झाले आणि पेमेंट केले नाही असे विभागाकडून सांगण्यात आले. मग एमबी कसे रेकॉर्ड झाले ? ज्या ज्युनिअर इंजिनिअरने एमबी रेकॉर्ड केले, डेप्युटी इंजिनिअरने ती पास केली, अकाऊंटन्टने त्याला मंजुरी दिली ही संपूर्ण प्रोसेस केलेली आहे. Who is responsible ? ही एक चेन आहे, सिस्टीम आहे. २५ कामांपैकी एकही काम मंजुर नव्हते. परंतु, ९ कामे झालेली आहेत आणि उर्वरित १६ कामे झालेली नसताना एमबी रेकॉर्ड करण्यात आली. ज्युनिअर इंजिनिअरने रेकॉर्ड केले असे सांगण्यात आले. त्यावर डेप्युटी इंजिनिअर आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची स्वाक्षरी नाही. आपण या संदर्भातील सर्व कागदपत्रे समितीला सादर करण्यात येणार होती. संदर्भात विभागाचे काय मत आहे ? समितीला एमबी बुकची कॉपी दाखविण्यात यावी. एमबी रेकॉर्ड होते, त्या बिलावर पास ऑर्डर दिली जाते आणि त्यावर डेप्युटी इंजिनिअर, अकाऊंटन्टची स्वाक्षरी असते. ही संपूर्ण सिस्टम आहे. क्रोनॉलॉजिप्रमाणे ते तपासण्यात यावे, असे समितीने सूचित केले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वाक्षरी केली नाही तर ते दोषी नाहीत, हे मान्य आहे. परंतु, ज्यांनी स्वाक्षरी केली त्यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई केली जात नाही याबाबत समितीने आश्चर्य व्यक्त केले असता, या संदर्भात कारवाई झालेली आहे. १६ कामांच्या संदर्भात उल्लेख होता. कनिष्ठ अभियंता यांनी एमबीमध्ये मेजरमेंट रेकॉर्ड केले होते. परंतु, त्यांनी उप अभियंता यांच्याकडे ते तपासणीसाठी सादर केले नाही किंवा उप अभियंता यांनी कार्यकारी अभियंता यांच्याकडे सादर केले नाही. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

They are not at fault. परंतु, ज्यांनी काम न करता एमबी रेकॉर्ड केले ते दोषी आहेत असे समितीने सूचित केले असता, या कामाचे पेमेंट केले नाही किंवा यामध्ये फायनान्शिअल काही उद्भवले नसले तरी संबंधित ज्युनिअर इंजिनिअरला कारणे दाखवा नोटीस इश्यू केलेली आहे. त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले. काम न होता ज्युनिअर इंजिनिअरने एमबी रेकॉर्ड केलेली आहे. हा फ्रॉड आहे. मग त्याला कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासा का घ्यायचा? कामच झालेले नाही, हा फ्रॉड आहे. ज्या कॉन्ट्रॅक्टरने बिल दिले तो गुन्हेगार आहे. कारण, काम न करता बिल दिले. ज्यांनी एमबी रेकॉर्ड केले ते दोषीच आहेत. कागदपत्रावरून हे सर्व सिद्ध होत आहे. महालेखाकारांनी आक्षेप घेतल्यानंतर विभागाकडून इतक्या दिवसांनी कारणे दाखवा नोटीस देण्यात येत आहे. विभाग समितीचा कार्यकाळ संपण्याची वाट बघत आहेत काय ? सन २०१२ मध्ये एमबी रेकॉर्ड झालेली आहे. सन २०१५ मध्ये महालेखाकारांनी हे निदर्शनास आणले. हि बाब सन २०१८ मध्ये समिती समोर साक्षीसाठी आली आणि संबंधितांना आता कारणे दाखवा नोटीस देण्यात येत आहे ही शोकांतिका आहे. निदर्शनास आणल्यानंतर सुद्धा विभाग ३-३ वर्षे कारवाई करीत नाही, हे बरोबर नाही असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता, सन २०१५ मध्ये मुंबई शहरातील ४७ ज्युनिअर इंजिनिअर्स, २ डेप्युटी इंजिनिअर्स यांना सस्पेंड करण्यात आले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्या अधिकाऱ्यांना वेगवेगळ्या कारणांमुळे सस्पेंड करण्यात आले असेल असे मत समितीने व्यक्त केले असता, ते कारण असेच होते. त्यांना वेगवेगळ्या कारणासाठी सस्पेंड केलेले नाही. मुंबईमध्ये अशी पद्धत होती की, अगोदर काम करायचे आणि एमबी बुक वगैरे नंतर रेकॉर्ड करावयाचे, जॉब नंबर नंतर घ्यायचे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

येथे कामच झालेले नाही तरी एमबी रेकॉर्ड झालेली आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता समितीचे मत बरोबर आहे.

२.६ परिच्छेद क्र.३.१.५ अवास्तववादी मागणी आणि निधीचे संवितरण

या परिच्छेदाच्या अनुषंगाने माहिती देताना शासकीय निवासी आणि अनिवासी इमारतींची दरवर्षी देखभाल व दुरुस्तीची मागणी असते. विभागाकडे अशा इमारतींचे मागील १२ वर्षांचे स्टॅटॅस्टीक आहे. विभागाला उक्त इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मागणी केलेल्या निधीच्या तुलनेत केवळ ३५ ते ४० टक्के निधी मिळाला आहे. मुळात देखभाल व दुरुस्तीचा खर्च हा दरवर्षी वाढत जातो. प्रत्यक्षातत विभागाला प्राप्त होणारे वाटप मर्यादित असल्यामुळे त्या रकमेतून संपूर्ण देखभाल व दुरुस्तीचे काम पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे ज्या गोष्टी प्राधान्याने करावयाच्या असतात त्या करण्यात येतात आणि काही दुरुस्त्या निधीअभावी शिल्लक राहतात ही वस्तुस्थिती आहे. नॉर्म्सनुसार इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी जेवढा निधी मिळावयास पाहिजे त्या तुलनेत केवळ ३५-४० टक्के निधी मिळतो.ात्यामुळे इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीची बरीच कामे करता येत नाहीत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु महालेखापाल यांचा आक्षेप असा आहे की, विभागाला जेवढ्या निधीची आवश्यकता असते त्यापेक्षा विभाग कितीतरी अधिक पटीने वित्त विभागाकडे निधीची मागणी करतो असे समितीने निदर्शनास आणले असता, हे खरे आहे की, विभाग मोठ्या प्रमाणावर निधीची मागणी करतो. परंतु प्रत्यक्षात मात्र मागणी केलेल्या रकमेच्या तुलनेत जवळजवळ ५० टक्क्यांपर्यंतच निधी वितरीत केला जातो. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परंतु विभागाची मागणीच मुळात पाच पट असते. २०१०-२०१५ च्या दरम्यान विभागाने बिल्ट-अप एरियानुसार मुंबई प्रेसिडेन्सी डिव्हीजनसाठी २३९.४६ कोटी रुपयांची मागणी करणे अपेक्षित होते. परंतु विभागाने तफ्रबल १२४४.८७ कोटी रुपयांची मागणी केली. तसेच, विभाग सर्वच इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीची कामे करीत नाही. एकूण मालमत्तेचा बिल्ट-अप एरिया लक्षात घेतला तर त्या दृष्टीने जे निकष आहेत त्या अनुषंगाने विभागाकडून पाच पट निधीची मागणी केली जाते आणि त्या तुलनेत विभागाला तीन पट निधी मिळतो. विशेषतः मुंबई प्रेसिडेन्सी डिव्हीजन आणि उत्तर मुंबई या विभागांतील इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची मागणी करण्यात आली व खर्च सुद्धा मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. या व्यतिरिक्त अन्य ठिकाणी मात्र मागणी केलेल्या रकमेच्या दुप्पट किंवा थोडाफार जास्त निधी मिळाला आहे. परंतु उपरोक्त दोन ठिकाणी बिल्ट-अप एरियाच्या नॉर्म्सनुसार जेवढा निधी मिळावयास पाहिजे होता त्याच्या तीन पट निधी मिळाला असे महालेखापाल यांचे निरीक्षण आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, मुंबईमध्ये अनेक अशा इमारती आहेत की त्या इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीवर मागणीनुसार तातडीने खर्च करावा लागतो. मग त्यामध्ये मंत्रालयाची इमारत असेल, उच्च न्यायालयाची इमारत असेल, व्हीआयपी-व्हीव्हीआयपी यांची निवासस्थाने असतील, या ठिकाणी मागणीनुसार देखभाल व दुरुस्तीवर खर्च करावा लागतो. अनेक इमारतींतील देखभाल व दुरुस्तीच्या कामापोटी अनेकदा वरच्या पातळीवरून सांगण्यात येते की, अमुक इमारतीमध्ये आजच्या आज आणि तातडीने कामे करावीत. अशा परिस्थितीत विभागाला त्या ठिकाणी कामे करावीच लागतात. मुंबई वगळता अन्य जिल्ह्यात जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांची निवासस्थाने सोडली तर अन्य लोकांकडून दुरुस्तीची जास्त मागणी नसते. परंतु मुंबईत मात्र मोठ्या प्रमाणावर व्हीआयपी/व्हीव्हीआयपी राहत असल्यामुळे

त्यांच्या निवासस्थानांच्या देखभाल व दुरुस्तीची मोठ्या प्रमाणावर आणि तातडीची मागणी असते. जर दुरुस्तीच्या बाबतीत थोडा जरी विलंब झाला तर लगेच ते विभागाच्या प्रधान सचिवांकडे तक्रारी करतात. लोकांची अपेक्षा असते की, त्यांनी फोन केल्यानंतर पाच मिनिटांत त्यांच्या आवडीचे साहित्य वापरून दुरुस्ती करून द्यावी. मुळात इतर शहरांच्या तुलनेत मुंबईतील शासकीय निवासी व अनिवासी इमारतींच्या देखभाल व दुरूस्तीची मोठ्या प्रमाणावर मागणी असते. २०१०-२०१५ या दरम्यान विभागाची १२४४.८७ कोटी रुपयांची मागणी होती, परंतु प्रत्यक्षात मात्र ६८४.५३ कोटी रुपये इतका निधी मिळाला. विभाग जेवढी मागणी करतो त्या तुलनेत प्रत्यक्षात ५० टक्क्यापर्यंत निधी मिळतो. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागाने केलेल्या मागणीच्या तुलनेत ५० टक्के निधी मिळत असला तरी, विभाग निधीची जी मागणी करतो तीच अवास्तव असते. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने २० टक्के जादा निधीची मागणी केली होती. महालेखापालांच्या मतानुसार प्रत्यक्षात विभागाला वितरित झालेला निधी ५० टक्के इतका कमी आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

प्रत्यक्षात विभागाला देखभाल व दुरुस्तीच्या खर्चासाठी २३९.४६ कोटी रुपयांची आवश्यकता होती. पंरतु विभागाने १२४४.८७ कोटी रुपयांची मागणी केली आणि त्या तुलनेत विभागाला ६८४.५३ कोटी रुपये निधी मिळाला असे समितीने निदर्शनास आणले असता, महालेखापालांचे मत असे आहे की, विभागाकडून कारपेट एरियाप्रमाणे २० टक्के जादा निधीची मागणी करण्यात आलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वास्तविक पाहता विभाग एकूण इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीपोटी येणारा खर्च लक्षात घेऊन निधीची मागणी करतो. परंतु त्या इमारतींपैकी ५० टक्के इमारतींची दुरुस्ती करण्याची गरज नसते. तरी सुद्धा महालेखापाल यांनी एकूण इमारती गृहीत धरून विभाग करीत असलेली मागणी मान्य केली. परंतु विभागाने जी मागणी केली तीच मुळात अवास्तव केली आहे.असे मत समितीने व्यक्त केले असता, मुंबईत अनेक इमारती अशा आहेत की त्यावर खर्च करावाच लागतो. उदाहरणार्थ मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीमध्ये मेंटेनन्सपोटी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करावा लागतो. शिवाय ती इमारत जुनी असल्यामुळे त्या ठिकाणी देखभाल व दुरुस्तीपोटी खर्च करावयाचा असल्यास अगोदर स्ट्रक्चरल ऑडिटरला आणावे लागते तसेच हेरिटेज आर्कीटेक्टची देखील नेमणूक करावी लागते. हेरिटेज इमारत असल्यास अमुक प्रकारचीच सामुग्री वापरावी असे सांगितल्यास तशाच प्रकारची सामुग्री आणावी लागते. दुसरे उदाहरण म्हणजे एशियाटीक लायब्ररी होय. या लायब्ररीचे माननीय मुख्यमंत्र्यांनी उदघाटन केलेले आहे. त्या ठिकाणी दुरुस्तीचे काम होते. परंतु ती इमारत हेरिटेज असल्यामुळे त्या ठिकाणी दुरुस्ती करताना जनरल रिपेअर्सचे नॉर्म्स लागू होत नाहीत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने या संदर्भातील नॉर्म्स बदलून घ्यावयास पाहिजेत. जेणेकरून काम करण्यात अशा अडचणी येणार नाहीत. हेरिटेज इमारतीच्या दुरुस्तीच्या बाबतीत समिती एखादी गोष्ट मान्य करु शकते. परंतु ज्या इमारती हेरिटेजमध्ये मोडत नाहीत त्यावर करण्यात आलेला खर्च समिती मान्य करणार नाही. विभागाने अमुक इमारती या व्हीआयपी/व्हीव्हीआयपीच्या असून त्यांच्यासाठी कोणतेही नॉर्म्स नाहीत, हे एकदाचे जाहीर करावे. अशा इमारतींवर कितीही खर्च केला तरी त्यांना ऑडिट लागू नाही, हे एकदाचे अध्यादेश काढून जाहीर करावे. असे समितीने सूचित केले असता, महालेखापालांनी लेखापरिक्षण करताना हे बघावयास पाहिजे की, ज्या ठिकाणी देखभाल व दुरुस्तीची मागणी होती त्या ठिकाणी मागणीनुसार काम करण्यात आले आहे की नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मागणीपेक्षा प्रत्यक्षात ते काम करणे आवश्यक होते काय हे सुद्धा पाहिले पाहिजे. नाही तर कोणी काहीही मागणी करेल. अमुक इमारतीच्या दुरुस्तीची खरोखरच आवश्यकता होती किंवा कसे, याचा विभाग अभ्यास करणार आहे की नाही ? अशी विचारणा समितीने केली, तसेच नॉर्म्सच्या संदर्भात शासन निर्णय अस्तित्वात आहे काय, असल्यास, त्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करावयाची असल्यास विभागाने तसा प्रस्ताव सादर करावा असे वित्त विभागाच्या सचिवांनी सुचित केले असता, नॉर्म्सच्या बाबतीत शासन निर्णय नाही, परंतु ते थम्बरुल नॉर्म्स आहेत. नॉर्म्समध्ये बसत नसताना सुद्धा कधी कधी अनेक ठिकाणी देखभाल व दुरुस्तीची कामे करावी लागतात. मुंबई शहरात अपवादात्मक केसेस जास्त आहेत.असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागीय सचिव जे सांगत आहेत ते सत्य असून, त्या बाबतीत आक्षेप नाही. परंतु उच्च न्यायालयाच्या इमारतीमध्ये इतर कोणताही मेंटेनन्स नाही. त्या इमारतीची भिंत दगडाची आहे आणि वरच्या बाजूला कौलारु आहेत. त्या ठिकाणी टॉयलेटच्या दुरुस्तीशिवाय कोणत्याही दुरुस्तीची गरज नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, तसे म्हणता येणार नाही. उच्च न्यायालयाच्या इमारतीमध्ये रुफमधून खालच्या बाजूला काहीना काही पडत असते. अशा वेळी दुरुस्ती करावीच लागते. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

उच्च न्यायालयाच्या इमारतीतील संपूर्ण रुफ बदलून टाकावे. तसेच त्यानंतर पत्रे लावून त्यावर कौलारु टाकावेत. जेणेकरून त्या इमारतीच्या हेरिटेजला धक्का लागणार नाही. या बाबतीत एकदाच काय तो निर्णय घ्यावा लागेल. मुंबईतील व्हीआयपी/व्हीव्हीआयपींची यादी निश्चित करावी

लागेल. जर विभागाने जादा खर्च केला किंवा निविदा प्रक्रिया योग्य प्रकारे पार पाडली नाही तर उच्च न्यायालय त्यावर आक्षेप नोंदविते. व्हीआयपी/ व्हीव्हीआयपींच्या बाबतीत नॉर्म्स ठरविले पाहिजेत. नेमके व्हीआयपी/ व्हीव्हीआयपी कोण आहेत या बाबतची यादी निश्चित केली पाहिजे. जर विभागाकडून ऑडिटचे, अकाऊंटच्या नियमामध्ये उल्लंघन करून काम होत असेल तर ते कुठे तरी थांबले पाहिजे. नाही तर महालेखापाल यांनी अशा कामांच्या बाबतीत आक्षेप घ्यावयास नको असे मत समितीने व्यक्त केले असता सचिवांचे मत असे आहे की, या संदर्भात शासन निर्णय नसून ते थम्बरुल नॉर्म्स आहेत. त्यामुळे थम्बरुल नॉर्म्सच्या बेसवर आक्षेप आहे. असे वित्त विभागाच्या सचिवांनी सांगितले.

कुठे जर काही चुकीचे घडले तर उच्च न्यायालय प्रत्येक बाबतीत स्ट्रक्चर पास करते. विभागाकडून उच्च न्यायालयातील देखभाल व दुरुस्तीवर अतिरिक्त खर्च झाला असून त्यावर महालेखापाल यांनी आक्षेप घेतला आहे व या विषयी लोकलेखा समितीमध्ये चर्चा झाली हे उच्च न्यायालयास कळविले पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता उच्च न्यायालयातील देखभाल व दुरुस्तीपोटी जादा देयक अदा करण्यात आले हा मुद्दा नाही. मुळात महालेखापाल यांचा आक्षेप असा आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वित्त विभागाकडे निधीची जास्त मागणी करण्यात आली असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एकंदरीत एका वर्षात पूर्ण बिल्ट-अप एरियावर देखभाल व दुरुस्तीपोटी किती रुपये खर्च करावेत या बाबतच्या नॉर्म्सचे कुठेही पालन झालेले नाही. केवळ उच्च न्यायालयाच्या इमारतीमध्येच नव्हे तर इतर ठिकाणी सुद्धा अशा प्रकारचा खर्च झाला आहे. नाशिक येथे ५० कोटी रुपयांच्या तुलनेत १३६ कोटी रुपये खर्च झाला आहे. याच प्रमाणात अमरावती, नागपूर, औरंगाबाद या ठिकाणी खर्च का झाला नाही ? अशी विचारणा समितीने केली असता राज्यात निवासी व अनिवासी इमारतीचे क्षेत्र १९८ लाख चौरस मीटर इतके आहे.

असे विभागीय सचिवांनी सांगितले विभागाने शासन निर्णय काढून देखभाल व दुरुस्तीच्या कामाचे नॉर्म्स निश्चित केले आहेत की नाहीत ? अशी विचारणा वित्त सचिवांनी केली असता, नॉर्म्सच्या संदर्भात शासन निर्णय अस्तित्वात नसून, मार्गदर्शक सूचना अस्तित्वात आहेत. नाशिक येथील खर्चाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, नाशिक येथील निवासी व अनिवासी इमारतीचे क्षेत्र १०.३ लाख चौरस मीटर आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखापालांच्या मतानुसार १९९१ चे नॉर्म्स २००५ मध्ये बदलले आहेत. त्यामुळे १९९१ च्या नॉर्म्सप्रमाणे कार्यवाही न करता २००५ च्या नॉर्म्सनुसार कार्यवाही करणे अपेक्षित होते. महालेखापाल यांच्या सूचनेनुसार १९९१ चे नॉर्म्स रिव्हाईज करून घ्यावयास पाहिजे असे वित्त विभागाच्या सचिवांनी सूचित केले.

मुझे ऐसा लगता है कि यह नॉर्म्स १९९१ के है. हर पांच साल में यह नॉर्म्स रिव्हाईज होने चाहिए. सन २००५ में एक ही रिव्हीजन हुआ है. उसके बाद रिव्हीजन नहीं हुआ है असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता, We will revise the norms also असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाच्या माध्यमातून ज्या अयोग्य गोष्टी होत आहेत त्या कुठे तरी थांबल्या पाहिजेत. सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये देखभाल व दुरुस्तीचे काम हे अनैतिक मार्गाने संपत्ती जमा करण्याचा फार चांगला मार्ग असतो असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी यांस सहमती दर्शविली व परंतु हे खरे आहे की, विभागाच्या माध्यमातून देखभाल व दुरुस्तीच्या खर्चावर मोठ्या प्रमाणात आळा बसविलेला आहे. महोदय, महालेखापाल यांनी सुचविले आहे की, १९९१ चे निकष २००५ मध्ये सुधारित झालेले आहेत. महालेखापाल यांनी सुचविल्यानुसार सदरहू निकष सुधारित करून घेण्यात येतील. तसेच निकष सुधारित करून घेताना त्यामध्ये दिरंगाई होता कामा नये किंवा अतिरिक्त किंवा खोटी देयके अदा करता कामा नयेत, समितीने सूचित केल्यानुसार या बाबतीत विभागाकडून योग्य ती काळजी घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

जिल्हा स्तरावर इमारतीच्या दुरुस्तीपोटी केवळ जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, डीआयजी यांच्याच निवासस्थानावर खर्च होतो. परंतु वर्ग-३ आणि ४ मधील कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. त्या निवासस्थानातील ड्रेनेज सिस्टीम, टॉयलेट, लाईट व्यवस्था इत्यादी सर्व नादुरुस्त आहेत. मी आपल्या निदर्शनास एक प्रकरण आणून देतो. एका जिल्ह्यातत जिल्हाधिकारी यांच्या निवासस्थानामध्ये १० लाख रुपये खर्च करून नवीन टाईल्स बसविण्यात आल्या होत्या. परंतु जिल्हाधिकाऱ्यांच्या पत्नीला त्या टाईल्स न आवडल्यामुळे त्या दुसऱ्याच दिवशीच काढून पुन्हा नवीन टाईल्स बसविण्यात आल्या. याचाच अर्थ वर्ग-१ दर्जाच्या अधिकाऱ्याच्या निवासस्थानावर मोठ्या प्रमाणावर खर्च केला जातो आणि वर्ग-३ आणि ४ चे कर्मचारी राहत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची मात्र आवश्यक ती देखभाल व दुरुस्ती केली जात नाही. वर्ग-३ व ४ चे कर्मचारी राहत असलेल्या इमारतींची सुद्धा आवश्यक ती देखभाल व दुरुस्ती केली पाहिजे. मला वाटते या बाबतीत विभागाच्या माध्यमातून आवश्यक त्या सूचना खालच्या स्तरावर गेल्या पाहिजेत असे समितीने सूचित केले असता, या संदर्भातील नॉर्म्स तयार करताना समितीने सुचविल्यानुसार आवश्यक त्या बाबी समाविष्ट करण्यात येतील असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

माहिती पुस्तिकेमध्ये मोमीन समितीच्या अहवालाबाबत उल्लेख करण्यात आलेला आहे. मोमीन समितीचा अहवाल विभागाला प्राप्त झाल्याचे देखील नमूद केले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता,ा मोमीन समितीचा अहवाल विभागाला प्राप्त झालेला आहे. उक्त समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता यांना सुचविण्यात आले आहे की, या विषयी एक शासन निर्णय तयार करावा. त्या शासन निर्णयामध्ये किती कालावधीनंतर निवासस्थानाच्या आतील रंगकाम व्हावे, किती कालावधीनंतर बाहेरील रंगकाम व्हावे, किती कालावधीनंतर फ्लोरींग बदलू शकतो या बाबतचा उल्लेख करावा. हे काम करीत असताना त्याचे इंडेंट संबंधित विभागाकडून आले पाहिजे. इंडेंट झाल्यानंतर इमारतीतील दुरुस्तीचे काम व्यवस्थित झाले आहे की नाही हे तपासल्याशिवाय उक्त कामाचे देयक अदा करता कामा नये, हे देखील नमूद करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या बाबतीत एक सिस्टीम असावी एवढेच समितीचे मत व्यक्त करून नॉर्म्स निश्चित करण्यात येतील त्याची एक प्रत मुख्य न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय यांना सुद्धा पाठवावी असे समितीने सूचित केले.

विभागाकडून जे नॉर्म्स निश्चित करण्यात येतील त्याची प्रत नेहमीप्रमाणे सर्व संबंधित विभागांना अग्रेषित करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

२.७ परिच्छेद क्र.३.१.६ मंजुरी शिवाय कामांचे निष्पादन :—

२०१० ते २०१५ या पाच वर्षात तीन विभागातील ४००७ कामे जॉब क्रमांक न मिळता करण्यात आली त्या कामांवर ५५.५८ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. यासंदर्भात काय कारवाई करण्यात आली इलेक्ट्रीकलच्या कामांमध्ये जॉब क्रमांक देण्याची पद्धत नाही असे नमूद केले आहे. २०१६-१७ पासून जॉब क्रमांक देणे सुरू केले आहे. याबाबत कोणावर कोणती कारवाई केली? तसेच इलेक्ट्रीकल विभागात जॉब क्रमांक न देण्याची काय कारणे आहेत? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये तीन कार्यकारी अभियंता यांचा समावेश होता. मुंबई प्रेसिडेन्सी डिव्हीजनचे कार्यकारी अभियंता होते. त्यांच्या विरोधात मार्च २०१८ मध्ये दोषारोप दाखल केले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मार्च २०१८ म्हणजे आता दोषारोप दाखल केले आहे मागील तीन वर्षात का करण्यात आले नाही? समितीची साक्ष लागली नसती त्या व्यक्ती निर्दोष सुटल्या असत्या असे मत समितीने व्यक्त केले असता, यासंदर्भातील कार्यवाही सुरू होती. संबंधितांना शोकॉज नोटीस इश्यू केली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २०१५ ते २०१८ या तीन वर्षात काय कार्यवाही केली आहे अशी विचारणा समितीने केली असता, सचिवांनी अवगत केले २०१५ मध्ये महालेखापाल यांनी विभागाच्या लक्षात आणून दिल्यानंतर जोपर्यंत या विषयाची साक्ष लागत नाही तोपर्यंत महालेखापा कारवाई केली नाही. एजी कार्यालयाकडून जेवढे पॅरा काढले जातात त्यातील फक्त पाच टक्के पॅरावर साक्ष लावली जाते. It means that the Department will not do anything unless and until the Public Accounts Committee not call you. सन २०१५ मध्ये तुमच्या लक्षात ही बाब आणून दिली आज त्यांना शोकॉज नोटीस दिली असे सांगत आहात. तुम्ही त्यांना प्रोटेक्ट केले पाहिजे. २०१५ मध्ये का शोकॉज नोटीस दिली नाही २०१८ मध्ये का शोकॉज नोटीस देण्यात आली अशी विचारणा समितीने केली असता, परभणी येथील श्री.संजय सोलनकर हे कार्यकारी अभियंता होते, त्यांच्यावर दिनांक ६.६.२०१५ रोजी कारवाई करण्यात आली आहे. अशा वेगवेगळ्या तारखांच्या केसेस आहेत. त्यामुळे फक्त २०१८ मध्ये कारवाई केली असे नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखापाल कार्यालयाने एखादी बाब विभागाच्या निदर्शनास आणल्यानंतर समितीच्या साक्षीची वाट का पाहण्यात येते. यासंदर्भातील कारवाई अगोदर केली असती तर समितीने विचारलेल्या प्रश्नांना पळवाटा काढणे किंवा त्यांना संरक्षण देण्याची परिस्थिती विभागीय प्रतिनिधींवर ओढवणार नाही. विभागाने या सर्व गोष्टी वेळेवर केल्या पाहिजेत असे समितीने सूचित केले असता, वेगवेगळ्या अधिकाऱ्यांवर वेगवेगळ्या वेळी कारवाई झालेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

त्या सर्व तारखा समितीला देण्यात याव्यात एखाद्या प्रकरणी विभागाने कारवाई केली असेल असे मत समितीने व्यक्त केले असता, श्री. संजय सोलनकर, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्यावर दिनांक ६.६.२०१५ रोजी कारवाई केली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मागील तीन वर्षात त्यांच्यावर दोषारोप निश्चित झाले नाहीत काय ? त्यांच्या संदर्भात अंतिम निर्णय झालेला नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यासंदर्भातील चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी सामान्य प्रशासन विभागाचा असतो. प्रत्येक रिजनचे चौकशी अधिकारी सामान्य प्रशासन विभागाचे असतात. ते अधिकारी ही चौकशी ३ ते ५ वर्षे चालवितात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सामान्य प्रशासन विभागातील अधिकारी चौकशी अधिकारी असतात ते चौकशीसाठी विलंब लावत असतील तर समिती सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांना साक्षीला बोलाविल त्यांच्याकडे किती चौकशा प्रलंबित आहे त्याची लेखी माहिती समितीला सादर करावी. सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांना साक्षीला बोलावून अमुक अमुक चौकशा त्यांच्याकडे प्रलंबित आहेत. यामध्ये त्यांच्याकडून का दिरंगाई करण्यात येत आहे अशी विचारणा करता येईल असे समितीने सूचित केले.

३ ते ४ वर्षाचा कालावधी विभागीय चौकशीसाठी लागत असेल तर समितीने सामान्य प्रशासन विभागाच्या सचिवांना दुसऱ्या प्रकरणी संदर्भात साक्षीला बोलविले होते त्यांना सांगितले होते की, विभागीय चौकशीची कालमर्यादा ठरविण्यात यावी. त्यांनी असे सांगितले होते की, यासंदर्भातील शासन निर्णय काढण्यात येईल. या प्रकरणात विभागाने काही प्रकरणामध्ये कारवाई केली असली तरी आता २०१८ मध्ये काही प्रकरणाची कारवाईला सुरूवात करण्यात येत आहे ही बाब विभागाला मान्य करावी लागणार. समितीमार्फत अशा सूचना आहेत की, लोकलेखा समितीची बैठक होवो किंवा न होवो. महालेखापाल कार्यालयाने काही विषय उपस्थित केल्यावर विभागाने त्यावर कारवाई करावी. लोकलेखा समिती कोणताही विषय साक्षीला घेऊ शकते. एखादी बाब विभागाच्या लक्षात आल्यानंतर विभागाने कारवाई केलीच पाहिजे. जेणेकरून यातून काही चांगले करता येईल असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीने केलेल्या सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत लेखा परीक्षेने सदर बाब निदर्शनास आणण्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग विद्युत अंतर्गत जॉब क्रमांक प्राप्त करण्याची पद्धत अवलंबली जात नाही. जॉब नंबर नसेल तर काम कसे काय होऊ शकते. अशी कार्यपद्धती नाही असे सचिव कसे म्हणू शकतात. जॉब नंबर नसेल तर ती सिस्टीम कशी काय उभी राहील. विभागाने काय काम केले हे कसे समजणार आहे. कोणत्याही कामाला जॉब क्रमांक नसेल तर, त्याची नोंद कशी होणार सार्वजनिक बांधकाम विभाग इमारतीचे काम करते त्याला नंबर असतात की नाही. इलेक्ट्रीकलचे काम असेल किंवा कोणतेही काम असेल तरी जॉब क्रमांक पाहिजेत असे मत समितीने व्यक्त केले असता, बजेटमध्ये जी कामे घेण्यात येतात त्यासाठी अर्थसंकल्पाचा क्रमांक असतो. अर्थसंकल्पामध्ये इमारतीचे काम मंजुर झाले की, विद्युतीकरणाचे काम त्यामध्ये टक्केवारीच्या स्वरूपात पूर्वी मंजुर होत होते. ट्रान्सफार्मरसह जेवढी किमत लागते ती रक्कम त्यामध्ये नमूद केलेली असते. त्या कामाला जो जॉब क्रमांक असतो तो सिव्हील अधिक इलेक्ट्रीकल असा एकत्रित असतो. विभागाकडून सिव्हीलची कामे करण्यात येतात त्या कामांमध्ये क्रमांक असतो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

आता सिव्हील व इलेक्ट्रीकलचे काम वेगवेगळे करण्यात येते काय ? त्याची प्रशासकीय मान्यता एकत्रित असते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, कोर्टाचा निर्णय आल्यामुळे टेंडर वेगवेगळे करण्यात येते. कामाची मंजुरी एकत्र असते. याबाबत माहितीसाठी मुंबईतील एक उदाहरण देताना. विद्युतीकरणासाठी खास निधी बाजूला ठेवण्यात येतो. यामध्ये लिफ्टची कामे तसेच विद्युतीकरणाची निश्चित केलेली कामे असतात त्यामध्ये दुरुस्ती करताना काही ठिकाणी वायर पूर्णपणे बदलाव्या लागतात. मोठे इलेक्ट्रीकलचे जॉब असतात. असा निधी फक्त विद्युत विभागाला दिला जात होता. तेवढी तांत्रिक मंजुरी झाली की ते काम झाले. त्याला जॉब क्रमांक मिळाला असे गृहित धरले जात होते. आता त्यांना सांगण्यात आले आहे की, असे करण्यात येऊ नये जे काम करण्यात येणार आहे त्याचा कार्यक्रम तयार करण्यात यावा प्रत्येकाला जॉब क्रमांक देण्यात यावा असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जॉब क्रमांक नसेल तर विभागाचे नियंत्रण कसे काय राहील अशी विचारणा समितीने केली असता, जॉब क्रमांकाऐवजी तांत्रिक मंजुरीचा क्रमांक सर्व ठिकाणी देण्यात आलेला आहे. सिव्हीलच्या कामासाठी जॉब क्रमांक देण्याची सिस्टीम आता सुरू केली आहे. कोर्टाने इलेक्ट्रीकलचे टेंडर वेगळे काढावे असे म्हटले आहे. इलेक्ट्रीकल कंत्राटदार हायकोर्टात गेले होते. औरंगाबाद हायकोर्टाने तसा निर्णय दिला आहे. यापूर्वी सिव्हील व इलेक्ट्रीकलचे एकत्रित टेंडर काढले जात होते. इलेक्ट्रीकल कंत्राटदाराने हायकोर्टात जाऊन अशी ऑर्डर घेतली आहे की, सिव्हील व इलेक्ट्रीकलचे टेंडर वेगळे काढावेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२.८ परिच्छेद क्र.३.१.७ - तातडीच्या दुरुस्तीची गरज असलेल्या इमारती दुर्लक्षित राहिल्या.

सदर परिच्छेदासंदर्भात यामध्ये ज्या कामांचा उल्लेख आहे ती झाली आहेत त्यांचे फोटो आणले आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जी कामे झाली आहेत त्याबाबत आक्षेप नाही (१) पोलीस क्वार्टर्स, पीकेट रोड हे काम पूर्ण झाले आहे. (२) जे.जे.रुग्णालयतील स्वस्तिक इमारतीला सन २०१३ पासून दुरुस्तीची आवश्यकता आहे. आतापर्यंत विभागाची निविदा प्रगतीपथावर आहे. याबाबत विलंबाचे

काय कारण आहे अशी विचारणा समितीने केली असता, किरकोळ दुरुस्तीची कामे पूर्ण झाली आहे. स्ट्रक्चरल रिपेअर कामाचे टेंडर आता काढण्यात येत आहे. क्रमांक तीन वर लघुवाद न्यायालयाच्या इमारतीचे काम आहे. यामध्ये स्ट्रक्चरल रिपेअर्स व लिफ्ट क्रमांक ७,८ व २ यांच्या सभोवतालच्या भिंती व आऊटरसाईडच्या पोलीस स्टेशनला लागून असलेल्या भिंतींचे काम पूर्ण झाले आहे. न्यायालयीन कक्ष व व्हरांडा यांचे काम पूर्ण झाले आहे. चौथा, पाचवा व सहावा मजल्यावरील व्हरांडा व दर्शनी भागातील पडदीची कामे पूर्ण झाली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

या कामांना दिनांक १५ मार्च २०१७ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. ही सर्व कामे २०१३ पासून करणे अत्यंत आवश्यक होते. महालेखापालांचा आक्षेप हाच आहे की, या कामासाठी इतका विलंब कसा काय लागला आहे. १० मार्च रोजी वर्कऑर्डर दिलेली आहे अशी विचारणा समितीने केली असता, तेथे वास्तव्य असताना नियमित दुरुस्तीचे काम करणे शक्य आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लिफ्टची दुरुस्ती विभाग २०१३ पासून करीत नाही. पाच-पाच वर्षे दुरुस्ती होत नाही. २०१३ पासून लिफ्ट बंद आहेत, २०१७ ला आपण मंजुरी दिली, २०१८ मध्ये टेंडर काढले आहे. ही कामे कधी पूर्ण होणार आहेत अशी विचारणा समितीने केली असता,लिफ्टच्या भिंतीच्या संदर्भातील ती दुरुस्ती आहे. प्रत्यक्षात लिफ्टची दुरुस्ती नाही. स्ट्रक्चरल दुरुस्तीचा तो पार्ट आहे. तो भाग स्वतंत्र केलेला आहे.द्म लिफ्ट कार्यरत आहे, बाहेरच्या बाजूने स्ट्रक्चरल रिपेअर करावयाचे आहे तेथे काम करण्यात येणार आहे. लिफ्ट सुरू आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लिफ्टच्या स्ट्रक्चरला आपणाला काही करता येत नाही काय ? १० मार्च रोजी वर्कऑर्डर दिली असून हे काम कधी पूर्ण होणार आहे.अशी विचारणा समितीने केली असता, लिफ्ट चालू आहे, स्ट्रक्चरल काम करायचे आहे लिफ्ट ज्या भिंतीमध्ये बसविण्यात आली आहे. ते काम स्ट्रक्चरल पद्धतीचे आहे ते काम सुरू आहे. जून अखेरपर्यंत हे काम पूर्ण होणार आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मुलींसाठी प्रमाणित वसतिगृह, नागपूर हे काम पूर्ण झाले आहे काय ? या समितीच्या प्रश्नाबाबत मुलींसाठी वसतिगृह, नागपूर हे काम झाले आहे त्याचे फोटो आणले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासकीय माध्यमिक आश्रमशाळा, सुरूडी, बीड या इमारतीचे काम पूर्ण न करता आदिवासी विकास विभागाकडे ती शाळा हस्तांतरित करण्यात आली आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, आदिवासी विकास विभागाचा वेगळा अभियांत्रिकी विभाग (Enginnering Section) तयार करावा. त्याप्रमाणे त्यांचे मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता, उप अभियंता अशी यंत्रणा तयार करण्यात आली आहे. तेथे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी डेप्युटेशनवर आहेत. ती यंत्रणा त्यांच्या अखत्यारित काम करते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जिल्हा कारागृह, परभणी या कामाच्या संदर्भातील तक्रार डिसेंबर, २०११ मध्ये करण्यात आली होती. हे काम २०१३ मध्ये मंजुर झाले होते. वर्क ऑर्डर पाच वर्षानंतर म्हणजे दिनांक १८ फेब्रुवारी २०१८ मध्ये देण्यात आली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, हे काम मे अखेरपर्यंत पूर्ण होत आहे. त्याचे फोटो आणले आहेत. प्रशासकीय मान्यता दिली होती परंतु त्या विभागाकडून निधी मिळणे गरजेचे होते तो निधी आता मिळालेला आहे. त्यानंतर लगेच सदर काम सुरू केले आहे. ते काम आता पूर्ण होत आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

२.९ परिच्छेद क्र.३.१.८-देखभाल अनुदानातून भांडवली कामांचे निष्पादन.

सदर परिच्छेदाबाबत देखभाल अनुदानातून भांडवली खर्च कसा काय करता येईल. यामध्ये एक मुद्दा मंत्रालय इमारतीचा आहे व दुसरा मुद्दा सारंग इमारतीचा आहे तसेच तिसरा मुद्दा औंढा येथील विश्रांतीगृह बांधकामाचा आहे. महालेखापाल यांचा मुद्दा असा आहे की, हायपॉवर कमिटीची बैठक झाली होती. त्यामध्ये असे म्हटले होते की, यासाठी सेपरेट हेड ओपन करण्यात येईल. नंतर ही बाब रिपेअर व मेन्टेनन्समध्ये घेण्यात आली. असे करण्याची विशेष परिस्थिती काय होती. असा निर्णय कशासाठी घेतला आहे. याबाबत माहिती दिली तर महालेखापालाचा आक्षेप दूर करता येईल असे समितीने सूचित केले असता, मंत्रालय इमारतीची परिस्थिती समितीला माहिती असेल मंत्रालय इमारतीला आग लागली होती. तो भाग पूर्णपणे डॅमेज झाला होता. त्यावेळी एकच पर्याय होता की, लगेच काम सुरू करावे. तो खर्च योजनेतर खर्चामध्ये घेण्यात आला असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाचे लेखी उत्तर असे नाही. लेखी उत्तर असे आहे की, राज्य प्रतिष्ठा धोक्यात आहे. हे कसे काय याबाबत समितीने विचारणा केली असता, मंत्रालय इमारतीचे काम लवकरात लवकर पूर्ण करणे आवश्यक होते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मंत्रालय इमारतीचे काम लवकरात लवकर झाले पाहिजे. मंत्रालय इमारत रिपेअर केली चांगली केली त्याबाबत काही वाद नाही. मुद्दा इतकाच होता की, it should not be taken into maintenance असे समितीने सूचित केले असता, मेन्टेनन्स ही बाब आपण मेजर मेन्टेनन्स प्लॅनमध्ये व नॉन प्लॅनमध्ये देखील घेणे शक्य आहे त्याचे कारण हे नवीन बांधकाम केलेले नाही. इमारत रिपेअर केली आहे. त्यामुळे हे काम कोणत्याही हेडमध्ये करता येते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखापाल यांचा आक्षेप असा आहे की, हायपॉवर समितीची बैठक जुलै २०१२ मध्ये झाली होती. Unanimous decision was taken that the Mantralaya renovation work should be carried out independently via separate funding and not through the Major Head 2059, असा निर्णय झाला होता. तरी देखील याच हेडमध्ये हे काम का घेतले. असा महालेखापालांचा आक्षेप होता असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यावेळी एचपीसीचे सदस्य वित्त सचिव होते त्यांनी या बाबीला मान्यता दिली आहे. त्यांनी त्या हेडमध्ये निधी दिला आहे. हेड ऑफ अकाऊंटचा फक्त विषय आहे. दोन्ही हेड ऑफ अकाऊंटमध्ये हे काम करणे शक्य होते. नवीन इमारत करायची असेल तर नॉन प्लॅनच्या हेडमध्ये ते काम करता येत नाही. जुन्या इमारतीचे मेजर रिपेअर कॅपिटल मध्ये घेऊ शकतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाचे मत योग्य आहे. नवीन हेड करण्यापेक्षा जुन्यामध्ये त्यांनी रिपेअर केले आहे. इमारतीचे स्ट्रक्चर तेच आहे. असे मत वित्त विभागाच्या सचिवांनी व्यक्त केले.

सारंग इमारतीचे काम झाले आहे औंढा येथील विश्रांती गृहाचे काम पूर्ण झाले आहे काय ? हे काम कधी सुरू झाले होते. डीपीडीसीच्या कोणत्या हेडमधून विश्रांतीगृहाचे बांधकाम करण्यात आले आहे. लेखाशीर्ष कोणते होते अशी विचारणा समितीने केली असता, औंढा येथील विश्रांतीगृहाचे काम डीपीडीसीमध्ये घेण्यात आले होते. ते काम डीपीडीसीच्या फंडातून पूर्ण करण्यात आले आहे. विश्रामगृहासाठी डीपीडीसीचे पैसे वापरता येतात अशी विचारणा समितीने केली असता, ४०५९ Capital outlay on buildings असे लेखाशीर्ष आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

डीपीडीसीवर नियंत्रण नियोजन विभागाचे आहे, त्यांच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही केली असावी असे वित्त विभागाच्या सचिवांनी अवगत केले.

जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली तर समिती जिल्हाधिकारी यांना बोलावेल असे समितीने सूचित केले व विभागाने कोणत्या हेडखाली मागणी केली. या समितीच्या प्रश्नाबाबत लेखाशीर्ष ४०५९ १९४६ असे मंजुर केलेले आहे. जिल्हा वार्षिक योजना असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

डीपीडीसीकडे जी मागणी केली की, या हेडमधून असा निधी द्यावा.याबाबत मान्यता कशी दिली अशी विचारणा समितीने केली असता, औंढा मध्ये मान्य केले आहे.

३ कामे दुसऱ्या योजनेखाली करण्यात येत आहेत व २ कामे दुसऱ्याच योजनेखाली म्हणजे डीपीडीसीच्या फंडातून केले आहेत. एकाच कामाचे पाच तुकडे कसे काय करता येऊ शकतात अशी विचारणा समितीने केली असता, अस्तित्वात असलेल्या विश्रामगृहाची दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निधीतून केली आहे. नवीन दोन खोल्या बांधण्याचा निर्णय डीपीडीसीने घेतला व त्यासाठी निधी दिला त्याप्रमाणे दोन खोल्या बांधण्यात आल्या. त्याचे फोटो आणले आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

याबाबत प्रशासकीय मान्यतेची प्रत समिती प्रमुखांकडे सादर केलेली आहे. याची ऑफिशिअल कॉपी देखील देण्यात येईल. नाविन्यपूर्ण योजनेतत वेगवेगळ्या गोष्टी घेता येतात. कोणत्याची प्रकारची योजना नाविन्यपूर्ण योजनेमध्ये घेऊ शकतो तसाही त्यामध्ये एक हेड आहे. डीपीडीसीला नाविन्यपूर्ण योजना म्हणून कोणताही कार्यक्रम घेता येतो. नाविन्यपूर्ण योजनांची वेगळी यादी दिलेली आहे. एखादा जिल्हाधिकारी त्याचे वेगवेगळे अर्थ लावतो. हे नाविन्यपूर्ण योजनेच्या हेडमधील पैसे नाहीत. औंढा नागनाथ हे ज्योतिर्लिंग आहे आणि तेथे येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षात घेता तेथे राहण्याची व्यवस्था नव्हती असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

२.१० परिच्छेद क्रमांक ३.१.९ - निवास करण्यास अयोग्य ठरविण्यात आलेल्या इमारतीवर झालेला अनावश्यक खर्च.

इमारतीमधील २३ व्यावसायिक गाळ्यांपैकी किती गाळेधारकांनी गाळे रिक्त केले आहेत. किती गाळेधारकांनी निष्कास प्रकरणी उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे, सदर न्यायालयीन प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, मॅजेस्टीक आमदार निवास, कोलाबा, मुंबई ही हेरीटेज इमारत टेक्नीकल ऑडीटच्या आधारे ती इमारत वास्तव्य करण्यासाठी योग्य नाही असा रिपोर्ट प्राप्त झाला होता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आमदार महोदयांकडून मॅजेस्टीक आमदार निवासातील खोल्या रिक्त करून घेतल्या आहेत, परंतु पुढे काय ? नवीन इमारत बांधण्याकरीता आर्किटेक्टचर डिझाईनपासून सर्व गोष्टी तयार झालेल्या आहेत का ? न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, सहकार भवन यांना शॉपकरीता जागा देण्यात आलेली आहे, त्यासंबंधीची कोर्ट केसमधील पुढील तारीख दिनांक २८.११.२०१८ अशी देण्यात आलेली आहे. व्हेकेशनमुळे कामकाज सध्या स्थगित आहे. हायकोर्टाच्या निकालाच्या आधारे त्यांनी व्हॅकेट केलेले आहे. यानंतर सदरील इमारत पाडण्याचे नियोजन करण्यात येईल. हेरिटेज इमारतीची दुरुस्ती व पुनर्बांधणी असे नियोजन पूर्णपणे तयार आहे. याची अंमलबजावणी करावयाची होती. परंतु कोर्ट केसमुळे काम प्रलंबित आहे. जास्तीत जास्त एक्स्पीडाईट करून विभागाकडून लवकरात लवकर काम करण्यात येईल. विभागाने सहकार भांडारला लीजवर जागा दिली होती, लीज समाप्त करून आम्हाला ती जागा परत करावी असे पत्र लिहिले आहे. त्यांनी नकार दिल्यामुळे इव्हीक्शन प्रोसीडींग सुरू केलेले आहे. कॉम्पीटंट ॲथॉरीटीकडून विभागाने इव्हीक्शन करून घेतले आहे. याविरुद्ध त्यांनी उच्च न्यायालयात चॅलेंज केलेले आहे. यामुळे विभागाला न्यायालयात उत्तर देणे भाग पडले असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन २०१० मध्ये स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये धोकादायक इमारत असल्याचे म्हटले आहे. यानंतर काय झाले. इमारत धोकादायक होती तर या इमारतीच्या मेंटेनन्सवर एवढा खर्च कसा केला आहे ? सन २००६ नंतर हा खर्च केला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, मॅजेस्टीक आमदार निवासास रिगल सिनेमाच्या बाजूने जो रस्ता जातो. मॅजेस्टीक आमदार निवासात जेथून प्रवेश करतो, तेथील भिंतीच्या वरच्या प्रसरण सांध्यामध्ये पूर्वी ३.५ इंचाचा गॅप होता, आता या दगडी भिंतीचा गॅप ५.५ इंचाचा झालेला आहे. त्यामुळे आमदारांना तेथे ठेवणे धोकादायक होते. आमच्यापेक्षाही वेगळ्या अधिकाऱ्यांकडून ही इमारत तपासून घेतलेली आहे. त्यांनी सांगितले आहे की, व्हॅकेट करा म्हणून ही इमारत व्हॅकेट करून घेतली आहे. इमारतीच्या देखभाल दुरुस्तीवर सन २००९ ते सन २०१५ मध्ये हा खर्च केलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१४ पर्यंत आमदार महोदय या इमारतीमध्ये राहात होते. तोपर्यंत इमारतीचा मेंटेनन्स करणे आवश्यक होते. सन २०१४ नंतर या इमारतीमधील खोल्या कोणाला देण्यात आलेल्या नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता, डिसेंबर २०१६ मध्ये ही इमारत आमदारांकडून आपण रिक्त करून घेतली आहे. एप्रिल, २००९ ते डिसेंबर २०१६ या कालावधीत प्रत्यक्षात आमदारांचे तेथे वास्तव्य होते. तेव्हा देखभाल दुरुस्ती केलेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

या इमारतीच्या पुनर्बांधणीनंतर तेथे आमदारांची व्यवस्था करणार आहात का किंवा अन्य काही केले जाणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत विधीमंडळ कार्यालयाच्या सूचनेप्रमाणे प्लॅन तयार करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे येथे आमदारांकरीता निवासाच्या खोल्या आहेत, विधीमंडळात येणारे राष्ट्रकुल संसदीय मंडळाचे प्रतिनिधी व परदेशी प्रतिनिधीच्या वास्तव्यासाठी ९ सुटस तेथे तयार केले जाणार आहेत. अद्यावत स्टेनलेस स्टीलचे किचन बेसमेंटमध्ये राहणार आहे. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे जशा सुविधा आहेत, तशा सुविधा येथे होणार आहेत. तेथे एकूण ३६ खोल्या होणार असून त्यापैकी २४ आमदारांची निवास व्यवस्था व ९ सुटस तेथे केले जाणार आहेत. आमदारांच्या खोल्या ५८० स्क्वेअरफुटाच्या असणार आहेत. याचे सर्व नियंत्रण विधीमंडळाकडे आहे. तेथे मजल्याची मर्यादा वाढविण्यासंदर्भात ती हेरीटेज बिल्डींग आहे, त्यामुळे त्याचे मजले जास्त वाढविता येणार नाही, पण तेथील बेसमेंटचा वापर करण्याचे ठरले होते. बेसमेंटमध्ये पार्कींगची सोय करता येईल व त्यास एका बाजूने एंट्री देता येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्या परिसरात पार्कींगची खूप अडचण आहे, त्यामुळे तेथे पार्कींगची सुविधा करणे खूप आवश्यक आहे असे समितीने सूचित केले असता, आता मंत्रालय परिसरात मेट्रो रेल्वेचे जे स्टेशन होत आहेत, तेथे आपणास बऱ्यापैकी पार्कींगची सुविधा मिळणार आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

२.११ परिच्छेद क्रमांक ३.१.१० - रंगलेप कामांच्या निष्पादनात संशयास्पद फसवणूक

घाटकोपर येथील पोलीस क्वॉर्टर्समधील १७ इमारती (९८० क्वॉर्टर्स) च्या रंगलेप कामाच्या निष्पादनात संशयास्पद फसवणूकीच्या कामांची चौकशी करण्याचे निर्देश मुख्य अभियंता स्तरावरून दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन यांना केव्हा दिले आहेत व सदर प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे ? महालेखाकारांनी ही बाब विभागाच्या निदर्शनास कधी आणली आहे. चौकशी कधी सुरू केली आहे. चौकशी सुरू करण्यास उशीर का झाला. यास कोण जबाबदार आहे. चौकशीमध्ये कोणाचा दोष आढळला आहे. निधीचा अपव्यय झाल्याबाबत महालेखाकारांचे म्हणणे आहे, याबाबत चौकशीमध्ये काय म्हटले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१४-२०१५ मध्ये ऑडीट झाल्यावर लक्षात आले. दिनांक ४.२.२०१५ रोजी चौकशी सुरू केली आहे. समितीच्या मागील बैठकीच्या वेळी मुख्य अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन यांना बोलावले होते. चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे. चौकशीच्या निष्कर्षामध्ये

नमूद केले आहे की, येथील मुळ बांधकाम पोलीस हौसींग कार्पोरेशनकडून झाले होते. बी.जी.कन्ट्रकशन्स टेक्नॉलॉजी प्रा.लि. पूर्णे हे कंत्राटदार होते. कन्स्ट्रक्शनचा मुळ मुद्दा त्याकरिता नमूद केलेला आहे. येथे रंगरंगोटीची कामे करून घेण्यात आली. तीन वर्षाची अनुज्ञेयता असते, परंतु त्याच्या आतमध्येच दुसऱ्यांदा ही रंगरंगोटी करण्यात आली. याबाबतच्या चौकशी अहवालाचा निष्कर्ष समितीसमोर सादर करण्यात येईल. हे काम झालेले नाही, असे महालेखाकारांचे मत आहे. याबाबत स्पष्टीकरण देण्यास समितीने सांगितले असता, याबाबत पोलीस हौसींग कॉपोरेशनकडून निरीक्षण करण्यात आले, तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तेथे उपस्थित नव्हते. त्यानंतर पुन्हा रहिवाशी व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यासमवेत एकत्रित चर्चा करण्यात आली. पोलीस हौसींग कॉपोरेशनने मुद्दा उपस्थित केला होता की, कामे झालेली नाहीत. आता त्यांनी स्वतः पाहिले आहे व समाधान व्यक्त केलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

९८० क्वॉर्टर्सपैकी ४२० क्वॉर्टर्सला एकाच कालावधीत डबल रंगरंगोटी केल्याचे दाखविले गेले आहे. ४२० पैकी २२२ क्वॉर्टर्सला रंगरंगोटी झालेली नव्हती असे समितीने सांगितले असता, डबल रंगरंगोटीचे कारण मुळ बांधकामाच्या डिफेक्ट लायबीलीटीमध्ये काही दुरुस्त्या उद्‌भवल्या होत्या, हे काम मुळ कंत्राटदाराने केले आहे, जे पोलीस हौसींगच्या अंतर्गत होते. या दुरुस्त्या करण्यापूर्वी एकदा रंगरंगोटी झाली होती. या दुरुस्त्या झाल्यानंतर पुन्हा रंगरंगोटीची आवश्यकता भासली आहे, त्यामुळे सहाजिकच रंगरंगोटी पुन्हा करण्यात आली असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

लेखापरीक्षण झाले नसते तर ही बाब समोर आली नसती. २२२ क्वॉर्टर्सला पुन्हा रंगरंगोटी केली नसती. शेवटी हे काम कसे पूर्ण झाले अशी विचारणा समितीने केली असता, महालेखाकारांचे आक्षेप दोन बाबतीत होते. तीन वर्षाच्या कालावधीत दोन वेळा कामाची पुनरावृत्ती झाली आहे. २२१६ व ४०५५ लेखाशिर्षाअंतर्गत कामाचे अभिलेखे पाहिले तर हा मुद्दा सिद्ध होतो. या मागील कारणांची आम्ही चौकशी केली. २२१६ चे कामे पूर्ण झाल्यानंतर मे. बी.जी.शिर्के हे ओरीजनल काम केलेले कंत्राटदार आहेत, त्यांनी तेथे स्ट्रक्चरल रिपेअरस केले आहे. कारण तेथील क्वॉर्टर्स अत्यंत दुरावस्थेत आहेत. त्यानंतर त्यांनी क्वॉर्टर्स दुरुस्त केले, ४०५५ मध्ये फरशीचे काम मंजुर झाले होते. त्यामध्ये देखील रंगलेपाचे काम होते. फरशीचे काम व स्ट्रक्चरल रिपेअरचे काम हे २२१६ ची रंगलेपाची कामे झाल्यानंतर झालेली आहेत, त्यामुळे पुन्हा एकदा रंगलेपाची कामे करावी लागली, असे एकंदरीत दिसत आहे. पेमेंट डबल झाले नाही. पहिल्यांदा त्यांनी २२१६ मधील कामे केली आहेत व त्याचे पेमेंट दिले आहे. त्यानंतर स्ट्रक्चरल रिपेअर बीम, कॉलम, स्लॅब केले असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्यावेळी इमारत बांधली गेली, त्यानंतर स्ट्रक्चरल रिपेअर करण्याचे काम का करण्यात आले अशी विचारणा समितीने केली असता, ३० वर्षांपूर्वी लो कॉस्ट हौसींगमध्ये पोलीस हौसींगने कामे केलेली आहेत, त्यातील डिफेक्ट लायबीलीटी चालू होत्या. त्यावेळी पोलीस महासंचालकांनी निर्देश दिले होते की, त्याचे रिपेअर करून देण्यात यावे. अशा प्रकारे २२१६ ची रिपेअरची कामे फेब्रुवारी २०१४ पर्यंत पूर्ण झालेली आहेत. बी.जी.शिर्के यांनी दिनांक २५.३.२०१४ पर्यंत कामे पूर्ण केली आहेत. त्यानंतरही ४०५५ ची कामे त्यांनीच मंजुर करून दिली होती, परंतु ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेली आहेत, यामध्ये फरशी व रंगलेपाची कामे होती. फरशीचे व स्ट्रक्चरल रिपेअरच्या कामामध्ये एक दोन महिन्यांचा गॅप आहे. काम करणाऱ्या एजन्सीबाबत बी.जी.शिर्के या मोठ्या एजन्सीने स्ट्रक्चरल रिपेअरचे काम केले आहे. पोलीस हौसींग कॉपोरेशन ही त्यांची मुख्य कंट्रोल एजन्सी आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केवळ मेंटेनन्सचे काम आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जर मेंटेनन्स करावयाचा होता तर पहिल्यांदा रंगरंगोटी का केली. मेंटेनन्स केल्यामुळे ही रक्कम वाया गेली हा महालेखाकारांचा आक्षेप आहे. महालेखाकारांच्या आक्षेपानुसार यामध्ये निष्काळजीपणा झालेला आहे, हे मान्य आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, तीन वर्षाचा कालावधी मेंटेन झाला नाही हे तर रिपोर्टमध्ये आहे. त्यामध्ये नुकसान झालेले नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाच्या अहवालामध्ये कोणती कारवाई प्रस्तावित केली आहे ? चौकशी अहवालामध्ये कोणाला दोषी धरले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, कालावधी मेंटेन न केल्यामुळे शर्ती सेवा नियम २४ (२) चा यामध्ये भंग झालेला आहे. त्यामुळे सेवा नियम ३(१), ३(१) (२) चे उल्लंघन झालेले आहे. याच्या कारणांसह आम्ही दिनांक ९.४.२०१८ रोजी रिपोर्ट दिलेला आहे. त्यावर शासनाकडून कार्यवाही होईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

वास्तविक ४२० क्वॉर्टरपैकी २२२ क्वॉर्टरला प्रत्यक्षात रंगरंगोटी झालेली नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, ४२० पैकी २२२ क्वॉर्टरबाबत एक साधे पत्र दिलेले आहे. लोहमार्ग पोलीस मुख्यालयाचे निवासी गार्डीयन यांनी परस्पर त्यांचे प्रशिक्षणार्थी नेमले. प्रत्येक रुमबाबत त्यांना जे आढळले त्याचा रिपोर्ट त्यांनी दिला आहे. त्यावर पुढे काय झाले त्याचे कागद विभागाला मिळाले नाही. आता दिनांक ६.४.२०१८ रोजी तेथे भेट दिली आहे व चौकशी केली आहे. तेथील ७ इमारतीमधील सर्व क्वॉर्टर्स तपासल्या असता येथे रंगलेपाचे काम झालेले दिसत आहे. पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यासोबत पोलीस विभागाचे अधिकारी घेऊन ४२० क्वॉर्टर्स तपासणी

केली, त्यामध्ये असे आढळले की, ३८४ क्वॉटर्समध्ये रंगलेपाचे काम झालेले आहे. २४ क्वॉटर्स बंद होते असा अहवाल आला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखाकारांचे म्हणणे आहे की, २२२ क्वॉर्टर्सची रंगलेपाची काम झालेले नाही. महालेखाकारांनी कशाच्या आधारे फायंडींग केले आहे अशी विचारणा समितीने केली असता, लोहमार्ग पोलीस मुख्यालयाचे निवासी गार्डीयनचे पत्र उप अभियंता यांना दिले आहे की, अमुक अमुक क्वॉटर्समध्ये रंगलेप झाल्याचे दिसत नाही. याबाबत अहवालामध्ये आलेले आहे की, त्यांनी पाहणी करताना सार्वजनिक बांधकाम विभागाचा कोणताही कर्मचारी सोबत घेतलेला नाही. त्यांनी खोटा अहवाल दिला आहे असे म्हणता येणार नाही, त्यांचा अहवाल सन २०१५ मधील आहे. तेथील क्वॉर्टर्सची अत्यंत दुरावस्था आहे, काही काम केले तरी तेथे काम झालेले नाही असे तेथे सांगितले जाते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तेथे शासकीय कर्मचारी राहतात. त्यांच्याबद्दल असे कसे काय बोलू शकतात ? सन २०१५ मध्ये तेथील लोकांनी रंगलेप झालेला नाही असा अहवाल दिलेला आहे. आता सांगण्यात येत आहे की, रंगलेप झालेला आहे. विभागाने हे काम दोन वर्षात केले असणार असे मत समितीने व्यक्त केले असता, ही निवासस्थाने बघितली आहेत. ती आजही खरोखर वाईट अवस्थेत आहेत. आजही तेथे गेले तर सार्वजनिक बांधकाम विभागाने काम केले आहे असे वाटणार नाही. ४०५५ या लेखाशीर्षाखाली कामे मंजुर झालेली आहेत. त्या कामांसाठी विवक्षित निधी प्राप्त झाला. त्यावेळी ती कामे कशी करायची, त्यात दुरूक्ती नको हे पाहिले. बी.जी.शिर्के यांनी त्यांच्यावरील जबाबदारी पार पाडली आहे किंवा नाही हे पाहण्यासाठी गेले असता, जे काम करण्यात येते त्यासंदर्भात तेथील माणसाकडून, जो राहणारा आहे त्याच्याकडून काय काम केले ते लिहून घ्यावे. तेथील पोलिसांचे जे अधिकारी आहेत त्यांनीही कोणते काम आवश्यक आहे आणि कोणते काम झाले याचा अहवाल द्यावा. कारण त्यावेळी पोलीस गृहनिर्माण मंडळाला प्रशासकीय मान्यता देऊन पैसे जमा करावयाचे होते. त्यासंदर्भात त्यांची तपासणी सुरू होती. तेव्हा यात गैरसमज असू शकतो. लोकलेखा समितीने सांगितल्यामुळे विभागाने हे सर्व मुद्दे गांभीर्याने घेतले आहेत. त्या वेळी राहणारे आणि आता राहणारे या सर्वांना कोण कोण रावसाहेब आले, कोणी काय काम केले हे विचारून घेतले. रेकॉर्डवरून सर्व कंत्राटदरांची नावे मिळविली. त्यांच्या बिलांची खात्री केली. प्रशासकीय मान्यतेची खात्री केली. त्यात अंतर किती दिवसांचे पडते हे देखील पाहिजे. साधारणपणे तीन महिने, चार महिने, पाच महिने अंतर पडल्याचे दिसून येते. रंगलेपासंबंधी सन २०१५ मध्ये रिपोर्ट देण्यात आला. त्याची सन २०१८ मध्ये तपासणी केली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आता जो रंगलेप बघतिला आहे तो साधारणतः कधी करण्यात आला आहे. सन २०१५ मध्ये रंगलेप केला आहे की, सन २०१८ मध्ये रंगलेप केला आहे हे सहजपणे कळून येते. रंगाची तपासणी देखील करता येते. त्याप्रमाणे आपण रंगाची तपासणी केली आहे काय? सन २०१८ मध्ये जाऊन तपासले आहे. महा लेखपालांनी ही बाब सन २०१५ मध्ये निदर्शनास आणली आहे. त्याची तातडी होती तर आपण सन २०१५ जाऊन तपासावयास पाहिजे होते.सन २०१५ मध्ये चौकशी लावली आहे. ३ वर्षानंतर तेथील वस्तुस्थिती काय आहे हे तपासण्यासाठी संबंधित तेथे गेले. महा लेखापाल यांचा गंभीर मुद्दा असताना ३ वर्ष चौकशीला वेग देण्याऐवजी विलंब लावलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे. कार्यालय मुंबइ येथेच आहे. काम देखील मुंबईचेच आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने कागदपत्र सादर करण्यासाठी १० वेळा पत्र दिली आहेत. यात डॉक्युमेंटेशन प्रुफ हा महत्त्वाचा होता. ३ वर्षाच्या आत रिपीटीव्हन ऑफ कलरींग होत असेल तर त्यासाठी कागदपत्रे लागतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लोकलेखा समितीची साक्ष लागली नसती तर अजून तीन वर्षे आपला चौकशीचा अहवाल आला नसता. साक्ष लागली म्हणून विभागाने अहवाल मागवून घेतला. नाही तर अजून तीन वर्षे अहवाल देखील झाला नसता असे मत समितीने व्यक्त केले असता, तो अहवाल प्राप्त झालेला आहे. त्याची छाननी करून एक महिन्याच्या आत तपशीलवार अहवाल सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यात कोणती जबाबदारी कोणावर निश्चित करण्यात आली आहे हे देखील समितीला कळवावे. यात अनियमितता झाली आहे. त्यामुळे अधिकारी किंवा कंत्राटदार हे जबाबदार असणारच असे मत समितीने व्यक्त केले असता, जबाबदारी येते काय हे देखील पडताळून पाहण्यात येईल. जर अधिकाऱ्यांची बाजू योग्य असेल तर तसे देखील समितीस सादर करण्यात येईल. नसेल तर त्यांच्यावर क्शन घेऊन व तसे सादर करण्यात येईल.

ऑक्युपंटने शासकीय निवासस्थान सोडल्यानंतर तेथे राहणारा जो नवीन ऑक्युपंट येतो तो रंगकामाची मागणी करतो. त्यामुळे साधारणतः दर दोन वर्षानी खोल्यांना रंग लावण्यात येतो. तरी देखील रंग कधी लावण्यात आला यासंबंधात फॉरेन्सिक ऑडिटसारखी तपासणी करून घेण्यात येईल. त्यात काम केले आहे हे सिद्ध होत असेल तर कारवाईचा प्रश्न नाही. पण काम केले नाही हे सिद्ध झाले तर

त्यासंबंधातील अहवाल सादर करण्यात येईल. दिनांक ९.४.२०१८ रोजी परिच्छेद आला असल्यामुळे थोडासा वेळ द्यावा अशी विनंती आहे. विभागाने व्हीएनआयटीकडून फोरेन्सिक ऑडिट करून घेतले आहे. तसे वाटल्यास येथील काही कामांचे ऑडिट करून घेऊ आणि एका महिन्यामध्ये त्याचा अहवाल सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासंबंधात आपले जे काही म्हणणे असेल त्याचा अहवाल समितीला एक महिन्यामध्ये सादर करावा असे समितीने सूचित केले असता, भविष्यात अशा प्रकारची प्रकरणे घडू नयेत यासाठी परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्यात ३ वर्षाच्या आत रिपिटेशन होऊ नये हा मुद्दा घेतलेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

रंगलेप न लावता देयक तयार करण्यात आलेले आहे असे देखील नोटींग आहे. पीडब्ल्यूडीच्या कामाची क्वालिटी चांगली असली तरी देखील पोलीस विभागासाठी ते जे बांधकाम करतात ते अतिशय निकृष्ट दर्जाचे असते. त्यामुळे ही बाब विभागाच्या निदर्शनास आणली तर बरे होईल असे समितीने सूचित केले असता, पोलीस हाऊसिंगसाठी आंतरिक सुपरव्हिजनसाठी मागणी करण्यात आलेली आहे. गेल्या दीड वर्षापासून आमचे ३ अधीक्षक अभियंता, १ मुख्य अभियंता, ८ कार्यकारी अभियंता तेथे देण्यात आले आहेत. आता काम चांगले सुरू आहे असा देखील रिपोर्ट आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

पोलीस वसाहतीतील इमारतीसंबंधात त्या इमारतीतील ड्रेनेजचे पाईप लिक असतात. त्यामुळे इमारती खराब होतात. आपण रस्त्यावरून जाताना अकोल्याची पोलीस वसाहत बघावी. तेथील इमारतीतील सर्व पाईप लिक आहेत. तेथील इमारतीच्या भिंती ओल्या दिसतात. ड्रेनेजचे सर्व पाणी पूर्णतः तेथील इमारतीमध्ये मुरते. यासंबंधात मॉनेटरींग व्यवस्थित असायला हवे. जे एन्ड युझर आहेत त्यांचा येथे फिडबॅक घेण्यात आलेला नाही. तो घेतला असता तर हा विषय कदाचित विभागाच्या लक्षात आला असता. त्यामुळे स्ट्रेंग्थन करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावा लागेल. विभागाकडे सगळ्या विंग्ज आहेत. पण परिणामकारक अंमलबजावणी दिसत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, इमारतीसंबंधात शासन स्तरावर एक समिती घटित करण्यात आली होती. आता संगणकीकरण मोठ्या प्रमाणावर झालेले आहे. त्याद्वारे आपण हे चेक करू शकतो. मॉनेटरिंग देखील इफेक्टीव्ह करू शकतो. यासंदर्भातील सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे. त्याचे टेस्टींग दोन-तीन ठिकाणी केले आहे. क्वार्टर्स वाटपापासून ऑक्युपेंटला ताबा मिळाल्यापासून काय दुरुस्ती करण्यात आली, त्या कोणकोणत्या दिवशी केल्या, त्यांच्या मागण्या कशा वाढत चालल्या आहेत किंवा त्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने विभाग काय करतो इत्यादी प्रकारे खर्चाचे मॉनेटरींग शासन स्तरावर वित्त विभागाच्या बीम्स प्रणालीशी जोडण्याचे काम विभागाने केलेले आहे. मागणी आल्यानंतर विभागाने किती दिवसात प्रतिसाद दिला, दुरुस्ती कोणत्या पद्धतीने केली हे सगळे संगणकावरच दिसेल. आज याबाबतची कागदपत्र शोधावी लागतात. ती संगणकाद्वारे सहज उपलबध होतील अशी यंत्रणा विभागाचे उभी केली आहे. साधारणतः याची अंमलबजावणी या पावसाळ्यानंतर करण्यात येणार आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले तसेच या व्यतिरिक्त क्षेत्रीय अभियंत्रयांसाठी परिपत्रक देखील निर्गमित केले आहे. त्यात हा मुद्दा घेतला आहे की, १०० कोटी रूपयांची कामे किवा जेथे दुरुस्तीची आवश्यकता आहे तेथे त्यांचे पत्र असावे. अधीक्षक अभियंता यांनी कामे तपासून मग त्यास जॉब नंबर द्यावा. काम झाल्यानंतर त्यांनी स्वाक्षरी केल्यानंतर त्यांना पेमेंट देण्यात येईल अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत असेही विभागीय सचिवांनी सांगितले.

२.१२ परिच्छेद क्र.३.१.११ : कमकुवत आंतरिक नियंत्रण आणि संनियंत्रण

यासंबंधात विभागाचे मत काय आहे ? विभागाकडे व्हेटींगचे रिमार्क आहेत काय ? सर्कल लेव्हलच्या बैठकीसाठी विभागाने जी.आर.काढलेला आहे. सन २०१५ ते २०१८ या कालावधीत किती बैठका झालेल्या आहेत ? जी.आर.काढला म्हणजे सर्व काही आलबेल आहे असे नाही. सन २०१५ ते २०१८ या कालावधीत सर्कल पातळीवर किती बैठका झाल्या अशी विचारणा समितीने केली असता, या कालावधीत प्रत्येक मंडळांतर्गत बैठका झालेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. समितीची एप्रिलमध्ये बैठक झाली होती. त्यानुसार सर्वांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. २३ सर्कलपैकी १२ सर्कल्समध्ये विभागांना बोलावून बैठका घेण्यात आल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यात समितीच्या संदर्भाचा विषय नाही. मूळ जी.आर.हा विभागाचा आहे. तो समितीचा जी.आर नाही. जी.आर.हा सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्गमित केलेला आहे. विभागाच्या जी.आर.ची अंमलबजावणी विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेली नाही. ती का केली नाही. शासनाच्या परिपत्रकाची अंमलबजावणी अधिकारी का करीत नाही याचे स्पष्टीकरण देण्यास समितीने सांगितले असता समितीचा मुद्दा बरोबर आहे. याची अंमलबजावणी पूर्णपणे सर्व ठिकाणी व्हावयास पाहिजे होती. बैठका घ्यायला पाहिजे होत्या. परंतु, त्या सर्व ठिकाणी झालेल्या नाहीत असे विभागीय सचिवांनी मान्य केले.

विभागाच्या हलगर्जीपणामुळे हे सर्व होते आहे. विभाग संबंधितांविरुद्ध कोणतीही कारवाई करीत नाही म्हणून त्यांना वाटते की, काहीही केले नाही तरी काहीही होत नाही. अशा प्रकारची विभागाची स्थिती झाली आहे. बैठकीची देखील ती स्थिती आहे. महालेखापाल यांच्या पॅरामध्ये सर्व निरिक्षणे आलेली आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, या वर्षी ११ सर्कल्समध्ये बैठका घेण्यात आल्या असून त्याचे कार्यवृत्त उपलब्ध झालेले आहे. ते समितीकडे सादर करण्यात येईल.

ज्या अधिकाऱ्याने काम केलेले नाही त्याला जबाबदार धरणार काय ? त्यांची एक वेतनश्रेणी, प्रमोशन थांबवावे. असे काही तरी केले पाहिजे. शासकीय अधिकाऱ्यांना समजले पाहिजे की, सरकार सिस्टीमने चालते. आपल्या परिपत्रकाची अंमलबजावणी होत नसेल तर ती दुर्दैवी बाब आहे. त्यामुळे यासंबंधात विभागाची ठोस भूमिका समितीला जाणून घ्यायची आहे. तेव्हा या प्रकरणी ज्या अधिकाऱ्याने आपल्या परिपत्रकाची अंमलबजावणी केली नाही त्याच्या विरोधात काय करणार ? नाही तर परिपत्रक मागे घ्यावे. दोन पैकी एक काम करावे असे समितीने सूचित केले असता, यासंबंधात अधिकाऱ्यांचे खुलासे मागवून पुढील कार्यवाही करण्यात येईल. आता हे सर्व सुरळीत झालेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने सन २०१५ मध्ये १९ अभियंत्यांना निलंबित केले होते. त्यांच्याबद्दल पुढीलकोणती कारवाई करण्यात आली आहे. आपण किती कॉन्ट्रॅक्टरना काळ्या यादीत टाकले आहे अशी विचारणा समितीने केली असता, १८ कॅान्ट्रॅक्टरना काळ्या यादीत टाकलेले आहे. शासनाने त्यस परवागनी दिलेली आहे. प्रत्यक्षात त्यांना काळ्या यादीत टाकल्याचे प्रमाणपत्र देखील आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

इंजिनिअर्सची स्थिती काय आहे. ज्या फर्मला काळ्या यादीत समाविष्ट केले, त्याच कंत्राटदारांनी दुसऱ्याच्या नावाने तेथेच फर्म उघडली आहे, हे खरे आहे काय ? एखाद्या नावाची एक कंपनी आहे. त्या कंपनीला काळ्या यादीत टाकले. पण नावात बदल करून कंपनी काढली. तसे येथे झाले आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत पडताळणी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे झाले कंत्राटदारांच्याबाबतीत. पण इंजिनिअर्सच्याबाबतीत काय स्थिती आहे ? या समितीच्या प्रश्नाबाबत अभियंत्यांविरुद्धची दोषारोप पत्रे अजून व्हावयाची आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१३ मध्ये निलंबित केले आहे. तीन वर्ष झाल्यानंतर देखील दोषारोप पत्र तयार होत नाही ? याचा अर्थ हे संगनमताने होत आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. या सर्व गोष्टीला विभागाचे समर्थन आहे असा आक्षेप समितीने घेतला तर तो चुकीचा होणार नाही. खालचे अधिकारी सांगतात की, आम्हाला वर पर्यंत टोल द्यावा लागतो ही गोष्ट मान्य आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, पहिला मुद्दा गुन्हा दाखल करण्याबाबतचा होता. त्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात आलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्याच्याशी समिती सहमत आहे.परंतु ज्यांना निलंबित केले त्यांच्याविरोधात तीन वर्षे विभागीय चौकशी का सुरू केली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय चौकशी सुरू करताना अगोदर त्याचे पुरावे गोळा करावे लागतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पुराव्यांशिवाय त्यांना निलंबित कसे केले ? निलंबन म्हणजे शिक्षा नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, प्राथमिक चौकशीमध्ये अपहार झाल्याचे आढळून आल्यास निलंबन करता येते व त्याप्रमाणे या प्रकरणात देखील निलंबन करण्यात आलेले आहे. या प्रकरणा बाबतची माहिती महिन्याभरात सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

तीन वर्षे विभागीय चौकशी का झाली नाही याची कारणे अगोदर समितीला पटवून द्या तरच समिती मान्य करील अन्यथा मान्य करणार नाही. याची प्रोसिजर एकदा समजावून सांगण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, शासन स्तरावर तक्रार आल्यानंतर चौकशीला पाठविण्यात येत. यासाठी शासन आणि मुख्य अभियंता असे दोन प्राधिकारी आहेत.त या प्रकरणात मुख्य अभियंता म्हणून चौकशी करण्याबाबत आदेशित केले होते. ज्या कंत्राटदारांनी चुकी केलेली आहे त्यांच्यावर एफ.आय.आर. दाखल झालेला आहे. तसेच ज्या अधिकाऱ्यांनी चुका केल्या त्यांचे दोषारोपपत्र मुख्य अभियंता यांच्याकडून शासनाकडे येतात. त्यानंतर ते सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावे लागतात. यामध्ये आर्थिक भार तपासावा लागतो. त्यासाठी गृह विभागाकडे देखील ही फाईल जाते. या सर्व प्रोसिजरमध्ये एक ते दीड वर्षाचा कालावधी जातो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

या प्रकरणाला तीन वर्षांचा कालावधी लोटला आहे असे समिीने निदर्शनास आणले असता, एफ.आय.आर. तसेच इतर बाबींच्या प्रती असून त्या समितीस सादर करण्यात येईल. परंतु काही मुद्दयांबाबतची माहिती तपासून समितीस सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अधिकारी निलंबित होतात, विभागीय चौकशी सुरू होते तरीही त्यांची पदोन्नती होते किंवा इतर लाभ मिळतात. मग निलंबन किंवा विभागीय चौकशी कशासाठी करण्यात येते ? कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकले व अभियंत्यांना निलंबित करण्यात आले. या अभियंत्यांनी ६ महिने सुट्टयांचा आनंद घेतला व आता त्यांना पदोन्नतीसह सर्व लाभ देणे सुरू आहे. लोकलेखा समितीसमोर महालेखाकारांचे वेटिंग घेऊन येत असताना हा विषय चर्चेला येणे साहजिकच आहे. ते विभागीय चौकशीमध्ये सुटले असते तर काही हरकत नव्हती. परंतु कारवाईच केली जात नाही याचे मला आश्चर्य वाटत आहे. Better to keep mum ? समितीला सर्व सिस्टीम माहिती आहे. यामध्ये विलंब झाल्याचे विभागाला मान्य आहे. निदान या प्रकरणाची सद्यस्थिती तरी काय आहे अशी विचारणा समितीने केली असता, आर्थिक दायित्वासंदर्भात मुख्य अभियंता यांना सूचना दिल्या होत्या. प्रत्येक माणसाचे दायित्व किती आहे त्यानुसार कोणावर किती जबाबदारी निश्चित करायची याबाबत आले नसल्यामुळे हे प्रलंबित आहे.

याला किती वेळ लागणार आहे ? आता या सर्व १९ अभियंत्यांवर जबाबदारी निश्चित झाली, परंतु त्यांना आतापर्यंत पदोन्नती मिळाली, वेतनवाढी मिळाल्या किंवा एखादा सेवानिवृत्त झाला तर काय करणार ? आर्थिक नुकसानीची वसुली करण्यात येईल परंतु आजपर्यंत संबंधित व्यक्तीला बडतर्फ करणे आवश्यक असतानाही पदोन्नती देण्यात आली त्याची कशी वसुली करणार ? अशी विचारणा समितीने केली असता, निवृत्ती वेतनातून की असेना पण त्यांच्याकडून वसुली केली जाते. एखाद्या प्रकरणात ४८ हजार रुपयांची वसुली असेल तर संबंधिताकडून एकरकमी किंवा टप्प्याटप्प्यांनी ती केली जाते. तसेच शिक्षा भोगून झाल्यानंतर संबंधिताला पदोन्नती द्यावी लागते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

पैसे भरले म्हणजे क्लीन चिट असे आहे का ? केवळ पैसे भरणे एवढाच उद्देश आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यांना नकार दर्शविला व शिक्षेच्या परिणामांमध्ये एक वेतनवाढ थांबविणे, सेन्शुअर करणे, दोन वेतन वाढी थांबविणे, तीन वेतनवाढी थांबविणे व जबर शिक्षा द्यायची असेल तर सेवामुक्त करणे आणि बडतर्फ करणे अशा पाच प्रकारांचा समावेश आहे असे सांगितले.

या प्रकरणामध्ये विभाग काय करणार आहे असा प्रकार घडू नये यासाठी देखील काय करणार आहे असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, असे गैरप्रकार घडत असल्याचे लक्षात आल्यानंतर संगणकीकरण केले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभाग खूप चांगले काम करीत आहे हे समितीला मान्य आहे. परंतु सदर प्रकरणातील १९ अभियंत्यांबाबतचा मुद्दा आहे. त्यांच्यावर कारवाई करून हे प्रकरण किती दिवसांमध्ये मार्गी लावणार आहात ? विभागीय चौकशी किती दिवसांमध्ये सुरू होईल ? अशी विचारणा समितीने केली असता, एक महिन्यामध्ये यांचे दोषारोपपत्र प्राप्त होतील. त्यानंतर सामान्य प्रशासन विभागाची परवानगी व इतर कार्यवाहीसाठी साधारणपणे चार महिन्यांचा कालावधी लागेल. त्यानंतर चौकशी होऊन त्याप्रमाणे शिक्षा होईल. प्रत्यक्षात विभागीय चौकशी सुरू होण्यासाठी चार ते सहा महिन्यांचा कालावधी लागेल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

हे अभियंते सन २०१५ मध्ये निलंबित झाले आहेत. आता २०१८ मध्ये सांगण्यात येत आहे की, ६ महिन्यांनी त्यांची विभागीय चौकशी सुरू होईल. दोषी लोकांना एवढे दिवस वाचविण्याचे काम होत असेल तर आपल्यावर कोणाचेही दडपण नाही किंवा आपण काहीही केले तरी आपल्याला काहीही होणार नाही असे विभागामध्ये वातावरण होईल. निलंबन कालावधीमध्ये सहा महिने सुट्टीचा आनंद घेऊन पुन्हा पगार घ्यायचा, असा हा प्रकार आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, सामान्य प्रशासन विभागाकडून जी प्रक्रिया करायची आहे त्यामध्ये विभागाकडून स्वतः पुढाकार घेऊन तीन महिन्यांमध्ये कारवाई सुरू करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वत केले.

ज्याप्रमाणे "Justice delayed is justice denied" तसं "Punishment delayed is punishment denied". त्याप्रमाणे शिक्षा दिली बडतर्फी नाही, असे आहे. याला उशीर केला म्हणजे त्याची ग्रॅव्हिटी संपते असे मत समितीने व्यक्त केले असता, असे घडणार नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

निलंबित करण्यात आलेल्या १९ अभियंत्यांची यादी, त्यांना केव्हा निलंबित करण्यात आले, पुन्हा कधी कामावर घेण्यात आले, आता ते कोणत्या पदावर कार्यरत आहेत, त्यांची पदोन्नती झाली असल्यास किंवा सेवानिवृत्त झाले असतील तर त्याबाबतची सविस्तर माहितीची विचारणा समितीने केली असता, सदर माहिती एका आठवड्यात समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

यामधील काही लोक सेवानिवृत्त देखील झाले असतील. सप्टेंबर, २०१५ पासून आता सन २०१८ पर्यंत ३ वर्षे पूर्ण झाले आहेत. तरीही या प्रकरणी विभागीय चौकशी सुरू करण्यासाठी आणखी सहा महिन्यांचा कालावधी मागण्यात येत आहे. ही बाब गंभीर नाही का ? असे मत समितीने व्यक्त केले असता, तीन महिन्यांमध्ये विभागीय चौकशी सुरू करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नियम केवळ लोकप्रतिनिधींसाठीच आहेत का, विभागासाठी नाहीत का? लोकप्रतिनिधींनी एखादे काम सांगितले तर त्याला नियम लागतात मग या ठिकाणी का नियम लागू होत नाहीत, यासाठी काही कालबद्ध कार्यक्रम नाही का? यासाठी काय कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणार? अशी विचारणा समितीने केली असता, तीन महिन्यांमध्ये सामान्य प्रशासन विभागाकडून परवानगी मिळवून आदेश निर्गमित करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे प्रकरण चार वर्षांपुर्वीचे आहे. यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडून परवानगी मिळाली नाही हे आज का सांगण्यात येत आहे. विभागीय चौकशी सुरू झाल्यानंतर पुढे किती वर्षे चालेल हे माहिती नाही. चौकशी अधिकारी नेमताना ज्यांच्यावर पूर्वी काही आरोप झालेले असतील त्यांना नेमण्यात येऊ नये असे मत समितीने व्यक्त केले असता, कार्यकारी अभियंता यांच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची चौकशी करणाऱ्या प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांची पदे रिक्त होती. त्यामुळे याबाबत दोन-तीन दिवसांपूर्वीच शासनाने आदेश निर्गमित केला आहे की, कंत्राटी पद्धतीने असे काम करण्यास तयार असणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रती प्रकरणी १८ हजार रुपये मानधन देऊन, पॅनलवर घेऊन चौकशी प्रकरण तीन महिन्यांच्या आत संपवायचे. चौकशी अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभागाचे नसतात. साधारणतः सामान्य प्रशासन विभागामध्ये काम केलेले सह सचिव, उप सचिव दर्जाचे अधिकारी असतात.त सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये काम केलेल्या अधिकाऱ्याची चौकशी सार्वजनिक बांधकाम विभागामध्येच काम करणाऱ्या किंवा निवृत्त अधिकाऱ्यांकडून करण्याचा प्रघात नाही. ती इतर विभागाच्या अधिकाऱ्यांकडूनच होते, त्याप्रमाणेच करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

याला अगोदरच चार वर्षांचा विलंब झालेला आहे. या सर्व अभियंत्यांची नावे, त्यांचे सेवेचे वेगवेगळे टप्पे व चौकशीचा कालबद्ध कार्यक्रम समितीला किती दिवसांमध्ये करण्यात येणार आहे अशी विचारणा समितीने केली असता, सदर माहिती आठ दिवसांमध्ये सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

७ विभागांमध्ये पेंडिंग बिलांचे रजिस्टर मेंटेन केले जात नाही असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, आता संपूर्ण महाराष्ट्रामध्ये संगणकीकरण करण्यात आलेले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

२.१३ परिच्छेद क्र. ३.६ कामाच्या अतिरिक्त बाबींना अनियमित मंजुरी

या परिच्छेदासंदर्भात लमसम कंत्राटमध्ये एक्स्ट्रा आयटम टाकण्यात आला. ४ कोटी ४८ लाख रुपये जास्तीचे द्यावे लागले. याबाबत जे स्पष्टीकरण देण्यात आले त्यामध्ये महालेखापालांचा अभिप्राय असा आहे की, लमसममध्ये हे काम होते. कंत्राटदाराने सांगितले होते की, त्याला सर्व साईडची माहिती आहे. असे असताना नंतर वॉटर लेव्हलची परिस्थिती उद्‌भवली व त्यादृष्टीने एक्स्ट्रा आयटमला मान्यता दिली आहे याबाबत विभागाला आणखी काही खुलासा करायचा आहे काय ? कंत्राट लमसम देण्यामध्ये विभागाचा काय विचार आहे. या प्रकरणात लमसम कंत्राट कशासाठी दिले आहे. बँकवॉटरमुळे पूलाची उंची किती ठेवावी व पेअर्स कोठे घ्यावे. काम करताना असे ठरलेले असते की, पाणी असेल तर काम करायचे, पाण्याची लेव्हल काय राहणार आहे, तेव्हा जास्तीत जास्त लेव्हलपर्यंत पाणी कोठे गेले, किती मीटर उंच गेले, त्याची माहिती असते. हाय लेव्हलपेक्षा पाणी वाढेल काय व पावसाच्या अंदाजानुसार बँकवॉटरचे स्टोअरेज किती असावे. याबाबत जलसंधारण व सार्वजनिक बांधकाम विभागांच्या अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक होते. असे मत समितीने व्यक्त केले असता, पावसाळ्याचा तसा विषय नव्हता. उकाई धरण गुजरातमध्ये आहे, या धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत होते. हेडऑन प्लॅग केला नव्हता. हे तीन ते चार वर्षे झाले नसते तर त्या अगोदर पूल पूर्ण झाला असता. त्यामुळे विभागाला कोणताही एक्स्ट्रा क्लेम द्यावा लागला नसता. गुजरात सरकारने त्या धरणाचे प्लगिंग केल्यामुळे धरणातील पाण्याची लेव्हल सहा मिटरने वाढली. बांधकाम केलेल्या पूलाच्या भिंती पाण्याच्या पातळीच्या खाली जायला लागल्या. काम पूर्ण करायचे असते व वेल फाऊन्डेशनवर लमसम कंत्राट अलॉट झाल्यामुळे तसेच करावे लागले असते. धरणातील पाण्याची पातळी खाली जाऊ देण्यासाठी काही कालावधीत नंतर काम केले असते तर त्या कामासाठी जास्त कालावधी लागला असता व जास्तीचे एस्केलेशन द्यावे लागले असते. या तीन/चार गोष्टींचा विचार करून कॅशऑन पद्धतीचे काम करण्याचा व्यवहार्य पर्याय तेथे स्वीकारण्यात आला व ते काम करण्यात आले. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लमसम टेंडर का काढण्यात आले. यांची माहिती देताना त्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सर्व्हे करण्यात येतो, व डिझाईन ठरविण्यात येते. त्या डिझाईन प्रमाणे काम करायचे असेल तर पूर्वी विभागाकडे बी-१ नावाची पद्धत होती. एमओआरटीएफ विभाग आता ॲडॉप्ट करतो त्यामध्ये स्टॅन्डर्ड बीड एसबीडी अशी पद्धत आहे. पूलांसाठी इनोव्हेटिव्ह डिझाईन वापरण्यात यावे. लॉंग स्पॅन ब्रिजेस व्हावे किंवा ट्रूस्पॅन कन्टीन्युस ब्रिजेस व्हावेत म्हणून विभागाकडून कंत्राटदाराला मुभा देण्यात येते की, त्याने स्वतःचे डिझाईन वापरावे. नाविन्यपूर्ण डिझाईन देऊन विभागाच्या कोटपेक्षा कमी किंवा जास्त कंत्राट द्यावे. अशी ही लमसम पद्धत आहे. पूलांसाठी नॉर्मली विहीर पद्धतीचा पाया घेण्यात येतो. ती पद्धत आतापर्यंत वापरण्यात आली आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

लमसम किमतीमध्ये या कामाचे कंत्राट देण्यात आले तेव्हा सर्व गोष्टी कंत्राटदाराने मान्य केल्या होत्या. महालेखापालांनी असे नमूद केले आहे की, जागेच्या स्थितीनुसार पाण्याच्या प्रवाहात काम केले जाईल. अशा प्रकारचे साक्षांकित घोषणापत्र कंत्राटदाराने देण्याची अट निविदेमध्ये नमूद केली होती. ऑलरेडी ३४.४० कोटी रुपये असताना ४२ कोटी रुपये देयक झाले म्हणजे ऑलरेडी ८ कोटी रुपये जास्त खर्च करण्यात आले होते. त्यांच्या वर ४.४८ कोटी रुपये जास्त देण्यात आले आहेत. ती एस्केलेशन कॉस्ट आहे, परंतु ४ कोटी रुपये हे एक्स्ट्रा आयटमचे काम आहे. ४ पिअर्सची ती एक्स्ट्रा किमत आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, ठाणे खाडी पुलाचे काम कॅशऑन पद्धतीने केले आहे. हा पूल लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. या कंत्राटमध्ये नमूद केले आहे की, सर्व परिस्थितीची विभागास कल्पना आहे. त्याचप्रमाणे कंत्राटामध्ये डिझाईन क्रायटेरिया दिलेला असतो. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने कंत्राटामध्ये किती लेव्हल दर्शविली होती. ८९.२ दर्शविण्यात आली होती काय ? एक्स्ट्रा आयटमच्या कामास मान्यता घेऊन ते करण्यात आले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ८९.२ लेव्हल असल्याची खात्री केलेली आहे, त्यासंदर्भातील ड्राईंग आहे. ते रेकॉर्डवर आहे तांत्रिक मंजुरी देणारे मुख्य अभियंता हे सक्षम प्राधिकारी आहेत त्यांची मंजुरी घेण्यात आली होती. त्यानंतर एक्स्ट्रा आयटम ॲड करण्यात आला. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाकडून तीन पर्याय प्रमाणित करण्यात आले आहेत, तीन पर्यायांपैकी दुसरा पर्याय विभागाने स्वीकारार्ह आहे असे सांगितले असे मत समितीने व्यक्त केले असता, तिसरा पर्याय असा होता की, उकाई धरणातील पाण्याची उंची उन्हाळ्यात म्हणजे एप्रिल-मे मध्ये पूर्ण होईल. तेव्हा त्या दोन महिन्यांच्या काळात काम करणे हा पर्याय होता. या तीन भिंतीचे काम तीन चार वर्षे करण्यात आले असते तर एस्केलेशन कॉस्ट जास्त द्यावी लागली असती. त्यावेळी इस्टीमेटनुसार ५ कोटी ८४ लक्ष रुपये खर्च येणार होता. जर या भिंती सोडून दिल्या व तेथे फाईल पद्धतीने काम केले असते तर ७ कोटी ८६ लक्ष जास्त लागणार होते. त्यामुळे कॅशऑन करून तातडीने भींत पूर्ण करून घेण्याचा पर्याय स्वीकारण्यात आला होता. ७ कोटी रुपयांच्या ऐवजी ४ कोटी ४८ लाख रुपयांमध्ये ते काम करण्यात आले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पिअर्सचे काम वेगळे आहे, ३४ कोटी ४० लाख रुपयांमध्ये काम होणार होते ते काम ४२ कोटी रुपयांपर्यंत गेले आहे. हा वाढीव खर्च कशासाठी केलेला आहे अशी विचारणा समितीने केली असता, तापी नदीवर जे पूल आहे त्यात एक्झीक्युशनमध्ये पायाची उंची आहे, विहीर पद्धतीचा पाया असतो, तो खाली सिंक केला जातो. पायाच्या उंचीमध्ये दगडाच्या रेस्टींगमध्ये नेहमी फरक पडला आहे. तापी नदीवर पाच ते सहा पूल झाले त्या ठिकाणी रॉक लेव्हल बदलल्यामुळे जास्त पैसे लागले आहेत. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

इस्टीमेट करताना ते गृहित का धरण्यात आले नाही ? यापूर्वी अशा पूलांमध्ये एस्केलेशन झाले ते पूल अगोदर झाले होते काय ? जे पूल अगोदर झाले त्यांचा अनुभव या ठिकाणी वापरण्यात आला नाही. या ठिकाणी एस्केलेशन होते याचा विचार करायला पाहिजे होता. असे मत समितीने व्यक्त केले असता, तांत्रिक मान्यता देण्याअगोदर ट्रायलपिट घेण्यात येते. काही पूल या पूलाच्या अगोदर व काही पूल सोबत करण्यात आले आहेत. रॉक लाईनसाठी विभागाकडून ट्रायल बोअर करण्यात येते. एका पूलासाठी ३० मीटर बोअर करण्यात येतात. यानुसार बेस्ट ड्राईंग तयार करण्यात येते. त्या बेस्ट ड्राईंग टेंडरला जोडलेल्या असतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हार्ड रॉक पाच मीटरवर दाखविला आहे व तो दोन मीटरवरच लागला. असे कधी होत नाही काय, तो नेहमी खालीच जातो वर कधी येत नाही. अशी विचारणा समितीने केली असता, वरवडे येथे ब्रीज तयार करण्यात आला होता त्या ठिकाणी २६ मीटर ऐवजी १४ मीटरवर रॉक लागला होता. तेथेच फाऊंडेशन रेस्ट केले आहे. त्यानुसार असेसमेंट करण्यात आले होते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

उकाई धरणाच्या बँक वॉटरमुळे पूलाची उंची वाढवावी लागली असे उंचीचे समर्थन करण्यात येत आहे हे काम गुजरात सरकारने केले. उकाई धरणात पाणी वाढवायचे असेल, साठवायचे असेल तर जिल्हाधिकारी व आयुक्तांनी परवानगी घेतल्याशिवाय त्या धरणाचे गॉर्ज फिलिंग करता येत नाही व उंची देखील वाढविता येत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, प्लगिंग केल्यामुळे पाण्याच्या पातळीमध्ये अचानक वाढ झाली आहे. हे धरण पूर्वी अस्तित्वात आलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

धरण पूर्वी अस्तित्वात असले तरी हा प्रकल्प आंतरराज्यीय असल्यामुळे आंतरराज्यीय पाणी वाटप लवादानुसार त्याचा इफेक्ट महाराष्ट्रावर होतो. यासंदर्भात महाराष्ट्र शासनाला काहीही न कळविता त्यांनी प्लगिंग केले काय? त्याचे पाणी आपोआप वाढले ज्या राज्यांचे पाणी वाढणार त्या राज्यात कळवून त्यांची परवानगी घेतल्याशिवाय त्यांनी काम कसे केले यासंदर्भात काय कारवाई करण्यात आली अशी विचारणा समितीने केली असता, धरणाची उंची वाढविण्यासाठी परवानगी लागते. गळती असलेल्या धरणाचे प्लगिंग करण्यासाठी परवानगी लागत नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

लिकेज हा नंतरचा विषय झाला. लिकेज झाल्यानंतर जे प्लगिंग करण्यात आले व त्यामुळे पाणी वाढले. धरण लिक होणार नाही, परंतु सुरूवातीची वॉटर लेव्हल काय आहे ते विभागाला माहिती असायला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, एलडब्ल्यूएल म्हणजे लो वॉटर लेव्हल असते त्या लेव्हलला पाणी राहिले असते तर त्या खर्चात ते काम पूर्ण झाले असते किंवा थोडीशी किमत वाढली असती. असे विभागीय सचिवांनी विदित केले.

हा लो वॉटर लेव्हलचा विषय नाही, हाईएस्ट वॉटर लेव्हलचा हा विषय आहे. जेव्हा धरणाचे बांधकाम करण्यात येते त्यावेळी ते पुढे मागे लिकेज होईल अशी कन्सेप्ट त्यामध्ये नसते. जास्तीत जास्त वॉटर लेव्हल काय असेल ते विभागाला माहिती असते. त्यानुसार विभागाकडून कार्यवाही करण्यात येते. लिकेज झाले व पाण्याची लेव्हल खाली गेली म्हणून खालच्या लेव्हला कन्स्ट्रक्शन करण्यात येत असेल तर ते बरोबर नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, पूलाच्या बांधकामाबाबत सांगण्यात येत नाही पूलाची उंची या सर्व बाबी विचारात घेऊन एचएफएल वर पूल ठेवण्यात आला आहे. तो पूल उंच केला आहे फाऊन्डेशन कन्स्ट्रक्शनबाबतचा हा प्रश्न आहे. पूलाचा विहीर पद्धतीचा पाया विभागाला करता येत नव्हता तो करण्यासाठी त्याच्या बाजूला कॅशऑन बांधावा लागला, हा अतिरिक्त खर्च आलेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विहीर पद्धतीचा पाया करावा लागेल हे अंदाजपत्रक नंतर विभागाच्या लक्षात आले त्यामुळे खर्च ३४ कोटीवरून ४२ कोटी रुपये झाला. पण ही बाब समिती मान्य करणार नाही. उकाईचे बँक वॉटर असो की, हतनूर धरणाचा प्रश्न असो. ३४ कोटी रुपयांवरून ४२ कोटी रुपये झाले असे नसून ४ कोटी रुपये एक्स्ट्रा खर्च झाले आहेत. हा खर्च त्या कामाचाच आहे, ४ कोटी रुपयांचे पिअर्स एक्स्ट्रा केले आहेत. ३० मीटरचे अंतर कमी करण्यासाठी ते केले आहे. अंतर कमी करण्यासाठी नसून सिस्टममध्ये बदल केला आहे, चार पिलरसाठी हे केले आहे. ३४ कोटीवरून ४२ कोटी रुपये खर्च झाले विहीर पद्धतीची फुटींग करण्यासाठी फाऊडेंशन मोठ्या प्रमाणात घ्यावे लागले त्यासाठी हा निधी लागला आहे. ३४ कोटी रुपयांवरून ४२ कोटी रुपये लागले हा खर्च कशासाठी झाला सविस्तर माहिती समितीने देण्यास सांगितले असता, या पूलासाठी आजपर्यंत ४६.०८ कोटी रुपये खर्च झालेला आहे. त्याचे विगतवारी अशी आहे की, पूलासाठी झालेला खर्च ३४.४० कोटी रुपयांमध्ये मुख्य बांधकाम करण्यात आले आहे, ते लमसम मध्ये कंत्राट देण्यात आले होते. ४ वर्षे काम सुरू होते टेंडर क्लॉजनुसार जे प्राईज व्हेरिएशन देण्यात येते ते ७ कोटी २० लक्ष रुपयांचे आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मुख्य पुलाच्या उंचीचा प्रश्न सुरू नसून विहीर पद्धतीचे फाऊंडेशन केले त्याचा खर्च वाढला आहे, असा मुख्य मुद्दा आहे. यावर विभागाचे उत्तर असे आहे की, उकाई धरणात पूर्वी प्लगिंग केलेले नसल्यामुळे बँकवॉटरची लेव्हल कमी होती. मिनटाईम प्लगिंग केल्यामुळे व वॉटर लेव्हल वाढल्यामुळे विभागाकडील फाऊंडेशनच्या कामाची सिस्टीम बदलावी लागली. हा मुद्दा आहे. विभागाकडून धरणाच्या बँक वॉटरच्या संदर्भात एखाद्या पुलाचे बांधकाम करण्यात येते त्यावेळी, प्लगिंग नसल्यामुळे वॉटर लेव्हल कमी होते व प्लगिंग झाल्यामुळे वॉटर लेव्हल वाढली. ठिसूळ पद्धतीवर विभाग पूलाचे फाऊंडेशन करीत असेल तर यामध्ये भ्रष्टाचार झाला काय, अनियमितता झाली काय हा मुद्दा नाही. विभागीय प्रतिनिधी इतिवृत्तावरून ही माहिती घेत आहेत की, वेगळा अभ्यास करतात. संबंधितांकडून काही अहवाल मागविण्यात येतात काय, यासंदर्भात काही वेगळी यंत्रणा आहे काय, त्यांनी विभागाला सांगितले वॉटर लेव्हल एवढी असते म्हणून विभागाने या पद्धतीने काम केले. त्यांनी मिनटाईम प्लगिंग केले व प्लगिंग पूर्ण केल्यावर त्या धरणाची मूलभूत क्षमता म्हणजे उंची वाढविण्याअगोदरची क्षमता लक्षात घेऊन बांधकाम करावे लागेल. असा काही अहवाल दिला होता काय? तसेच समजा गुजरातने धरणाचे प्लगिंग केले नसते व ते धरण लिकेज झाले नसते तर विभागाने पूलाचे फाऊडेंशनची डिझाईन तीच ठेवली असती. नंतर पाच वर्षांनंतर अशी परिस्थिती झाली असती की, धरण लिकेज होते म्हणून प्लगिंग करावे, त्यानंतर विभागाला काय करता आले असते. तापी नदीवर असे तीन ते चार ब्रीज केले त्याचा अनुभव विभागाला होता की, त्या पाण्याची पातळी कधीही वाढू शकते. त्यामुळे त्याचा समावेश इस्टीमेट मध्ये का केला नाही? अशी विचारणा समितीने केलेली असता, यामध्ये दोन प्रकार आहेत, एक पायलिंग पद्धतीने फाऊडेंशन करणे. ही पद्धत स्वीकारली तर कोणत्याही पाण्याच्या लेव्हलमध्ये फाऊंडेशनमध्ये विशेष बदल करावा लागत नाही. परंतु महाराष्ट्रात त्यावेळी जी प्रिव्हेलंट डिझाईन होती ते सर्व पूल विहीर पद्धतीच्या पायावर करण्यात आले. त्यावेळी दीड मीटर जाडीच्या पायलिंग रिंग देशात दोन किंवा तीन उपलब्ध होत्या. त्यामुळे कोटेशन खूप हाय येत होते. ही वस्तुस्थिती आहे. आता पायलिंग रिंग मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे येणारे कोटेशन कंम्पेरेबल किंवा रेटच्या हिशोबाने कमी आहेत. त्यावेळी पायलिंग रिंग नव्हत्या ही वस्तुस्थिती आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

समितीला मूळ प्रश्नांचे तांत्रिक उत्तर अपेक्षित आहे? धरणाचे प्लगिंग झाले आहे असे गृहित धरून वॉटर लेव्हल काढली काय ? विभागाची लाईन ऑफ थिंकिंग काय आहे? आहे त्या पद्धतीने केले असते, त्यानंतर प्लगिंग झाले असते व वॉटर लेव्हल वाढली असती. अशा वेळी त्या पुलाचे काय झाले असते. एखादा भयंकर प्रकार झाला असता असे मत समितीने व्यक्त केले असता, पाण्याची पातळी

वाढली असती व जो पूल बांधला तो वेगळा झाला असता. हे तसे नाही, विभागाकडून लोएस्ट वॉटर लेव्हलची पाहणी करण्यात येते व दोन वर्षे असेच राहिले असते तर याच रेटनुसार तो पूल बांधता आला असता. पूलाच्या उंचीमध्ये कोणताही बदल नाही. पूलाच्या कन्स्ट्रक्शनमध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता नव्हती व तो पूल बांधून झाला असता. पूलाचे काम सुरू असताना प्लगिंग झाले व पूलाचे काम सुरू असताना पाण्याची पातळी वाढली, म्हणून फाऊंडेशनमध्ये बदल करावा लागला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

पूल बांधून झाल्यावर पाण्याची पातळी वाढली असती आणि एक वर्षानंतर धरणाचे प्लगिंग झाले असते व पाण्याची पातळी वाढली असती तर ब्रिजच्या स्ट्रक्चरला काही प्रॉब्लेम झाला असता काय? अशी विचारणा समितीने केली असता, ब्रिजच्या स्ट्रक्चरला काहीही प्रॉब्लेम झाला नसता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

The problem was to construct the foundation only. त्यासाठी विभागाला डिझाईन बदलावी लागली व वेगळी व्यवस्था करावी लागली.

यामध्ये कंत्राटदाराने दोन पत्रे दिली आहेत. त्यातील एका पत्रात असे म्हटले आहे की, "The location of the subject bridge is such that the whole of the work is to be executed in the standing water condition". म्हणून ते निगोशिएशनमध्ये कोणत्याही रकमा कमी करु शकत नाही. त्यानंतर कंत्राटदार डिक्लेरेशन ऑफ कॉन्ट्रॅक्टमध्ये असे म्हणतात की, "The influence of the backwater due to Ukai Dam on the downside of the proposed site and the various discharge through the Hatnur Dam and various barrages on the underside of this water have also been studied and I/ We fully aware of the fact that I/We may have to work in standing water". या सर्व बाबी कंत्राटदार डिक्लेरेशनमध्ये कबूल करीत आहे म्हणजे त्यांना या सर्व गोष्टी माहिती होत्या. त्यानंतर विभाग त्या कंत्राटदाराची बाजू कशाला घेतो त्यांच्या डिक्लेरेशनचा अर्थ काय आहे. महालेखापालांचे ही तेच मत आहे. त्यामुळे विभागाचे म्हणणे समर्थनीय ठरत नाही. विभागाने अतिरिक्त साहित्यासाठी सन १९९९ च्या आधारावर जेव्हा कंत्राटदाराला परवानगी दिली आहे त्या बाबतीत त्याला सर्व स्थिती माहिती असताना विभाग त्यास वाढीव निधी कसा देतो याचा खुलासा करावा असे समितीने सूचित केले असता, याचे लॉजिक असे आहे की डिक्लेरेशन एखाद्या कंत्राटाचा पार्ट आहे त्या प्रकरणी कंत्राटामध्ये ज्याच्या बेसिसवर डिझाईन केले जाते त्यासाठी डिझाईन क्रायटेरिया दिला जातो. त्याला सपोर्टींग विभागाचे ड्राईंग दिले असते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने हे कंत्राट लमसम दिले आहे. डिझाईन कोणी केले होते. हे कंत्राट लमसम दिले असल्यामुळे design is not made by the Government. ही डिझाईन कंत्राटदाराने तयार केली आणि कंत्राटदारानेच सर्व केले असताना सरकार त्याची बाजू कशाला घेत आहे. हा विषय अतिशय गंभीर असल्यामुळे याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे असे मत व्यक्त करून त्या धरणाच्या उंचीची ८९ मीटरची मर्यादा शासनाने ठरवून दिली होती काय ? ही मर्यादा कशाच्या आधारे दिली होती अशी विचारणा समितीने केली असता, ही मर्यादा शासनाने ठरवून दिली होती. विभागाने यासंबंधी जो सर्व्हे केला होता त्या सर्व्हेच्या आधारे ही मर्यादा दिली होती. एकूण ३० वर्षाच्या पाण्याच्या पातळयांचा विचार करण्यात आला होता आणि त्याच्या आधारे हे ड्राईंग विभागाने त्यांना दिले होते. कामाच्या वेळी त्याची उंची ९६ मीटर इतकी झाली आहे. ८९ मीटर वरून ९६ मीटर उंची झाली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अशी परिस्थिती बदलत असेल तर त्या पूलाच्या कामास विलंब झाला असता, त्यांनी त्याचे समर्थन केले आहे. शासनाने जे ८९ मीटरची मर्यादा घालून दिली होती व त्यास कंत्राटदाराने होकार दिला. परिस्थिती बदलल्यानंतर ती उंची ९६ मीटर झाली आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

३० वर्षांची पाण्याची पातळी विचारात घेऊन त्याला ८९ मीटर उंची ठरवून दिली आहे. त्यानंतर ती उंची ९६ मीटर झाली आहे. असे असते तर कंत्राटदाराने तेव्हाच काम बंद करून टाकले असते. आता तो पूल सुरू झाला आहे आणि त्यामध्ये कंत्राटदाराने जे स्पष्टीकरण दिले आहे त्याचा उपयोग काय ? विभाग कंत्राटदाराकडून लमसममध्ये काम करून घेतो, त्यानंतर त्याला ज्यादाचे काम दिले जाते आणि त्याच्याकडून स्पष्टीकरण करून घेतले जाते आणि त्यानंतर त्याला अधिकच्या रकमा दिल्या जातात असे मत समितीने व्यक्त केले असता, आपण जर असेच थांबून राहिलो असतो आणि या डिक्लेरेशनच्या आधारे काम करावे आणि ३-४ वर्षांनंतर जेव्हा केव्हा पाण्याची लेवल कमी होईल त्यानंतर हे डिक्लेरेशन केले असते तर विभागाला विनाकारण एक्सकेलेशनचा अधिकचा खर्च द्यावा लागला असता, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पाण्याची लेवल कमी असताना काम करण्याचा प्रश्न यासाठी उद्‌भवत नाही की त्यांनी स्पष्टता सांगितली आहे की याबद्दल त्यांना जाणिव आहे. कंत्राटदाराला त्याला माहिती आहे की धरणाचे पाणी मागे येणार आहे, बॅरेजचे पाणी येणार आहे वगैरे या सर्व गोष्टी लिहून दिल्या आहेत की त्याला या सर्व बाबींची जाणीव आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, कंत्राटामधील सर्व पाने वाचायची असतात.तविभागाने दिलेला डिझाईन क्रायटेरिया, दिलेल्या ड्रॉईंग्स आणि त्यावरच्या लेवल्स वाचल्या पाहिजेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

या लम्पसम कंत्राटाच्या आधारावर कंत्राटदाराने जे घोषणापत्र दिले आहे ते घोषणापत्र न घेता आपल्याला त्याच्याकडून हे एक्ट्रा आयटेमचे काम करून घेता आले असते काय ? अशी समितीने विचारणा केली असता, त्या लेवलला येऊन काम करता आले असते. त्यासाठी खूप कालावधी थांबावे लागले असते आणि त्यासाठी त्याला एक्सकेलेशनची किमत ज्यादा द्यावी लागली असती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्या लेवलला पाणी येऊन थांबताना पुलाची उंची वाढली नाही तर पाण्याची उंची वाढली आहे. पण त्यामध्ये डिझाईन बदलले आहे. पाण्याची उंची वाढल्यामुळे त्यांना अप्रोच ब्रिज बांधावा लागला आहे. विभागाच्या पर्याय क्रमांक २ प्रमाणे काय केले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, ते काम आफ्टर थॉट केलेले नाही तर त्यावेळीच हा विचार करण्यात आला आहे. This is not an after-thought. म्हणजे जेव्हा परिस्थिती निर्माण झाली तेव्हा हा विचार केला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

करारनाम्यानुसार विभागाला हे अपेक्षित असताना सुद्धा व तो कंत्राटदार ते काम करेल असे त्याने मान्य केले असताना विभाग त्याला एक्सकेलेशनची किमत का देतो? महालेखापालांचादेखील आक्षेप आहे की, कंत्राटदाराने घोषणापत्र दिल्यानंतर त्याला एक्सकेलेशनची किमत का देण्यात येत आहे? समिती विभागाच्या या उत्तराशी समाधानी नाही. कंत्राटदार घोषणपत्रामध्ये लिहून देत आहे की हे अधिकचे काम करणे अपेक्षित आहे, तर त्याला विभागाने एक्ट्रा आयटेमचे पैसे का द्यावेत. विभागाने घोषणापत्रामध्ये त्याने म्हटले आहे की तो या बाबींचे दर कमी अशासाठी करीत नाही की मला या सर्व बाबी करून काम ठोसपणे पूर्ण करायचे आहे. महालेखापालांचे सुद्धा तेच म्हणणे आहे आणि तोच आक्षेप आहे की ८९ मीटर उंची गृहीत धरली होती. मात्र त्यामध्ये वाढ झाली त्यामुळे त्याला असे काम करण्यास परवानगी दिली आहे. उत्तरामध्ये विभागाचे म्हणणे असे आहे की त्याने हे विभागाची परवानगी घेऊन केले आहे परस्पर केलेले नाही. मात्र समितीचे आणि महालेखापालांचे यांचे असे म्हणणे आहे की त्याने हे काम लम्प-सम म्हणून एक्स्ट्रा साहित्याच्या खर्चाचे पैसे न देता त्याने त्याच घोषणापत्रांच्या अंतर्गत हे काम केले असते काय ? अशी विचारणा केली असता, कोणत्याही लमसम कंत्राटामध्ये असलेले मेकॅनिझम समितीने समजून घेतले पाहिजेत. लम्पसम कंत्राटामध्ये डिझाईन क्रायटेरिया, त्यासोबत जोडलेले ड्रॉईंग आणि सोबतची इतर माहिती तसेच निरनिराळ्या कंत्राटदारांसमवेत झालेली निविदापूर्व बैठक आणि त्या निविदापूर्व बैठकीमध्ये संमत केलेले मुद्दे यांचा विचार केला जातो. विशेषत्त्वाने या कंत्राटाच्या निविदापूर्व बैठकीमध्ये या लेवलचा मुद्दा विचारण्यात आला होता की या लेवलचे किती प्रमाणात व्हेरिएशन होऊ शकते. त्यावर त्यावेळी तत्कालीन मुख्य अभियंता यांच्याकडून त्या परिस्थितीमध्ये ३० सें.मी.पर्यंत व्हेरिएशन होऊ शकते असे मान्य करण्यात येऊन तत्कालीन सी.एस.डी.मध्ये नोंद करण्यात आली की ८९.२ मीटरच्या उंचीमध्ये डिझाईन ड्रॉईंगमध्ये इतकी उंची कमी जास्त झाली तर विभाग कोणताही क्लेम मान्य करणार नाही असे प्री-बिड बैठकीमध्ये इतिवृत्त आहे आणि त्याची प्रत समितीला देण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

लम्प-सम ड्रॉईंग विभागाने तयार केले असेल तर त्यानंतर त्याच्या ड्राईंगमध्ये काय डिटेल्स आहेत ते विभाग स्वीकारतो असे आहे काय ? त्यांना काम करताना ज्या अडचणी आल्या त्या विभाग सादर करतो. पण लम्पसम कंत्राट कशाला म्हटले जाते. एक तर लम्पसम कंत्राटाची व्याख्या काय आहे? विभागाला जर लम्पसममध्ये अशा अटी टाकायच्या असतील तर मग त्याला लम्पसम कसे म्हणायचे? यामध्ये सुरूवातीलाच सांगितले की विभागाला हे काम लम्पसममध्ये करायचे आहे. लम्पसम कशाला म्हणायचे तर जेथे कामाचे स्वरूप निश्चित नाही ही विभागाची परंपरा आहे. जेथे कामाचे स्वरूप निश्चित नसते तेथे ऑलरेडी प्राईस एक्सकेलेटेडच असते. कामाचे स्वरूप निश्चित असते तर हा ३४ कोटींचा प्रकल्प १४ किंवा २० कोटींमध्ये अथवा २२ कोटींमध्ये झाला असता. हे काम विभागाने लम्पसम अशा प्रकारे का केले तर ते वेगळ्या प्रकारचे असून त्यामध्ये अनियमितता आहे. पाण्याच्या लेवलची अनिश्चितता आहे. बँक वॉटर ठरलेले नाही. त्यामुळे अडचणी निर्माण होणार आहेत. त्यामुळे हा प्रकल्प लम्पसममध्ये घेतला आहे आणि लम्प-समच्या कामाची किमत ऑलरेडी एक्सकेलेटेड असते असे मत समितीने व्यक्त केले असता, पुलाचे जेथे विहीर पद्धतीचे पाये केले आहेत आणि ज्या पद्धतीचे पुलाचे फाऊंडेशन लेवल आणि ज्या ठिकाणी रॉकची अनिश्चितता असते त्या ठिकाणी विभागांकडून लम्पसम टेंडर्स काढण्यात येतात. अशा पद्धतीच्या प्रकरणांमध्ये विभागाकडून आतापर्यंत लम्पसम टेंडर्स काढण्यात आली आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

याबाबत शासनाचे धोरण आहे किंवा कसे ? लम्प-सम कंत्राटामध्ये अटी व शर्ती असतात काय याबद्दलची व्याख्या काय आहे. अमुक कमी झाले तर तमुक करावे लागेल. एक्सकेलेशन झाले तर अमुक खर्च मिळेल अशा जर अटी असतील तर त्याला लम्पसम कसे म्हणणे शक्य आहे. विभागाने सांगितलेली माहिती तांत्रिक आहे. एका बाजूला लम्प-सम मान्य करायचे आणि दुसऱ्या बाजूला अटी व शर्ती मान्य करायच्या या दोन बाबी एकत्रित कशा येऊ शकतील असे मत समितीने व्यक्त केले असता, लम्पसम कंत्राट देताना खरे आहे की डिझाईनची जबाबदारी विभागाकडून संबंधित कंत्राटदाराला देण्यात येते. त्याशिवाय त्याने डिझाईननुसार त्यांनी त्यांचे रेट कोट करावे असे त्यांना सांगण्यात येते. परंतु लम्पसम कंत्राट करीत असताना विभाग असे सीएसडी इश्यू करीत नाही की कॉमन सेट ऑफ डिव्हीएशनमध्ये जर असे डिव्हीएशन होत असेल तर विभाग मान्य करणार आणि हे होत नसेल तर विभाग मान्य करणार नाही वगैरे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या प्रकरणी ३० सें.मी. पर्यंत मान्य केले असल्याचे इतिवृत्तामध्ये म्हटले आहे ना असे समितीने निदर्शनास आणले असता, या केसमध्ये डिव्हीएशन होत असल्याचे विभागाने मान्य केले आहे. Normally, I would not call for a contract of that kind. I normally dont subscribe to a contract which will be of this kind where there is a lumpsum..... contract असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने जीआर काढला आहे की ब्रिज तेव्हाच करण्यात येतील जेव्हा जागा मिळेल.ल त्याप्रमाणे हे कंत्राट सुद्धा चुकीचे आहे आणि ज्याप्रमाणे विभागाने सीएसडीमध्ये तसे ते करावे अशी अपेक्षा आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, आता कंत्राटांची पद्धत बदलली आहे. आता विभागाकडून अशा प्रकारची कंत्राटे काढण्यात येत नाहीत. आता विभागाने स्टॅन्डर्ड बिड डॉक्युमेंट्स जे एमओआरटीएफने तयार केले आहेत त्याचे काटेकोरपणे पालन करून टेंडर्स काढण्याचा निर्णय दिला आहे. त्याशिवाय अगोदर जे बी वन टेंडर्स होते तेही बंद केले असून त्याला आता असे म्हटले आहे की आयटेमवाईज कार्यकारी अभियंता यांनी पृथक्करण करून सही करून पाठवावे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने जेव्हा हे लम्पसम कंत्राटाचे अंदाजपत्रक तयार केले तेव्हा ते जर सीएसआरनुसार केले असते तर त्यापेक्षा हे किती जास्त अशी समितीने विचारणा केली असता, डिझाईनच्या बाबतीत विभागाने कंत्राटदाराला सांगितले होते की त्याला अमुक या अटीवर काम करायचे आहे. उदाहरण म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या समुद्रातील पुतळ्यासंबंधी टेंडर काढताना त्या कंत्राटदाराला सांकेतिक स्वरूपात रक्कम सांगितली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

स्मारकाची रक्कम दोन हजार कोटी आहे किंवा तीन हजार कोटी आहे असे ठरविले असेल ना? अशी विचारणा समितीने केली असता, अशी रक्कम ठरविणे शक्य नाही. कारण त्यामध्ये इन्व्हेस्टीगेशन सुद्धा त्या कंत्राटदारालाच करावे लागते. प्रत्येक बिडर त्यांच्या इन्व्हेस्टीगेशननुसार ते देतो. विभाग फक्त पुलाची उंची किती असावी याबाबत सूचना देऊ शकतो असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जर त्या कंत्राटदाराने २०० कोटींच्या जागेवर २००० कोटी रुपयांची मागणी केली तर विभाग ती रक्कम देणार आहे काय? या समितीच्या विचारणेबाबत त्यामध्ये कॉम्पिटेटीव्ह रेट जर २००० कोटी रुपये इतका असेल तर शासन ते अमान्य करण्याचा निर्णय घेऊ शकते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

पण विभाग तो निर्णय कोणत्या आधारावर घेणार आहे, कारण विभागाकडे सुद्धा ते अमान्य करण्यासाठी काही तरी अंदाजपत्रक असले पाहिजे. विभागाकडे कोणताही अंदाजपत्रक असल्याशिवाय you cannot accept, you cannot reject. असे मत समितीने व्यक्त केले असता, I agree with you, Sir. But, it was only an estimate असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाकडून जे एक्सलेशन देण्यात येत आहे त्यामध्ये कुठेही टक्केवारी नमूद नाही. एकूण अंदाजित रक्कम अमुक इतकी असल्यानंतर अमुक इतक्या रकमेपर्यंतच एक्सकेलेशन देणे शक्य आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, आता टेंडरच्या डॉक्युमेंटमधून एस्केलेशन क्लॉज काढून टाकण्यात आला आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाकडून संपूर्ण राज्यामध्ये बीओटीचे रस्ते बांधण्यात येतात. त्यांच्या बाबतीत तो कंत्राटदार स्वतः डिझाईन करतो.ो एखाद्या ठिकाणी जमीन खचली तर ते व्यवस्थित करण्याचे काम तोच कंत्राटदार करतो. त्यासाठी विभाग त्याच्या टोलचा कालावधी वाढवून देत नाही. एखादा पूर आला आणि त्यामुळे जर एखादा रस्ता वाहून गेला असेल तर त्याच्या बांधकामासाठी विभाग त्या कंत्राटदाराला विशेष निधी म्हणून पैसे देतो काय? अशी विचारणा समितीने केली असता, त्यामध्ये जर फोर्स मेजर असेल तरच अशा रकमा देण्यात येतात अन्यथा देत नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ज्यावेळी एखादे कंत्राट लम्पसम देण्यात येते त्यावेळी विभाग त्याची अंदाजित रक्कम काढत नाही काय? त्या प्रकल्पाचे डिझाईन तयार करण्याचे काम त्या कंत्राटदाराला देण्यात आले त्या प्रकल्पाची लम्पसम कॉस्ट किती होती, त्यानंतर त्याची आणखी किमत किती वाढली. जी विभागाला लम्पसम कंत्राट काढण्याची गरज काय होती? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकल्पाची किमत अंदाजित ३१.३९ कोटी इतकी होती आणि ऑफर आली होती ३४.४० कोटी रुपये होती हा विषय २००८-०९ चा असून जूना विषय आहे. विभागाकडून ईपीसीचे कंत्राट आताही काढण्यात येते. कंत्राटदारातील इंजिनिअरिंग करावे, त्यांनीच प्रोक्युरमेंट करावे आणि त्यांनीच कन्स्ट्रक्शन करावे आणि त्यासाठी केंद्र शासनाने एक ईपीसीचे मॉडेल डॉक्युमेंट तयार केले आहे. त्या मॉडेल डॉक्युमेंटमध्ये सर्व गोष्टी अंतर्भूत आहेत की त्यांनी आयटमवाईज हे सर्व रेट द्यावेत वगैरे. त्या आयटमनिहाय दर पहाणे शक्य झाले तर तो आयटम त्या दराप्रमाणे आहे की नाही याची पडताळणी करता येते त्या आयटमचा दर देकाराप्रमाणे आहे किंवा नाही. कंत्राटदाराने जर त्या आयटमनिहाय दिलेली क्वॉन्टीटी प्रॅक्टीकल वाटत नसेल तर त्याला त्याबाबत विचारणा करणे शक्य आहे की हे साहित्य योग्य नाही किंवा वेगळे आहे वगैरे. परंतु ईपीसी कंत्राटाची पद्धत अशी आहे की त्यांनी क्वॉन्टीटी ठरवावी, डिझाईन द्यावे आणि आयटेमचे दर द्यावेत. आयटेमचे दर विभागाकडून डीएसआरशी पडताळणी करणे शक्य आहे. हे ईपीसी कंत्राटाबद्दलचे डेफिनेशन आहे असे केंद्र शासनाने सर्वांना ईपीसी हे मॉडेल डॉक्युमेंट सर्वांना वितरित केले आहे. आता त्याचे विभागाने काटेकोरपणे पालन करायचे आहे. विभागीय सचिवांनी अवगत केले.

लम्पसम कंत्राट बंद करण्याची कारणे सांगताना त्यावेळी म्हणजे २००७-०८ मध्ये विभागाकडे कोणत्या प्रकारची कंत्राटे काढावीत. याबाबतत इतक्या मोठ्या प्रमाणातील डॉक्युमेंट्स किंवा तत्सम अनुभव वगैरे नव्हता की विभागाकडे इंजिनिअरिंग स्कील असताना सुद्धा कॉन्ट्रॅक्टींग स्कील नाही. कारण contracting is a separate legal exercise असते. आता अमुक बाबी का केल्या नाहीत तर या बाबी कॉन्ट्रॅक्टींग कॅपॅबिलीटीच्या आहेत. यामध्ये केंद्र शासनाने वेळोवेळी बदल केला आहे. उदाहरण म्हणून बीओटीची जी कन्सीशन ॲग्रीमेंट आहेत त्या बाबतीत जर एखाद्या ठिकाणी पूर आला असेल किंवा पावसामुळे रस्ता खराब झाला असला तरी विभागाकडून टोल बंद करण्यात येत नाही. टोल सुरू ठेवण्यात येतो. मूळात रस्त्याची क्वॉलीटी किमान दर्जाची नसेल तोपर्यंत विभाग त्यावर टोल वसूल करीत नाही आणि तसे करणे नियमात सुद्धा बसत नाही. परंतु विभाग कधीही टोल बंद करीत नाही. कारण एकदा टोल बंद केला तर तो पुन्हा कधीही सुरू करता येत नाही. त्यामुळे जेव्हा पाऊस पडतो आणि रस्त्यावर खड्डे पडतात तरी सुद्धा विभाग टोल बंद करीत नाही. परदेशामध्ये तसे अपेक्षित नाही. महाराष्ट्रात सुद्धा लम्प-सम कंत्राटामध्ये जर सीएसडी कॉमन सेटअप डिव्हीएशन टाकले तर विभागाकडून त्याबाबत सर्वांनाच कळविण्यात येते व तर ते डिव्हीएशन आपल्याला नंतर मान्य करावे लागते.

त्याचप्रमाणे एक्सकेलेशनचा मुद्दा विभागाने आता काढून टाकला आहे. व्हेरीएशनमध्ये सुद्धा ५ टक्क्यांपेक्षा अधिक व्हेरीएशन मान्य नाही.ी एक्सकेलेशन आता सीमेंट, स्टील आणि बिटूमीनवर आहे. त्याला स्टार रेट दिला आहे. इतर कोणत्याही कामासाठी एक्सकेलेशन मिळणार नाही असे विभागाने टेंडरमध्ये आता उल्लेखित केले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

एक्स्ट्रा फाऊंडेशनमध्ये पाण्याची पातळी वाढल्यामुळे ४ कोटी रुपयांचे काम अधिकचे करावे लागले आहे. त्यामध्ये दोन मुद्दे आहेत. एक म्हणजे ४ कोटी रुपये अधिकचा खर्च करावा लागला आहे. ७.८० कोटी रुपये प्राईज एक्सकेलेशनसाठी लागले आहेत. मात्र त्या करारामध्ये प्राईज एक्सकेलेशनचा क्लॉज होता काय? हे काम स्टॅन्डर्डनुसार केले की लम्प-सम करार करून केले आहे. विभागाने जे ७.८० कोटी रुपये दिले आहेत ते प्राईज एक्सकेलेशनचे दिले आहेत. असे समितीने निदर्शनास आणले असता, ते काम स्टॅन्डर्डमध्ये आहे. Price variation as per standard clause which is there in the tender असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लम्प-समचे विभागाने जे ३१ कोटी रुपये ठरविले आहेत.त ते ठरविताना विभागाकडे कामाचा अंदाज नसताना आणि कोणती डिझाईन होणार आहे हे माहिती नसताना आणि काय होईल याची कल्पना नसताना ३१ कोटी रुपये कसे ठरविले आहेत ? मग विभागाने करारनामा लम्प-सम कशाला केला? विभागाने कंत्राटदाराला डिझाईन दिली काय की अमुक डिझाईनप्रमाणे हे काम करावे. निविदा अटीमध्ये शासनाच्या अमुक डिझाईनप्रमाणे पूल बांधावा असे कंत्राटदाराला दिले आहे काय? पुलाची उंची सोडून रुंदी आणि लांबी बांधण्याचे डिझाईन दिले आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, कोणत्याही पुलाचे विभागाकडून इन्व्हेस्टीगेशन करण्यात येते त्यानुसार, जर कंत्राटदार मिळाला नाही आणि त्या ठिकाणी पूल बांधण्याचे ठरविले तर विभागाकडे कोणते तरी डिझाईन असायलाच हवे कंत्राटदाराला तसे डिझाईन दिले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मग पायलिंगची साईज कशी हवी आहे हे विभागाने कंत्राटदाराला का दिले नाही? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडून त्या लम्प-सम कंत्राटामध्ये त्या कंत्राटदाराला स्वतःचा अल्टरनेटीव्ह करायला सांगण्यात आले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ही खर्चाची वाढ लम्प-सम टेंडरिंगमध्ये प्राईज एक्सकेलेशन ब्रिजच्या किमतीमध्ये लागू शकते. खालच्या डिझाईनच विभागाकडे नव्हत्या. कंत्राटदार त्या डिझाईन करणार होता. त्याला लम्प-सम कंत्राट म्हटल्यानंतर काय होणार. शासनाने लमसम चे धोरण केव्हापासून स्विकारले आहे? त्याचे स्वतंत्र असे नियम तयार करण्यात आले आहेत काय? How can it be done without approval of Government ? Lumpsum contract is a policymatter, who has approved this and what are the criteria of tender? लमसमचे विषय वेगळे असतील परंतु रेग्युलर कॉन्ट्रॅक्टचे निकष लमसमला लागू होत नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यामध्ये प्राईस व्हेरिएशन क्लॉज आहे. त्यानुसार जी भाववाढ होते ती त्याला अदा केलेली आहे. जेथे जेथे विभागाला कॉम्प्लेक्स स्ट्रक्चर उभे करायचे असेल त्यासाठी डिझाईन तयार करावी लागते. Lumpsmum Contract This form is approved by the Government.

हा कॉन्ट्रॅक्ट लमसम होता. शासनाने लमसमची रक्कम ३१ कोटी रुपये निश्चित केलेली आहे. त्यानंतर ३४ कोटी रुपयांचा करारनामा विभागाने मान्य केला. विभागाने ४४ कोटी रुपये कंत्राटदारास अंतिमतः अदा केलेले आहेत. या लमसम मध्ये दोन्ही गोष्टी धरल्या पाहिजेत. काही ठिकाणी कॉस्ट वाढेल तर काही ठिकाणी कमी होईल. इमारतीची हाईट वाढली तर त्यामुळे निश्चितच ठेकेदाराचे नुकसान होईल. विभागाकडून असे काही ॲटम चेक करण्यात आलेत का की जी क्वॉटिटी कोड केली होती, त्यापेक्षा हे काम कमी झालेले आहे. विभागाने वाढलेलीच रक्कम अदा केली, परंतु जी रक्कम कमी झाली त्याचा हिशोब केला का? अशी विचारणा समितीने केली असता, कंत्राटामध्ये एक्सेस किंवा सेव्हींग रिबेक्टचा क्लॉज असतो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

एखादी बाब वाढली तर त्याला एस्कलेशन प्राईस देण्यात येते. अशा काही बाबी असतील की ज्यामध्ये लमसमच्या टेंडरपेक्षा त्याला खर्च कमी आला असेल तर ती रक्कम वजा केली का? रक्कम कमीच झाली नाही का? अशी विचारणा समितीने केली असता, असे झालेले नाही. रक्कम कमी झालेली नसून वाढतच गेलेली आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

समितीने इतिवृत्ताची प्रत देण्याबाबत सूचित केले तसेच क्लॉज ३१ मध्ये एक्स्ट्रॉ ॲटमचा विषय आहे. एक्स्ट्रॉ ॲटम विशेष परिस्थितीमध्ये करावा लागला, परंतु तो क्लॉज यामध्ये नव्हता. लमसमची कॉन्ट्रॅक्टची जी नियमावली तयार झालेली आहे ती समितीला सादर करावी. असेही समितीने सूचित केले. महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून सिडकोकडून डिझाईन करून अप्रूव्ह घेतली जाते. त्यावेळेस सिडकोने यांचे डिझाईन ॲप्रूव्ह केले होते का? महाराष्ट्र शासनाच्या डिझाईन सेक्शनपेक्षा सिडकोचे सेक्शन मोठे आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, लमसम मध्ये कंत्राटदाराकडून जी डिझाईन तयार करण्यात येते त्याचे ॲप्रुफ कन्स्लटंट किंवा डिझाईन सर्कल ॲप्रूव्ह करीत असते. हे ड्राईंग डिझाईन सर्कलने ॲप्रूव्ह केलेले आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

लमसम कॉन्ट्रॅक्टची नियमावली मागवून घ्यावी आणि समितीला सादर करावी असे समितीने सूचित केले यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

यापरिच्छेदांबाबत लम्पसम कंत्राटाची नियमावली दिलेली आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता मुख्य अभियंता यांनी ते मंजुर केले आहे काय असा प्रश्न समितीने विचारले होता. त्याबाबत नंदूरबार जिल्ह्यातील हातोडा ब्रिजच्या संदर्भात मुख्य अभियंत्याचे पत्र आणलेले आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले. (विवरणपत्र क्र.३)

बैठकीच्या इतिवृत्तामध्ये कुठे लिहिले आहे. समितीने लम्पसम निविदेची माहिती मागितली होती. त्याचे ४० सेट आणलेले आहेत ते समितीला सादर करण्यात आले. मुख्य अभियंत्यांनी मंजुर केल्याचे पत्र आणलेले आहे. प्री.बीडमध्ये हे सर्व स्पष्ट झाले होते काय, त्याचा खुलासा पृष्ठ क्रमांक २०४ वर प्री बीडमध्ये १९ क्रमांकाचा मुद्दा आहे. "L.W.L. shown in the GAD is at R.L. 89.20 any increase in L.W.L. during construction shall be treated for extra standing water level may be given". व्हेरिएशन दिलेले आहे.

मुख्य अभियंता, नाशिक यांनी हे सर्व प्रकरण तपासले होते. त्यांनी मंजुरी दिलेली आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

२.१४ परिच्छेद क्र ३.७ आकस्मिक कामांसाठीची तरतूद अनधिकृतपणे वळविणे

सदर परिच्छेदावरील चर्चेच्या वेळी समितीने विभागीय प्रतिनिधींच्या निदर्शनास आणले की असे सन २०१३ मध्ये लोकलेखा समितीने शिफारस केली होती की, ज्या कामांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद केली गेली नसेल किंवा ज्या क्रमांना राज्य विधानमंडळाची मान्यता प्राप्त झाली नसेल त्यावरील कोणताही खर्च मंजुर केला जाऊ नये. तरी सुद्धा विभागाने त्याप्रमाणे अंमलबजावणी केलेली नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, महाड शहरात पुराचे पाणी भरते. त्यावेळी अर्ध्या इमारती पाण्यात बुडत होत्या म्हणून कार्यकारी अभियंत्याने तेथे

"pooling of contingencies" हा MPW मॅन्यअल मधील नियम वापरला. निरनिराळ्या कामाच्या कॉन्टिजन्सी गोळा करून त्या अधिकाऱ्याने ६० लक्ष रुपयांचे काम प्रथमत: हाती घेतले. असे सर्व पूलींग केल्यानंतर ६० लाख रुपयांचे काम करताना त्यांनी एकच टेंडर काढायला पाहिजे होते, परंतु येथे चूक झालेली आहे. येथे २० लाख रुपयांचे तीन पार्ट केलेले आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

टेंडरचे तुकडे करण्याचे काम सुरू आहे. कसेतरी तीन लाख रुपयांच्या आत काम करायचे म्हणून असे तुकडे पाडले जातात. एका इमारतीच्या रंगकामासाठी चार बाजूचे चार पेंटचे टेंडर काढले गेले. समोरचा, मागचा आणि दोन्ही बाजूचे असे वेगवेगळे चार टेंडर काढले आणि कॉन्ट्रॅक्टर मात्र एकच आहे. विभागीय प्रतिनिधी आरोग्य विभागाचे ते काम होते असे सांगतात. कोणत्याही विभागाचे काम असो. जे चुकीचे झालेले आहे त्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाची काय भूमिका आहे? चुकीचे झालेले आहे, हे मान्य आहे का अशी विचारणा समितीने केली असता, सन २००८ चे हे काम आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१३ मध्ये समितीने शिफारस केली होती की,अर्थसंकल्पात ज्या कामासाठी तरतूद केली असेल तर त्या कामासाठीच खर्च करावा. विभागाने MPW नियम पुस्तिकेचे उल्लंघन करून भांडारगृह आणि अभिलेख कक्ष बांधण्यासाठी २५ कामे वगळली आहेत. MPW प्रमाणे काम केले नाही. एवढेच नव्हेतर लोकलेखा समितीने जी शिफारस केली होती त्याप्रमाणे अंमलबजावणी सुद्धा केली नाही. विभागाच्या अधीक्षक अभियंत्यानी मान्यता दिली आणि काम करून घेतले. नवीन मंजुर झालेली आरोग्य इमारत, प्रशासकीय इमारत व नवीन रत्याची कामे सुरू करण्याची प्रक्रीया तातडीने हाती घेण्याकरिता, What does it mean? याचा काय संबंध आहे? प्रशासकीय इमारत, रुग्णालयाची इमारत बांधण्यासाठी हे करावेच लागणार. या बांधकामाचा काय संबंध आहे? अशी विचारणा समितीने केली असता, महाड मध्ये निरनिराळी कामे करायची होती. या सर्व कामांचे संगणकीय लेखे, अभिलेखे, त्यांची मोजमाप पुस्तके भिजून खराब झाली असती तर अडचण आली असती. पूर्वी एकदा असे रेकॉर्ड भिजले होते. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

आकस्मिक निधीची बाकीची कामे रद्द करून, त्याला क्लब करून इमारतींसाठी कोणतीही मान्यता न घेता अधीक्षक अभियंत्यांच्या स्तरावर हे काम करून घेतले असे समितीने निदर्शनास आणले असता, यामध्ये दोन भाग आहेत. एक पूलींग ऑफ कॉन्टिजन्सीमधून नवीन नियमानुसार काम करता येते म्हणून ती वित्तीय अनियमितता नाही असे विभागाचे म्हणणे आहे. दुसरी बाब अशी की तुकडे पाडलेले आहेत, हे मान्य आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

This is not acceptable. हे कसे स्वीकारता येईल. एकाद्या वेळेस इमरजन्सीमध्ये एकाचे दोन भाग केलेतर समजणे शक्य आहे. एक मोठे काम करायचे होते म्हणून बाकीच्या कामांचे पैसे इकडे वळविले आणि त्याला २५ तुकडे करून दिले. जेणेकरून छोट्या कामांसाठी मान्यता घेण्याची गरज नाही. इकडे २५ तुकडे केले. हे सर्व ठरवून केलेले असते. एक इमारत बांधायची आहे त्यामुळे त्याचे २५ तुकडे कशासाठी करायचे? आपल्याला मान्य असेल तर काय कारवाई करणार What action you are going to take Let us know अशी विचारणा समितीने केली असता, Shri Singh: Sir, we will inquire into this. We will conduct departmental enquiry. This process has to be followed असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे जे झालेले आहे ते चुकीचे झालेले आहे, हे मान्य आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, या प्रकरणाची चौकशी करण्यात येईल. कितीही तातडी असली तरी तुकडे पाडणे योग्य नाही. एकच टेंडर काढणे अपेक्षित होते. तुकडे पाडण्याशी विभाग सहमत नाही. रेकॉर्ड पाण्यामध्ये भिजणार असे एखादे काम इमरजन्सी असू शकते. अशी इमरजन्सी आली आणि इमारत बांधण्यासाठी आकस्मिक निधी वापरला तर समजणे शक्य आहे. ते रेकॉर्ड त्या इमारतीमध्ये शिफ्ट केले हे मान्य करु शकतो, परंतु तुकडे पाडणे अपेक्षित नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

तुकडे पाडणे योग्य नाही, हा मुद्दा विभागाने मान्य केला आहे, परंतु मोठ्या कामासाठी आकस्मिकता निधी वळविणे योग्य नाही. MPW मॅन्युअलचे नियम आणि लोकलेखा समितीची सन २०१३ ची शिफारस आहे. या दोन्ही बाबींवर सचिवांनी विचार करावा अशी समितीची अपेक्षा आहे. विभागीय चौकशीसाठी कालबद्ध कार्यक्रम आखावा असे समितीने सूचित केले त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

२.१५ परिच्छेद क्र. ३.८ कंत्राटदारास अनियमित प्रदान-

हे प्रकरणसुद्धा ३.६ प्रमाणे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने मुख्य अभियंता यांचे पत्र मिळविलेले आहे. हे काम सन २००० मध्ये झाले. विभागाकडे सर्व रेकॉर्ड आहे. सन २००० मध्ये जे पेमेंट झाले नाही ते सन २००९ साली करावे असे मुख्य अभियंत्यांनी आदेशित केले होते. सन २००९ मध्ये देखील पेमेंट झाले नाही म्हणून कंत्राटदाराने उद्विग्न होऊन विभागाकडे अपील केले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने जी पुस्तिका दिलेली आहे. त्यामध्ये सन २००० मधील एम.बी.रेकॉर्डींग आहे.

समितीला जे सबमिट केले त्यामध्ये त्यांची डिमांड आहे. एम.बी.रेकॉर्ड आहे. सन २०१३ मध्ये कॅल्युलेशन झालेले आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, सन २००९ मध्ये या प्रकरणाची छाननी झालेली आहे.

विभागाने मेजरमेंट केले हे विभागाचेच उत्तर आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, मेजरमेंट नाही. विभागाचेच नेहमी एमबीमध्ये बील लिहिण्यात येते. बील मेजरमेंट पुस्तकात रेकॉर्ड केले आहे, असे म्हटले आहे. कारण ठेकेदाराला कोणत्यातरी एका स्वरूपात पेमेंट करावे लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यामध्ये सिनिअर अकाऊन्टंटने काही मुद्दे उपस्थित केले होते.असे मत समितीने व्यक्त केले असता विभागाने त्यांच्या सर्व मुद्यांची उत्तरे दिलेली आहेत. नंतर त्यांनी आक्षेप घेतलेला नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ठेकेदाराने जे अतिरिक्त देयक दिलेले आहे त्याच्या तपासणीसाठी किती वेळ लागला? काम किती वर्षे चालले ? विभागाने अतिरिक्त पेमेंट किती केले ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये प्रश्न असा आहे की, सहा मीटर व्हेलचा डायमीटर डिझाईन सर्कलने मंजुर करताना सात मीटर केला. त्यामुळे कॉंक्रीटचे जास्त परिमाण द्यावे लागले आणि विहिरीच्या पायाची लेव्हल किती खाली गेली हे सन २००० मध्ये ज्यांनी तपासणी केली त्या कार्यकारी अभियंत्यांनी वर्कआऊट दिलेली असते. या दोन मुद्यांवरून तपासून कोणत्याही क्षणी पेमेंट करता येते. शासनाच्या मान्यतेने एका केसमध्ये १२ लाख रुपये आणि ९५ लाख रुपये अतिरिक्त पेमेंट केले. दोन ब्रीज आहेत. गोदावरी नदीवर धनगर टाकळी येथे एक पूल आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २००० मध्ये मूळ काम झालेले आहे. लम्पसम कंत्राटामध्ये एकदा काम सुरू झाल्यावर ते थांबविण्यात येत नाही.

GAD दिली काय? जे अतिरिक्त काम झाले त्याचे मोजमाप करण्यासाठी किती वर्षे घेतली? ठेकेदाराने ज्या दिवशी काम केले त्याच दिवशी त्यांनी जास्तीची मागणी केली होती. त्यांनी सन २००० मध्येच मागणी केली होती. काही वेळा अज्ञानापोटी फिल्डवर निर्णय घेतला जात नाही. कधी कधी अधिकाऱ्यांच्या मनात शंका असते की, कोणत्या एका शब्दामध्ये पकडले जाऊ नये, असेही होते म्हणून या प्रकरणाची कसोशीने छाननी केली. दिनांक २९ जून, २००९ ला जे मुख्य अभियंता होते त्यांनी असे लिहिलेले आहे की, ॲबटमेंटमध्ये केलेल्या वाळुच्या अतिरिक्त भरावामुळे देय ठरणारी रक्कम मंजुर करण्याचे आपण मान्य केलेले दिसते, असे त्यांनी एस.ई.ना कळविले आहे. त्यानुसार कार्यवाही करावी म्हणजे पेमेंट करावे असे आदेशित केलेले आहे. निविदेमध्ये संकलनसूत्रापेक्षाा पीपी-७ आणि इतर पीअर हे खाली गेलेले आहेत त्याचे काही अंशी पेमेंट केलेले आहे त्याचाही पुनर्विचार करून उर्वरित पेमेंट करावे. सहा मीटर व्यासाच्या खडुयाऐवजी सात मीटर व्यासाचे व्हेल फाऊन्डेशन करावे लागले आहे, त्याबद्दल पुनर्विचार करून मंडळाच्या सहाय्याने पेमेंट करावे असे आदेश आहेत. परंतु बिल फायनल झालेले होते आणि ते काम बजेटमधून वगळले असल्यामुळे त्यांचे पेमेंट झाले नव्हते. जर त्यांना ते पेमेंट करावयाचे असेल तर ते काम बजेटमध्ये घ्यावे लागेल. रेकॉर्ड आणि डॉक्युमेन्टेशन तयार करून मग त्याचे पेमेंट करावे लागेल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने त्यांना हे कधी मंजुर केले ? सन २००९ मध्ये मुख्य अभियंत्यांनी मंजुर केलेले दिसते. यासाठी ९ वर्षे का लागली ? अशी विचारणा समितीने केली.

महालेखापालांचे आक्षेप आहेत की, ३० दिवसांच्या आत फायनल बिल झाल्यावर केले पाहिजे. विभागाकडे पूर्वीपासूनचा क्लेम आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाकडे ठेकेदारांनी क्लेम केले होते, क्लेम फेटाळलेले नाहीत. क्लेमला उत्तर दिले नव्हते.

विभागाला क्लेम मान्य होते. काम बजेटमधून वगळले गेल्यामुळे पेमेंट करता आले नाही. सन २०१३ मध्ये ते काम बजेटमध्ये घेतले. पुलाच्या अंदाजपत्रकाबाबत ज्या पुलाच्या कामामध्ये १२ लाख रुपये जास्तीचे काम केलेले आहे त्या पुलाच्या कामाची किमत ४ कोटी ४९ लाख रुपये आणि दुसऱ्या पुलाच्या कामाची किमत १ कोटी ६६ लाख रुपये होती असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१ कोटी ६६ लाख रुपयांमध्ये १२ लाख रुपयांची वाढ झाली आणि ४ कोटी रुपयांमध्ये ९७ लाख रुपयांची वाढ झाली म्हणजे मूळ किमतीच्या २५ टक्के वाढ झाली असे मत समितीने व्यक्त केले असता, पुलाचे फाऊन्डेशन रेस्ट करण्यामध्ये रॉक मिळाला नाही तर त्या व्हेलचा काही उपयोग होणार नाही त्यामुळे तेथेपर्यंत ठेकेदाराला जावे लागले. सन २००० मध्ये त्यांनी तसे रेकॉर्ड करून ठेवलेले आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभाग ठेकेदाराला १२-१३ वर्षे पेमेंट देत नाही. विभागाने ते काम वगळून टाकल्यामुळे त्यांना पैसे देता येत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, आता यामध्ये विभागाने दोन मूलभूत सुधारणा केलेल्या आहेत. या संदर्भात विभागाचा गेली एक-दीड वर्षे अभ्यास सुरू होता. प्रधान सचिव साहेबांसोबत खूप चर्चा झाली. याबाबत सहा महिन्यांपूर्वी सूचित केले आहे की, लम्पसम पद्धतीच्या निविदा वापरणे बंद करण्यात याव्यात. कारण विभाग डिस्पूट रिझॉल्युशन मेकॅनिझम नीट सोडवत नाही. आता केंद्र शासनाने एमओआरटी पद्धत सुरू केलेली आहे, ईपीसी पद्धतीने पुलाच्या निविदा मागविण्यात याव्यात त्यामध्ये दोघांमध्ये भांडण असेल तर सोडविण्याची प्रक्रिया सुलभ केलेली आहे.

ही दोन्ही कामे स्टेट हाय-वे बजेटेड वर्क्स नॉन बँकलॉग या हेडखालील कामे आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. दोन्ही पूल स्टेट हाय-वेची होती स्टेट हाय-वे जुना रस्ता आहे.

२.१६ परिच्छेद क्र. ३.९ पुलाची निष्क्रीयता:

पुलाची निष्क्रीयता या परिच्छेदासंदर्भात पुलाचे बांधकाम करताना भूसंपादन केल्याशिवाय पुढील कार्यवाही कशी केली, कार्यादेश किती तारखेला दिला, जिल्हाधिकाऱ्यांकडे भूसंपादनाचा प्रस्ताव कधी पाठविला, यामध्ये जो कालावधी आहे तो निदर्शनास आल्यानंतरही इतका मोठा कालावधी असण्याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जे काम अर्थसंकल्पात घेण्यात आले, त्यानंतर या कामाला तांत्रिक मंजुरी देऊन त्याची टेंडर नोटिस दिनांक १३.३.२०११ रोजी काढण्यात आली. दिनांक ११.८.२०११ रोजी कामाचा कार्यादेश दिला. दरम्यानच्या काळात लागणारी जागा मोजून दिनांक २५.६.२०१२ रोजी भूसंपादनाचा प्रस्ताव सादर केला. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

दिनांक २५.६.२०१२ रोजी भूसंपादनाचा प्रस्ताव सादर केला. एकदा निविदा काढली, एखादी गोष्ट निदर्शनास आली नाही समजणे शक्य आहे. परंतु, पहिली चूक केली ती म्हणजे निविदा काढल्या. चूक केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांकडे भूसंपादनाचा प्रस्ताव सादर करण्यास परत ९ महिने एवढा वेळ लावला, तो तर निष्काळजीपणा आहे ना ? एखाद्या वेळेस एखादा रस्ता करीत असताना प्रत्यक्षात कल काही साईटवर जाऊन मोजमाप करण्यात येत नाही, त्यामुळे ते काम राहिले असे समजणे शक्य आहे. परंतु, जमीन शासनाच्या ताब्यात नाही ही बाब निदर्शनास आल्यानंतर भूसंपादन तातडीने पूर्ण करणे आवश्यक होते. कार्यस्थळावर जाऊन काम करताना एखादी अडचण निर्माण होते हे मान्य आहे. परंतु एखादी गोष्ट निदर्शनास आल्यानंतर जो उशीर केला जातो, त्याकरिता कोण जबाबदार आहे? अशी विचारणा समितीने केली असता, हे जे करण्यात आलेले आहे ते यापुढे होणार नाही फक्त याचीच काळजी घेणे शक्य आहे. काही काही वेळेस बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे, टेंडर काढण्यात यावे अशी खूप घाई केली जाते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

लोकप्रतिनिधीकडून अमूक काम घ्यावे, हे मान्य करावे, हे बजेटमध्ये घ्यावे असे सांगण्यात येते ते सर्व योग्य आहे. परंतु, निविदा काढल्यानंतर, कार्यादेश दिल्यानंतर, जमीन शासनाच्या ताब्यात नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर भूसंपादनाचा प्रस्ताव ९ महिने सादर करायचा नाही, हे योग्य नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, येथून पुढे याबाबत काळजी घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

भूसंपादनाचा प्रस्ताव दिनांक २५.६.२०१२ रोजी सादर केला. त्यानंतर भूसंपादन कधी झाले ? ३ वर्षांचा कालावधी लागतच नाही. सेक्शन, ४, ५, ६... त्याकरिता निधी उपलब्ध असताना संबंधित अधिकाऱ्यांनी पाठपुरावा करून एक वर्षात, जास्तीत जास्त दीड वर्षात हे काम केले पाहिजे होते. मग विभागाने त्याला प्राईस एक्सलेशन दिले असेल. असे मत समितीने व्यक्त केले असता, फायनल अॅवॉर्ड हे दिनांक २४.४.२०१५ रोजी डिक्लेअर झाले पुलाची वेगळी निविदा काढली होती. अॅप्रोचेसची नंतर वेगळी काढली.

एखादी गोष्ट बजेटमध्ये समाविष्ट करीत असताना सन्माननीय सदस्य मंत्री महोदयांना पत्र देतात, ती कामे बजेटमध्ये येतात. एखाद्या वेळेस निविदा निघतात ते मान्य आहे. पण ही बाब निदर्शनास आल्यानंतर विभाग जो हलगर्जीपणा करतो त्यांना शासन झाले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, हे बरोबर आहे असे नाही. परंतु, ब्रिजचे टेंडर काढण्याची पद्धत अशी आहे की, ब्रिजचे काम करताना ब्रिजचे पिअर्स वगैरे तयार होत असताना भूसंपादन होऊन जाईल असे गृहीत धरुन ब्रिजचे टेंडर काढण्यात येते.

You are justifying it wrongly. जोपर्यंत विभागाकडे रस्त्याचे प्रोचेस नाहीत, तोपर्यंत ब्रिज बांधण्याचे काही कारणच नाही. जागा फार मोठी नाही ०.९७ हेक्टर जमीन आहे. ते जमीन मालक जर कोर्टामध्ये गेले असते तर ब्रिज पडून राहिला असता, असे मत समितीने व्यक्त केले असता, कोर्टामध्ये फक्त कॉम्पनसेशनचा विषय असतो. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये ३ वर्षे इतका वेळ लागलेला आहे. आजच्या तारखेला याची सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, आता तो ब्रीज पूर्ण झाला असून तेथून वाहतूक सुरू आहे. तेथे काही अडचण नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

रस्त्याकरिता जास्त पैसे लागले नाहीत. मात्र कामाला उशीर झाल्यामुळे रस्त्याच्या कामाकरिता ४९ लक्ष रुपयांऐवजी ७५ लक्ष रुपये लागले असा आक्षेप महालेखापालांनी घेतलेला आहे. प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेमध्ये बाकीचे टो वॉल, पिचिंग वगैरे काम वगळले. त्याची किमत किती होती ? विभागाने ते ३५ लाख रुपयांचे काम वगळले व ते पैसे विभागाने त्या रस्त्यासाठी वापरले. महालेखाकारांचा मुद्दा हाच होता की, विलंब झाल्यामुळे पैसे वाढले. असे मत समितीने व्यक्त केले असता, त्याची किमत ३५ लाख रुपये होती. टो वॉल व पिचिंग हे अर्थवर्कला करायचे असते त्याचा निधी होता असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

वगळलेले टो वॉल व पिचिंगचे काम कमी केले व तो निधी कॉस्ट एक्सलेशनमुळे रस्त्याकरिता लागला तेथे ॲडजस्ट केला व विभागाकडून सांगण्यात येते की, जास्तीचे पैसे लागले नाहीत, हे योग्य नाही. कारण उशीर झाला व त्यामुळे किमत वाढली असे समितीने निदर्शनास आणले असता, पुलाची निविदा रक्कम ३२१.५१ लक्ष रुपयांची होती. पुलावर झालेला खर्च हा एस्कलेशनसह २८१ लक्ष रुपयांचा आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जोपर्यंत ॲप्रोच नाही तोपर्यंत पुलाला काय किमत आहे ? ज्यावेळेस पुलाचे काम केले त्याच वेळेस या सर्व गोष्टी करणे अपेक्षित होते. विभागाने प्रस्ताव सादर केला व वरच्या अधिकाऱ्यांनी तो मंजुर केला नाही किंवा शासनाने मंजुर केला नाही, असे आहे का की, जिल्हाधिकाऱ्यांनी मंजुर केला नाही. कागदपत्रे पाहिली तर विभागाने प्रस्तावच उशिरा सादर केलेला आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, प्रस्ताव सादर करण्याकरिता १० महिन्यांचा विलंब झाला, यामागे कुठल्याही प्रकारचा हेतू आहे असे कागदपत्रांवरून दिसत नाही. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अधिकाऱ्यांचा हेतू असा असतो की, बजेटमध्ये एवढे पैसे आहेत, त्या पुलाचे काम करा, तो रस्ता लोकांना उपयोगात येवो की न येवो त्याच्याशी घेणेदेणे नाही, कॉंट्रक्टरला कॉंट्रॅक्टरचे पेमेंट मिळाले पाहिजे, अधिकाऱ्यांना अधिकाऱ्यांचे पेमेंट मिळाले पाहिजे. त्याचा हा हेतू नसतो की, रस्ता पूर्ण होऊन लोकांच्या उपयोगी आला पाहिजे. त्या दोघांचा हेतू साध्य झाला, कॉंट्रॅक्टरचा झाला, अधिकाऱ्यांचाही झाला. परंतु, जनतेकरिता तो पूल झाला पाहिजे हा शासनाचा हेतू साध्य झाला नाही. जे अधिकारी अशाप्रकारे दुर्लक्ष करतात ते अत्यंत दुर्दैवी आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

या संदर्भात परिपत्रक निघाले पाहिजे की, जोपर्यंत approaches are not available till then no bridge will be constructed. असे मत समितीने व्यक्त केले असता, तसे परिपत्रक यापूर्वीच काढण्यात आलेले आहे कारण हा विषय अगोदरही १-२ साक्षीमध्ये आला असेल. नॅशनल हायवेचे देखील १-२ ब्रिज तयार झाले, त्यामध्ये ॲप्रोच रोडमध्ये भूसंपादन उशिरा झाल्यामुळे नॅशनल हायवेचा ब्रिज तयार होऊनही त्यावरून तो वाहतूकीकरिता खुला करता आला नाही. त्यामुळे आता असाच निर्णय घेण्यात आला आहे की, जोपर्यंत भूसंपादन पूर्ण होत नाही तोपर्यंत टेंडरच काढायचे नाही. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ही बाब अतिशय गंभीर आहे. १०० टक्के शासनाची जमीन आहे तरी, ॲप्रोचेसचे काम होण्यास ४ वर्षे आणि पुलाचे काम होण्यास ३ वर्षे लागली. तो पूल बांधून तसाच पडून राहिला, कारण ॲप्रोचेसचा पत्ता नाही. ॲप्रोचेसचा वाव होता. हे विदर्भा नदीवरील ॲप्रोचेसचे काम ४ वर्षे का झाले नाही ? अशी विचारणा समितीने केला असता, हा ब्रिज बॅकवॉटरचे क्षेत्र तेथे येते त्यावरचा होता. याबाबत मागे समजले की, बॅकवॉटरच्या क्षेत्रामुळे सगळीकडेच पूल उंच करा असे त्यावेळस कुठल्या तरी बैठकीत सांगण्यात आले होते. पूल उंच झाल्यानंतर ॲप्रोचेसचे काम करण्यासाठी अर्थ रिटेनिंग वॉल ज्या घेतलेल्या होत्या तेथे आता वेगळे काही तरी स्ट्रक्चर करावे लागते म्हणून ते अपूर्ण राहिलेले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अभिप्राय व शिफारशी-

परिच्छेद क्र.३.१ : राज्य निधीतून शासकीय इमारतीची देखभाल

परिच्छेद क्र.३.१.१ वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार न करणे

३.१ अभिप्राय-

महालेखापालांनी सात मंडळांतर्गत असलेल्या १३ सार्वजनिक बांधकाम विभागांच्या १२० इमारतींच्या देखभाल दुरुस्तीसंदर्भात तपासणी केली असता १३ विभागांनी २०१०-११ ते २०१४-१५ दरम्यान १२० इमारतींपैकी ७१ इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीची एकूण १,४४४ कामे केली होती आणि त्यावर रु.५५.०७ कोटी खर्च करण्यात आला होता. उर्वरित ४९ इमारतींमध्ये उपयोगकर्त्यांच्या तक्रारी असून सुद्धा अनेक कारणांमुळे जसे निधीची कमतरता, देखभाल व दुरुस्ती कामांस प्राधान्य न देणे, नियोजनातील अपर्याप्तता इत्यादींमुळे देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात आली नाहीत. एवढेच नव्हेतर ७१ इमारतींची १४४४ कामे वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार केल्याशिवाय निष्पादित केल्या गेली. तसेच, इमारतींचे मुद्रित रजिस्टर सुद्धा देखभाल व दुरुस्तीसाठी नियत असलेल्या इमारतींची माहिती दर्शविण्यासाठी अद्यावत ठेवण्यात आले नव्हते. निधी उपलब्धता विचारात न घेता आणि ज्या इमारतींस दुरुस्ती अत्यंत आवश्यक आहे त्यास प्राधान्य न देता वर्षभर देखभाल व दुरुस्तीची कामे मंजूर केली होती. परिणामी १३ विभागांपैकी चार विभागांमध्ये २३७ शासकीय निवासस्थाने मागील एक ते पाच वर्षापासून देखभाल व दुरुस्तीची काम जसे गळती, तडकलेल्या भिंती, तुटलेले दार आणि तावदान, बुजलेले आणि तुटलेले गटार पाईप इत्यादी कामे न झाल्यामुळे रिकामी पडली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

याबाबत विभागाने सदर निवासस्थाने संबंधित खात्याच्या ताब्यात असून या बाबतची माहिती उपभोक्ता खात्याकडून प्राप्त होणे आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, ही कार्यान्वयीन यंत्रणा असल्याने या इमारतींमधील दुरुस्तीची कामे, उपभोक्ता खात्याच्या मागणीनुसार व निधी उपलब्धतेच्या अधिन पूर्ण करण्यात येतात. यासाठी अत्यंत तुटपूंजा निधी प्राप्त होतो. त्यामधून शासकीय निवासस्थानांच्या दुरुस्ती व देखभाल संदर्भातील शक्य ती अत्यावश्यक कामे हाती घेण्याचे नियोजन करण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

याबाबत समितीने विचारणा केली असता, ज्यावेळी संबंधित अधीक्षक अभियंता अशी बैठक घेतात त्यावेळी उपभोक्ता विभागाचे अधिकारी उपस्थित असतात. त्यामध्ये जुनी कामे जर अपूर्ण असतील तर त्यासंबंधी चर्चा होते आणि नवीन कोणती कामे घ्यावयाची असतील तर ती ठरविण्यात येतात. प्राधान्यक्रमानुसार त्याचा कार्यक्रम तयार करण्यात येतो. यापैकी २३७ निवासस्थानांच्या दुरुस्तीचा हा कार्यक्रम होता. या २३७ निवासस्थानांपैकी १९९ निवासस्थाने दुरुस्त करण्यात आली आहेत. असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. सार्वजनिक बांधकाम विभागाने सन १९९१ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विभागाने उपयोगकर्ता विभागाच्या प्रक्षेपित गरजा आणि निधीच्या उपलब्धतेच्या आधारावर वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार करणे बंधनकारक असतांना त्याची अंमलबजावणी न झाल्याबाबत समितीने विचारणा केली असता, कृती आराखडा ठरविताना बैठक घ्यावी व सर्व विभागप्रमुखांना बैठकीस बोलावून त्यांच्या समवेत दुरुस्तीचा कार्यक्रम तयार करावा. कामांची विभागणी तीन भागांत करावी व त्यानुसार वार्षिक कार्यक्रम मंजूर करणे त्यासाठी निधीचे नियोजन व वितरण करणे व उरलेला निधी एस.एल.आर. किंवा विशेष दुरुस्तीसाठी म्हणून त्यांच्याकडे ठेऊन त्यामधून कामे मंजूर करणे या पद्धतीनेच ही सर्व कामे मंजूर झालेली आहेत. सी.आर., एस.एल.आर. आणि एस.डी.आर. यांचा एकत्रित कार्यक्रम तयार करून तो रेकॉर्डवर ठेवणे व त्याला वार्षिक कार्यक्रम म्हणून घोषित करणे ही अपेक्षित बाब आहे. परंतु विभागाने निधीच्या उपलब्धतेनुसार वार्षिक दुरुस्ती कार्यक्रमाचे नियोजन करूनच ही कामे केलेली आहेत परंतु यास वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम म्हणून घोषित केल्याचे घोषणापत्र विभागाच्या रेकॉर्डवर कुठेही उपलब्ध नाही. यासाठी शासनाने एक रुपरेषा आखून दिली होती. अतिशय चांगली परिस्थिती असेल तर रुपरेषेनुसार काम देखील करता येईल. परंतु सन २०११-१२ साली विभागाने वित्त विभागाकडे कार्यालयीन व रहिवासी इमारतींच्या दुरुस्तीसाठी ११८४ कोटी रुपयांची मागणी नोंदविली. परंतु कार्यालयीन इमारतींसाठी रु.१६५ कोटी व रहिवासी इमारतींसाठी रु. १०५ कोटी असे फक्त २७० कोटी रुपये प्राप्त झाले त्यामुळे निधीच्या कमी उपलब्धतेमुळे अशाप्रकारे वार्षिक दुरुस्ती कार्यक्रमांची अधिकृत घोषणा व अंमलबजावणी करणे शक्य होत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. परंतु महालेखापालांनी केलेली सूचना विभागाला मान्य आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे वार्षिक कार्यक्रम घोषित करण्यात येईल. तसेच, उपलब्ध निधीच्या मर्यादेत राहून त्याबाबत तंतोतंत पालन करण्यात येईल असेही विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले.

शिफारशी —

३.२ (१) महाराष्ट्रात सार्वजनिक बांधकाम विभाग शासकीय इमारती सुस्थितीत ठेवण्यासाठी जबाबदार आहे. योग्य व समयोचित देखभाल इमारतींना टिकवून ठेवून त्यांचे आयुष्य वाढविते आणि त्यांच्या संरचनेच्या शेवटपर्यंत रचना क्षमता अथवा कार्यक्षमतेनुसार त्यांचा वापर होणे सुकर करते. अशा स्थितीत सार्वजनिक बांधकाम विभागाने या कामांचे नियोजन अतिशय योग्य

पद्धतीने करून त्याची अंमलबजावणी करणे अभिप्रेत व अपेक्षित आहे. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने १९९१ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार, अधीक्षक अभियंता हे मंडळ प्रमुख आणि कार्यकारी अभियंता हे विभाग प्रमुख असून त्यांनी उपयोगकर्ता विभागाच्या प्रमुखासह आगामी वर्षासाठी इमारती दुरुस्तींच्या कार्यक्रमाबाबत चर्चा करण्यासाठी तिमाही बैठक घ्यावयास पाहिजे. या संदर्भात, मंडळाने इमारतींचे मुद्रित रजिस्टर राखावयास पाहिजे आणि एखाद्या वर्षात दुरुस्तीसाठी नियत असलेल्या इमारतींची पुरेशी माहिती (जसे बांधकामाचे वर्ष आणि किंमत, बांधकाम क्षेत्र (**built-up area**) ठळक नोंदी (**specification**) इत्यादी विभागाने द्यावयास पाहिजे. संबंधित अधीक्षक अभियंत्याने उपयोगकर्ता विभागाच्या प्रक्षेपित गरजा आणि निधीच्या उपलब्धतेच्या आधारावर वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार करावयास पाहिजे व त्याप्रमाणे देखभाल दुरुस्तीचे काम करणे अभिप्रेत व आवश्यक होते परंतु तसे करण्यात आले नाही, महालेखाकारांच्या तपासणीमध्ये सन २०१० ते २०१५ या कालावधीत १२० इमारतींपैकी ७१ इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीची एकूण १४४४ कामे केली होती आणि त्यावर रु.५५.०७ कोटी खर्च करण्यात आला होता. उर्वरित ४९ इमारतींमध्ये उपयोगकर्त्यांच्या तक्रारी असून सुद्धा अनेक कारणांमुळे जसे निधीची कमतरता, देखभाल व दुरुस्ती कामांस प्राधान्य न देणे, नियोजनातील अपर्याप्तता इत्यादींमुळे देखभाल व दुरुस्तीची कामे करण्यात आली नाहीत व ही कामे वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार न करता तदर्थ पद्धतीने करण्यात आली. वास्तविकतः विभागाने कामांचे वार्षिक नियोजन निधीच्या उपलब्धतेनुसार कामांची विभागणी करून ती पूर्ण करण्याचा प्रयत्न केला परंतु याची वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम म्हणून अधिकृतरित्या घोषणा केली नाही असेही विभागीय सचिवांनी समितीसमोर मान्य केले. याचाच अर्थ १९९१ पासून आतापर्यंत विभागाने कधीही अशाप्रकारे वार्षिक कार्यक्रम तथा कृती आराखडा आखून देखभाल दुरुस्तीचे काम केल्याचे दिसून आले नाही. विभागाने किरकोळ/चालू दुरुस्ती, विशेष दुरुस्ती व मोठ्या भांडवली खर्चाची दुरुस्ती अशा प्रकारे कामांची विभागणी करून ही कामे केली व यासाठी विभागाने जी काही कार्यपद्धती राबविली त्यास वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम असल्याचे संबोधणे वा गृहीत धरणे ही विभागाची भूमिका निश्चितच योग्य व समर्थनीय तर नाहीच पण ही बाब मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करणारी आहे. तरतुदींचे पालन विभागाने विहित कार्यपद्धतीनुसारच करणे अभिप्रेत असून ते सोयीस्करित्या राबविणे यथोचित नाही. विभागांकडे आर्थिक वर्षात प्रलंबित असलेली दुरुस्तीची कामे त्यासाठी आलेल्या मागणीचा क्रम, कामांचा प्राधान्यक्रम, गरज, तातडी, निधी व कामांची आवश्यकता या निकषांद्वारे ही दुरुस्ती अतिशय पारदर्शकरित्या हाती घेणे विभागाने अभिप्रेत असतांना हे निकष पाळले गेले नव्हते. त्यामुळे केलेल्या कामांची गुणवत्ता, तातडी, महत्त्व, प्राधान्यक्रम हा नेमका कशाच्या आधारे निश्चित केला याबाबत शंका घेण्यास पूर्ण वाव निर्माण होतो तसेच यामध्ये अतिशय तातडीने व प्राधान्याने करावयाच्या दुरुस्तीची कामे देखील मागे पडलेली असल्याची शंका नाकारता येत नाही. विभागाने अधिकृतरित्या वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार न करता ही कामे केल्यामुळे यात पारदर्शकतेचा निश्चितच अभाव दिसून येतो. अतः विभागाने देखभाल व दुरुस्तीची कामे एका सुनियोजित वार्षिक दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत केली पाहीजेत ज्यात दुरुस्तीची कामे दिलेल्या प्राधान्याने आणि निधी उपलब्धतेनुसार मांडलेली असावी व त्यानुसार ठरविलेल्या धोरणाप्रमाणे दरवर्षी वार्षिक दुरुस्ती कार्यक्रम तयार करूनच देखभालदुरुस्तीची कामे करावीत. आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला देखभाल व दुरुस्ती कामांच्या कामनिहाय प्रस्तावांना कार्यकारी अभियंताद्वारे प्राधान्य असलेली काम/कामे सर्वप्रथम हाती घेण्यात यावी. या संबंधिच्या तक्रारी नोंदविण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान वा पद्धतीचा अवलंब करावा व त्या तक्रारींवर विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहितीदेखील ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करण्यात यावी व यात अधिकाधिक पादर्शकता विभागाने आणावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.३ (२) सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २०१०-११ ते सन २०१७-१८ या कालावधीतील देखभाल दुरुस्तीची कामे तपासण्यासाठी एक कृती आराखडा तयार करावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी तसेच देखभाल दुरुस्तीची कामे करताना ज्या अधिकाऱ्यांनी नियमांचे पालन केले नाही असे आढळून येईल त्यांचेवर योग्य ती कारवाई करावी. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.४ (३) १३ विभागांपैकी चार विभागांमध्ये २३७ शासकीय निवासस्थाने मागील एक ते पाच वर्षापासून देखभाल दुरुस्तीची कामे न झाल्यामुळे रिकामी पडून होती असेही आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. याची देखील विभागाने विशेष दखल घेऊन ही कामे सत्वर पूर्ण करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक ३.१.२ जादा कामाच्या मंजुरीमुळे दायित्वाची निर्मिती :–

३.५ अभिप्राय –

विभागाने त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या आर्थिक तरतुदींपेक्षा जास्त प्रमाणात देखभाल व दुरुस्तीची कामे मंजूर करून निष्पादित केली. परिणामी, कंत्राटदारांच्या मागील वर्षाच्या प्रलंबित देयकांच्या प्रदानाचे रु.३४८.७२ कोटीचे दायित्व सार्वजनिक बांधकाम विभागावर लादल्या गेले होते. तपासणी केलेल्या ११ विभागांच्या मागील पाच वर्षांच्या (२०१०-१५) एकूण वार्षिक सरासरी खर्चापेक्षा हे दायित्व जास्त होते. जर हे दायित्व निर्धारित करून अदा करावे लागले तर हे ११ विभाग पुढे एक वर्ष देखभाल व दुरुस्तीची कोणतीही कामे हाती घेण्यास सक्षम राहणार नाहीत. याहिउपर प्रलंबित देयकांचे रु.३४८.७२ कोटीचे मोठे दायित्व असल्यावरही सार्वजनिक बांधकाम विभागाने २०१३-१४ मध्ये रु.१९ कोटी निधी प्रत्यर्पित केला होता. असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सदरहू आक्षेपातील उपभोक्ता विभागांची मागणी व पुरवठा (निधी) यामधील अनियोजनबद्ध प्रमाणांमुळे मंजूर केलेली कामे ही उपलब्ध निधीपेक्षा जास्तीची दिसून येतात. मुळातच उपभोक्ता विभागांच्या मागण्या ह्या प्रत्येक वर्षी पूर्ण करणे शक्य नसते. काही महत्त्वपूर्ण उपभोक्ता विभागांच्या मागण्या पूर्ण करणे अत्यंत गरजेचे असते. कामाची मंजुरी व निधी उपलब्धता यामध्ये तफावत निर्माण होऊन, दायित्व जास्तीचे दिसते. तथापि यापुढे संगणक प्रणालीद्वारे या बाबी प्राधान्याने हाती घेण्यात येत असून त्याद्वारे दायित्व आटोक्यात राहून, उपभोक्ता विभागाच्या प्रमुख गरजा पूर्ण होतील यादृष्टीने सर्वंकष प्रयत्न करण्यात येत असल्याचे समितीस सांगण्यात आले.

यासंदर्भात समितीने विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. विभागाला निधी कमी मिळत असताना १९ कोटी रुपयांचा निधी समर्पित करण्याची कारणे समितीने विचारली असता, मंत्रालय दुरुस्तीचे काम सन २०१२-१३ चे आहे. मंत्रालयास सन २०१२ मध्ये आग लागली होती. त्याच्या दुरुस्तीचे काम सन २०१३ मध्ये करण्यात आले होते. त्यावेळी मंत्रालयाच्या दुरुस्तीसाठी विभागाच्या नॉन-प्लॅनमधून विवक्षित निधीची तरतूद करण्यात आली होती आणि सदर निधी याच कामासाठी खर्च करावयाचे बंधन वित्त विभागाने निधी मंजूर करतेवेळी घातल्यामुळे उर्वरित निधी परत पाठविण्यात आला असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले.

मंत्रालयाचे बरेचसे काम करणे शिल्लक होते. तसेच कंत्राटदाराची देयके विभागाने मंजूर केली आहेत, परंतु प्रदान दिलेले नाही. निधी परत पाठविण्यापेक्षा मंत्रालयाच्या कामांसाठी तो का वापरण्यात आला नाही अशी विचारणा समितीने केली असता, कंत्राटदाराचे विवादित देयके देण्यात आलेली नाहीत. कारण त्यामध्ये अपेक्षिततेप्रमाणे काम केले नसेल तर आणि शासनाने नियुक्त केलेले जे सल्लागार होते त्यांचे प्रमाणिकरण होत नाही, तोपर्यंत कंत्राटदाराची देयके अदा करावयाची नव्हती. त्यामुळे त्या मंडळाने सदर खर्च केलेला नाही. विभागाला मागच्या वर्षीची फायनल मोडीफाईड ग्रँट जी मिळणार आहे त्याच्या आधारे दिडपट वजा अशा पद्धतीचा कार्यक्रम मंजूर करता येतो. त्याप्रमाणे विभागाला दरवर्षी जो निधी प्राप्त होतो त्याच्या दिडपट खर्च करण्याचे नियोजन विभाग करीत असतो परंतु त्यापैकी किती रक्कम मिळणार याची शाश्वती नसते त्यामुळे मागील वर्षाच्या दायित्वाची रक्कम वाढली आहे व आता हे दायित्व हळूहळू कमी करण्याचा प्रयत्न विभाग करीत आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला. संसदेच्या धर्तीवर महाराष्ट्रात देखील विभागांतर्गत अर्थसंकल्पीत निधी व त्याअंतर्गत होणारे खर्च याचे यथायोग्य नियोजन करण्यासाठी सर्व पक्षीय सदस्यांची वित्तीय समिती तयार करण्याची देखील आवश्यकता असल्याचे मत समितीने व्यक्त केले. याअगोदर महाराष्ट्रात अर्थसंकल्पाची विभागनिहाय छाननी करणेकरीता प्रायोगीक तत्वावर विभाग संलंग्न स्थायी समित्यांचे (Standing Committee) गठन करण्यात आले होते परंतु नंतर त्या बरखास्तदेखील करण्यात आल्या.

एकीकडे विभागावर मोठया रकमेचे दायित्व असतांना दुसरीकडे प्राप्त निधी विभागाने प्रत्यार्पित केला ही देखील गंभीर बाब आहे. निधी प्रत्यार्पित करण्याऐवजी अडचणींवर यथोचित तोडगा काढून विभागाने दायित्वाची रक्कम कमी करणे आवश्यक होते असे समितीचे स्पष्ट मत आहे. यासंदर्भात विभागाने कोणत्या कामांवर किती खर्च केला व गत ५ वर्षांत किती कामांवर दोनदा खर्च झाला याची तपासणी करून समितीला माहिती देणेबाबत समितीने निर्देशित केले असता यासंदर्भात माहिती समितीला प्राप्त झाली आहे. (विवरणपत्र ३ जोडल्याप्रमाणे)

शिफारशी :–

३.६ (१) आर्थिक वर्षाच्या सुरुवातीला देखभाल व दुरुस्ती कामांच्या काम-निहाय प्रस्तावांना कार्यकारी अभियंता यांनी प्राधान्य क्रमानुसार लावून संबंधित अधीक्षक अभियंता यांचेकडे मंजुरीसाठी सादर करावयास पाहिजे. जर, पुरेसा निधी उपलब्ध नसेल तर सर्वोच्च प्राधान्य असलेली काम/कामे सर्वप्रथम हाती घेण्यात यावी असे असताना, सार्वजनिक बांधकाम विभागाने उपलब्ध तरतुदीपेक्षा जास्त प्रमाणात देखभाल व दुरुस्तीची कामे मंजूर करून निष्पादित केली. परिणामी, कंत्राटदारांच्या मागील वर्षाच्या प्रलंबित देयकांच्या प्रदानाचे रु.३४८.७२ कोटीचे दायित्व लादले गेले होते व जर हे दायित्व अदा करावे लागले तर हे ११ विभाग पुढे एक वर्ष देखभाल व दुरुस्तीची कोणतीही कामे हाती घेण्यास सक्षम राहणार नाहीत. देखभाल दुरुस्तीसाठी जेवढा निधी मंजूर

केला जातो. त्या निधीपेक्षा मागील प्रलंबित कामांचे दायित्व जास्त असल्यामुळे विभाग त्या वर्षभरात कोणतेही काम करु शकत नाही अशी परिस्थिती निर्माण होते. या ढिसाळ नियोजनामुळे दायित्वाची रक्कम त्या वर्षी मंजूर निधी एवढी होऊन विभाग कोणतेही काम हाती न घेऊ शकण्याची परिस्थिती ओढवते. प्रत्येक वर्षी देखभाल दुरुस्तीची प्रलंबित कामे व त्याअनुषंगाने प्राप्त होणारा अत्यल्प निधी यामुळे प्राप्त निधीतून ही सर्व कामे होणे शक्य नसते हे समितीला मान्य आहे. तसेच ऐनवेळी तातडीने करावयाच्या दुरूस्त्यांमुळे निधी अन्य कामांसाठी वळता करावा लागतो हीदेखील वस्तुस्थिती आहे. परंतु ही परिस्थितीदेखील दरवर्षीची व नियमित स्वरुपाची आहे. या सर्व बाबींचे नियोजन विभागाने करणे आवश्यक व अभिप्रेत आहे. दरवर्षी विभागाला जो निधी प्राप्त होतो त्यातून दायित्व वजा करून उर्वरीत निधीच्या दिडपट रकमेचे नियोजन विभाग करीत असतो. परंतु तेवढा निधी विभागाला प्राप्त होईलच याची शाश्वती नसते त्यामुळेही ही दायित्वाची रक्कम वाढत जाते. उपलब्ध निधीच्या दिडपट वार्षिक कार्यक्रम तयार करता येतो. परंतु त्यामध्ये विभागाने प्रायोगिकता ठरवून घेतली पाहिजे. तसेच उपलब्ध रकमेचे योग्य नियोजन विभागाने करावे. पुढील वर्षात विभागाचे दायित्व कमी होईल अशा प्रकारचे नियोजन अचूकरित्या करण्यात यावे तसेच भविष्यात ज्यादा कामांच्या मंजुरीमुळे अतिरिक्त दायित्वाची निर्मिती टाळावी व त्याअनुषंगाने योग्य त्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा. निधीकरीता मागण्यांचे अंदाजपत्रक आणि विभागाद्वारे त्यांचे प्रदान सुद्धा वास्तववादी आणि वार्षिक दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजूर कामांची संख्या आणि कामांच्या प्रकारावर पुर्णतः आधारीत असावयास पाहिजे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(२) उपभोक्ता विभागांची निवासी व अनिवासी इमारतींच्या दुरुस्तीबाबत मागणी, उपलब्ध होणाऱ्या निधीची मर्यादितता, सातत्याने नवनिर्मिती होत असलेल्या इमारती, परंतु सदर इमारतीच्या स्थितीनुसार करावयाच्या दुरुस्तीचे प्राधान्यक्रम व संपुर्ण वस्तुस्थिती लक्षात घेता, याबाबत, नियोजन प्राधान्यक्रम व अंमलबजावणी, ही कार्यवाही परीणामकारकतेने व कार्यक्षमतेने होणे गरजेचे व अपरीहार्य आहे. सा.बां. विभागाने असे नियोजन करणे शक्य व्हावे याकरीता, उपभोक्ता विभागांच्या निवासी व अनिवासी इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीकरीता आवश्यक निधी, वित्त विभागाने थेट उपभोक्ता विभागास द्यावा. प्रत्येक कार्यकारी अभियंता (सा.बां.) यांच्या अखत्यारीतील इमारतींच्या दुरुस्तीची प्राधान्यक्रमाची बाब उपभोक्ता विभागाच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्याने कार्यकारी अभियंता यांना कळवून अंदाजपत्रक प्राप्त करावे. त्यानुसार कार्यकारी अभियंता यांना सदर निधी ठेव अंशदान (Deposite Basis) स्वरुपात उपलब्ध करून द्यावा, सदर कामे ठेव अंशदान तत्वावर सा.बां. विभागाकडून कार्यान्वित करण्यात येणेबाबतच्या पर्यायाचा विभागाने सखोल अभ्यास करून त्याचा अवलंब करावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.३.१.३ देखभाल व दुरुस्तीच्या मानदंडाची सुधारणा न करणे :-

३.७ अभिप्राय-

प्रेसिडेंसी विभाग, मुंबई येथे सन २०१०-१५ दरम्यान १५ निवासी इमारतीच्या प्रत्यक्ष देखभाल व दुरुस्तीवर झालेला खर्च २००५ च्या आर्थिक मानदंडाच्या (२०१४-१५ पर्यंत १० टक्के प्रति वर्ष वाढवून) सहा ते २० पट जास्त होता तसेच, या १५ निवासी इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी २०१०-१५ दरम्यान झालेला प्रत्यक्ष खर्च जानेवारी, २०१४ मध्ये विहीत केलेल्या रु.२८,५०० प्रति चौरस मीटर दराने तेवढेच बिल्टअप क्षेत्र असलेल्या नविन इमारतींच्या बांधकाम किंमतीच्या एक ते तीन पटीत होता म्हणजेच या १५ इमारती, ज्यांच्या देखभाल व दुरुस्तीवर रु.५२ कोटी खर्च करण्यात आला, त्या इमारती केवळ रु.३७ कोटी खर्चून नव्याने बांधता येऊ शकल्या असत्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले. त्यावर तांत्रिक प्रगती आणि आवश्यकतेनुसार मानदंड सुधारीत करण्याची आवश्यकता असल्याचे विभागाने मान्य केले व त्या अनुषंगाने शासनाच्या विविध विभागांच्या अनिवासी व निवासी इमारतींचे बांधकाम व देखभाल दुरुस्तीसाठी जसे की, किरकोळ दुरुस्ती, विशेष दुरुस्ती, विवक्षित दुरुस्ती इत्यादी जुन्या बाबींचा आढावा घेऊन ज्या बाबींचे साहित्य बाजारात उपलब्ध होत नाहीत त्या बाबी वगळणे तसेच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नव्याने बाजारात आलेल्या बाबींचा अभ्यास करून इमारती देखभाल व दुरुस्तीसाठी सुधारीत प्रमाणके ठरविणेसाठी सन २०१५ मध्ये सेवानिवृत्त सचिव (बांधकामे) सा.बां.विभाग, यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली आहे व त्याचा अहवाल प्राप्त झाला असून मानके निश्चित करण्याची व त्यास वित्त व नियोजन विभागाची मंजूरी घेण्याची कार्यवाही व त्याची अंमलबजावणी प्रगती पथावर असल्याचे समितीस सांगण्यात आले.

देखभाल दुरुस्तीसंबंधी मोमीन समितीचे मानदंड स्वीकारणे व त्याची अंमलबजावणी यापूर्वीच इतक्या वर्षापासून विभागाने अद्याप का केली नाही याबाबत समितीने विचारणा केली असता हे संपुर्ण काम व कार्यवाही संगणकीकरणाच्या माध्यमातून करणे प्रस्तावित होते व ही संगणकीकरणाची

प्रक्रिया क्लिष्ट असून त्याला ३ वर्षे वेळ लागलेला आहे ही वस्तुस्थिती आहे व या कालावधीमध्ये पुन्हा काही नवीन इमारती यात सामाविष्ट झाल्या. त्यांची देखील माहिती अद्ययावत करायची आहे. त्यामुळे हा विलंब झाला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

१५ निवासी इमारतींच्या देखभाल दुरुस्ती करिता प्रत्यक्षात झालेल्या खर्चात नवीन इमारत झाली असती या महालेखापालांच्या आक्षेपाबाबत समितीने विचारणा केली असता यातील काही इमारती या हेरिटेज इमारती असल्यामुळे त्या पाडता येत नाहीत तसेच यात मा. मंत्री व मा. उच्च न्यायालयातील न्यायाधीश रहात असून काही इमारतींसंदर्भात त्या पाडून नवीन बांधण्याचा निर्णय देखील झाला होता परंतु नंतर या इमारतींची केवळ दुरुस्ती करावी असा निर्णय घेण्यात आला यासंदर्भात झालेल्या बैठकीमध्ये या इमारतींच्या पुनर्बांधणीपेक्षा दुरुस्तीला खर्च जास्त येणार असल्याची बाब मान्यवरांच्या निदर्शनास आणण्यात आली होती काय ? अशी समितीने विचारणा केली असता नस्तीवर "It is prudently instructed to repair the building" असे अभिप्राय नमूद असल्याचे तसेच या इमारतींमधील मान्यवरांना इतरत्र हलवून त्या दर्जाचे दुसरे निवासस्थान उपलब्ध करून देणेसाठी येणाऱ्या अडचणी पाहता इमारतीची दुरुस्ती करणे सोयीचे होते असे विभागीय प्रतिनिधींकडून समितीसमोर सांगण्यात आले. यानंतर माझगाव कोर्टाबाबत देखील दुरुस्तीसंदर्भात असाच आग्रह होता परंतु, विभागाने दुरुस्तीच्या खर्चामध्ये नवीन इमारत बांधणेबाबत कटाक्षाने लक्षात आणून दिले असता त्यास नंतर परवानगी मिळाली असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारशी :-

३.८ (१) सार्वजनिक बांधकाम विभागाने शासकीय इमारतींच्या (निवासी आणि प्रशासकीय दोन्ही) देखभाल व दुरुस्तीसाठी भौतिक आणि आर्थिक मानदंड विहित केले होते (मार्च १९९१). आर्थिक मानदंड प्रत्येक पाच वर्षानंतर आढावा घेऊन सुधारित करावयाचे होते. परंतु विभागाने आर्थिक मानदंड फक्त एकदाच नोव्हेंबर, २००५ मध्ये सुधारित केले. तसेच कालानुरुप आणि बांधकामामध्ये आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यात येऊ लागल्यामुळे नवीन उपकरणे वापरात आली आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दर अनुसूचिमध्ये वेळोवेळी समाविष्ट करण्यात आली. परंतु, देखभाल व दुरुस्तीचे भौतिक मानदंड मागील २४ वर्षापासून सुधारित करण्यात आले नाहीत. देखभाल दुरुस्तीचा खर्च आखून दिलेल्या प्रतिवर्ष १०% वाढ या मानदंडाप्रमाणे करणे आवश्यक आहे. मात्र २०१०-२०१५ मध्ये देखभाल दुरुस्तीवर ५२ कोटी रुपये खर्च झालेला आहे. ज्या इमारती दुरुस्त केल्या गेल्या त्या ३७ कोटीमध्येच नव्याने बांधून झाल्या असत्या असे समितीने निदर्शनास आणले असता यातील काही इमारती हेरिटेज असून त्या १०० वर्षे जुन्या आहेत त्यामुळे त्या नवीन बांधता येत नसल्यामुळे त्यावर दुरुस्तीसाठी खर्च करणे आवश्यक होते. तसेच काही इमारतींमध्ये राहणाऱ्या व्यक्ती या मा.मंत्री व मा. न्यायालयाच्या न्यायाधीश दर्जाच्या असल्यामुळे इमारत नवीन बांधण्यासाठी तेथे राहत असणाऱ्या मान्यवरांची अन्य ठिकाणी त्या दर्जाची निवासाची व्यवस्था करणेदेखील अडचणींचे होते त्यामुळे दुरुस्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला. वास्तविक विभागाने हेरिटेज इमारतींसाठी विहीत मानदंडांना अपवाद करून विशेष बाब म्हणून अधिकचा निधी मंजुर करून देखभाल दुरुस्तीचे अंदाजपत्रक स्वतंत्ररित्या तयार केले असते तर अशा प्रकारचा आक्षेप आला नसता परंतु विभागाने त्याच विहीत मानदंडाच्या धर्तीवर हेरीटेज इमारतींची देखभाल दुरुस्ती केल्यामुळे हा अधिकचा खर्च दिसून येतो. अतः विभागाने यापुढे दरवर्षी हेरिटेज इमारती व अन्य महत्त्वाच्या इमारती यांचे दुरुस्तीचे स्वतंत्र अंदाजपत्रक करूनच देखभाल दुरुस्तीची कामे करावी तसेच माझगाव कोर्टाप्रमाणेच इतर हेरिटेज इमारतीबाबत परवानगी प्राप्त करण्याचा प्रयत्न करून दुरुस्ती टाळून नवीन बांधकामासाठी प्रयत्न करणे तसेच प्रेसिडेंन्सी विभाग मुंबई येथील अनेक शासकीय इमारतींमध्ये राहणाऱ्या व्यक्ती या अति महत्त्वाच्या व उच्च पदावरील असल्यामुळे अशा इमारतींबाबत व्यावहारीक निर्णय घेणे विभागाला बऱ्याचदा अडचणीचे ठरते ही जरी वस्तुस्थिती असली तरीही इमारत नव्याने बांधकाम करण्याच्या खर्चापेक्षा दुरुस्तीचा खर्च अधिक येत असेल तर विभागाने व्यावहारीक भुमिका घेणेसंदर्भात आग्रही राहण्याची आवश्यकता आहे. याची अंमलबजावणी अन्य प्रकरणांपेक्षा तुलनेने थोड्या वेगळया पद्धतीने करणे अपरिहार्य ठरते परंतु त्यामधून नवीन इमारत तयार होऊ शकते ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. अतः अशा इमारतींबाबत विभागाने सर्वांना विश्वासात घेऊन उच्च स्तरावरुन व्यावहारीक व योग्य निर्णय भविष्यात घ्यावा अशी समितीची शिफारस आहे.

३.९ (२) देखभाल दुरुस्तीच्या मानदंडासंबंधी मोमीन समितीच्या शिफारशीसंदर्भात विभागाने मानके निश्चित करणेसंदर्भातील व अन्य बाबींसंदर्भात योग्य ती कार्यवाही व अंमलबजावणी विना विलंब करावी व त्याबाबतचा शासन आदेश निर्गमित करण्याबाबतची कार्यवाही विभागाने त्वरीत करून केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीस कळवावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.१.४ मंजूर झालेली कामे रद्द करणे

३.१० अभिप्राय-

दोन विभागांतील (प्रेसिडेंसी आणि उत्तर मुंबई) दस्ताऐवजांच्या तपासणीत आढळले की, रु.६५.४८ कोटी किंमतीची, १११८ कामे ज्यांना आधीच जॉब क्रमांक नेमून दिले होते. ती कामे डिसेंबर, २०१० ते फेब्रुवारी, २०१४ दरम्यान रद्द करण्यात आली. तसेच, रद्द झालेल्या १११८ कामापैकी २५ कामांमध्ये मोजमाप पुस्तिका क्रमांक नोंदविण्यात आले होते. ज्यावरुन ही २५ कामे निष्पादित करण्यात आली होती आणि त्यांची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदविली गेली होती. परंतु ह्या २५ कामांच्या प्रत्यक्ष स्थितीची पडताळणी करण्यासाठी मोजमाप पुस्तिकेच्या प्रती लेखापरीक्षेला प्रस्तुत केल्या नाहीत. असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत यावर विभागाने मंजूर प्रस्तावांचा आढावा घेऊन निधीच्या कमतरतेमुळे काही कामे स्थगित/रद्द करण्याबाबत प्रस्ताव मांडले. तसेच दक्षता आणि गुणवत्ता नियंत्रक मंडळ (VQCC) यांना रद्द करण्यात आलेल्या २५ कामांची स्थिती तपासण्याचे आदेश देण्यात आले आहेत (नोव्हेंबर २०१५) आणि पुढील कारवाई त्यांच्या शिफारशींच्या आधारे करण्यात येईल, असे समितीसमोर सांगण्यात आले.

या परिच्छेदाबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता, रद्द केलेल्या कामांचे एमबी रेकॉर्ड कसे झाले? तसेच या संदर्भातील देयके मान्य झाली होती काय? काम न करता एमबी रेकॉर्ड करणे हा गुन्हा आहे. याबाबत पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला काय? संबंधितांना तातडीने निलंबित केले काय, आज ते कोणत्या पदावर कार्यरत आहेत यासंदर्भात समितीने विचारणा केली असता, सन २०१५ मध्ये चौकशीचे आदेश दिले. अद्याप एफआयआर, निलंबन काहीच झाले नाही असे समितीच्या निदर्शनास आले. कार्यकारी अभियंता यांनी २५ कामांच्या प्रत्यक्ष स्थितीची पडताळणी करण्यासाठी मोजमाप पुस्तिकेच्या प्रती लेखापरीक्षणाकरिता प्रस्तुत केल्या नाहीत. त्यांच्यावर काय कारवाई केली ? याबाबत समितीने विचारणा केली असता, ही बाब खरी असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. रद्द केलेल्या कामांचे एमबी रेकॉर्ड कसे झाले व ही कामे संशयास्पद वाटल्यामुळे दक्षता आणि गुणवत्ता नियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्याकडे ही कामे तपासायला दिली. याचा अहवाल विभागाकडे प्राप्त झाला असून ९ कामे झाली असून त्याचे प्रदान केले आहे व इतर १६ कामे नंतर रद्द करण्यात आली. पण त्याचे जरी प्रदान झाले नाही परंतु देयके प्रदानासाठी मात्र मंजूर करण्यात आली होती. या प्रकरणातील सर्व स्तरावरील तपासणी करून संबंधितांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात येईल. असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्य केले. या संदर्भातील महत्त्वाची कागदपत्रे तपासणीदरम्यान महालेखाकारांना उपलब्ध न करणे ही देखील गंभीर बाब असून विभागाने या प्रकरणी संबंधितांवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे. केवळ लोकलेखा समितीची साक्ष लागल्यामुळे आता सन २०१५ मध्ये विभागाने या कामांच्या तपासणी संदर्भात पत्रव्यवहार केला तोपर्यंत विभागाने याप्रकरणी कोणतीही दखल गांभीर्याने घेतली नाही. १६ ठिकाणी कामेच दिसत नाहीत. यामध्ये गैरव्यवहार व अनियमितता झालेली असल्याचे विभाग मान्य करतो परंतु संबंधितांवर एफआयआर तसेच निलंबन अशी कोणतीही कारवाई समितीची साक्ष लागेपर्यंत करीत नाही. या कामांचे एमबी रेकॉर्ड झाले, देयके मान्य झाली परंतु केवळ निधी उपलब्ध नसल्यामुळे रकमेचे प्रदान होऊ शकले नाही. अन्यथा या रकमांचे प्रदान कंत्राटदारांना करण्यात आले असते. या सर्व बाबी अत्यंत गंभीर असून या सर्व बाबींची तपासणी करून एफआयआर दाखल करणेबाबत समितीला विभागीय प्रतिनिधींनी आश्वासित केले.

शिफारस :-

३.११ प्रेसिडेंसी आणि उत्तर मुंबई या दोन विभागांतील दस्ताऐवजांची तपासणी केली असता असे दिसून आले की, रु.६५.४८ कोटी किंमतीची, १११८ कामे ज्यांना आधीच जॉब क्रमांक नेमून दिले होते. ती कामे डिसेंबर, २०१० ते फेब्रुवारी, २०१४ दरम्यान रद्द करण्यात आली. तसेच रद्द झालेल्या १११८ कामांपैकी २५ कामांचे मोजमाप पुस्तिका क्रमांक नोंदविण्यात आले होते, ज्याद्वारे असे दिसून येत होते की, रद्द केलेली ही २५ कामे निष्पादित करण्यात आली होती आणि त्यांची मापे मोजमाप पुस्तिकेत नोंदविली गेली होती. वारंवार विनंती करूनही संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी ह्या २५ कामांच्या प्रत्यक्ष स्थितीची पडताळणी करण्यासाठी मोजमाप पुस्तिकेच्या प्रती लेखापरीक्षेला सादर केल्या नाहीत. अशा प्रकारे २०१० ते २०१४ या कालावधीत १११८ कामांना जॉब क्रमांक देऊनही सदर कामे विभागाने रद्द केली. एवढेच नाही तर रद्द केलेल्या २५ कामांचे एम बी रेकॉर्ड करण्यात आले, त्यापैकी फक्त ९ कामे करण्यात आली व १६ कामे करण्यात आली नाहीत. त्यानंतर सर्व २५ कामांचे देयकही तयार करण्यात आले, मात्र निधीअभावी सदर देयक पारित झाले नाही. अशा प्रकारे रद्द केलेल्या कामांची देयके जरी प्रदान झाली नसली तरी विभागाच्या अधिकाऱ्यांनी रद्द झालेल्या कामांचे एमबी रेकॉर्ड करणे व त्याबाबतचे देयक तयार करून वरिष्ठांकडे प्रदानासाठी प्रस्तावित करणे ही खूपच गंभीर बाब आहे. तसेच महालेखाकारांनी या प्रकरणी आक्षेप नोंदविल्यानंतरही विभागाने या गंभीर प्रकरणाची स्वत:हून कोणतीही दखल घेतली नाही. केवळ लोकलेखा समितीने यासंदर्भात साक्ष लावल्यानंतर या प्रकरणांच्या तपासणीचे आदेश देण्यात आले ही बाब अतिशय गंभीर असून यात अनेकांचे संगनमत असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. विभागाने या सर्व प्रकरणांची सखोल चौकशी करून सर्व संबंधितांविरुद्ध पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही करावी तसेच संबंधितावरुद्ध निलंबनाची कारवाई करून प्रकरणाची पुढील आवश्यक ती चौकशी करावी यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीस द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.१.५ अवास्तववादी मागणी आणि निधीचे संवितरण

३.१२ अभिप्राय-

सन २०१०-१५ दरम्यान १३ पैकी चार विभागांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व इमारतींचे बिल्ट-अप क्षेत्र, जरी दुरुस्तीयोग्य असो वा नसो ते विचारात घेऊन त्यांना अनुज्ञेय असलेल्या अधिकतम निधी पेक्षाही जास्त निधीची मागणी (रु.१,२८१ कोटी) केली होती. तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन विभागांना (प्रेसीडेंसी व नाशिक) अनुज्ञेय असलेल्या अधिकतम निधीपेक्षा रु.५०५ कोटी जास्त निधी वितरित केला. असा आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केला.

विभागाने याबाबत खुलासा केला की, प्रेसिडेंसी विभागाच्या सन २०१०-२०१५ या ५ वर्षाच्या कालावधीचा सरासरी खर्च एकूण रु.१४२.५८ कोटी इतका आहे. त्या पैकी अटळ बाबींवरील सरासरी खर्च रु.२६.५३ कोटी इतका आहे. त्यामुळे प्रत्यक्षात देखभाल व दुरुस्ती (किरकोळ दुरुस्ती, विशेष दुरुस्ती, विविक्षित स्वरुपाची दुरुस्ती) वरील सरासरी खर्च रु.११६.०५ कोटी इतका आहे. प्रेसिडेंसी विभाग यांचेकडे प्रामुख्याने अतिमहत्त्वाच्या व्यक्ती आणि उच्च पदस्थ व्यक्ती त्यांच्या निवासस्थानासह वारसा (Heritage) इमारती आहेत. यातील काही इमारती १०० वर्षापेक्षाही जास्त जुन्या असल्याने त्यांना जास्तीत जास्त देखभालीची आवश्यकता असते. तसेच या सर्व इमारती समुद्राकाठी स्थित असून अति पाऊस आणि क्षारयुक्त हवा सोसत असल्यामुळे त्यांची देखभाल व दुरुस्तीची गरज मानदंडापेक्षा जास्त आहे. त्याचप्रमाणे सा. बां. विभागाने शासकीय इमारतींच्या देखभाल व दुरुस्तींसाठी भौतिक आणि आर्थिक मानदंड सन १९९१ मध्ये विहित केले जे, प्रत्येक ५ वर्षानंतर आढावा घेऊन सुधारित करावयाचे आहेत. परंतु हे आर्थिक मानदंड सन २००५ मध्ये फक्त एकदाच सुधारण्यात आले आहेत व या इमारतींच्या दुरुस्तीसाठी लागणारा निधी या विहित मानदंडापेक्षा जास्त असल्यामुळे तसेच इतर अन्य बाबी व आधुनिक तंत्रज्ञानामुळे वाढीव निधीची ही तफावत दिसून येते.

वरील बाबी निदर्शनास आल्यावर शासनस्तरावरून नियुक्त करण्यात आलेल्या श्री. एस. एस. मोमीन सेवानिवृत्त सचिव (बांधकामे), सा.बां. विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यासगटाचा अहवाल प्राप्त झाला असून यातील शिफारशींच्या अनुषंगाने देखभाल दुरुस्तीचे नियोजन, मानके, अंमलबजावणीची कार्यप्रणाली करण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. याबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता, समितीसमोर सांगण्यात आले की, शासकीय निवासी आणि अनिवासी इमारतींची दरवर्षी देखभाल व दुरुस्तीची मागणी असते. विभागाकडे अशा इमारतींचा मागील १२ वर्षांचा खर्चाचा तपशील उपलब्ध आहे. विभागाला उक्त इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मागणी केलेल्या निधीच्या तुलनेत केवळ ३५ ते ४० टक्के निधी मिळाला आहे. मुळात देखभाल व दुरुस्तीचा खर्च हा दरवर्षी वाढत जातो. प्रत्यक्षात विभागाला प्राप्त होणारे निधीचे वाटप मर्यादित असल्यामुळे त्या रकमेतून संपूर्ण देखभाल व दुरुस्तीचे काम पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे ज्या गोष्टी प्राधान्याने करावयाच्या असतात त्या करण्यात येतात आणि काही दुरूस्त्या निधीअभावी शिल्लक राहतात ही वस्तुस्थिती आहे. नॉर्म्सनुसार इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी जेवढा निधी मिळावयास पाहिजे त्या तुलनेत केवळ ३५-४० टक्के निधी मिळतो. त्यामुळे इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीची बरीच कामे करता येत नाहीत.

वास्तविक महालेखाकारांनी आक्षेपात नमूद केलेले विवरण पत्र पाहता विभागाला देखभाल व दुरुस्तीच्या खर्चासाठी अनुज्ञेय रक्कम रु.६३० कोटी असून विभागाने मागणी केलेला निधी रु.१९१०.५१ कोटी असून विभागाला वितरित केलेला निधी हा रु.१०६६.९९ कोटी इतका असल्याचे दिसून येते. याचाच अर्थ विभागाला अनुज्ञेय असलेल्या रकमेपेक्षा जास्तीचाच निधी विभागाला प्राप्त झाला आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, मुंबईत अनेक महत्त्वांच्या निवासी व अनिवासी इमारती अशा आहेत की त्यावर खर्च करावाच लागतो. शिवाय ती इमारत जुनी असल्यामुळे त्या ठिकाणी देखभाल व दुरुस्तीपोटी खर्च करावयाचा असल्यास अगोदर स्ट्रक्चरल ऑडिटरला आणावे लागते तसेच हेरिटेज आर्किटेक्टची देखील नेमणूक करावी लागते. हेरिटेज इमारत असल्यास विशिष्ट प्रकारचीच सामुग्री वापरावी असे सांगितल्यास तशाच प्रकारची सामुग्री आणावी लागते तसेच मुंबई उच्च न्यायालय, एशियाटीक लायब्ररी या ठिकाणचे दुरुस्तीची कामे होती. परंतु या इमारती हेरिटेज असल्यामुळे त्या ठिकाणी दुरुस्ती करताना सर्वसाधारण इतर दुरुस्तीचे नॉर्म्स लागू होत नाहीत त्यामुळे या खर्चात वाढ होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शिफारस -

३.१३ देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठी वार्षिक मागणी करण्यात येते जी अधीक्षक अभियंता यांचे स्तरावर एकत्रिकृत करण्यात येऊन मंडळाची एकत्रिकृत मागणी सचिव (इमारती), सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे तपासणी आणि मंजुरीसाठी पाठविण्यात येते. परंतु सदरहू परिच्छेदान्वये विभागाकडून निधीची अवास्तववादी मागणी आणि निधीचे संवितरण झाल्याचे आक्षेप महालेखाकारांकडून नोंदविलेले आहेत. त्यातील विभाग प्रेसिडेंसी मुंबई येथील इमारतीमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण व्यक्ती यांच्या निवासस्थानासह अनेक मोठी व महत्त्वाची शासकीय कार्यालये देखील असून त्यातील बऱ्याचशा इमारती या हेरीटेजमध्ये मोडतात. हेरीटेजच्या इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी जास्त प्रमाणात निधी लागतो तसेच या सर्व इमारती समुद्रकाठी स्थित असून हवामानामुळे त्यांची देखभाल व दुरुस्तीची गरज मानदंडापेक्षा जास्त आहे तसेच विभागाने मागणी केलेला पूर्ण निधी प्राप्त होत नाही त्यामुळे जेवढा निधी

प्राप्त झाला त्यातून या कामांचे प्राधान्य ठरविणे व अति तातडीने करून घ्यावयाची कामे निश्चित करणे हे विभागाला अडचणीचे ठरते हे समितीला मान्यच आहे. परंतु या सर्व बाबींचे नियोजन करण्याची जबाबदारी ही विभागाचीच आहे. परंतु महालेखाकारांनी त्यांचे आक्षेपात नमूद केलेल्या विवरणपत्रात असे स्पष्टपणे दिसून येते की शासनाने या विभागांसाठी अनुज्ञेय असलेल्या रकमेपेक्षा निश्चितच जास्त निधी वितरित केला आहे. या उपर विभागाने मागणी केलेला निधी हा बराच जास्त असल्याचेही दिसून येते.

विशेषतः मुंबई प्रेसिडेंसीमध्ये असलेल्या सर्व इमारतींचे (मग त्या दुरुस्तीयोग्य असो वा नसो) बिल्टअप क्षेत्र विचारात घेऊन त्यांना अनुज्ञेय असलेला देखभाल व दुरुस्ती निधी मागण्याऐवजी विभागाने त्यापेक्षा ३ ते ४ पट जास्त निधीची मागणी केली. तसेच विभागाने देखील अनुज्ञेय असलेल्या निधीपेक्षा जास्त निधी वितरित केला. तसेच चार विभागांस अनुज्ञेय असलेल्या अधिकतम देखभाल व दुरुस्ती निधीची परिगणना संबंधित मंडळाच्या अधीक्षक अभियंत्याने लेखापरीक्षेस सादर केलेल्या बिल्ट-अप क्षेत्राच्या आधारावरच करण्यात आली आहे.

बिल्ट-अप क्षेत्रासाठी २० टक्के अतिरिक्त वाढ दिल्यावरही नाशिक आणि नाशिक (पूर्व) विभागांच्या २०१०-१५ दरम्यान देखभाल आणि दुरुस्तीच्या निधीत मामूली वाढ होऊन तो अनुक्रमे रुपये ६१.०१ कोटी (रुपये ५०.८५ कोटी वर) आणि रुपये १३.१९ कोटी (रुपये १०.९३ कोटी वर) वर जाईल आणि महत्त्वाचे असे की चार विभागांच्या २०१०-१५ दरम्यान देखभाल व दुरुस्तीच्या निधीच्या मागणीचा अंदाज बांधण्यासाठी लेखापरीक्षेने सर्व इमारती (दुरुस्तीयोग्य असो वा नसो) विचारात घेतल्या. फक्त दुरुस्तीयोग्य इमारती विचारात घेतल्या असत्या तर देखभाल व दुरुस्ती निधीसाठी असलेली जादा मागणी (रुपये १,२८१ कोटी) कमी झाली असती. विभागाने या कामांचे व निधीचे नियोजन अत्यंत वास्तववादी पद्धतीने करणे आवश्यक व अभिप्रेत आहे. अतः विभागाने देखभाल दुरुस्तीचे नियोजन, मानके व अंमलबजावणीची कार्यप्रणाली तात्काळ निश्चित करून घ्यावी तसेच विभागाने देखभाल दुरुस्तीसाठी निधी मागणी करताना वास्तविकतेवर आधारित मागणी करावी व सदर खर्च अनुज्ञेयतेपेक्षा जास्त होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदर खर्च मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणेच करण्यात यावा तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने शासकीय इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीसाठी भौतिक व आर्थिक मानदंड मार्च, १९९१ मध्ये विहित केले व प्रत्येक ५ वर्षानंतर त्याचा आढावा घेऊन त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे. परंतु विभागाने हे मानदंड नोव्हेंबर, २००५ मध्ये प्रथमच व फक्त एकदाच सुधारीत केले. त्यामुळे ही तफावत दिसून येते. अतः विभागाने हे मानदंड वेळोवेळी अद्ययावत करावे व आवश्यकता पडल्यास हेरिटेज इमारतींसाठी योग्य त्या समर्थनीय कारणांसह स्वतंत्र निधीची मागणी करावी. मात्र कोणत्याही परिस्थितीत इमारतींवर अशी इमारत नविन बांधकाम केल्यास जेवढा खर्च होईल त्यापेक्षा देखभाल दुरुस्तीवर जास्त खर्च करण्यात येऊ नये तसेच निधीकरीता मागण्यांचे अंदाजपत्रक आणि विभागाद्वारे त्यांचे प्रदान सुद्धा वास्तववादी आणि वार्षिक दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत मंजूर कामांची संख्या आणि कामाच्या प्रकारावर पुर्णतः आधारित असावे. याप्रकरणी विभागाने आवश्यक ती उपाययोजना करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.३.१.६ मंजुरी शिवाय कामांचे निष्पादन :-

३.१४ अभिप्राय-

जॉब क्रमांक मिळाल्याशिवाय देखभाल व दुरुस्तीच्या कोणत्याही कामाचे निष्पादन अनधिकृत मानले जाते. तरीही १३ पैकी तीन विभागांनी २०१०-१५ दरम्यान रु.५५.५८ कोटी किंमतीची ४००७ कामे जॉब क्रमांक मिळाल्याशिवाय निष्पादित केली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले.

सदरहु आक्षेप विभागाने महालेखाकारांसमवेत झालेल्या निर्गमन परिषदेत मान्य केले व वरील अनियमितता क्षमापित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू केल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने संबंधितांवर दोषारोपपत्रे बजावून विभागीय चौकशी सुरू केल्याचेही समितीस सांगण्यात आले.

यापूर्वी सार्वजनिक बांधकाम (विद्युत) अंतर्गत जॉब क्रमांक प्राप्त करावयाची पद्धत अवलंबली जात नव्हती. जॉब क्रमांकास मान्यता देण्याची पद्धत कार्यकारी अभियंता (विद्युत) कार्यालयामध्ये २०१६-१७ मध्ये सुरू करण्यात आली आहे असेही समितीसमोर सांगण्यात आले.

जॉब नंबर नसेल तर विभागाने काय काम केले हे कसे समजणार ? केलेल्या अथवा करावयाच्या कामांना जॉब क्रमांक असलाच पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, बजेटमध्ये जी कामे घेण्यात येतात त्यासाठी अर्थसंकल्पाचा क्रमांक असतो. अर्थसंकल्पामध्ये इमारतीचे काम मंजूर झाले की, विद्युतीकरणाचे काम त्यामध्ये टक्केवारीच्या स्वरुपात पूर्वी मंजूर होत होते. ट्रान्सफार्मरसह जेवढी किंमत लागते ती रक्कम त्यामध्ये नमूद केलेली असते. त्या कामाला जो जॉब क्रमांक असतो तो सिव्हील अधिक इलेक्ट्रीकल असा एकत्रित असतो व विभागाकडून सिव्हीलची कामे करण्यात येतात त्या कामांमध्ये जॉब क्रमांक असतो असे विभागीय सचिवांनी समितीसमोर स्पष्ट केले.

आता कोर्टाचा निर्णय आल्यामुळे सिव्हील व इलेक्ट्रीकलचे कामाचे टेंडर वेगवेगळे करण्यात येते. कामाची मंजुरी एकत्र असते. या अगोदर तांत्रिक मंजुरी झाली की त्याला जॉब क्रमांक मिळाला असे गृहित धरले जात होते. आता विभागामार्फत संबंधितांना सांगण्यात आले आहे की, जे काम करण्यात येणार आहे त्याचा कार्यक्रम तयार करण्यात यावा, प्रत्येकाला जॉब क्रमांक देण्यात यावा असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले.

शिफारस-

३.१५ जॉब क्रमांक मिळाल्याशिवाय देखभाल दुरुस्तीच्या कोणत्याही कामाचे निष्पादन हे अनधिकृत मानले जाते. मात्र २०१०-१५ दरम्यान ३ विभागांनी रु.५५.५८ कोटी किंमतीची ४००७ कामे जॉब क्रमांकाशिवाय केली आहेत. विद्युत कामांमध्ये जॉब क्रमांक देण्याची पद्धत पुर्वी नव्हती, सन २०१६-१७ पासून अशी पद्धत सुरू करण्यात आली आहे असे सचिवांनी समितीस सांगितले. विभागाचे उत्तर समिती मान्य करू शकत नाही. कारण जॉब क्रमांक नसेल तर कामे करणे शक्य नाही. जॉब क्रमांकाशिवाय विभागाला यंत्रणा उभी करता येणार नाही. तसेच होणाऱ्या कामांवर नियंत्रण ठेवता येणार नाही. ह्या सर्व बाबी विचारात घेता जॉब क्रमांक मिळाल्याशिवाय कोणतेही काम सुरू होणार नाही व त्याबाबतचे देयक प्रदान होणार नाही याबाबत आवश्यक ती व्यवस्था विभागाने तात्काळ निर्माण करावी व त्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे. तसेच जॉब क्रमांक मिळाल्याशिवाय देखभाल दुरुस्तीची कामे करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची विभागाने कालबद्ध पद्धतीने सखोल चौकशी करून चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व यापूर्वी ज्या अधिकाऱ्यांवर दोषारोपपत्र बजावले आहे. त्यांचेवर केलेल्या कारवाईची माहिती तात्काळ समितीला सादर करावी. उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र. ३.१.७ तातडीच्या दुरुस्तीची गरज असलेल्या इमारती दुर्लक्षित राहिल्या :-

अभिप्राय-

३.१६ सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे १९९१ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मोडकळीस आलेल्या आणि असुरक्षित इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीस प्राधान्य द्यावयास पाहिजे. दुरुस्तीची अत्यंत आवश्यकता असलेल्या इमारती उपयोगकर्ता विभागाद्वारे वारंवार तक्रारी करूनही दीर्घ कालावधीसाठी दुर्लक्षित होत्या. असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले असून त्याबाबतचा विस्तृत तपशील त्यांचे आक्षेपात नमूद केला आहे. त्यावर तातडीच्या दुरुस्तीची गरज असलेल्या इमारतींची कामे हाती घेण्यात आली असून निविदा मागविण्यात आल्या असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

समितीने यासंदर्भात साक्ष घेतली असता विभागाने जी कामे पूर्ण केली आहेत त्याबाबत आक्षेप नाही. मात्र जे. जे. रुग्णालयातील स्वस्तिक इमारतीला सन २०१३ पासून दुरुस्तीची आवश्यकता आहे. आतापर्यंत विभागाची निविदा प्रगतिपथावर आहे. याबाबत विलंबाचे कारण काय आहे अशी विचारणा समितीने केली असता, किरकोळ दुरुस्तीची कामे पूर्ण झाली आहेत. स्ट्रक्चरल रिपेअर कामाचे टेंडर आता काढण्यात येत आहे. मजला क्रमांक तीन वर लघुवाद न्यायालयाच्या इमारतीचे काम आहे. यामध्ये स्ट्रक्चरल रिपेअर्स व लिफ्ट क्रमांक ७, ८ व २ यांच्या सभोवतालच्या भिंती व आऊटरसाईडच्या पोलीस स्टेशनला लागून असलेल्या भिंतींचे काम पूर्ण झाले आहे. न्यायालयीन कक्ष व व्हरांडा यांचे काम पूर्ण झाले आहे. चौथ्या, पाचव्या व सहाव्या मजल्यावरील व्हरांडा व दर्शनी भागातील पडवीची कामे पूर्ण झाली आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

शिफारस-

३.१७ सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे १९९१ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मोडकळीस आलेल्या आणि असुरक्षित इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीस प्राधान्य द्यावयास पाहिजे असे असताना देखील दुरुस्तीची अत्यंत आवश्यकता असलेल्या इमारती उपयोगकर्ता विभागाद्वारे वारंवार तक्रारी करूनही दीर्घ कालावधीसाठी दुर्लक्षित केल्या होत्या. त्यावर तातडीच्या दुरुस्तीची गरज असलेल्या इमारतीची कामे हाती घेण्यात आली असून निविदा मागविण्यात आल्या आहेत असे सचिवांनी समितीस सांगितले. केवळ निविदा मागवून देखभाल व दुरुस्तीची कार्यवाही पूर्ण होत नाही. मोडकळीस आलेल्या इमारतीची सुरक्षा विचारात घेऊन देखभाल दुरुस्तीची कार्यवाही तातडीने करणे आवश्यक आहे. अतः विभागाने भविष्यात देखभाल दुरुस्तीचा वार्षिक कार्यक्रम तयार करावा व उपभोक्त्या विभागाकडून प्राधान्यक्रम यादी घेऊनच देखभाल दुरुस्तीची कामे हाती घेऊन प्राधान्याने करण्याची कार्यवाही करावी. तसेच अशा मोडकळीस आलेल्या इमारती अथवा तातडीने देखभाल दुरुस्तीची आवश्यकता असलेल्या इमारतींची कामे प्राधान्याने व विनाविलंब करण्यात यावीत. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीस द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.३.१.८-देखभाल अनुदानातून भांडवली कामांचे निष्पादन :

अभिप्राय-

३.१८ सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे १९९१ मध्ये निर्गमित देखभाल व दुरुस्तीच्या (M&R) मार्गदर्शक तत्त्वांनुसार देखभाल अनुदानातून मूळ कामे नित्यक्रम म्हणून हाती घेण्यात येऊ नयेत. तथापि, काही प्रकरणांमध्ये भांडवली खर्च देखभाल व दुरुस्ती निधीतून करण्यात आला, जे मार्गदर्शक तत्त्वांच्या विरुद्ध आहे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

जून, २०१२ मध्ये मंत्रालय इमारतीला आग लागली ज्यात इमारतीच्या संरचनेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. डिसेंबर २०१२ पासून इमारतीच्या नूतनीकरणाचे मोठे काम रु. २४२.२५ कोटी अंदाजित किंमतीवर हाती घेण्यात आले. हाती घेण्यात आलेली सर्व कामे भांडवली प्रकारची होती, जसे इमारतीची संरचनात्मक दुरुस्ती, प्लंबींग, अग्नि प्रतिबंधक उपाययोजना कामे, मध्यवर्ती वातानुकूलित यंत्रणा [Heating, Ventilating and Air-Conditioning (HVAV)], आठ मित्सुबिशी उद्वाहक (elevators), १४ एक्सेलेटर्स (सरकते जीने), आग विझवण्याची यंत्रणा बसविणे इत्यादि. तथापि, हे काम मुख्य शीर्ष-४०५९ (सार्वजनिक बांधकामावर भांडवली खर्च) ऐवजी मुख्य शीर्ष-२०५९ (प्रशासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्ती) अंतर्गत मंजूर करण्यात येऊन निष्पादित करण्यात आले. असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले. याबाबत विभागाने नूतनीकरणाचे काम जरी देखभाल व दुरुस्ती कामांच्या प्रवर्गात मोडत नसले तरी, जेथे राज्य प्रतिष्ठा धोक्यात आहे अशा आकस्मिक स्थितीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने, ज्यामध्ये मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, सचिव, वित्त विभाग तसेच सचिव, सा.बां. विभाग यांचा समावेश असलेल्या उच्चाधिकार समितीने मंत्रालयाच्या नूतनीकरणाचे काम जाणीवपूर्वक देखभाल दुरुस्ती शिर्षांतर्गत करण्याचा निर्णय घेतला असे समितीसमोर स्पष्ट केले.

देखभाल अनुदानातून हा भांडवली खर्च कसा काय करता येईल? यामध्ये मंत्रालय इमारती, सारंग इमारती तसेच औंढा येथील विश्रांतीगृह बांधकामांचा समावेश आहे, अशी समितीने विचारणा केली असता, उच्चाधिकार समितीची बैठक झाली होती. त्यामध्ये असे म्हटले होते की, यासाठी वेगवेगळे शीर्ष तयार करण्यात येईल. नंतर ही बाब देखभाल व दुरुस्ती मध्ये घेण्यात आली. मंत्रालय इमारतीला आग लागली होती, तो भाग पूर्णपणे खराब झाला होता. त्यावेळी एकच पर्याय होता की, लगेच काम सुरू करावे. त्यासाठी तो खर्च योजनेतर खर्चामधे घेण्यात आला. असे समितीसमोर सांगण्यात आले.

मंत्रालय इमारतीला लागलेली आग पाहता, काम लवकरात लवकर झाले पाहिजे यात कोणताही वाद वा दुमत नाही व ते काम प्राधान्याने करणे आवश्यकच होते. परंतु मुद्दा एवढाच आहे की हा खर्च देखभाल दुरुस्तीमधून करणे अभिप्रेत नव्हते हा खर्च फार मोठ्या प्रमाणात होणारा होता त्यामुळे यासाठी विशेष निधी मान्य करून घेण्यास कोणतीही अडचण नव्हती. तसेच, सारंग इमारतीचे स्ट्रक्चर तेच असल्याने तेथे देखभाल दुरुस्तीचे काम करण्यात आले तर औंढा येथील विश्रांतीगृहाचे काम डीपीडीसीच्या निधीतून करण्यात आल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

शिफारस :

३.१९ सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे देखभाल दुरुस्तीसंदर्भात १९९१ मध्ये मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानुसार देखभाल दुरुस्तीसाठीच्या अनुदानातून मूळ बांधकामे नित्यक्रम म्हणून हाती घेण्यात येऊ नयेत. अशी तरतूद आहे. तथापि, महालेखाकारांनी आक्षेपित केलेल्या काही प्रकरणांमध्ये इमारतींसाठी मोठ्या प्रमाणातील भांडवली खर्च देखभालदुरुस्ती निधीतून खर्च करण्यात आला, या निधीतून केलेल्या कामाची तातडी, प्राधान्य, महत्त्व समिती नाकारीत नाही परंतु त्यास लागणाऱ्या निधीची व्याप्ती पाहता, यासाठी विशेष निधी उपलब्ध करून घेण्यास कोणतीही अडचण वा हरकत नव्हती. इतका मोठा खर्च देखभाल दुरुस्तीच्या खर्चातून करणे नक्कीच समर्थनीय नाही. मंत्रालय नूतनीकरणाचे काम देखभाल दुरुस्तीच्या कामांच्या प्रवर्गात मोडत नसले तरीही, अशा आकस्मिक स्थितीमध्ये महाराष्ट्र शासनाच्या मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीने (ज्यामध्ये सचिव, वित्त विभाग, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचा समावेश आहे) मंत्रालय इमारत दुरुस्तीच्या नूतनीकरणाचे काम देखभाल दुरुस्तीच्या लेखाशीर्षामधून करण्याचा निर्णय जाणीवपूर्वक घेतला होता. कारण काम तातडीने सुरू करणे आवश्यक होते, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले, त्यामुळे मंत्रालय इमारत दुरुस्तीचा अपवाद वगळता भविष्यात सार्वजनिक बांधकाम विभागाने देखभाल दुरुस्तीची कामे विभागाच्या १९९१ च्या मार्गदर्शक तत्त्वांप्रमाणेच करावीत तसेच भांडवली-विशेष दुरुस्ती कामे नियमित देखभाल निधीतून करण्यात येऊ नये कारण अशी कामे ज्यादा खर्चिक तर असतातच पण त्यांच्यामुळे देखभाल व दुरुस्तीच्या मंजूर वार्षिक अनुसूचीमधुन अनेक किरकोळ परंतु उच्चतर प्राधान्य असलेली देखभालीची इतर कामे वगळली जातात त्यामुळे, त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी व सन १९९१ च्या मार्गदर्शक सूचना पुन्हा एकदा क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास आणाव्यात व याबाबत केलेली कार्यवाही ३ महिन्यात समितीस द्यावी, अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.३.१.९— निवास करण्यास अयोग्य ठरविण्यात आलेल्या इमारतीवर झालेला अनावश्यक खर्च.

अभिप्राय-

३.२० मॅजेस्टीक आमदार निवास, कुलाबा, मुंबई ह्या इमारतीचे बांधकाम १९०९ मध्ये करण्यात आले आणि ती इमारत हेरीटेज (Heritage) इमारत म्हणून घोषित करण्यात आली. आय.आय.टी. मुंबई आणि एका खाजगी बांधकाम रचना सल्लागार (शशांक मेहेंदळे आणि असोसिएटस) द्वारे ही इमारत निवास करण्यास अयोग्य, धोकादायक आणि असुरक्षित आहे असे घोषित करण्यात आले (मे आणि जून २०१०) महानगरपालिका, बृहन्मुंबई (MCGM) यांनीसुद्धा ही इमारत भग्नावस्थेत आहे आणि त्यात निवास करणे किंवा त्याचा वापर करणे धोकादायक आहे अशी धोक्याची सूचना प्रदर्शित केली (ऑक्टोबर २०१३) असे असूनसुद्धा कार्यकारी अभियंता, प्रेसिडेंसी विभाग, मुंबई यांनी एप्रिल २००९ आणि डिसेंबर २०१५ दरम्यान या इमारतीच्या देखभाल आणि दुरुस्तीवर रु. ९.२० कोटी खर्च केले, असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले.

आमदारांकडून खोल्यांकरीता करण्यात आलेल्या मागण्यांमुळे आणि मुंबईतील निवासव्यवस्थेच्या कमतरतेमुळे मॅजेस्टीक इमारतीतील खोल्या जरी ती इमारत वास्तव्य करण्यास अयोग्य व धोकादायक घोषित करण्यात आली असली तरी, तात्पुरत्या काळाकरिता आमदारांना वास्तव्यास देण्याशिवाय दुसरा पर्याय/विकल्प उपलब्ध नसल्यामुळे प्रेसिडेंसी विभाग, मुंबई यांना आमदारांच्या सूचनेवरून मॅजेस्टीक इमारतीतील नियमित दुरुस्तीची कामे करावी लागली आहेत. इमारत बाजारात गर्दीच्या ठिकाणी स्थित असल्याने सदरील जागा रिक्त करण्यास आणि इमारत पाडण्यास अडचणीची व आपत्तीजनक बाब ठरू शकते. तसेच या प्रकरणी काही गाळेधारक न्यायालयातही गेले आहेत असे समितीसमोर सांगण्यात आले.

माहे डिसेंबर, २०१६ मध्ये सदरील इमारतीतील कक्ष सन्माननीय सदस्यांकडून रिक्त करून घेण्यात आले आहेत. इमारतीमध्ये एकुण २३ व्यावसायिक गाळे असून सदर गाळे रिक्त करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यापैकी काही गाळेधारकांनी निष्कासन प्रकरणी मा.उच्च न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्यांबाबत मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त होणाऱ्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे समितीसमोर सांगण्यात आले.

इमारतीमधील २३ व्यावसायिक गाळ्यांपैकी किती गाळेधारकांनी निष्कासन प्रकरणी उच्च न्यायालयात दावा दाखल केला आहे, सदर न्यायालयीन प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता, मॅजेस्टीक आमदार निवास, कुलाबा, मुंबई ही हेरीटेज इमारत टेक्नीकल ऑडीटच्या आधारे वास्तव्य करण्यासाठी योग्य नाही, असा अहवाल प्राप्त झाला होता असे विभागीय सचिवांनी सांगितले. सन २०१० मध्ये स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये धोकादायक इमारत असल्याचे नमूद असतांना या इमारतीच्या देखभाल दुरुस्तीवर एवढा खर्च कसा केला व सन २०१० नंतर हा खर्च केला आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, मॅजेस्टीक आमदार निवासात जेथून प्रवेश करतो, तेथील भिंतीच्या वरच्या प्रसरण सांध्यामध्ये पूर्वी ३.५ इंचाचा गॅप होता, आता या दगडी भिंतीचा गॅप ५.५ इंचाचा झालेला आहे. त्यामुळे आमदारांना तेथे ठेवणे धोकादायक होते. विभागबाह्य अधिकाऱ्यांकडूनदेखील ही इमारत तपासून घेतली असता, त्यांनीदेखील इमारत रिकामी करून घेणेबाबत सांगितल्यामुळे ही इमारत रिकामी करण्यात आली आहे. इमारतीच्या देखभाल दुरुस्तीवर सन २००९ ते सन २०१५ मध्ये हा खर्च केलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१४ पर्यंत आमदार महोदय या इमारतीमध्ये राहात होते. तोपर्यंत इमारतीचा मेंटेनन्स करणे आवश्यक होते. सन २०१४ नंतर या इमारतीमधील खोल्या कोणाला देण्यात आलेल्या नाहीत डिसेंबर, २०१६ मध्ये ही इमारत आमदारांकडून रिक्त करून घेतली आहे. एप्रिल, २००९ ते डिसेंबर, २०१६ या कालावधीत प्रत्यक्षात आमदारांचे तेथे वास्तव्य होते. त्यामुळे देखभाल दुरुस्ती केलेली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

तसेच याबाबत विधिमंडळ सचिवालयाच्या सूचनेप्रमाणे नवीन प्लॅन तयार करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे येथे आमदारांकरीता निवासाच्या खोल्या आहेत, विधिमंडळात येणारे राष्ट्रकुल संसदीय मंडळाचे प्रतिनिधी व परदेशी प्रतिनिधीच्या वास्तव्यासाठी ९ सूटस तेथे तयार केले जाणार आहेत. सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे जशा सुविधा तशा सुविधा येथे होणार आहेत. तेथे एकूण ३६ खोल्या होणार असून त्यांपैकी २४ आमदारांची निवासव्यवस्था व अद्ययावत स्टेनलेस स्टीलचे किचन बेसमेंटमध्ये राहणार आहे. आमदारांच्या खोल्या ५८० स्क्वेअर फुटाच्या असणार आहेत. याचे सर्व नियंत्रण विधिमंडळाकडे आहे. तेथे मजल्याची मर्यादा वाढविण्यासंदर्भात ती हेरीटेज बिल्डींग आहे, त्यामुळे त्याचे मजले जास्त वाढविता येणार नाही, पण तेथील बेसमेंटचा वापर करण्याचे ठरले होते. बेसमेंटमध्ये पार्कींगची सोय करता येईल व त्यास एका बाजूने एंट्री देता येईल असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले.

शिफारस :

३.२१ सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे १९९१ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार मोडकळीस आलेल्या आणि असुरक्षित इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीस प्राधान्य द्यावयास पाहिजे. परंतु दुरुस्तीची अत्यंत आवश्यकता असलेल्या इमारती उपयोगकर्ता विभागाद्वारे वारंवार तक्रारी करूनही दीर्घ कालावधीसाठी दुर्लक्षित होत्या. मॅजेस्टीक आमदार निवास, कुलाबा, मुंबई या इमारतीचे बांधकाम सन १९०९ मध्ये करण्यात आले आहे आणि सदर इमारत हेरीटेज (Heritage) इमारत म्हणुन घोषित करण्यात आली आहे. आय.आय.टी., मुंबई आणि एका खाजगी बांधकाम रचना सल्लागार (शशांक मेहंदळे आणि असोसिएटस) द्वारे ही इमारत निवास करण्यास अयोग्य, धोकादायक आणि असुरक्षित आहे असे घोषित करण्यात आले. (मे आणि जून २०१०) महानगरपालिका, बृहन्मुंबई (MCGM) यांनी सुद्धा ही इमारत भग्नावस्थेत आहे आणि त्यात निवास करणे किंवा त्याचा वापर करणे धोकादायक आहे अशी सूचना दिली. (ऑक्टोबर २०१३) असे असूनसुद्धा कार्यकारी अभियंता, प्रेसिडेंसी विभाग, मुंबई यांनी एप्रिल २००९ ते डिसेंबर २०१५ दरम्यान या इमारतीच्या देखभाल आणि दुरुस्तीवर रु.९.२० कोटी खर्च केले आहेत. आमदारांकडून खोल्यांकरीता करण्यात आलेल्या मागण्यांमुळे आणि मुंबईतील निवासव्यवस्थेच्या कमतरतेमुळे मॅजेस्टिक इमारतीतील खोल्या जरी ती इमारत वास्तव्य करण्यास अयोग्य घोषित करण्यात आली असली तरी, तात्पुरत्या काळाकरिता आमदारांना वास्तव्यास देण्याशिवाय दुसरा पर्याय/विकल्प उपलब्ध नसल्यामुळे प्रेसिडेंसी विभाग, मुंबई यांनी आमदारांच्या सूचनेवरून मॅजेस्टीक इमारतीतील नियमित दुरुस्तीची कामे करावी लागली आहेत. इमारत बाजारात गर्दीच्या ठिकाणी स्थित असल्याने सदरील जागा रिक्त करण्यास आणि इमारत पाडण्यास अडचणीची व आपत्तीजनक बाब ठरू शकते. तसेच या प्रकरणी काही गाळेधारक न्यायालयातही गेले असल्यामुळे विभागास तात्पुरती दुरुस्ती करणे गरजेचे होते. त्यामुळे विभागाने सदर इमारतीसाठी दुरुस्तीचा खर्च केला आहे, असे समितीसमोर सांगण्यात आले.

विभागाने याबाबत न्यायालयीन प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे याचा आढावा घ्यावा व प्रकरणाचा पाठपुरावा तातडीने करून व इमारतीच्या पुनर्बांधणीमध्ये येणारे अडथळे दूर करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यांत समितीस द्यावी, अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.३.१.१०—रंगलेप कामांच्या निष्पादनात संशयास्पद फसवणूक :

अभिप्राय :

३.२२ घाटकोपर येथील पोलिस क्वार्टर्स येथे १७ इमारती (९८० क्वार्टर्स) आहेत ज्यात रेल्वे पोलिस कर्मचारी राहतात. विभागाने सप्टेंबर, २०१२ ते मार्च, २०१४ (१९ महिने) दरम्यान सर्व ९८० क्वार्टर्सच्या आतील भागांच्या रंगलेपाची कामे केली. तथापि, यादृच्छिक (Random) पद्धतीने निवडलेल्या सात इमारतींच्या (४२० क्वार्टर्स) मोजमाप पुस्तिकेच्या छाननीत निदर्शनास आले की, या क्वार्टर्समध्ये एकाच कालावधीत दोन वेळा रु.६२.०६ लक्ष किंमतीची रंगलेपाची कामे निष्पादित करण्यात आली. लोहमार्ग पोलिस मुख्यालय, घाटकोपरद्वारे करण्यात आलेल्या (फेब्रुवारी, २०१५) आंतरिक सर्वेक्षणातही असे आढळले की, ४२० पैकी २२२ क्वार्टर्समध्ये रंगलेपाची कामे प्रत्यक्षात करण्यातच आली नाही परंतु मागील पाच वर्षांत (२०१०-१५) यावर रु.३२.७८ लक्ष खर्च करण्यात आल्याचे दर्शविले आहे. १९ महिन्यांच्या कालावधीत रंगलेपाचे काम दोन वेळा केल्यामुळे शासकीय इमारतीच्या आतील बाजूच्या रंगलेपाच्या कामाकरिता नेमून दिलेल्या कालावधीचे (जे १९९१ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या परिशिष्ट 'F' प्रमाणे तीन वर्षांतून एकदा आहे) उल्लंघनच होत नाही तर सर्वेक्षणाच्या निष्कर्षावरून पोलिस क्वार्टर्सच्या रंगलेपाच्या कामात संशयित फसवणूक झाल्याचे दिसते. कंत्राटदाराला भुगतान करण्यापूर्वी जर उपयोगकर्त्याकडून याची तपासणी वा आढावा घेण्यात आला असता तर, सर्वेक्षणाचा उद्देश योग्य सफल झाला असता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

महालेखाकारांसमवेत यासंबंधी झालेल्या निर्गमन परिषदेत सदर कामांची चौकशी करण्याचे निर्देश दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन यांना दिलेले असुन चौकशीची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याचे विभागाने मान्य केले. समितीने याबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता हे चौकशीचे आदेश विभागाने केव्हा दिले व याची सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ही बाब सन २०१४-२०१५ मध्ये लेखापरीक्षणानंतर लक्षात आली. दिनांक ४ फेब्रुवारी २०१५ रोजी चौकशी सुरू केली आहे. आता चौकशी अहवाल प्राप्त झालेला आहे. चौकशीच्या निष्कर्षामध्ये नमूद केले आहे की, येथील मूळ बांधकाम पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून झाले होते. बी.जी. कन्ट्रक्शन्स टेक्नॉलॉजी प्रा.लि., पुणे हे कंत्राटदार होते. येथे रंगरंगोटीची कामे करून घेण्यात आली. तीन वर्षांची अनुज्ञेयता असते, परंतु त्याच्या आतमध्येच दुसऱ्यांदा ही रंगरंगोटी करण्यात आली. हे काम झालेले नाही, असे महालेखाकारांचे मत आहे. याबाबत स्पष्टीकरण देण्यास समितीने सांगितले असता, याबाबत पोलीस गृहनिर्माण महामंडळाकडून निरीक्षण करण्यात आले, तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी तेथे उपस्थित नव्हते. त्यानंतर पुन्हा रहिवाशी

व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यासमवेत एकत्रित चर्चा करण्यात आली. पोलीस गृहनिर्माण महामंडळाने मुद्दा उपस्थित केला होता की, कामे झालेली नाहीत. आता त्यांनी स्वत: पाहिले आहे व समाधान व्यक्त केलेले आहे याबाबतच्या चौकशी अहवालाचा निष्कर्ष समितीसमोर सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले असता मग सदरहु आक्षेप महालेखापालांनी कशाच्या आधारे घेतला अशी विचारणा समितीने महालेखाकारांना केली असता लोहमार्ग पोलीस मुख्यालयाचे निवासी अधिकारी यांनी उपअभियंता यांना तसे पत्र दिल्याचे सांगण्यात आले. मात्र या पाहणीवेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचा कर्मचारी सोबत घेतला नव्हता असे विभागाचे म्हणणे आहे. डबल रंगरंगोटीचे कारण मूळ बांधकामाच्या डिफेक्ट लायबीलीटीमध्ये काही दुरूस्त्या उद्‌भवल्या होत्या, हे काम मूळ कंत्राटदाराने केले आहे. जे पोलीस गृहनिर्माण महामंडळाच्या अंतर्गत होते. या दुरूस्त्या करण्यापूर्वी एकदा रंगरंगोटी झाली होती. या दुरूस्त्या झाल्यानंतर पुन्हा रंगरंगोटीची आवश्यकता भासली आहे. त्यामुळे सहाजिकच रंगरंगोटी पुन्हा करण्यात आली असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले. यासंदर्भात महालेखाकारांचे म्हणणे आहे की, २२२ क्वॉटर्सची रंगलेपाची कामे झालेली नाहीत महालेखाकारांनी कशाच्या आधारे हे आक्षेप नोंदविले आहेत. अशी विचारणा समितीने केली असता, लोहमार्ग पोलीस मुख्यालयाचे निवासी अधिकाऱ्याचे पत्र उप अभियंता यांना दिले आहे की, काही क्वॉटर्समध्ये रंगलेप झाल्याचे दिसत नाही. याबाबत अहवालामध्ये आलेले आहे की, त्यांनी पाहणी करताना सार्वजनिक बांधकाम विभागाचा कोणताही कर्मचारी सोबत घेतलेला नाही असे विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले.

शिफारस-

३.२३ घाटकोपर येथील ९८० पोलीस क्वॉटर्सपैकी ४२० क्वार्टर्सला एकाच कालावधीत दोनदा रंगरंगोटी केल्याचे दाखवले गेले. मात्र ४२० पैकी २२२ क्वार्टर्सला रंगरंगोटी झालेली नव्हती असा याप्रकरणी मूळ आक्षेप आहे. सदरची बाब महालेखापालांनी कशाच्या आधारे घेतली. अशी विचारणा समितीने केली असता लोहमार्ग पोलीस मुख्यालयाचे निवासी अधिकारी यांनी उप अभियंता यांना तसे पत्र दिल्याचे सांगण्यात आले, मात्र त्यांनी पाहणीवेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचा कर्मचारी सोबत घेतला नव्हता असे विभागाचे म्हणणे आहे. याबाबत विभागाने पुढे असे सांगितले की, दोनदा रंगरंगोटीचे कारण मूळ बांधकामाच्या डिफेक्ट लायबीलीटी कालावधीमध्ये काही दुरूस्त्या उद्‌भवल्या होत्या, हे काम मूळ कंत्राटदाराने केले आहे, जे पोलीस गृहनिर्माण महामंडळाअंतर्गत होते. या दुरुस्त्या करण्यापूर्वी एकदा रंगरंगोटी झाली होती. या दुरुस्त्या झाल्यानंतर पुन्हा रंगरंगोटीची आवश्यकता भासली आहे, त्यामुळे सहाजिकच रंगरंगोटी पुन्हा करण्यात आली. विभागाने झालेल्या कामांची मुख्य अभियंता स्तरावरुन दक्षता व गुणनियंत्रण मंडळामार्फत तपासणी करावी व तपासणीमध्ये जी कामे झालेली नाहीत व दोनदा रंगरंगोटी केल्याचे दाखविले आहे असे आढळून येईल त्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.३.१.११ : कमकुवत आंतरिक नियंत्रण आणि संनियंत्रण

अभिप्राय-

३.२४ प्रभावी आंतरिक नियंत्रण चुर्कीची आणि अनियमिततेची जोखीम कमी करते आणि उधळपट्टी, दुरुपयोग आणि गैरव्यवस्था यामुळे होणाऱ्या हानीस रोखून साधनसंपत्ती टिकविण्यास मदत करते. सार्वजनिक बांधकाम विभागातील आंतरिक नियंत्रण आणि संनियंत्रणाच्या पद्धतीत कमकुवतपणा आढळला, सात पैकी चार मंडळांनी देखभाल व दुरुस्ती कामाच्या प्रगतीचा आढावा घेण्याकरिता २०१०-१५ दरम्यान उपयोगकर्ता विभागासोबत त्रैमासिक बैठक आयोजित केली नाही. मंडळाचे अधीक्षक अभियंता देखभाल व दुरुस्तीची कामे सुरू असताना त्यांचे प्रत्यक्ष निरीक्षण नियमितपणे करत होते परंतु विभागीय स्तरावर, १३ पैकी फक्त तीनच विभागांच्या कार्यकारी अभियंत्यांनी २०१०-१५ दरम्यान देखभाल व दुरुस्ती कामांचे नियमितपणे निरीक्षण केले. महाराष्ट्र शासनाने नमूद केले की निरीक्षण नियमितपणे करण्यात आले परंतु निष्कर्षांचे दस्तावेज तयार करण्यात आले नाहीत. निरीक्षण प्रक्रियेचे दस्तावेज तयार न केल्यामुळे प्रभावी संनियंत्रण आणि देखभाल व दुरुस्तीच्या कामांच्या निष्पादनात दाखविण्यात आलेल्या त्रुटींचा पाठपुरावा करणे यात अडथळा निर्माण होऊ शकतो. निविदेच्या अटींनुसार, बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्याची गुणवत्ता कंत्राटदाराद्वारे शासकीय प्रयोगशाळेत तपासून घ्यावयास हवी. दक्षता आणि गुणवत्ता नियंत्रण मंडळाद्वारे कंत्राटदारास प्रमाणपत्र देण्यात येते जे कंत्राटदाराच्या चालू लेखा देयकासोबत दाव्यांचा निपटारा करण्याकरिता जोडलेले असावयास हवे. उत्तर मुंबई विभागात, चालू लेखा देयकांसोबत जोडलेल्या २९ गुणवत्ता प्रमाणपत्रांच्या लेखापरिक्षा पडताळणीत आढळले की २९ पैकी २५ प्रमाणपत्र दक्षता आणि गुणवत्ता नियंत्रण मंडळाद्वारे जारी करण्यात आली नव्हती, यावरून कामाच्या गुणवत्तेत तडजोड करण्यात आली आहे असे निदर्शनास येते. महाराष्ट्र शासनाने या गंभीर चुर्कीमुळे १९ अभियंत्यांना सप्टेंबर, २०१५ मध्ये निलंबित केले होते आणि संबंधित संशयित कंत्राटदारांची नावे काळ्या यादीत टाकण्यासाठी कारवाई सुरू करण्यात आली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मे, १९८८ च्या परिपत्रकाप्रमाणे, सर्व अधीक्षक अभियंत्यांनी प्रत्येक देखभाल दुरुस्तीच्या कामांना प्रदान केलेले जॉब क्रमांक दर्शविणारी नियंत्रण नोंदणी पुस्तिका ठेवणे आवश्यक होते. ही नियंत्रण पुस्तिका कामाच्या प्रगतीवर संनियंत्रण आणि वाटप केलेल्या निधीतून केलेल्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. परंतु २०१०-१५ दरम्यान सात पैकी चार मंडळांनी नियंत्रण नोंदणी पुस्तिका ठेवलीच नाही. जॉब क्रमांकाकरिता नियंत्रण नोंदणी पुस्तिका न ठेवणे हे जादा कामांना मंजुरी दिल्यामुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक दायित्व जमा होण्यामागील एक कारण आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मे, २००६ च्या परिपत्रकाप्रमाणे, देयकांचे प्रदान करतांना पारदर्शितेची खात्री करण्याकरिता आणि प्रदान करतेवेळी कंत्राटदारांच्या पक्षपाती वागणूक देण्याच्या अनावश्यक तक्रारी टाळण्याकरिता, सर्व विभागांनी, एक प्रलंबित देयक पुस्तिका ठेवावयास पाहिजे ज्यात कंत्राटदाराच्या चालू लेखा देयकाची नोंद घ्यावयास पाहिजे. परंतु २०१०-१५ दरम्यान १३ पैकी सात विभागांद्वारे प्रलंबित देयक पुस्तिका ठेवण्यात आल्या नाही.

सन २०१५ ते २०१८ या कालावधीत सर्कल पातळीवर किती बैठका झाल्या अशी विचारणा समितीने केली असता, या कालावधीत प्रत्येक मंडळांतर्गत बैठका झालेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. समितीची एप्रिलमध्ये बैठक झाली होती. त्यानुसार सर्वांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. २३ सर्कलपैकी १२ सर्कल्समध्ये विभागांना बोलावून बैठका घेण्यात आल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले. विभागाने सन २०१५ मध्ये १९ अभियंत्यांना निलंबित केले होते. त्यांच्याबद्दल पुढील कोणती कारवाई करण्यात आली आहे. आपण किती कंत्राटदारांना काळया यादीत टाकले आहे अशी विचारणा समितीने केली असता, १८ कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकलेले आहे. शासनाने त्यास परवानगी दिलेली आहे. प्रत्यक्षात त्यांना काळया यादीत टाकल्याचे प्रमाणपत्र देखील आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले असता, यास जबाबदार अभियंत्यांवर काय कारवाई केली. तसेच ज्या कंत्राटदार कंपनीला काळ्या यादीत समाविष्ट केले, त्याच कंत्राटदारांनी अन्य नावाने कंपनी उघडली आहे, हे खरे आहे काय ? एखाद्या नावाची एक कंपनी आहे. त्या कंपनीला काळया यादीत टाकले. पण नावात बदल करून कंपनी काढली. तसे येथे झाले काय? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत पडताळणी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. तसेच अभियंत्यांविरुद्धची दोषारोप पत्रे अजून व्हावयाची आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अभियंत्यांना सन २०१३ मध्ये निलंबित केले आहे. तीन वर्ष झाल्यानंतर देखील दोषारोपपत्रे तयार होत नाही? याचा अर्थ हे संगनमताने होत आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. या सर्व गोष्टीला विभागाचे समर्थन आहे असा आक्षेप समितीने घेतला तर तो चुकीचा होणार नाही. पहिला मुद्दा गुन्हा दाखल करण्याबाबतचा होता. त्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात आलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. त्याच्याशी समिती सहमत आहे. परंतु ज्यांना निलंबित केले त्यांच्याविरोधात तीन वर्षे विभागीय चौकशी का सुरू केली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय चौकशी सुरू करताना अगोदर त्याचे पुरावे गोळा करावे लागतात असे विभागीय सचिवांनी सांगितले. पुराव्यांशिवाय त्यांना निलंबित कसे केले? निलंबन म्हणजे शिक्षा नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, प्राथमिक चौकशीमध्ये अपहार झाल्याचे आढळून आल्यास निलंबन करता येते व त्याप्रमाणे या प्रकरणात देखील निलंबन करण्यात आलेले आहे. या प्रकरणाबाबतची माहिती महिन्याभरात सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले. यामधील काही लोक सेवानिवृत्त देखील झाले असतील. सप्टेंबर, २०१५ पासून आता सन २०१८ पर्यंत ३ वर्षे पूर्ण झाले आहेत. तरीही या प्रकरणी विभागीय चौकशी सुरू करण्यासाठी आणखी सहा महिन्यांचा कालावधी मागण्यात येत आहे. ही बाब गंभीर नाही का? असे मत समितीने व्यक्त केले असता, तीन महिन्यांमध्ये विभागीय चौकशी सुरू करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शिफारशी-

३.२५ (१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आंतरिक नियंत्रण व संनियंत्रण पद्धतीबाबत महालेखापालांनी आक्षेप घेतला की, विभागाने (१) देखभाल दुरुस्तीसंबंधी उपयोगकर्त्या विभागासोबत २०१०-१५ या कालावधीत बैठका घेतल्या नाहीत, (२) देखभाल दुरुस्तीच्या कामावेळी अधीक्षक अभियंता यांनी प्रत्यक्ष निरीक्षण केले नाही. (३) बांधकाम साहित्याची गुणवत्ता प्रयोगशाळेत तपासली नाही. (४) जॉब क्रमांक न देताही कामे करण्यात आली. याबाबत विभाग कोणतेही समर्थनीय व ठोस उत्तर देऊ शकला नाही. सबब, विभागाने बांधकामाच्या बाबतीत ज्या कंत्राटदारांकडून गुणवत्तेप्रमाणे काम होणार नाही त्यांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करावी व जे अभियंते अपेक्षेप्रमाणे बैठका घेणे, प्रत्यक्ष निरीक्षण करणे इ.नेमून दिलेली कामे करणार नाहीत, त्यांचेविरुद्ध तात्काळ विभागीय चौकशी सुरू करून कारवाई करावी व केलेली कारवाई समितीला ३ महिन्यांत कळवावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२६ (२) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मे, २०१६ च्या परिपत्रकाअन्वये देयकांचे प्रदान करताना पारदर्शकतेची खात्री करण्याकरिता आणि प्रदान करतेवेळी कंत्राटदारांच्या पक्षपाती वागणूक देणाऱ्या अनावश्यक तक्रारी टाळण्याकरिता सर्व विभागांनी एक प्रलंबित देयक पुस्तिका ठेवावी अशा मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामध्ये कंत्राटदारांच्या चालू लेखा देयकांची नोंद ठेवण्यात यावी अशी तरतूद आहे. परिपत्रकातील तरतूदी विभागाने पुन्हा एकदा क्षेत्रीय कार्यालयांच्या निदर्शनास आणाव्यात व सदर तरतूदीप्रमाणे क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही करण्यात येत असल्याची खात्री करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.३.६ कामाच्या अतिरिक्त बाबींना अनियमित मंजुरी :-

अभिप्राय :

३.२७ सार्वजनिक बांधकाम विभागाने नंदूरबार-तळोदा मार्गावरील हातोडा येथे तापी नदीवर रु.३०.१९ कोटी अंदाजित खर्चात मोठा पूल बांधण्याच्या कामासाठी लम्पसम तत्वावरील निविदा सप्टेंबर, २००८ मध्ये मागविली. कामाची जागा गुजरात तसेच महाराष्ट्र राज्यामध्ये व्यापलेली होती. गुजरात राज्यातील उकाई धरणाच्या १२० कि.मी सखल भागातील बँकवॉटर आणि तापी नदीच्या उर्ध्व भागाकडील हतनूर धरण आणि सूलवाडा, सारंगखेडा आणि प्रकाशा बंधाऱ्या मधून होणाऱ्या उत्सर्जनाचा परिणाम या स्थानावर होत होता. उपरोक्त धरण / बंधाऱ्या मधून होणाऱ्या अनियमित उत्सर्जनामुळे पुलाचे काम करण्यासाठी पाण्याची न्यूनतम पातळी निश्चित करणे कठीण होते. अतः रेखांकने ही ढोबळ स्वरुपाची व दर्शक स्वरुपाची असून कंत्राटदाराने त्याचे काम त्यानुसार नियोजित करावे असे निविदेतील अटींमध्ये स्पष्टपणे नमूद करण्यात आले होते. तसेच, काम प्रगतीपथावर असताना पाण्याच्या न्युनतम पातळीत बदल झाल्यास त्यासाठी कामाच्या अतिरिक्त बाबीचा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नव्हता. कामाच्या जागेच्या स्थितीनुसार पाण्याच्या प्रवाहातदेखील काम केले जाईल अशाप्रकारे स्वाक्षांकीत घोषणापत्र कंत्राटदाराने देण्याची अट देखील निविदेमध्ये नमूद केली होती त्यानुसार रु. ३४.४० कोटी खर्चाचा मोठा पूल बांधण्याचे लम्पसम (Lumpsum) कंत्राट राजदीप बिल्टकॉन प्रायव्हेट लिमिटेड (कंत्राटदार) यांना फेब्रुवारी, २००९ मध्ये दिले. सदर काम फेब्रुवारी, २०११ पर्यत पूर्ण करावयाचे होते कंत्राटदाराला मार्च २०१६ पर्यंत चार वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. सप्टेंबर, २०१५ पर्यंत त्यावर रु. ४२.१९ कोटी खर्च करण्यात आला होता व डिसेंबर, २०१५ रोजी काम प्रगतीपथावर होते. निविदेतील अटींनुसार कंत्राटदाराने त्याला कामाच्या जागेच्या परिस्थितीविषयी आणि काम प्रत्यक्ष पाण्यात करावे लागणार असल्याविषयी जाणीव असल्याचे स्वाक्षांकीत घोषणापत्र देखील दिले असताना जानेवारी, २००९ मध्ये किंमतीविषयी वाटाघाटी करताना कंत्राटदाराने असे नमूद केले की, सदर पूलाची जागा अशा ठिकाणी आहे की जेथे प्रस्तावित जागेवरील उर्ध्व तसेच सखल बाजूस धरण असल्याने संपूर्ण काम पाण्याच्या प्रवाहात करावे लागणार आहे. या जागेची परिस्थिती लक्षात घेता तेथे तात्पुरता बंधारा (cofferdams) बांधणे तसेच पाण्याचा उपसा करणे, कामाच्या जागेवर तात्पुरत्या पायऱ्या बांधणे आणि जागेपर्यंत पोहोचणे यावरील खर्च मोठया प्रमाणावर होणार होता. कंत्राटदाराने पुढे असेही मत व्यक्त केले की, रु. ३४.४० कोटी बोली / प्रस्ताव सर्वात योग्य आणि अंतिम होता. कारण, तो एका तज्ञ संरचना सल्लागाराने निश्चित केलेल्या प्रमाणाच्या आणि सध्याच्या बाजारातील परिस्थिती नुसार केलेल्या दर विश्लेषणाच्या आधारावर करण्यात आला होता तरीही निविदेतील अटींच्या तसेच किंमतीच्या वाटाघाटी दरम्यान कंत्राटदाराने दिलेल्या स्पष्टीकरणाच्या विरुद्ध, विभागाने पाण्याची पातळी वाढल्यामुळे पीयर्सच्या ठिकाणी विहीरीचा पाया खणण्यासंबंधीच्या कामासाठी बंधारा, तात्पुरता पूल, कामासाठी फलाट इत्यादींचे बांधकाम करण्यासाठी कंत्राटदाराने नोव्हेंबर, २०१३ रोजी केलेल्या विनंतीमुळे रु. ४.४८ कोटींची अतिरिक्त बाबींची दर यादी (EIRL) डिसेंबर, २०१३ रोजी मंजूर केली. पूलाचे बांधकाम लवकर पूर्ण होण्यासाठी होत असलेली जनतेची मागणी लक्षात घेऊन, तसेच पीयर्ससाठी पाण्याची पातळी खूपच जास्त असल्यामुळे अतिरिक्त बाबींच्या दर यादीस मंजूरी देण्यात आली असे विभागाने सांगितले. कंत्राटदाराच्या रु.४.४८ कोटींच्या अतिरिक्त बाबींच्या दर यादीस मंजूरी देणे ही अनियमितता होती. असा आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविला आहे.

नंदूरबार तळोदा रस्त्यावर तापी नदीवर हातोडा गावाजवळ नंदूरबार सज्जीपूर तळोदा रस्त्यावर मोठ्या पुलाचे बांधकाम करायचे होते. या कामासाठी ' क ' नमुन्यातील (Lump sum Contract) निविदा किंमत रु.३०.९० कोटी रक्कमेची निविदा मागविण्यात आली होती व या कामासाठी रु. ३४.४० कोटी इतक्या रकमेची निविदा स्विकृत करण्यात आली होती. हे कंत्राट लम्पसम असल्यामुळे अतिरिक्त बाबींचा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नसतांनाही विभागाने तो विचारात घेऊन कंत्राटदारास रु.४.४८ कोटींच्या अतिरिक्त बाबीस मंजूरी देण्याची कारणे समितीने तपासली असता काम करतांना पाण्याची वाढलेली पातळी हे यामागील कारण असल्याचे समितीस सांगण्यात आले. गुजरात सरकारने उकाई धरणाचे प्लगींग केल्यामुळे पाण्याची पातळी ६ मीटरने वाढली त्यामुळे बांधकाम केलेल्या भिंती पाण्याच्या खाली जायला लागल्या. पाण्याची पातळी कमी होण्याची वाट पाहिली असती तर या कामासाठी जास्त कालावधी लागला असता व यासाठी कंत्राटदाराला किंमत वाढ (Escalation) द्यावे लागले असते त्यावेळी विभागाकडे उपलब्ध असलेल्या ३-४ पर्यायांपैकी हा सर्वात कमी खर्चिक पर्याय उपलब्ध होता या सर्व बाबींचा विचार करून कॅशऑन पद्धतीचे काम करण्याचा व्यवहार्य पर्याय स्विकारण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

वास्तविक पाण्याच्या अनियमित उत्सर्जनापुढे पाण्याची न्यूनतम पातळी निश्चित करणे कठीण होते त्यामुळेच हे कंत्राट लम्पसम पद्धतीने दिले असताना अशाप्रकारे पाण्याच्या पातळीतील तफावतीमुळे खर्चात आलेल्या वाढीची जबाबदारी ही कंत्राटदारानेच स्वीकारणे कंत्राटातील अटी शर्तीनुसार बंधनकारकच होते व त्याप्रकारचे साक्षांकित घोषणापत्र देखील कंत्राटदाराने दिले होते त्यामुळे अतिरिक्त प्रदानाचा याठिकाणी प्रश्नच उद्‌भवत नाही. लम्पसम टेंडर काढण्याचा मूळ उद्देशच हा असतो की त्या कामाची सर्वच नफा-तोटयाची जबाबदारी कंत्राटदाराचीच असते. मुळात कामाची किंमत रु.३४.४० कोटी असताना ती रु.४२ कोटी झाली व त्यातही ४.४८ कोटींचे अतिरिक्त प्रदान केले. जर विभागाला हे प्रकरण अशाच पद्धतीने हाताळायचे होते तर उपरोक्त सर्व शक्यतांचा विचार मूळ अंदाजपत्रकातच विभागाने करणे आवश्यक होते.

पुलांचे बांधकाम लवकर पूर्ण होण्यासाठी जनतेची होत असलेली मागणी लक्षात घेऊन तसेच पिअर्ससाठी पाण्याची पातळी खूपच जास्त असल्यामुळे अतिरिक्त बाबींच्या दर वाढीला मंजुरी देण्यात आली. ही बाब निश्चितच समर्थनीय नाही. अंदाजपत्रक तयार करताना, या सर्व शक्यता व बाबी गृहीत धरूण विभागाने प्रकल्पाचे व निधीचे नियोजन करणे अभिप्रेत होते. एवढेच नव्हे तर या तापी नदीवर या अगोदर पाच ते सहा पूल झालेले आहेत. त्यावेळी काम करतांना रॉक लेव्हल बदलल्यामुळे जास्त पैसे लागले आहेत. असे असतांनाही त्या पुलांचा अनुभव याठिकाणी वापरण्यात आला नाही. उकाई धरणाला प्लगींग केल्यामुळे पाण्याची पातळी वाढली व बँक वॉटरची पातळी वाढल्यामुळे विभागाकडील फाउंडेशनच्या कामाची सिस्टीम बदलावी लागली. अशा प्रकारची कारवाई करतेवेळी गुजरात सरकारने महाराष्ट्राची परवानगी घेतली नव्हती कारण धरणाची उंची वाढविण्यासाठी परवानगी लागते परंतु गळती असलेल्या धरणाचे प्लगिंग करण्यासाठी परवानगी लागत नाही. त्यापुढे पाण्याची पातळी निश्चित करणे कठीण होते. असे असतांना धरणाचे अंदाजपत्रक तयार करतांना धरणाच्या पाण्याच्या पातळीची कमालमर्यादा ग्राहय धरणेच आवश्यक होते परंतु, तसे न करता गळतीमुळे खाली गेलेल्या पाण्याची पातळी ग्राह्य धरुन हे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. ही बाब निश्चितच योग्य नसून नियोजनातील त्रुटी दर्शविणारी आहे. गुजरात सरकारने हे प्लगिंग सदरहू पुलाचे बांधकाम झाल्यानंतर केले असते व पाण्याची पातळी नंतर वाढली असती तर काय परिस्थिती उद्भवली असती याबाबत समितीने विचारणा केली असता पुल बांधून झाल्यावर पाण्याची पातळी वाढली असती तरी पुलाच्या बांधकामाला कोणताही धोका नव्हता. फक्त ही कामे सुरू असताना प्लगिंगमुळे वाढलेल्या पाण्याच्या पातळीमुळे फाऊंडेशनमध्ये बदल करावा लागला गत ३० वर्षाची पाण्याची पातळी विचारात घेऊन उंची ८९ मीटर निश्चित करून देण्यात आली होती परंतु, ही उंची नंतर ९६ मीटर झाली त्यामुळे हा वाढीव खर्च विभागाने मान्य केला असे समितीसमोर सांगण्यात आले. उपरोक्त सर्व वस्तुस्थिती असली तरीही या सर्व बाबींची माहिती असल्याचे घोषणापत्र कंत्राटदाराने विभागाला सादर केले तसेच हे संपूर्ण डिझाईन कंत्राटदाराने तयार केलेले असतानाही कंत्राटदाराची बाजू घेऊन शासनाचे नुकसान करणारे निर्णय घेणे निश्चितच समर्थनीय नाही. लम्पसम कंत्राटाचा उद्देशच हा असतो की, ही सर्व जोखीम व अतिरिक्त खर्च झाल्यास तो कंत्राटदाराने सोसणे बंधनकारक असते. अन्यथा हे कंत्राट वाढीव दराने लम्पसम म्हणून देण्याचे विभागाला कोणतेही कारण नव्हते. एका बाजूने वाढीव दराने लम्पसम कंत्राट मंजूर करायचे व दुसऱ्या बाजूला खर्चाच्या अतिरिक्त बाबीही मंजूर करायच्या असे विभागाला कदापि करता येणार नाही. केवळ नैसर्गिक आपत्ती वा फोर्स मेजर असेल तरच अशा प्रकारचा विचार विभागाने केला असता तर एकवेळ समिती समजू शकते. एखाद्या प्रकल्पाची किंमत वस्तुतः काम करताना वाढली अथवा कमी झाली तर, त्याची संपूर्ण जबाबदारी ही कंत्राटदाराचीच असेल यालाच लम्पसम कंत्राट म्हणतात. मग ह्या अतिरिक्त बाबींची आर्थिक जबाबदारी विभागाने स्वीकारण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. असे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारस :-

३.२८ नंदूरबार तळोदा मार्गावरील हातोडा येथे तापी नदीवर मोठा पूल बांधण्याचे लम्पसम कंत्राट देण्यात आले होते. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका १९८४ च्या परिच्छेद १९२ नुसार लम्पसम कंत्राटात कंत्राटदाराने निर्धारित किंमतीत रेखांकन व वैशिष्ट्यांसह संपूर्ण काम त्यातील जोखमींसह पूर्ण करावयाचे असतानांही व या सर्व बाबी कंत्राटदाराने स्वाक्षांकीत घोषणापत्र सादर करून मान्य केल्या असतानांही विभागाने कंत्राटदारास अतिरिक्त बाबींसाठी रु.४.४८ कोटींचे प्रदान केले जे अनियमित होते. त्यामध्ये जागेच्या स्थितीनुसार पाण्याच्या प्रवाहात काम केले जाईल अशा प्रकारचे स्वाक्षांकित घोषणापत्र कंत्राटदाराने देण्याची अट निविदेमध्ये नमूद होती. कंत्राटाची किंमत ३४.४० कोटी रूपये असताना त्यात काम चालू असतांना ८ कोटी रूपये वाढ होऊन प्रकल्पाची किंमत ४२ कोटी रूपये झाली होती. त्यामध्ये पुन्हा अतिरिक्त बाबींसाठी वाढीव किंमत म्हणून रु. ४.४८ कोटी रुपये कंत्राटदारास देण्यात आले.

उकाई धरणाच्या बँक वॉटरमुळे पूलाची उंची वाढवावी लागली. ही कार्यवाही गुजरात शासनाने केली. हे धरण पूल बांधण्यापूर्वी अस्तित्वात होते. शिवाय हा प्रकल्प आंतरराज्यीय असल्यामुळे पाणी वाटप लवादानुसार त्याचा परिणाम महाराष्ट्र राज्यावर झालेला होता. ह्या धरणाची गळती होत होती व ती थांबविण्यासाठी प्लगिंग करावे लागले. धरणाची गळती थांबल्यानंतर पाण्याची पातळी वाढली, परिणामी फाऊंडेशनच्या कामाची सिस्टीम बदलावी लागली असे गृहीत धरुन कंत्राटदारास अतिरिक्त बाबींसाठी रकमेचे प्रदान करण्यात आले. पाण्याच्या अनियमित उत्सर्जनामुळे पुलाचे काम करतांना पाण्याची न्यूनतम पातळी निश्चित करणे कठीण होते त्यामुळेच हे कंत्राट लम्पसम पद्धतीने देण्यात आले. याबाबतची माहिती असल्याचे घोषणापत्र देखील कंत्राटदाराने विभागाला सादर केले. असे असेल तर कंत्राटदाराने दिलेल्या घोषणापत्राला कोणताही अर्थ राहत नाही. कंत्राटदाराने सर्व स्थिती जाणूनच टेंडर भरले होते व या सर्व बाबी कराराच्या अटी व शर्तीमध्ये नमूद होत्या. प्रकल्पाचे डिझाईन देखील कंत्राटदाराने तयार केले असे असताना शासनाने त्याला वाढीव रक्कम देणे योग्य नाही. विभाग कंत्राटदारास लम्पसममध्ये काम देतो व त्यानंतर त्याचा जादा कामाचा मोबदला मंजूर केला जातो ही विभागाची कृती नियमबाह्य असून निश्चितच समर्थनीय नाही. करारनाम्यानुसार विभागाने कंत्राटदाराकडून काम करून घेणे अपेक्षित असताना व कंत्राटदार काम करेल असे त्याने मान्य केले असताना विभागाने त्याला वाढीव किंमत दिली.

एवढेच नव्हे तर आतापर्यंत तापी नदीवर पाच ते सहा पूल झाले त्या कामांसाठी त्यावेळी लेव्हल बदलल्यामुळे जास्त पैसे लागले आहेत याची माहिती विभागाला असतानाही व जे पूल अगोदर झाले त्यांचा अनुभव विभागाने विचारात घेणे आवश्यक व अभिप्रेत होते. यामध्ये विभागाचे नियोजन पूर्णतः चुकले आहे. असे समितीचे मत आहे.

ज्या कामाचे स्वरुप निश्चित नसते अशा कामासाठी लम्पसम कंत्राट काढण्यात येते. लम्पसम कंत्राटाच्या कामाची किंमत अगोदरच वाढविलेली असते. हे काम वेगळया प्रकारचे असल्याने व पाण्याच्या पातळीची अनिश्चितता आहे. तसेच बँक वॉटर किती असणार हे माहिती नाही. त्यामुळे यामध्ये अडचणी निर्माण होणार असल्याने या प्रकल्पाचे लम्पसम कंत्राट दिले होते. तसेच पुलाचे जेथे विहीर पद्धतीचे पाये केले जातात आणि ज्या पद्धतीने पुलाचे फाऊंडेशन लेव्हल आणि ज्या ठिकाणी खडकाची अनिश्चितता असते त्या ठिकाणी विभागांकडून लम्पसम टेंडर्स काढण्यात येतात. अशा परिस्थितीत विभागाने एका बाजूला लम्पसम कंत्राट मान्य करायचे आणि दुसऱ्या बाजूला अतिरिक्त बाबी मान्य करायच्या या दोन बाबी शासनास एकत्रित करता येणार नाहीत. लम्पसम कंत्राट देताना डिझाईनची जबाबदारी विभागाकडून संबंधित कंत्राटदाराला देण्यात आली होती. त्याशिवाय त्याने डिझाईननुसार त्यांचे मूल्य कोट करावे असे त्यांना सांगण्यात येते असे असताना सुद्धा कंत्राटदारास वाढीव किंमत देणे कदापि समर्थनीय नाही.

हे संपुर्ण प्रकरण अतिशय गंभीर स्वरुपाचे असून शासनाचे आर्थिक नुकसान करणारे व कंत्राटदाराचे नियमबाहयरित्या आर्थिक हित जपणारे आहे. अतः विभागाने याप्रकरणी संबंधित सर्व अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करावी. तसेच संबंधित कंत्राटदारास नियमबाह्यरित्या देण्यात आलेल्या रु.४.४८ कोटी वसूलीची कार्यवाही तसेच अन्य कायदेशीर कार्यवाही शासनाने करावी व वसूली न झाल्यास संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांकडून वसूली करून याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.३.७- आकस्मिक कामांसाठीची तरतूद अनधिकृतपणे वळविणे

अभिप्राय :-

३.२९ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम (MPW) नियमपुस्तिका, १९८४ च्या परिच्छेद १४५ नुसार कामांच्या अंमलबजावणीदरम्यान अचानक उद्‌भवणाऱ्या आकस्मिक बाबींसाठी स्वतंत्र उपशीर्ष " आकस्मिकता " अंतर्गत कामाच्या अंदाजित किंमतीच्या पाच टक्के इतकी तरतूद करावी. खर्चाच्या ज्या बाबीसाठी अंदाजपत्रकात तरतूद केली नसेल व ती बाब त्या कामाशी कितीही निगडीत असेल तरी त्या नवीन बाबीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मंजुरी प्राप्त केल्याशिवाय तरतूद वळविण्यात येऊ नये अशी तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम (MPW) नियम पुस्तिकेच्या परिशिष्ट ४२ (अनु क्र. १४) नुसार " आकस्मिकता " अंतर्गत अंदाजपत्रकामध्ये केलेली तरतूद त्याच अंदाजपत्रकात तरतूद न केलेल्या एखाद्या नवीन बाबीसाठी वळविण्याचे संपूर्ण अधिकार अधीक्षक अभियंता यांना देण्यात आलेले आहेत. असे असतानाही नवेनगर-महाड, जिल्हा रायगड येथे भांडार गृह आणि अभिलेख कक्ष बांधण्यासाठी २५ कामांतील आकस्मिक खर्चासाठीची रु. १.४५ कोटीची तरतूद वळविण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मंजुरी प्राप्त करणे टाळण्यासाठी हे काम १४ उप-कामांमध्ये विभागले आणि दोन कंत्राटदारांना सोपविले होते व ही ४ कामे रु. १.४५ कोटी खर्चात जानेवारी २०१३ ते मे २०१४ दरम्यान पूर्ण करण्यात आली असे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे सदरहु परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस :-

३.३० महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम (MPW) नियमपुस्तिका, १९८४ च्या परिच्छेद १४५ नुसार कामाच्या अंमलबजावणी दरम्यान अचानक उद्‌भवणाऱ्या आकस्मिक बाबींसाठी स्वतंत्र उपशीर्ष " आकस्मिकता " अंतर्गत कामाच्या अंदाजित किंमतीच्या पाच टक्के इतकी तरतूद करावी. अशी तरतूद खर्चाच्या ज्या बाबीसाठी अंदाजपत्रकात तरतूद केली नसेल व ती बाब त्या कामाशी कितीही निगडीत असेल तरी त्या नवीन बाबीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मंजुरी प्राप्त केल्याशिवाय तरतूद वळविण्यात येऊ नये. तसेच MPW नियम पुस्तिकेच्या परिशिष्ट ४२ (अनु क्र. १४) नुसार " आकस्मिकता " अंतर्गत अंदाजपत्रकामध्ये केलेली तरतूद त्याच अंदाजपत्रकात तरतूद न केलेल्या एखाद्या नवीन बाबीसाठी वळविण्याचे संपूर्ण अधिकार अधीक्षक अभियंता यांना देण्यात आलेले आहेत अशी तरतूद आहे. त्याचप्रमाणे याअगोदर मार्च २००८ रोजी संपलेल्या वर्षासाठीच्या भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या अहवालात (नागरी) परिच्छेद ४.४.२ मध्ये ठाणे येथे रु. १.५५ कोटीची आकस्मिक कामासाठीच्या तरतूदींची रक्कम अतिरिक्त बांधकामे, दुरुस्ती, नूतनीकरण यासाठी वळविण्यात आली असता. लोकलेखा समितीने त्यावेळी यासंदर्भात साक्ष घेऊन राज्य विधानमंडळाला सादर केलेल्या (ऑगस्ट २०१३) १३ व्या अहवालात निधी अशाप्रकारे वळविणे अनियमित असल्याने ज्या कामांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद केली गेली नसेल किंवा ज्या कामांना राज्य विधानमंडळाची मान्यता प्राप्त झाली नसेल त्यावरील कोणताही खर्च

मंजूर केला जाऊ नये अशी शिफारस करण्यात आली होती. असे असतानाही अधीक्षक अभियंता (SE), सार्वजनिक बांधकाम मंडळ, रायगड, यांनी लोकलेखा समिती (PAC) च्या शिफारशींचा आणि महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेमधील तरतुदींचा भंग करून नवेनगर-महाड, जिल्हा रायगड येथे भांडार गृह आणि अभिलेख कक्ष बांधण्यासाठी २५ कामांतील आकस्मिक खर्चासाठीची रु. १.४५ कोटींची तरतूद अनधिकृतपणे वळविली. उपरोक्त तरतूदी अतिशय सुस्पष्ट असतानाही विभागाने त्याचे उल्लंघन केले विभागाने ज्या बाबींसाठी तरतूद केली व ज्यास राज्य विधानमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्याच बाबींकरीता विभागाने हा खर्च करणे बंधनकारक आहे व हा निधी अन्यत्र वळविणे हे वित्तीय नियमांचे उल्लंघन तर आहेच परंतु राज्याच्या सर्वोच्च सभागृहाचा अवमानही आहे. अत्यंत आकस्मिक परिस्थितीत उपलब्ध निधी अन्यत्र वळविण्याची विभागाला काही प्रमाणात असलेली मुभा विभागाने अत्यंत अपवादात्मक परिस्थितीतच वापरली पाहिजे. महाड शहरात पुराचे पाणी भरते. त्यावेळी अर्ध्या इमारती पाण्यात बुडत होत्या म्हणून कार्यकारी अभियंत्याने तेथे "अकस्मात संकोषण" (pooling of contingencies) हा महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम या नियम पुस्तिकेतील नियम वापरला व त्याअनुषंगाने निरनिराळया कामाचा आकस्मिक निधी एकत्र करून महाड येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याने ६० लाख रुपयांचे काम करण्याचा निर्णय घेतला. मूळात आकस्मिक खर्चाच्या कामात याचा समावेश होतो काय हा देखील मुळ प्रश्न आहे. प्रत्येक वर्षी पावसाळयात महाडमध्ये पुराच्या पाण्याचा धोका संभवतो व त्याचे प्रमाण कमी किंवा अधिक असू शकते अशा परिस्थितीत शासकीय दस्तावेज सुरक्षित राहावे यासाठी ही कामे विभागाने अतिशय पुर्वनियोजनबद्ध पद्धतीने करणे अपेक्षित आहे. परंतु तसे न करता यासाठी निरनिराळया कामांचा आकस्मिक निधी एकत्र करून वापरण्यात आला. सदरहु प्रकरणी कामाची आवश्यकता, गांभीर्य व तातडी समिती नाकारीत नाही परंतु त्यामुळे आवश्यक तांत्रिक बाबींचे व त्या नियमांचे सर्रास उल्लंघन विभागाला करता येणार नाही. एवढेच नव्हे तर सदर काम करताना संपूर्ण कामांची एकत्रित एकच निविदा काढणे आवश्यक असताना विभागाने सदर एकच काम १४ उप-कामांमध्ये विभागून दोन कंत्राटदारांना दिले. या बाबी अतिशय गंभीर व आक्षेपार्ह आहेत. विभागाने महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील नियमांचे उल्लंघन करून भांडारगृह आणि अभिलेख कक्षाचे बांधकाम केले आहे. " अकस्मात संकोषण " (pooling of contingencies) या नवीन नियमानुसार काम करता येते म्हणून ही वित्तीय अनियमितता नसल्याचे विभागीय सचिवांनी समितीसमोर व्यक्त केलेले मत समिती मान्य करु शकत नाही. कोणतेही सबळ कारण नसताना केवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मंजूरी प्राप्त करणे टाळण्यासाठी व विहित वित्तीय मर्यादेत हि कामे बसविण्यासाठी या कामांचे तुकडे पाडण्याचा प्रघात/पद्धत अधिकाऱ्यांमध्ये मोठया प्रमाणात दिसून येते व हि निश्चितच अनियमितता असून या सर्व बाबी संगनमताने देखील होत असल्याची शंका घेण्यास पूर्ण वाव आहे. सदरहू प्रकरणी कारण नसताना कामाचे तुकडे पाडणे ही विभागाची चूक असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्यच केले. ही बाब गंभीर असून याप्रकरणी समितीने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निदेश दिले असता या प्रकरणी विभागीय चौकशी करण्याचे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीला दिले. अतः या प्रकरणी आकस्मिक कामासाठीची तरतूद अनधिकृतपणे वळविणे व कामाचे तुकडे पाडून निविदा काढणे या दोन्ही बाबी संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी त्याचप्रमाणे कामाचे तुकडे पाडण्याची पद्धत विभागाकडून तात्काळ बंद करण्यात यावी व त्यापद्धतीचे निदेश शासन स्तरावरून तात्काळ निर्गमित करण्यात यावे व यासंबंधी केलेल्या कार्यवाहीची माहीती समितीस १ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.३.८ " कंत्राटदारास अनियमित प्रदान "

३.३१ अभिप्राय :-

तसेच प्राप्त यादीमध्ये दुरुस्तीच्या वर्गवारीत न मोडणा-या कामांबाबत, सदर कामं मुळ स्वरुपाची / NOW स्वरुपाची असल्यास त्याबाबत संबंधीत उपभोक्ता विभागास कळवून त्यांची अंदाजपत्रके पाठवून व त्यास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेनंतर कार्यान्वीत करण्याची दक्षता घेण्यात येईल.

अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर.

प्रत :- कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, सोलापूर / क्र.२ सोलापूर / पंढरपूर / अकलूज यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

दिनांक २४.०४.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ या कार्यालयाच्या बैठक कक्ष सभागृहामध्ये विभाग प्रमुखा बरोबर शासकीय इमारतींची दुरुस्ती व देखभाल उपभोक्त्या विभागाशी व अधिवासी (ॲक्युपेंटस्) यांचेशी दुरुस्तीचा वार्षिक कार्यक्रम तयार करणे व त्याचे संनियंत्रण हयाबाबत समन्वय हया विषयावर आयोजित करण्यांत आलेल्या बैठकीचे कार्यवृत्त.

विषय	*कार्यवाही करणारे कार्यासन/कार्यालय*
शासन सा. बां. विभाग क्र. बीपीएल १२०/सीआर-५९५/इमा-१, दिनांक १०.४.९० अन्वये विभाग प्रमुखांबरोबर इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीच्या संदर्भात चर्चा करुन वार्षिक कार्यक्रम तयार करणे व त्यांचे संनियंत्रण याबाबत समन्वय साधण्यासाठी त्रैमासिक बैठका आयोजित करण्याबाबत दिलेल्या सुचनेंनुसार माहे डिसेंबर २०१८ अखेरची त्रैमासिक बैठक दिनांक २३ जानेवारी २०१८ रोजी घेण्यात आलेली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त सर्व विभाग प्रमुखांना अधीक्षक अभियंता, मुंबई (सा. बां.) मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र. अअ/मुंमं/रेचिशा/उपभोक्ता त्रै.बै./१४२८ दिनांक ०५.०३.२०१८ अन्वये निर्गमित करून आजच्या बैठकीसाठी आमंत्रित करण्यांत आले होते. त्या अनुषंगाने आजच्या बैठकीस आमंत्रित केलेले व प्रत्यक्ष हजर असलेल्या विभाग प्रमुखांची / प्रतिनिधींची यादी सोबत परिशिष्ट-ब नुसार जोडलेली आहे.	
बैठकीचे सुरूवातीस सहाय्यक अधीक्षक अभियंता, मुंबई सा. बां. मंडळ यांनी आजच्या बैठकीस अधीक्षक अभियंता व संबंधित कार्यकारी अभियंता हे अमेरिकन शिष्टमंडळासमवेत बैठक वरळी, मुंबई येथे असल्याने ते उपस्थित राहु शकत नाही. तथापि, आजची पुर्वनियोजित बैठक सहाय्यक अधीक्षक अभियंता यांच्या अधिपत्याखाली घेण्यात यावी असे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने आजची बैठक सुरु करुया असे निवेदन केले व त्यांनी उपस्थितांची ओळख करुन घेतली तसेच उपभोक्ता विभागाचे उपस्थित अधिकारी / प्रतिनिधी यांनी सोबत आणलेले निवेदन व प्रत्यक्ष बैठकीतील निवेदन ऐकून सा. बां. / विद्युत सा. बां. विभागाचे उपस्थित क्षेत्रिय अधिकारी यांना खालील प्रमाणे सुचना केल्या.	
कौटुंबिक न्यायालय, बांद्रा, मुंबई :- उपभोक्ता विभागाच्या प्रतिनिधी यांनी त्यांचे दि. २२.०१.२०१८ च्या निवेदनान्वये स्थापत्य विषयक कामासंदर्भात यादी सादर केली. **स्थापत्य कामे** :- १) कचराकुंडीचे बांधकाम करणे तसेच आवार झाडे झुडपे लावुन सुशोभित करणे. २) खिडक्यांच्या काचा व चौकटी बदलणे व दुरुस्त करणे. ३) खिडक्यांना सुर्यप्रकाशरोधक आवरण लावणे. ४) स्ट्रक्चरल ऑडीटच्या शिफारशींची अंमलबजावणी ५) उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे, ६) इमारतीच्या आवारात नाम फलक बसविणे ७) वाहनतळासाठी शेड तयार करणे. ८) ॲल्युमिनियम पार्टीशन व इमारतीच्या टेरेसवर छत तयार करणे ९) मुख्य प्रवेशव्दार व तळमजल्यावरील जिन्याच्या ठिकाणी सरकते ग्रील बसविणे. १०) इमारतीच्या आवारात व इमारतीमध्ये वाळवी प्रतिबंधक उपाययोजना करणे ११) जलमापक यंत्राच्या ठिकाणी ग्रील बसविणे. १२) इमारतीच्या मोठया स्वरुपाची गिलावा व जिना दुरुस्तीची कामे करणे १३) इमारतीस आतुन व बाहेरुन रंगकाम करणे व इतर किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्तीचे कामे. १४) किरकोळ दुरुस्ती कामे (कडी, कोयंडे, दरवाजे व पार्टीशन १५) सर्व स्वच्छतागृहाची देखभाल व गळती प्रतिबंधक कामे १६) विद्युतरुममधील खिडकीची दुरुस्ती **विद्युत कामे** :- १) इमारतीच्या सभोवती मोठया क्षमतेचे इलेक्ट्रीक बल्ब बसविणे. २) पम्प रुम मध्ये नवीन विद्युत वॉटर पम्प बसविणे ३) अेसी बसविणे ४) निधी उपलब्धतेसाठी उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे ५) लिफ्ट मधील अकार्यरत बटनची दुरुस्ती करणे ६) लिफ्टचे सेंसर व मेंटेनन्स वेळच्यावेळी करणे ७) अस्ताव्यस्त वायरी व्यवस्थित फिटींग करणे. यासंदर्भात बांद्रा उपविभाग क्र. २ चे शाखा अभियंता खान यांनी मुळ गौण कामासंदर्भात अंदाजपत्रके उपभोक्ता विभागास सादर केले असल्याचे सांगितले तसेच उपभोक्ता विभागाने मध्यंतरीच्या काळात काही कामे खाजगी एंजसीमार्फत केलेली आहेत. त्याठिकाणी दुरुस्ती केलेल्या कामाबाबत प्रॉब्लेम आहेत. सा. बां. विभागामार्फत केलेल्या कामाबाबत काही तक्रार असल्यास त्याचे निराकरण करण्यात येईल असे सांगितले तसे बेसमेंटमध्ये पावसाळयात पाणी साचते सदर पाणी बाहेर काढणेचे काम विद्युत विभागाचे आहे परंतु ते करत नसल्याने बऱ्याच वेळा सा. बां. विभागामार्फत पंप मार्फत पाणी बाहेर काढुन गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली जाते. तसेच मागील जानेवारी २०१८ च्या बैठकीतील निवेदनाच्या अनुषंगाने या इमारतीमध्ये तात्काळ दुरुस्तीची कामे अधीक्षक अभियंता यांनी मंजुरी दिलेली आहे. त्यानुसार तांत्रिक मंजुरी व निविदा प्रक्रिया करुन ही कामे लवकरच हाती घेण्यात येत आहे. तसेच किरकोळ व दैनंदिन स्वरुपाची कामे वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमांतर्गत हाती घेण्यात येतात असे निवेदन केले. यासंदर्भात सहाय्यक अधीक्षक अभियंता यांनी वरील निवेदनाच्या अनुषंगाने कामाचे मुळ गौण कामे व दुरुस्ती कामे अश्याप्रकारे वर्गीकरण करण्यात यावे व मुळ गौण कामाचे अंदाजपत्रके तातडीने प्रशासकीय मान्यता व निधीसाठी उपभोक्ता विभागास सादर करावीत आणि बांद्रा उपविभाग क्र. २ चे उपविभागास वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम मंजुर केलेला आहे. त्यानुसार दैनंदिन कामे तातडीने करावीत. व मंजुर	कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई सा. बां. विभाग / उत्तर मुंबई विद्युत सा. बां. विभाग / उप अभियंता, बांद्रा सा. बां. उपविभाग क्र. २

कामांचे निविदा प्रक्रिया निश्चित करुन कामे पावसाळयापुर्वी तातडीने करावी. अश्या सुचना दिल्या. त्याचप्रमाणे विद्युत कामाच्या संदर्भात सहाय्यक अधीक्षक अभियंता यांनी उपस्थित उपअभियंता यांचेशी चर्चा करुन विद्युत विषयक कामांबाबत आवश्यक कार्यवाही तातडीने करुन याबाबतचा अहवाल उपभोक्ता विभागास सादर करावा अश्या सुचना दिल्या.	
<u>लेखा अधिदान कार्यालय</u> :- सदर विभागाचे उपस्थित अधिकारी/प्रतिनिधी यांनी लेखा व अधिदान कार्यालय बांद्रा पुर्व येथील तळमजला ते सात मजल्यावरील प्रसाधनगृहाचे दरवाजे व फ्लोअरिंग दुरुस्ती करणे. तसेच ३ ऱ्या व ४ थ्या माळयावर लिकेजचे इ. स्थापत्य कामांचे प्रॉब्लेम आहेत. तसेच विद्युत कामासंदर्भात काही ठिकाणी पंख्याची जागा बदलणे. व काही ठिकाणी अतिरिक्त पंखे बसविणे. व इतर किरकोळ विद्युत कामे जसे टयुबलाईट, वॉटर कुलर, दिवे व एक्झॉस्ट फॅन कामे करणे आवश्यक असल्याचे लेखी निवेदन सहपत्रासह आजच्या बैठकीत दिले. यासंदर्भात सहाय्यक अधीक्षक अभियंता यांनी वरील निवेदनाच्या अनुषंगाने कामाचे मुळ गौण कामे व दुरुस्ती कामे अश्याप्रकारे वर्गीकरण करण्यात यावे व मुळ गौण कामाचे अंदाजपत्रके तातडीने प्रशासकीय मान्यता व निधीसाठी उपभोक्ता विभागास सादर करावीत आणि बांद्रा उपविभाग क्र. २ चे उपविभागास वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम मंजुर केलेला आहे. त्यानुसार दैनंदिन कामे तातडीने करावीत. व मंजुर कामांचे निविदा प्रक्रिया निश्चित करुन कामे पावसाळयापुर्वी तातडीने करावी. अश्या सुचना दिल्या. मंत्रालय मुंबई येथील लेखा व अधिदान विभागाचे उपस्थित अधिकारी यांनी कार्यालय मेट्रो प्रकल्पामुळे चर्चगेट येथील राजमहल या खाजगी इमारतीमध्ये स्थलांतरित झालेले आहे त्यामुळे याबाबत सा. बां. विभागाकडुन देखभाल व दुरुस्ती अंतर्गत खर्च करता येऊ शकत नाही असे स्पष्ट केले. तथापि या इमारतीचे सा. बां. व विद्युत विभागाने पहाणी करुन दुरुस्तीच्या कामासंदर्भात अंदाजपत्रक दयावे तसेच सदर इमारतीचे फायर ऑडीटचा प्रस्ताव देखील दयावा अशी विनंती केली. सहाय्यक अधीक्षक अभियंता यांनी सदर खाजगी इमारतीमधील स्थापत्य व विद्युत दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी व दक्षिण मुंबई विद्युत विभाग यांनी उपभोक्ता विभागास सादर करावे तसेच विद्युत विभागाने फायर ऑडीट संदर्भात आवश्यक पुढील कार्यवाही करावी अश्या सुचना दिल्या.	कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग / दक्षिण विद्युत सा. बां. विभाग / उप अभियंता, दक्षिण सा. बां. उपविभाग
संचालक, शासन, मुद्रण व लेखन सामुग्री, मुंबई :- सदर उपभोक्ता विभागाचे अधिकारी यांनी त्यांचे दि.२४.०४.२०१८ चे निवेदन आजच्या बैठकीत दिले. त्यानुसार संचलनालय इमारतीमधील तळमजला ते दुसऱ्या मजल्यावरील रेलिंग व पायऱ्यांचे नुतनीकरण, ग्रंथागार शाखा येथील सुधारीत काउंटर व्यवस्था व नुतनीकरण करणे, पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील महिला व पुरुष शौचालय, तळमजला पहिला मजला व दुसरा मजला येथे अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता बैठक व्यवस्था संगणक संच ठेवणेसाठी योग्य जागा व बंदिस्त कपाटे इ. कामाचे सन २०१७-१८ चे सुधारीत अंदाजपत्रक संचलनालयास अद्याप प्राप्त झालेले नाही. **व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई :-** सदर उपभोक्ता विभागाचे अधिकारी यांनी त्यांचे दि.२४.०४.२०१८ चे निवेदन आजच्या बैठकीत दिले. १) छतावरील पन्हाळयाचे अंदाजपत्रक चालु वर्षीच्या दरसुचीनुसार सुधारीत करुन दयावे. २) उपहारगृहाचे नव्याने नुतनीकरणाचे अंदाजपत्रक करुन दयावे. ३) पिण्याच्या पाण्याची जुनी पाईपन बदलुन नवीन पाईपलाईन टाकण्याचे अंदाजपत्रक ४) मुख्य प्रवेशव्दार येथील (सरकते गेट) दरवाजाचे नव्याने अंदाजपत्रक ५) सुगम्य भारत अभियनांतर्गत कामे तातडीने सुरु करणेबाबत. तसेच विद्युत कामासंदर्भात त्याठिकाणी कोणीही शाखा अभियंता नसल्याने विद्युत काम ठप्प् स्वरुपात आहेत. तरी लवकरात लवकर शाखा अभियंता यांची नेमणुक करावी. या संदर्भात उपस्थित शाखा अभियंता यांचेशी चर्चा करुन सदर इमारतींमध्ये मंजुर वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रमातुन दैनंदिन व इतर अनुषंगिक कामे तातडीने करण्यात यावी. तसेच वरील कामाचे अंदाजपत्रकासंदर्भात खाजगी वास्तुशास्त्रज्ञांकडुन सल्ला घेऊन अंदाजपत्रके तातडीने उपभोक्ता विभागास सादर करावी आणि संरचनात्मक परिक्षण प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने उपभोक्ता विभागास मार्गदर्शन करावे. अश्या सुचना सहाय्यक अधीक्षक अभियंता यांनी दिल्या. तसेच उपस्थित विद्युत सा. बां. विभागाचे प्रतिनिधी यांना कार्यकारी अभियंता, दक्षिण विद्युत विभाग यांचेशी चर्चा करुन शाखा अभियंता (विद्युत) यांची लवकरच नेमणुक करण्याबाबत कार्यवाही होईल असे पहावे.	कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई / दक्षिण विद्युत सा. बां. विभाग / उप अभियंता, पश्चिम सा. बां. उपविभाग
राज्य मध्यवर्ती ग्रंथालय विभाग, महाराष्ट्र राज्य नगर भवन, मुंबई :- सदर विभागाचे उपस्थित प्रतिनिधी यांनी इलाखा शहर विभागास सुरु असलेल्या कामासंदर्भात दि. १६.०४.२०१८ रोजी निवेदन दिले असल्याचे सांगितले. त्याअनुषंगाने स्थापत्य कामे व्हावीत अशी विनंती केली. याबाबत संबंधित उपअभियंता मध्य सा. बां. उपविभाग यांनी सदर इमारतीमधील स्थापत्य कामासंदर्भात वेळोवेळी भेट घेऊन कामे मार्गी लावण्याबाबत कार्यवाही केलेली तसेच करण्यात येत असल्याचे व गळतीबाबत कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचे काम देखील प्रगतिपथावर असल्याचे निवेदन केले. यावर सहाय्यक अधीक्षक अभियंता यांनी उप अभियंता यांना सुरु असलेल्या कामाच्या ठिकाणी वारंवार भेटी देऊन उपरोक्त कामे निविदेत समाविष्ट असल्यास करण्यात यावी. तसेच कामाचा दर्जा गुणवत्ता पुर्वक राहील याची दक्षता घ्यावी असे निर्देश दिले.	कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग / दक्षिण विद्युत सा. बां. विभाग / उपअभियंता, मध्य सा. बां. उपविभाग

नगर व दिवाणी सत्र न्यायालय, मुंबई. :- सदर विभागाचे उपस्थित प्रतिनिधी यांनी उपभोक्ता विभागाचे पत्र क्र.१०१० दि.२०.०४.२०१८ चे पत्र आजच्या बैठकीत सादर केले. तसेच स्थापत्य कामांबाबत समाधान व्यक्त केले तथापि कोर्ट नं २६ बाबत सा. बां. विभागाने विद्युत सा. बां. विभागास अनुदान देऊन देखील अद्याप कामास सुरुवात केलेली नसल्याने तसेच लिफ्ट नेहमी बंद पडते आणि आवारातील इमारतींमध्ये एलईडी बल्ब, स्वीच बोर्ड, पंखे, विद्युत वायरींग नादुरुस्त अवस्थेत असुन या प्रकरणी विद्युत सा. बां. विभाग कोणतीही कार्यवाही करीत नसल्याने नाराजी व्यक्त केली. याबाबत सहाय्यक अधीक्षक अभियंता यांनी विद्युत सा. बां. विभागाचे प्रतिनिधी यांना याबाबत वरिष्ठांना निवेदन करुन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत विनंती करावी अश्या सुचना केल्या.	कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई./ उप-अभियंता, , दक्षिण उपविभाग, मुंबई.
उद्योग विभाग, नवीन प्रशासन भवन इमारत मुंबई :- सदर विभागाचे प्रतिनिधी यांनी उद्योग विभाग हा नवीन प्रशासन भवन इमारतीच्या २ ऱ्या व ३ ऱ्या मजल्यावर असुन याठिकाणी गळती होत असते. तसेच वाळवी प्रतिबंधक व उंदीर प्रतिबंध उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे निवेदन केले. त्याअनुषंगाने सहाय्यक अधीक्षक अभियंता यांनी सदर इमारतीचे संरचनात्मक दुरुस्तीचे सर्वसाधारण रु.१२.०० कोटी रक्कमेचे काम निविदा स्तरावर असुन निविदा प्रक्रिया नंतर सदर काम हाती घेण्यात येत असल्याचे सांगितले.	कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई./ उप-अभियंता, , दक्षिण उपविभाग, मुंबई.
क्रिडा व युवक सेवा विभाग, मुंबई :- सदर विभागाचे प्रतिनिधी यांनी त्यांचे दि.१५.०३.२०१८ चे निवेदन इलाखा शहर विभागास दिलेले असुन त्याची छायाप्रत आजच्या बैठकीत सादर केली. त्यानुसार सदर कार्यालयातील छताचे पत्रे दुरुस्त करणे, ठिकठिकाणी प्लास्टर, रंगकाम व लादीकरण आणि खिडक्यांची तावदाने, ग्रीलची दुरुस्ती, टॉयलेटच्या छताची दुरुस्ती ही स्थापत्य कामे व विद्युत बोर्ड बसवुन वायरिंग व्यवस्थित करणे इ. कामे आवश्यक असल्याचे निवेदन केले. त्याअनुषंगाने सहाय्यक अधीक्षक अभियंता यांनी उप अभियंता, मध्य उपविभाग, मुंबई यांना व विद्युत विभागाचे प्रतिनिधी यांना सदर कार्यालयाची पहाणी करुन आवश्यक दुरुस्ती कामासंदर्भात कार्यकारी अभियंता यांचेशी चर्चा करुन पुढील आवश्यक कार्यवाही करावी अश्या सुचना केल्या.	कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई./ दक्षिण विद्युत सा. बां. विभाग/उप-अभियंता, दक्षिण उपविभाग, मुंबई.
आजच्या बैठकीत उपभोक्ता विभागाचे प्रतिनिधी यांनी सा. बां. व विद्युत सा. बां. विभागाकडुन दिलेल्या अनुदानाच्या अनुषंगाने उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले जात नाही त्यामुळे मंत्रालयाच्या संबंधित प्रमुख विभागाकडुन सतत विचारणा होते आणि विशेष करुन कोर्ट इमारतीबाबत मा. उच्च न्यायालयाकडुन नाराजी व्यक्त केली जाते तरी उपयोगिता प्रमाणपत्र तातडीने उपभोक्ता विभागास सादर करावे अश्या सुचना सहाय्यक अधीक्षक अभियंता यांनी केल्या. तसेच सर्व उपविभागास वार्षिक देखभाल व दुरुस्ती कार्यक्रम मंजुर केलेला आहे. दैनंदिन व इतर अनुषंगिक कामे तातडीने करावी आणि जी कामे मंजुर आहेत त्याबाबतची तांत्रिक व निविदा प्रक्रिया करुन कामे हाती घेण्याचे नियोजन करावे त्याचप्रमाणे मुळ गौण स्वरुपाची कामे प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेसाठी उपभोक्ता विभागास सादर करावीत अश्या सुचना सहाय्यक अधीक्षक अभियंता, मुंबई सा. बां. मंडळ यांनी दिल्या. व पुढील बैठक दि.२४ जुलै २०१८ रोजी होईल असे निवेदन करून आजची बैठक संपल्याचे जाहिर केले.	सर्व कार्यकारी अभियंता व उप अभियंता

जा.क्र.अअ/मुंमं/रेचिशा/उपभोक्ता त्रै.बै./२९६४
अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय
मुंबई (सा.बां.) मंडळ, २५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१
ई-मेल:- mumbai.se @ mahapwd.com
दिनांक :- ११.०५.२०१८

(अे. डी. पाटील)
अधीक्षक अभियंता
मुंबई (सा.बां.) मंडळ,
मुंबई करिता

स्थळ प्रत मा. अ. अ. यांनी मंजुर केली आहे..

प्रत:- सर्व विभाग प्रमुखांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.
प्रति,

प्रत :- मा. मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई / मुंबई विद्युत सा. बां. प्रादेशिक विभाग, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

प्रत:- अधीक्षक अभियंता, विद्युत (सा.बां.) मंडळ, पुणे यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रत:- कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई / मध्य मुंबई विभाग, वरळी / उत्तर मुंबई विभाग, अंधेरी / एकात्मिकृत घटक सा. बां . विभाग, मुंबई यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी अग्रेषित.
सहपत्र:-वरीलप्रमाणे.
बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे प्रत्येक मुद्यावर कार्यवाही करण्यात येऊन त्याबाबतचा अनुपालन अहवाल तात्काळ मंडळ कार्यालयास सादर करण्यात यावा.

प्रत: कार्यकारी अभियंता, दक्षिण मुंबई विद्युत विभाग/मध्य मुंबई विद्युत विभाग/उत्तर मुंबई विद्युत विभाग यांचे माहितीसाठी व बैठकीत ठरल्याप्रमाणे कार्यवाहीसाठी अग्रेषित.
सहपत्र:-वरीलप्रमाणे.(उपभोक्ता विभागाकडून प्राप्त निवेदने)

प्रत:- उपअभियंता,दक्षिण / पश्चिम / मध्य / रुग्णालय / आमदार निवास / बांधकाम-१ / २ / पुर्व / उत्तर / बांधकाम / अंधेरी / कुर्ला / बांद्रा-१ / २ / एकात्मिकृत घटक सा.बां. उपविभाग क्र.२ मुंबई. यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी अग्रेषित.
सहपत्र:-वरीलप्रमाणे.

बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे प्रत्येक मुद्यावर कार्यवाही करण्यात येऊन त्याबाबतचा अनुपालन अहवाल तात्काळ मंडळ कार्यालयास सादर करण्यात यावा.

शासकीय इमारतींच्या दुरुस्ती व देखभालीबाबत विभाग प्रमुखांबरोबर होणाऱ्या माहे २४ जुलै २०१८ रोजी होणाऱ्या त्रैमासिक बैठकीचे वेळापत्रक.

अ.क्र	विभागाचे नांव	विभाग प्रमुख	बैठकीची वेळ
१)	महसूल	१) जिल्हाधिकारी, मुंबई शहर २) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर	११.०० ते ११.३०
२)	शिक्षण	१) शिक्षण उप संचालक २) संचालक, कला संचनालय ३) संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था ४) संचालक, तंत्र शिक्षण ५) प्राभारी संचालक, विज्ञान संस्था ६) उप संचालक, क्रिडा व युवक सेवा	
३)	विधी व न्याय	१) प्रोटोनोटरी आणि सिनियर मास्टर, उच्च न्यायालय २) रजिस्टार, उच्च न्यायालय ३) प्रमुख न्यायाधिश, कुटंब न्यायालय,बांद्रे ४) नगर दिवाणी व सत्र न्यायालय ५) स्मॉल कॉज कोर्ट	
४)	शिधावाटप	नियंत्रक, शिधावाटप	
५)	विक्रीकर	विक्रीकर आयुक्त	
६)	उद्योग	१) उद्योग संचालक, उद्योग संचनालय २) संचालक, महाराष्ट्र श्रमविज्ञान संस्था	
७)	मुद्रण व लेखन	१) संचालक, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री संचनालय २) व्यवस्थापक , शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री संचनालय ३) कामगार कल्याण अधिकारी, शासकीय मुद्रण व लेखन सामुग्री संचनालय	११.०० ते ११.३०
८)	अधिदान व लेखाधिकारी	अधिदान व लेखाधिकारी,बांद्रा/फोर्ट	
९) १०)	अबकारी मत्स्य	अधिक्षक, दारुबंदी व उत्पादन शुल्क मुंबई शहर संचालक, मत्स्य व्यवसाय विभाग, मुंबई	
११)	ग्रंथालय	१) मानद सचिव, ग्रंथालय २) अधिक्षक, प्रधान मुद्रांक	
१२) १३)	बालभवन समाजकल्याण	संचालक, बालभवन, मुंबई १) विभागीय समाजकल्याण अधिकारी २) अधिक्षक, बालसुधार गृह, डोंगरी,चेंबुर,मानखुर्द	
१४)	पोलीस	१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्त	
		२) संचालक, नागरी संरक्षण	
		३) समादेशक, होमगार्ड	११.३० ते
		४) संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा	१२.००
		५) नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा	
१५)	कारागृह	६) परिवहन आयुक्त, वांद्रा, मुंबई १) अधिक्षक, भायखळा कारागृह २) अधिक्षक, आर्थररोड कारागृह	११.३० ते १२.००
१६)	वैद्यकीय	१) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य २) प्रशासकीय अधिकारी, पोद्यार रुग्णालय ३) संचालक, हाफकीन संस्था ४) आयुक्त, राज्य कामगार विमा योजना ५) जी.टी.,कामा,जे.जे., सेंट जॉर्ज,बांद्रा कॉलनी-नागरी स्वास्थ केंद्र, मालवणी हॉस्पीटल.	११.३० ते १२.००

अधीक्षक अभियंता
मुंबई (सा.बां.) मंडळ
मुंबई करिता

स्थळ प्रत मा. अ. अ. यांनी मंजुर केली आहे.

दिनांक १७/०५/२०१८ रोजी शासकीय विश्रामधाम (सर्किट हाऊस) सांगली येथे सांगली जिल्ह्यातील विविध विभागाशी निगडीत शासकीय इमारती व निवासस्थाने देखभाल दुरूस्ती कार्यक्रम प्रस्तावित करणेकरीता विविध विभागाच्या खातेप्रमुख यांचे सोबत मा.अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ,कोल्हापूर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

बैठकीस उपस्थित अधिकारी यांची यादी उपस्थिती नोंदवही प्रपत्र जोडले आहे:-

सर्व प्रथम उपस्थित विभागाप्रमुखांचे स्वागत करून आढावा बैठकी आयोजनाबाबत माहिती मा.अधिक्षक अभियंता सा.बां.मंडळ कोल्हापूर यांनी दिली.

२/- सर्व विभाग प्रमुखाकडून त्यांच्य अखत्यारीतील शासकीय कार्यालयीन इमारती व निवासस्थाने यांच्या दुरूस्ती देखभाल बाबत विनंती पत्रे प्राप्त झाली व त्याची मुळ प्रत सा.बां.विभाग मिरज या कार्यालयाकडे उपलब्ध करून देणेत आलेली आहेत.

३/- शासनाच्या विविध विभागाच्या विभाग प्रमुखा कडे प्राप्त विनंती पत्रास अनुसरून संबंधित उपअभियंता / कार्यकारी अभियंता यांनी आपआपले अभिप्रायसह कामाबाबत माहिती अवगत केली व त्यानुसार मा.अधिक्षक अभियंता यांनी खालील प्रमाणे सुचना बैठकीस निर्गमित करणेत आल्या.

३.१) सदरचे मुळ स्वरूपाची बांधकामांबाबत संबंधित उपअभियंता यांनी त्या कामाची पाहणी करून अंदाजपत्रक संबंधित विभागास मंजूरीसाठी देणेत यावे.

३.२) ज्या इमारती नव्याने बांधणेत आलेल्या आहेत त्या इमारती बांधकाम निविदा मधील दोष दायित्व निवारण कालावधी अन्वये दुरूस्त्या बाबत प्राधान्य देणेत यावेत.

३.३) नव्याने बांधणेत आलेल्या व पशुसंवर्धन डेअरी विभागाशी संबंधित इमारती ज्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इमारतींची छापील नोंदवही (PRB) वर नोंद नाही, त्या इमारतींची नोंद पी आर बी मध्ये घेण साठी प्रस्ताव दि.३१ मे २०१८ पर्यंत मंडळ कार्यालयास सादर करावा.

३.४) सा.बां.विभागाच्या इमारतींची छापील नोंदवही/(पि आर बी) मध्ये ज्या इमारतींची नोंद नाही त्या इमारतींच्या दुरूस्ती देखभालीसाठी निधी उपलब्ध करून दिला जाणार नाही व त्याची पुर्ण जबाबदारी क्षेत्रीय स्तरावरील उपअभियंता / शाखा अभियंता यांची राहील.

३.५) इमारती दुरूस्ती कार्यक्रमाकरीता प्रथम प्राधान्यक्रम जलनिसारण, गळती काढणे, पाणी पुरवठा, दरवाजे, खिडक्या दुरूस्ती, फरशी काम असा असावा.रंगरंगोटी, रस्ते, संरक्षक भिंत ही कामे विहीत प्राधान्य क्रमानुसार उपलब्ध निधी नुसार घेण्यात यावी.यासाठी सदरचा विभागाची / पत्राची छायांकित प्र मागणी व विनंती पत्रे सा.बां.विभाग मिरज यांनी संबंधित उपअभियंत्याकडे हस्तांतर करावी.

३.६) दुरूस्ती कामाची विभागणी खालील प्रमाणे :-

किरकोळ दुरूस्ती	४०%
विशेष दुरूस्ती	३०%
विविक्षित दुरूस्ती	३०%

तरी आपली जणेकरून सर्व शासकीय इमारती वापरण्योग्य व सक्षम राहतील या दृष्टीने कार्यक्रम तयार करणेत यावा.

३.७) सर्व तालुक्याना त्यांच्या कार्यक्षेत्रातील इमारतीच्या जोते क्षेत्र निहाय निधी व दुरूस्ती कार्यक्रम मंजूर होईल या कडे कार्यकारी अभियंता यांनी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.

३.८) उपरोक्त ३.१ ते ३.७ सूचना नुसार इमारत दुरूस्तीसाठी प्राप्त निवेदन विनंती अर्ज यास अनुसरून किरकोळ + विशेष+ विविक्षित दुरूस्ती कार्यक्रम दि.३१ मे अखेर सादर करावा.

३.९) समाज कल्याण व सामाजिक न्याय विभाग कडील इमारतीच्या दुरूस्तीची अंदाजपत्रके सा.बां.विभागाने तयार करून मंजूरीकरीता सक्षम प्राधिकरण समाज कल्याण / सामाजिक न्याय विभाग यांचे कडे पाठविणे बाबत कार्यवाही अपेक्षित आहे.

४) क्षेत्रिय अभियंता सार्वजनिक बांधकम विभाग याना सुचना:-

४.१) उपअभियंता यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील रस्त्याची पावसाळ्यापुर्वी करावयाची निगा देखभाल विषयक कामे या दि.३१ मे २०१८ पुर्वी वार्षीक देखभाल दुरूस्ती मान्य निविदा अंतर्गत पुर्ण करावी व तसा अहवाल विभागीय कार्यालयास सादर करावा.

४.२) उपविभागीय कार्यक्षेत्रातील जे रस्ते राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषीत आहेत परंतू अद्याप राष्ट्रीय महामार्ग विभागाने ताब्यात घेतलेले नाहीत तसेच ज्या रस्त्यावर हायब्रिड अॅन्युटी प्रस्ताव मंजूर आहे, त्या निविदा अंतर्गत कार्यादेश आदेशास होणारा प्रशासकीय कालावधी विचारात घेता त्या सर्व रस्त्याच्या दुरूस्ती देखभाल कार्यक्रम एक वर्षाचा वार्षिक दुरूस्ती देखभाल कार्यक्रम मंडळ कार्यालयास त्वरीत सादर करावा.

४.३) सांगली जिल्ह्यातील रस्त्याच्या दर्जोन्नती पश्चात सा.बां. विभागाकडे हस्तांतरीत प्रस्तावामधील सर्व रस्ते तातडीने जिल्हा परिषद यंत्रणेकडून हस्तांतरण करून घेणेत यावेत व या रस्त्याच्या सुस्थिती करणाकरीता कार्यमंजूरी क्रमांक जॉब नं मागणी प्रस्ताव तातडीने सादर करावा.

४.४) मागील वर्षामध्ये मंजूर असलेल्या अर्थसंकल्प समाविष्ट वार्षिक देखभाल / दुरूस्ती कार्यक्रमातंर्गत डांबरी करणाची सर्व प्रकारची कामे ३१ मे पुर्वी पुर्ण करणेत यावी.

४.५) सन २०१७-१८ अर्थसंकल्पात समाविष्ट कामांची तांत्रिक मंजुरी दि ३१ मे २०१८ पूर्वी देण्त येऊन त्यांची ई-निविदा प्रक्रिया तसेच तांत्रीक प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करावी.

४.६) पुरवणी अर्थसंकल्प सन २०१८ मध्ये समाविष्ट करावयाच्या प्रस्तावित कामांचे अंदाज व ई-निविदेचे कागदपत्रासह दि ३१ मे पर्यंत सादर करावेत.

जा.क्रं./प्रकल्प/इमारती/ /२०१८
कार्यकारी अभियंता,सा.बां.विभाग,मिरज
संचे कार्यालय, मिरज
दिनांक-

बैठकीचे इतिवृत्त

अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ,कोल्हापूर कार्यालयामध्ये दिनांक १६/०५/२०१८ रोजी कोल्हापूर जिल्हयातील शासकीय निवासी व कार्यालयीन इमारतींची देखभाल व दुरूस्ती कामासंदर्भात संबंधीत उपभोक्ता विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करणेत आली होती.

सदर बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांची यादी सोबत जोडणेत आली आहे.

संबंधीत उपभोक्ता विभागाचे उपस्थित सर्व अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करून खालीलप्रमाणे देखभाल व दुरूस्तीची कामे हाती घेण्याबाबत कार्यवाही करण्याचे बैठकीत ठरविण्यात आले.

उपभोक्ता विभागाकडून इमारतींच्या देखभाल व दुरूस्ती अंतर्गत करावयाच्या कामांची पत्रे, यादी प्राप्त आहेत. सदर पत्रे, यादी सोबत जोडणेत आली आहेत. कार्यकारी अभियंता, उप अभियंता यांनी देखभाल व दुरूस्तीची कामे हाती घेताना उपभोक्ता विभागाने मागणी केलेल्या कामांपैकी छत गळती, स्वच्छतागृहे, ड्रेनेज व्यवस्था व पाण्याशी निगडीत दुरूस्तीच्या कामांना प्रथम प्राधान्य द्यावे. रंगकाम, फरश्या दुरूस्ती करणे इत्यादी इतर कामे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेणेचे प्रस्तावित करावे. उपभोक्ता विभागाच्या एकत्रित मागणीपैकी दुरूस्ती कामांचा प्राधान्यक्रम ठरवून नियोजन निश्चित करावे व त्यानुसार उपभोक्ता विभागनिहाय विविक्षित / विशेष व किरकोळ देखभाल दुरूस्तीचा कार्यक्रम तयार करणेत यावा.

तसेच काही विभागाकडून कपाटे, खुर्च्या फर्निचर, नविन संरक्षक भिंत बांधणे, पार्किंग शेड, नविन खोल्या, बोअर, व काही नवीन कामांची मागणी केलेचे दिसते. अशा कामांबाबत संबंधीत विभागाच्या मागणीप्रमाणे सा.बां.विभागाकडून MOW मधून अशा नविन कामांची (सोबतच्या यादीप्रमाणे) अंदाजपत्रके तयार करून संबंधीत उपभोक्ता विभागास तात्काळ पाठविणेत यावीत. तसेच ज्या इमारतीचा दोष दायीत्व कालावधी अद्याप पूर्ण झालेला नाही अशा इमारतींची दुरूस्ती संबंधीतांकडून तात्काळ करून घेणेत याव्यात.

बैठकी अंती सर्व उपस्थित अधिकाऱ्यांचे आभार मानून बैठक संपलेचे जाहिर केले.

जा.क्र. रेशा/ २८६० /२०१८
अधीक्षक अभियंता,
सा.बां.मंडळ, कोल्हापूर यांचे कार्यालय,
दिनांक :- 18 MAY 2018

(म.शं.साळुंखे)
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,कोल्हापूर

प्रत:- कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,कोल्हापूर / सा.बां.दक्षिण विभाग, कोल्हापूर/ विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, कोल्हापूर/ सा. बां. विद्युत विभाग, कोल्हापूर यांना माहितीसाठी व पुढील उचित कार्यवाहीकरीता रवाना, -- सोबत -यादीप्रमाणे.

प्रत:- उप अभियंता, सा.बां. उपविभाग,कोल्हापूर यांना माहितीसाठी व पुढील उचित कार्यवाहीकरीता रवाना.

दिनांक : 12/ 04/2018 रोजी सकाळी 11.30 वा. झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त

विषय : सर्व संबंधीत उपभोक्ता विभाग व कार्यकारी अभियंता यांच्या समवेत सन 2018-19 साठीचा इमारतींचा देखभाल दुरुस्तीचा आराखडा तयार करणेबाबत आयोजित आढावा बैठक

सदर बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते:

1	इंजि. पो.पी.सोनवणे	अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ,जळगांव
2	इंजि. आर.ए.पाटील	सहा. अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ,जळगांव
3	इंजि. आर.एस.परदेशी	कार्यकारी अभियंता, सा.बां.(उत्तर) विभाग,जळगांव
4	इंजि. पी.व्ही.मोराणकर	कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अमळनेर
5	श्री. के.एच.ठोंबरे	Sec.DLSA, जिल्हा न्यायालय, जळगांव
6	डॉ. एन.एस. चव्हाण	सिव्हील सर्जन, जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव
7	डॉ. बी.एस.खैरे	Dean, Govt. medical college जळगांव
8	डॉ. सी.डी. डांग	Govt. medical college जळगांव
9	श्री.बी.एम.तडवी	तुरुंगाधिकारी श्रेणी-1, जिल्हा कारागृह, जळगांव
10	श्री. आर.वाय.पाटील	प्रतिनिधी, Govt. polytechnic जळगांव
11	श्री. व्ही.पी.जाधव	प्रतिनिधी, Govt. Engg. College, जळगांव
12	श्री. ए.डी.राणे	प्रतिनिधी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी कार्यालय, जळगांव
13	श्री.जे.एस.पाटील	प्रतिनिधी, पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
14	श्री. कैलास चव्हाण	प्रतिनिधी, पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
15	श्री. विजयसिंग पाटील	प्रतिनिधी, पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
16	श्री. डी.एन. कोठावदे	प्राचार्य, आय.टी.आय, जळगांव
17	इंजि. एस.आर.राऊत	सहा.अभि.श्रेणी-1, सा.बां.उपविभाग क्र.1, जळगांव
18	इंजि.व्ही.बी.राजपूत	उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग, भडगांव
19	इंजि. निलेश बिऱ्हाडे	उपविभागीय अभियंता, सा.बां.(विद्युत)उपविभाग, जळगांव
20	इंजि.जे.एस.तडवी	शाखा अभियंता, सा.बां.उपविभाग, चोपडा
21	इंजि. आर.आर.चिरमाडे	उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग, यावल
22	इंजि. पी.डी.मेतकर	सहा.अभि.श्रेणी-1, बांधकाम उपविभाग, अमळनेर
23	इंजि. संजय निकुंभ	शाखा अभियंता, सा.बां.मंडळ,जळगांव

सर्व प्रथम बैठकीस उपस्थित सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे अधीक्षक अभियंता यांनी स्वागत केले. व बैठकीस सुरुवात करण्यात आली.

सा.बां.खात्याकडून विविध उपभोक्ता विभागाची कामे करीत असतांना 2 लेखाशिर्षांतर्गत (2059, 2216) दुरुस्तीची कामे केली जातात. सदर लेखाशिर्षांखाली अत्यल्प निधी उपलब्ध होत असतो. त्यामुळे उपभोक्ता विभागाने सा.बां. खात्यास त्यांची कामे कळवित असतांना अत्यंत महत्त्वाची कामे (प्राधान्य) ठरवून कळविण्यात यावी, जसे संडास-बाथरुम लिकेजेस, दरवाजे-खिडक्या यांची दुरुस्ती, छत water proofing इ. प्रकारची कामे असे अधीक्षक अभियंता यांनी उपस्थित उपभोक्ता विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांना स्पष्ट केले. 2059, 2216 लेखाशिर्षांतर्गत दुरुस्तीच्या कामांसाठी किमान रक्कमच शासनाकडून उपलब्ध होत असते, त्यामुळे अतिमहत्त्वाच्या गरजेच्या दुरुस्तीसाठी उपभोक्ता विभागाने आग्रह धरावा मूळ स्वरुपाच्या न

अन्य दुरुस्तीसाठी उपभोक्ता विभागाने आग्रह धरु नये. त्यामुळे आजरोजी होणारी बैठक वर्षाच्या सुरुवातीलाच बोलावण्यामागचा हेतु अ.अ. यांनी बैठकीत सर्व उपभोक्ता विभागांना स्पष्ट केला. उपभोक्ता विभागांनी त्यांच्याकडील कामे priority ठरवून 8 दिवसांत यादी सा.बां. मंडळ कार्यालयास सादर करावी असे सांगितले. सादर यादीतील किती कामे अनुदानाच्या उपलब्धतेनुसार करणे शक्य आहे ते ठरविले जाईल.

उपभोक्ता विभागाकडून priority wise आलेल्या कामांचा कार्यक्रम अंतिम झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल. प्राधान्य यादी एकदा प्राप्त झाली की त्यानंतर नविन कामे / यादी घेता येणार नाही. तसेच शासन आदेशानुसार छोट्या रकमेची व तुकडयांमध्ये कामे करु नयेत असेही अ.अ. यांनी बैठकीत सांगितले.

1. **जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव -**

जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव विभागाकडील दुरुस्ती कामांबाबत जाणून घेतले असता, उपस्थित न्यायाधीश श्री. ठोंबरे महोदय यांनी वारंवार सा.बां.खात्यास कळवून अद्यापही दुरुस्तीची बरीचशी कामे प्रलंबित असल्याचे बैठकीत सांगितले. त्यातही प्रथम प्राधान्य ठरवून पुनश्च एकदा यादी तयार करुन सा.बां. खात्यास पाठविण्यात येईल असेही न्यायाधीश महोदय यांनी सांगितले.

न्यायाधीश इमारत कामांचा आढावा घेत असतांना, पाणी गळती, drainage leakages — अत्यंत खराब अवस्था असल्याचे सांगण्यात आले. सिमेंट पाईपलाईन खराब असून ती बदलणे आवश्यक आहे., न्यायालयीन इमारतीची संरक्षक भिंतीची उंची वाढविणे, बाबत, रावेर येथील न्यायाधीश निवासस्थानांच्या खिडक्यांना जाळया बसविणे तसेच नविन electric fitting करणे आवश्यक आहे, न्यायाधीश महोदय बसत असलेल्या मागील बाजूच्या भिंतीस मोठाच तडा गेलेला आहे इ. स्वरुपाची कामे दुरुस्ती अंतर्गत करणे महत्वाचे असल्याचे सांगण्यात आले.

असे निदर्शनास आले आहे की, चोपडा येथील कोर्ट कर्मचारी निवासस्थान बांधणे हे काम मंजूर असून अद्यापही कामाचे अंदाजपत्रक तयार करणे व इतर अनुषंगिक बाबी पुर्ण होऊ शकलेल्या नाहीत त्यामुळे संबंधीत शाखा अभियंता यांना कारणे दाखवा नोटीसही बजावण्यात आली होती परंतु त्याबाबत त्यांचा खुलासा प्राप्त झालेला नाही तसेच हया कामावर तिसऱ्यांदा तक्रार प्राप्त होत असल्यामुळे अ.अ. यांनी तीव्र नाराजी व्यक्त करीत सदर शाखा अभियंता हयांची इतरत्र बदली करणे अनिवार्य असल्याचे सांगितले.

सर्व उपस्थित शाखा अभियंता, उपअभियंता, कार्यकारी अभियंता यांना स्पष्ट करण्यात येते की, न्यायाधीश निवासस्थानांच्या दुरुस्ती विषयक कामे ही गांभीर्याने घेण्यात येत नसतील तर संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्यावर कायदेशिर कारवाई प्रस्तावित करणेबाबत न्यायालयाचे आदेश प्राप्त झालेले आहेत त्यामुळे सदर विषय गांभीर्याने हाताळणे गरजेचे आहे असे अ.अ. यांनी सूचित केले.

2. **जिल्हा कारागृह इमारत कामे -**

उपस्थित तुरुंगाधिकारी श्रेणी-1, यांनी सांगितले की, कारागृहाचे main gate ला दुरुस्ती करणे आवश्यक आहे. main gate जवळ शौचालय बांधणे, महिला स्नानगृह ची छताची दुरुस्ती इ. कामे असून प्रथम प्राधान्यक्रम ठरवून एकत्रित कामांची यादी सा.बां. खात्यास सादर करण्यात येईल असेही सांगण्यात आले.

3. **Govt. polytechnic जळगांव -**

शासकिय तंत्रनिकेतन, जळगांव महाविद्यालयाची सर्व कामे पूर्ण झालेली आहेत व चांगल्या पध्दतीने पूर्ण झाल्याबद्दल प्राचार्य महोदयांनी सा.बां.खात्यांच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले असल्याचे उपस्थित प्रतिनिधी यांनी बैठकीत सांगितले. यावर्षीच्या कामांच्या दुरुस्ती कार्यक्रमामध्ये वसतिगृहाच्या दरवाजे खिडक्या दुरुस्ती करणे कामे आहेत. तसेच प्रथम प्राधान्यक्रम ठरवून एकत्रित कामांची यादी सा.बां. खात्यास सादर करण्यात येईल असेही सांगण्यात आले. पुर्वीच्या इमारतीमधील खिडक्यांची काचेची तावदाने वारंवार तुटतात त्याऐवजी फायबर ग्लासची तावदाने लावावीत असे अ.अ. यांनी सूचित केले.

4. **Govt. Engg. College, जळगांव —**

उपस्थित प्रतिनिधी यांनी सांगितले की, महाविद्यालयासमोरुन राष्ट्रीय महामार्ग जात असून सदर ठिकाणी speed breaker बसविणे गरजेचे आहे, यावर अ.अ. यांनी सदर बाबतीत NHAI कडे वर्ग झाले असून speed breaker बसविणेकामी प्रस्ताव NHAI कडे पाठविण्यात यावा असे सूचित केले.

वसतिगृहात बसविण्यात आलेले सोलार पॅनल बंद आहे तरी ते सुरु करणे अथवा बिघाड असल्यास दुरुस्त करुन मिळावे, याबाबत solar system कोणत्या एजन्सीकडून बसविण्यात आले आहे याची पडताळणी करुन त्यावर पुढील कार्यवाही करावी, असे अ.अ. यांनी सूचविले.

प्राचार्य निवासस्थानाचे नविन बांधकाम झाले असून सदर ठिकाणी रस्ता बांधून मिळावा यावर अ.अ. यांनी सूचित केले की, सदर काम नविन असून प्रस्ताव पाठविण्यात यावा, त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. वसतिगृह इमारतीच्या कामात फर्निचरची तरतूद नाही त्यामुळे सदरचे काम होऊ शकत नाही, संबंधीत विभागाने इमारत हस्तांतर करुन घ्यावी.

तसेच प्रथम प्राधान्यक्रम ठरवून इतर आवश्यक कामांची एकत्रित यादी सा.बां. खात्यास सादर करावी, असेही अ.अ. यांनी सूचित केले. त्याचप्रमाणे ज्या इमारती सा.बां. खात्याच्या पीआरवी नोंदवहीत नोंदविलेल्या असतील त्यांच्याच दुरुस्तीची कामे करणे शक्य आहे असे अ.अ. यांनी नमूद केले.

5. **औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जळगांव**

उपस्थित प्रतिनिधी यांनी प्रथम प्राधान्यक्रम ठरवून आवश्यक कामांची एकत्रित यादी सा.बां. खात्यास सादर करावी अ.अ. यांनी सूचित केले. 13व्या वित्त आयोगाअंतर्गत मंजूर काम पुरेसा निधी न मिळाल्याने अर्धवट आहे ते पुर्ण करण्यासाठी निधी उपलब्धतेकरिता विभागाने मागणी पत्र द्यावे.

6. **जिल्हा सामान्य रुग्णालय, जळगांव —**

जिल्हा सामान्य रुग्णालयात वॉर्डांची दुरुस्तीची विविध कामे आहेत. toilet-bathroom लिकेजेस इ. कामे आहेत. यावर अ.अ. यांनी सूचित केले की, रुग्णालयातील प्रत्येक वॉर्डनिहाय पाहाणी करुन वॉर्डनिहाय कामांचा प्रथम प्राधान्यक्रम ठरवून आवश्यक कामांची एकत्रित यादी सा.बां. खात्यास सादर करावी. आरोग्याशी संबंधीत सर्व कामे प्रथम प्राधान्याने प्रस्तावित करावीत.

यावल, पारोळा येथे 30 खाटांऐवजी 50 खाटांचे रुग्णालय बांधणे, मोहाडी रोड येथे दुसऱ्या फेजसाठी कर्मचारी निवासस्थाने बांधण्याकरिता विभागाने स्वतंत्र पत्र दयावे.

7. **पोलीस खाते —**

S.P. इमारतीचे रंगकाम व दुरुस्ती काम चांगली झाली असलेबद्दल अतिरिक्त D.G. यांनी सा.बां. खात्याकरिता चांगला शेरा नोंदविला आहे असे उपस्थित प्रतिनिधी यांनी सांगितले. गतवर्षी वगळ्न कामे झाली आहेत. उर्वरित कामांची प्राधान्य यादी देण्यात यावी. त्याअन्वये अनुदानाचे उपलब्धतेनुसार कामे हाती घेता येतील.

याखेरीज नविन पुर्ण झालेल्या इमारतींचा वापर सुरु करावा कारण बहुतेक कामे मंजूरीनुसार नमुना नकाशावर आधारित व संबंधीत विभागाच्या सहमतीने होतात. त्यामुळे सदर इमारती त्वरीत हस्तांतरीत करुन घ्याव्यात.

सर्व उपस्थित शाखा अभियंता /उपअभियंता / कार्यकारी अभियंता यांना अ.अ. यांनी सूचित आले की, उपरोक्त कामांमध्ये दरवाजे-खिडक्यांची कामे करीत असतांना खिडक्यांना काचा बसविण्याऐवजी यापुढे फायबर glass बसविण्याची तरतूद अंदाजपत्रकात समाविष्ट करावी. तसेच जी कामे सा. बां. खात्यामार्फत करणे शक्य आहे तेवढीच कामे करावीत. उर्वरित कामासाठी अंदाजपत्रक तयार करुन संबंधीत विभागास सादर करावीत. जी कामे दुरुस्तीच्या नियमात (norms मध्ये) बसतात अशीच कामे करावीत.

सुरक्षेशी संबंधीत दरवाजे खिडक्या दुरुस्ती, गळती प्रतिबंधक कामे, संडास-बाथरुम संबंधीत कामे अशी आवश्यक कामे प्रस्तावित करण्यात यावीत. रंगकाम, फरशी बदलणे वेगरे कामे प्रस्तावित करु नयेत.

सा.बां.खात्याचे पीआरबी वर असलेल्या इमारतींचीच कामे हाती घ्यावीत. मूळ स्वरुपाची कामे प्रस्तावित करु नयेत.

2216 या लेखाशिर्षाखाली अत्यल्प अनुदान उपलब्ध होत त्यामुळे उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेत सर्व कर्मचारी यांचेसाठी अत्यावश्यक कामे प्रस्तावित करावी.

शहरी भागासाठी किमान रु.20.00 लक्ष रकमेची कामे अंदाजपत्रकासह प्रस्तावित करावी. तालुक्यासाठी /ग्रामीण भागासाठी एकत्रित प्रस्ताव दयावा.

वर्षभरात करावयाची कामे याची एकत्रित यादी सर्व विभागांनी प्राधान्य निश्चित करुन द्यावी. अनुदानाच्या उपलब्धतेनुसार यादीतील कामे केली जातील. यादी बाहेरील कामे होणार नाहीत याची नोंद घ्यावी.

विषयांकित बैठक दर तिन महिन्यांनी ठेवण्यात येईल व प्रत्येक बैठक केलेल्या कामाचा आढावा घेतला जाईल. तसेच उपभोक्ता विभागाने त्यांच्या मागणीनुसार दुरुस्तीची कामे सुरु असतांना कामावर त्यांच्याकडील जबाबदार अधिकारी नेमून सांगितल्याप्रमाणे कामे होत आहेत किंवा कसे ? याची पाहाणी करावी जेणेकरुन कामे सुयोग्य पध्दतीने होण्यास मदत होईल.

पुढील बैठक जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयात बोलाविण्यात येईल. उपस्थितांचे आभार मानून बैठक समाप्त झाल्याचे घोषित करण्यात आले.

जा.क. सावांमंज / प्रशा-2/ ९५०६ /२०१८
अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,जळगांव,
"बांधकाम भवन" जिल्हाधिकारी कार्यालया समोर,
जिल्हापेठ, जळगांव ४२५००१
दिनांक १७ /०४ /२०१८

अधीक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
जळगांव

प्रत: कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग क्र 2, जळगांव / सा.बां. (उत्तर) विभाग, जळगांव / अमळनेर यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी अग्रेषित

बैठकीचे इतिवृत्त

अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ,कोल्हापूर कार्यालयामध्ये दिनांक १६/०५/२०१८ रोजी कोल्हापूर जिल्हयातील शासकीय निवासी व कार्यालयीन इमारतींची देखभाल व दुरूस्ती कामासंदर्भात संबंधीत उपभोक्ता विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक आयोजित करणेत आली होती.

सदर बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांची यादी सोबत जोडणेत आली आहे.

संबंधीत उपभोक्ता विभागाचे उपस्थित सर्व अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करून खालीलप्रमाणे देखभाल व दुरूस्तीची कामे हाती घेण्याबाबत कार्यवाही करण्याचे बैठकीत ठरविण्यात आले.

उपभोक्ता विभागाकडून इमारतींच्या देखभाल व दुरूस्ती अंतर्गत करावयाच्या कामांची पत्रे, यादी प्राप्त आहेत. सदर पत्रे, यादी सोबत जोडणेत आली आहेत. कार्यकारी अभियंता, उप अभियंता यांनी देखभाल व दुरूस्तीची कामे हाती घेताना उपभोक्ता विभागाने मागणी केलेल्या कामांपैकी छत गळती, स्वच्छतागृहे, ड्रेनेज व्यवस्था व पाण्याशी निगडीत दुरूस्तीच्या कामांना प्रथम प्राधान्य द्यावे. रंगकाम, फरश्या दुरूस्ती करणे इत्यादी इतर कामे निधीच्या उपलब्धेतेनुसार हाती घेणेचे प्रस्तावित करावे. उपभोक्ता विभागाच्या एकत्रित मागणीपैकी दुरूस्ती कामांचा प्राधान्यक्रम ठरवून नियोजन निश्चित करावे व त्यानुसार उपभोक्ता विभागनिहाय विविक्षित / विशेष व किरकोळ देखभाल दुरूस्तीचा कार्यक्रम तयार करणेत यावा.

तसेच काही विभागाकडून कपाटे, खुर्च्या फर्निचर, नविन संरक्षक भिंत बांधणे, पार्किंग शेड, नविन खोल्या, बोअर, व काही नवीन कामांची मागणी केलेचे दिसते. अशा कामांबाबत संबंधीत विभागाच्या मागणीप्रमाणे सा.बां.विभागाकडून MOW मधून अशा नविन कामांची (सोबतच्या यादीप्रमाणे) अंदाजपत्रके तयार करून संबंधीत उपभोक्ता विभागास तात्काळ पाठविणेत यावीत. तसेच ज्या इमारतींचा दोष दायीत्व कालावधी अद्याप पूर्ण झालेला नाही अशा इमारतींची दुरूस्ती संबंधीतांकडून तात्काळ करून घेणेत याव्यात.

बैठकी अंती सर्व उपस्थित अधिकाऱ्यांचे आभार मानून बैठक संपलेची जाहिर केली.

(म.शं.साळुंखे)
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,कोल्हापूर

जा.क्र. रेशा/ २८९० /२०१८
अधीक्षक अभियंता,
सा.बां.मंडळ, कोल्हापूर यांचे कार्यालय,
दिनांक :- 18 MAY 2018

प्रत:- कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,कोल्हापूर / सा.बां.दक्षिण विभाग, कोल्हापूर/ विशेष प्रकल्प (सा.बां.) विभाग, कोल्हापूर/ सा. बां. विद्युत विभाग, कोल्हापूर यांना माहितीसाठी व पुढील उचित कार्यवाहीकरीता रवाना. -- सोबत -वरीलप्रमाणे

प्रत:- उप अभियंता, सा.बां. उपविभाग,कोल्हापूर यांना माहितीसाठी व पुढील उचित कार्यवाहीकरीता रवाना.

उपभोक्ता विभागाच्या मागणीप्रमाणे MOW कामांची यादी		
अ.क्र.	कार्यालय नांव	MOW कामाचे स्वरूप
१५	कोषागार अधिकारी कोल्हापूर	प्रसाधन व स्वच्छतागृह नवीन बांधणे.
१६	जिल्हा समादेशक होमगार्डकार्यालय कोल्हापूर	प्रशिक्षण केंद्राभोवती संरक्षक भिंत बांधणे.
१७	ग्रामीण रूग्णालय कागल	वाहन पार्किंग व्यवस्था करणे, नवीन पत्र्याचे शेड बांधणे, कंपाऊड वॉल बांधणे
१८	वैद्यकीय अधिक्षक, सेवा रुग्णालय कोल्हापूर	रेन वॉटर हारवेस्टींग करणे, जुनी इमारत क्ष किरण विभागातील पार्टीशन बांधकाम काढून वार्ड तयार करणे, दोनचाकीवाहनाकरीता पार्किंग शेड बांधणे.
१९	प्राचार्य, श्रीमती महाराणी ताराबाई शासकीय अध्यापक महाविद्यालय कोल्हापूर	संरक्षक भिंत उंची वाढवून त्यावर लोखंडी रेलींग बसवून मिळणे.
२०	व्यवस्थापक शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार कोल्हापूर	डोटीपी व रिसो यंत्र विभागात सिलींग करणे, कार्यालयामध्ये नवीन फर्निचर करून मिळणे, दुचाकी वाहनांकरीता वाहनतळ करणे व कंपाऊंडवर जाळी मारणे.
२१	जिल्हा शल्यचिकित्सक कोल्हापूर	कार्यालयामध्ये पार्टीशन तयार करणे, जिन्याची दिशा बदलणे.

२०१८-१९

उपभोक्ता विभागाच्या मागणीप्रमाणे MOW कामांची यादी

अ.क्र.	कार्यालय नांव	MOW कामाचे स्वरूप
१	जिल्हा न्यायाधिश, जिल्हा न्यायालय, कोल्हापूर	स्थापत्य जिल्हा न्यायालय, इचलकरंजी - साक्षीदार व पक्षकार यांना बसण्यासाठी कोर्ट लगत समोर शेड मारून बसण्यासाठी काडाप्याचे बाक करून मिळावेत.
		स्थापत्य दिवाणी न्यायालय, वरिष्ठस्तर इचलकरंजी - साक्षीदार व पक्षकार यांना बसण्यासाठी कोर्ट लगत समोर शेड मारून बसण्यासाठी काडाप्याचे बाक करून मिळावेत.
		जिल्हा न्यायालय १ जयसिंगपूर - इमारतीच्या पहिल्या मजल्यावर कागदपत्रे ठेवण्याची भितीतील कपाटे रॅक करणे.
२	कर्नल, मुख्य प्रशासकीय अधिकारी, कोल्हापूर	चौकीदार रूम बांधून देणे.
३	प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोल्हापूर	मुख्य इमारतीची दुरूस्ती -गट निदेशक केबीन मधील पार्टीशन बदलून मिळावे, तसेच बेसिक कॉस्मॉटोलॉजी या व्यवसायात पार्टिशन करणे.
		कार्यशाळा क्र.१ - कार्यशाळामध्ये अंतर्गत व बाहेर तसेच परिसरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवून मिळणेबाबत. व मेन गेट समोर माहिती व मार्गदर्शन केबीन व कक्ष केबीन करून मिळणेबाबत.
		कार्यशाळा क्र.२- गटनिदेशक केबीन करून मिळणे , वीजतंत्री व एमआरएसी सेक्शननुसार पार्टीशन करून मिळावे, कार्यशाळा बाहेरील सिमेंट कॉक्रीट मध्ये गटारी बांधणे.
		कार्यशाळा क्र.३- गटनिदेशक केबीन मध्ये फून अथवा एसी व्यवस्था करणे नविन वायरिंग करणे.
४	अधीक्षक कोल्हापूर जिल्हा कारागृह शहर कोल्हापूर	बंदी व अधिकारी कर्मचारी यांचेकरीता पाणी पुरवठा करण्याकरीता पाणी साठवणूक करणेस नविन टाकी बांधणे अत्यंत आवश्यक आहे.
५	पोलीस अधिक्षक कोल्हापूर	गुन्हे श्वान पथक - कंपाउंड वॉल तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता लगतच्या जागेत आरसीसी खोलीचे बांधकाम करणे.
		पोलीस मुख्यालय येथे - कॉटर गार्ड, नारकोटीक्स सेल, सायबर मेसेज करीता खोल्यांचे बांधकाम करणे.
		पोलीस मुख्यालय येथे - कॉटर गार्ड, व मेस येथील महिला व पुरूष टॉयलेट व बाथरूम बांधकाम
		राधानगरी पो.ठाणे- पोलीस अधिकारी निवासस्थानाभोवती संरक्षण भित बांधणे.
६	उद्यान अधिक्षक शासकीय उद्याने कोल्हापूर	टाऊन हॉल उद्यानमध्ये संस्थान कालीन असलेल्या कांच बंगल्यासाठी नेट शेडींग मारून मिळणे अत्यावश्यक आहे.
		टाऊन हॉल उद्यानामधील देखरेखीसाठी असलेल्या सिक्युरिटी गार्डसाठीगेटवर लहान चौकी बांधून मिळावी.
		प्रिन्स शिवाजी उद्यानामधील मागील बाजूस पक्के कंपाऊंड वॉल बांधून मिळावे.
७	न्यायाधीश सहकार न्यायालय क्र 1 कोल्हापूर	निवासी इमारतीमधील कंपाऊंड मधील रिकाम्या जागेमध्ये फरशी बसवणे.
८	न्यायाधीश सहकार न्यायालय क्र २ कोल्हापूर	न्यायालयीन कर्मचारी व पक्षकारांना पिण्यासाठी पाण्याची स्वतंत्र व्यवस्था / पाईपलाईन टाकणे.
९	पशुसंवर्धन विभाग, मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्र कोल्हापूर	प्रवेशव्दार बांधणे, लोखंडी स्लायडींग ग्रील बसविणे
१०	शिक्षण उपसंचालक कार्यालय कोल्हापूर	आस्थपना शाखा केबीन बांधणे
११	विभागीय कृषी सहसंचालक कोल्हापूर विभाग कोल्हापूर	दोन नविन वाहनांकरीता पार्किंग शेड बांधकाम करणे
१२	सहाय्यक आयुक्त मत्स व्यवसाय तां कोल्हापूर	कार्यालयातील सहाय्यक आयुक्त केबीन मध्ये एसी बसविणे व कारपेट बसवून मिळणे.
१३	दारुबंदी व उत्पादन शुल्क विभाग, कोल्हापूर	वाहने पार्किंगसाठी कॉक्रीटकरणे.
१४	सहाय्यक संचालक कोल्हापूर पुरालेखागार कोल्हापूर, पुराभिलेख संचालनालय, कोल्हापूर	संरक्षक भित बांधणे, कॉक्रीट करणे.

विषय :- सा.बां.विभागाचे अंतर्गत निवासी इमारती व
कार्यालयीन इमारतींच्या देखभाल व दुरूस्ती संदर्भात आढावा
बैठक

सन २०१८-१९

- उपस्थिती नोंदवही -

विषय :- सा.बां.विभागाचे अंतर्गत निवासी इमारती व कार्यालयीन इमारतींच्या देखभाल व दुरूस्ती संदर्भात आढावा बैठक

आज दिनांक १६/०५/२०१८ रोजी निवासी व कार्यालयीन इमारतींच्या देखभाल व दुरूस्ती संदर्भात अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर कार्यालयात आयोजित बैठकीस विविध शासकीय कार्यालयांचे खालीलप्रमाणे अधिकारी / प्रतिनिधी उपस्थित होते.

अ.क्र.	अधिकारी नांव	पद	विभागाचे नांव	दूरध्वनी / मोबाईल क्र.	ई-मेल आयडी	स्वाक्षरी
१	श्री. स.शं.साळुंखे	अधीक्षक अभियंता	सा.बां.मंडळ,कोल्हापूर	8007494456	kolhapur.se@mahapwd.com	
२	श्री. श्री.म.घाटगे	सहा.अधी.अभि.	सा.बां.मंडळ,कोल्हापूर	8830472288	kolhapur.se@mahapwd.com	
३	श्री. आर.एस. पाटील	कार्यकारी अभि.	सा.बां.वि.कोल्हापूर		kolhapur.ee@mahapwd.com	
४	श्री. संदीप शिंदे		भू.सु.चा.मा.चा.वै.मे.कोल्हा पोट.कर्ड	9823014717	Shindesandip77@gmail.com	
५	[illegible]	सहाय्यक आयुक्त	[illegible]	9823430183	[illegible]	
६	डी.एम.दानोळे	अधिक्षकअभियंता	शासकीय तंत्र निकेतन कोल्हापूर	8793010335	danojidm@rediffmail.com	
७	ए.एस.मेडीकर	प्राचार्य	[illegible]	9371930352	Vidyaramcollege@gmail.com	
८	एन.डी.कौलवे	अधिक्षक	[illegible]	2624955	jccholapur@gmail.com	
९	डी.डी.शिंदे	कार्यालय अधिक्षक	सरकार न्यायालय कोल्हापूर	2629755	Jccholapur1@gmail.com	

Jccholapur@gmail.com

अ.क्र.	अधिकारी नांव	पद	विभागाचे नांव	दूरध्वनी / मोबाईल क्र.	ई-मेल आयडी	स्वाक्षरी
१०	S.L. Aole	Sr. Jailor	Sub Jail (Bindu Chowk)	(02028323)		
११	Dr. M.B. Kurane	Asst.	Education (SMTT Govt. College)	9273940065	tsheimaharani@yahoo.in	
१२	B.M. Jadhav	Accounts Officer	R.T.O, Kolhapur	9923334080 (0231) 2663131	mh09@mahatranscom.in	16.5.18
१३	P.A. Bhosale	Office Supdt.	RTO Kolhapur	0231/2324276	rto.kolhapur@yahoo.co.in	
१४	Abhijeet Hasurkar	C.S. office Kop. P.A.	Civil Surgeon office Kolhapur	0231/2660355 9765024103	rhcellkolhapur@gmail.com abhijeetai1@gmail.com	
१५	Dr. Deshpande R.V.	Principal	SMT Govt. College of Education, Kop	9823235397	tsmimaharani@yahoo.in	
१६	Sh. B. Awale	Reserch Ass.	पुरातत्त्व संग्रहालय	9823065403 0231-2658336	ddo5692.archivesoffice@gmail.com	
१७	V. T. Dalvi	D.T.	प्रादेशिक परिवहन	0231-2650375	Kolhapur9p@yahoo.co.in	
१८	D. G. Giri	पोलीस हवालदार	शासकीय मुद्रणालय	0231-2658395		
१९	V. S. Jadhav	P.C. Head Clerk	जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय कोल्हापूर	0231-2543899		V.S. Jadhav P.C.
२०	[illegible]	[illegible]	[illegible]	9420773302	[illegible]	

नियासी इमारती व कार्यालयीन इमारतींच्या देखभाल व दुरुस्ती संदर्भात आढावा बैठक

अ.क्र.	अधिकारी नांव	पद	विभागाचे नांव	दूरध्वनी / मोबाईल क्र.	ई-मेल आयडी	स्वाक्षरी
३२	H.S. Hadale	T.O. DTDA, Kolhapur	Agriculture	9421398923	dtakolhapur@yahoo.co.in	
३३	A.B. Patil	Garden Supdt. Town Hall Garden, Kolhapur	PWD Parks & Garden	9404513666	gskolhapur.pg@mahapwd.com	
३४	S.V. Kattkar	Clerk DSDO Kolhapur	Agriculture	9158063170	—	
३५	Satish Mane	DYSP (HQ) Kolhapur	office of the Supdt. of Police, Kolhapur	9158989495		
३६	M.R. Chinde	Deputy Engr. Asst. D. Engg. Kolhapur	PWD Electrical	9850849259	mr.chinde16@gmail.com	
३७	Sanjay Shinde	ROC	Revenue	2654912	[illegible]@gmail.com	
३८	Pushpa V. Hinge (Mali)	ST. clerk	Deputy Director of Education	0231-2543894	dydekop@gmail.com	P.V.Hinge.
३९						
४०						
४१						
४२						

...यासी इमारती व कार्यालयीन इमारतींच्या देखभाल व दुरुस्ती संदर्भात आढावा बैठक

दि.०८/०५/२०१८ रोजी सोलापूर जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय विभाग प्रमुख यांचेसमवेत सन २०१८-१९ मध्ये शासकिय इमारतींची देखभाल व दुरुस्ती साठी करावयाचे नियोजनाबाबत घेतलेल्या बैठकीचा इतिवृत्तांत.

बैठकीस उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांची यादी सोबत जोडली आहे.

सर्वप्रथम बैठकीस उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांचे स्वागत करण्यात आले. बैठकीमध्ये विविध उपभोक्ता विभागांनी इमारतींची दुरुस्ती करण्याच्या कामांची यादी मंडळ कार्यालयास सादर केली. सादर केलेल्या कामांबाबत संबंधीतांशी चर्चा करण्यात आली. त्यानुसार सर्व संबंधीत उपअभियंता, शाखा अभियंता व संबंधीत उपभोक्ता विभागाचे अधिकारी यांनी पत्रा नमुद कामांची संयुक्त पाहणी तात्काळ करुन घेण्यात यावी.

सदर पाहणीत अत्यावश्यक / तातडीच्या कामांसाठी आणि Drainageव Leakage च्या कामांकरिता प्रथम प्राधान्य देऊन किरकोळ दुरुस्ती CR / विशेष दुरुस्ती SLR / विविक्षित दुरुस्ती SDR या वर्गवारीत कामांचे विभाजन करुन कार्यक्रम निधिच्या उपलब्धतेनुसार मंजूरीसाठी विशेष दुरुस्ती SLR / विविक्षित दुरुस्ती SDR या वर्गवारीत सादर करावा. कार्यक्रम सादर करताना सदर कामासाठी उपभोक्ता विभागांकडून त्या अनुषंगाने पत्र / शिफारस घेण्याच्या सुचना देण्यात आल्या.

तसेच उपरोक्त अनुज्ञेय दुरुस्तीच्या वर्गवारीत न मोडणा-या कामांसाठी, उपभोक्ता विभागाच्या अग्रक्रमानुसार अंदाजपत्रके MOW / स्वेच्छा निधी / ठेव जमा मधून मंजूरी घेऊन, निधी प्राप्त झाल्यावर काम करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

उपअभियंता, विद्युत उपविभाग, सोलापूर यांनी आवश्यक ठिकाणी पाहणी करुन तातडीची कामे वेळेत करण्याबाबत सुचना देण्यात आल्या.

उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर करण्यात आले.

जा.क्र.एसओएल/पीडब्ल्यूसी/प्र.-२/ **१४६६** /२०१८.
अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, सोलापूर, यांचे कार्यालय,
दिनांक :- **१५/०५/२०१८.**
E-mail:- solapur.se@mahapwd.com

(राजेश भ. पाटील)
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर.

प्रत :- कार्यकारी अभियंता, सा. बां. वि., सोलापूर / क्र.२, सोलापूर/ पंढरपूर /अकलूज यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- प्रकल्प - १ / ४ / सा. बां. मंडळ, सोलापूर यांना माहितीसाठी.
प्रत :- अ.अ. नस्ती.

दि. **०८.०५.२०१८ रोजी 'शासकीय इमारतींची देखभाल व दुरुस्तीबाबत'** आयोजित आढावा बैठकीस उपस्थित सर्व प्रशासकीय विभागांचे अधिकारी / कर्मचारी खालीलप्रमाणे.

अ.क्र.	उपस्थित अधिकारी नांव / पदनाम सर्वश्री.	प्रशासकीय विभाग
१)	जाधव एस. एल. प्रबंधक	आयटीआय (मुलांचे) सोलापूर
२)	अवसेकर व्ही.एस., मुख्यालय सहायक	उपअधिक्षक भूमी अभिलेख, अक्कलकोट.
३)	हरळेकर एस. एन., उपअधिक्षक भूमी अभिलेख, मंगळवेढा	उपअधिक्षक भुमि अभिलेख, मंगळवेढा.
४)	एस.एम. कांडगांवकर, मुख्यालय सहायक.	उपअधिक्षक भुमि अभिलेख, मोहोळ.
५)	द.आ. कटारे	शां. तं. नि. सोलापूर.
६)	बिराजदार यु.ए., राज्यकर सहआयुक्त (GST Bharan)	जीएसटी (विक्रीकर विभाग)
७)	पो.नि. के.पी. तिर्थंकर	राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१०, सोरेगांव
८)	ए. आर. कुलकर्णी	न्याय विभाग
९)	बी. के. कोळेकर, प्राचार्य	औ.प्र. संस्था, मुलींची सोलापूर, मंगळवेढा व मंद्रूप
१०)	ए. पी. अधटराव	पोलीस अधिक्षक कार्यालय सोलापूर ग्रामीण.
११)	आर. बी. कुलकर्णी	न्याय विभाग
१२)	श्रीमती डाके जे. सी.	सामाजिक न्याय विभाग
१३)	अे. एस. कोळी	जोडभावी पेठ पोलीस ठाणे लाईन अंमलदार सोलापूर शहर.
१४)	पो. उपनिरीक्षक, एच.एम. भंगाळे	जिल्हा गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण.
१५)	राजेंद्र विठ्ठल पवार, उपअधिक्षक भुमि अभिलेख, करमाळा.	भूमि अभिलेख
१६)	जे. जे. कुलकर्णी, राज्यकर अधिकारी	GST Bharan
१७)	एस. ए. शेख, वरिष्ठ लिपिक, होमगार्ड, सोलापूर	होमगार्ड कार्यालय सोलापूर शहर.
१८)	एस. आर. रजपूत वरिष्ठ लिपिक, जि.अ.कृ.अ सोलापूर	कृषि विभाग
१९)	व्ही. एस. सुलगडले, लिपिक	प्रतिनिधी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
२०)	डॉ. सतिन का. मेश्राम	वैद्यकिय अधिक्षक, श्री छ.शि.म.सर्वो. रु, सोलापूर
२१)	एस. डी. हिरे, प्राचार्य आयटीआय पंढरपूर	प्र.जि.व्य.शि. व प्र.अधिकारी.
२२)	डॉ. गजानन जत्ती, सहयोगी प्राध्यापक	डॉ. वै.स्मृ.शा.वै.म., सोलापूर.
२३)	समाधान जामकर, प्र. अधिकारी	
२४)	अनिल माने, कार्यालय अधिक्षक	
२५)	अनभुले व.श्रे.लि.	पोलीस आयुक्त कार्यालय, सोलापूर शहर.

13.1.11

शासकिय निवासी/अनिवासी इमारतीच्या दुरुस्ती कामाबाबत सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड येथे उपभोक्ता खात्यासोबत दि.२६/०५/२०१५ रोजीच्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री के.टी.पाटील, अधीक्षक अभियंता (प्र), सा.बां, मंडळ, नांदेड.

२) श्री. जि.एच.राजपूत, कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, नांदेड.

३) श्री. व्हि.आर.धारासुरकर, कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, भोकर.

४) डॉ. श्री.एस.व्ही.अन्नपूरे, अधिष्ठाता, शासकिय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड.

५) श्री. अजिमोद्दीन अ.अमिद वरिष्ठ श्रे.लिपीक, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे प्रतिनिधी.

६) श्री. पी.आर.लाठकर, जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी.

७) श्री. एल. टी. जाधव, अधिव्याख्याता शासकिय तंत्रनिकेतन, नांदेड.

८) श्री. आर.आर.आडे, सहा. अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, नांदेड.

९) श्री. पी. पी. देशपांडे, उप-विभागीय अभियंता, सा.बां. उप-विभाग (उत्तर) नांदेड.

१०) श्री. जी. व्ही. भांगे, उप-विभागीय अभियंता, सा.बां. उप-विभाग (दक्षिण) नांदेड.

सदर बैठकीस अनुपस्थित असलेल्या अधिकारी यांचे विभाग.

१) विधी व न्याय विभाग, नांदेड.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, नांदेड.
३) डॉ. शंकरराव चव्हाण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नांदेड.
४) जिल्हा व्यवसाय व शिक्षण अधिकारी, नांदेड.
५) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नांदेड.
६) प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय, किनवट.
७) विक्रिकर विभाग, नांदेड.

बैठकीस सुरुवात करतांना उपभोक्ता खात्याकडील उपस्थित अधिकारी कर्मचारी यांना शासनाकडुन शासकिय निवासी/अनिवासी इमारतीच्या दुरुस्तीसाठी नांदेड जिल्हयासाठी चालु आर्थिक वर्षासाठी उपलब्ध असलेल्या एकूण निधी बाबत माहिती अवगत करुन दिली.

सर्व उपस्थित प्रतिनिधींना शासनाकडुन प्राप्त निधी हा प्रामुख्याने इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठीच असतो उदा. गळती प्रतिबंधक उपाय-योजना, जल/मल निःस्सारण, दरवाजे/खिडक्यांची दुरुस्ती, गिलावा, रंगरंगोटी, तुटलेल्या फरशा बदलने इ. तरी त्यांनी कामे प्रस्तावित

बऱ्याच उपभोक्ता विभागाकडुन मुळ स्वरुपाची कामे उदा. पार्टीशन करणे, छताला फाल्स सिलींग करणे, इमारतीत नविन दरवाजे करणे, अनावश्यक रंगरंगोटी, नविन डिझाईनची फरशी बसविणे अशी कामे व वाहनासाठी गॅरेज बांधने इमारतीतील अंतर्गत रचना बदलणेसाठीचे प्रस्ताव पत्राव्दारे सादर केल्याचे दिसून येते त्यासाठी दुरुस्तीच्या कामासाठी प्राप्त निधी खर्च करता येत नाही. त्यामुळे अशा कामांची आवश्यकता असल्यास वेगळे अंदाजपत्रक तयार करुन शासनाकडुन मान्यता प्राप्त झाल्यास व उपभोक्ता खात्याने स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिल्यास अशा स्वरुपाची कामे करता येतील या अनुषंगाने सूचना दिल्या व तशी कामे आवश्यक असल्यास शाखा अभियंता यांच्या मदतीने अंदाजपत्रके तयार करण्याबाबत सूचविण्यात आले.

उपस्थित प्रतिनिधींना दुरूस्तीची कामे प्रस्तावित करतांना त्यांचा प्राधान्य क्रम निश्चित करूनच कळविण्यात या बाबत सूचना देण्यात आली. तसेच त्यांच्या विभागाच्या कामाची यादी सोबत आणली असल्यास बैठकीतील सूचनानुसार त्यात सुधारणा करुन देण्याबाबत चर्चा झाली.

नांदेड जिल्हयात विभागनिहाय सा.बां. विभागाच्या PRB रजिस्टर वरील इमारतींची संख्या, एकूण बांधकाम क्षेत्रफळ, सन २०१५-१६ साठी विभागनिहाय निवासी व अनिवासी इमारतींच्या देखभाल व दुरूस्तीसाठी मंजूर व वितरीत अनुदान या बाबतचा तक्ता सोबत माहितीस्तव जोडण्यात येत आहे. त्यानुसार कामे उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेतच प्रस्तावित करावीत.

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सहपत्रः वरील प्रमाणे

जा.क्र/अ.अ.नां/प्रशा इमा/ 2e9y

दिनांक :- - 6 JUN 2015

अधीक्षक अभियंता (प्र)
सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड.

प्रती.

मा. जिल्हाधिकारी, नांदेड
मा. जिल्हान्यायाधिश, नांदेड
मा. पोलीस अधिक्षक, नांदेड.
मा. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड
मा. अधिष्ठाता, डॉ. श. च. शा. वै. म. नांदेड
मा. जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड
मा. जिल्हा व्यवसाय व शिक्षण अधिकारी, नांदेड
मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड
मा. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड
मा. प्रकल्प अधिकारी, किनवट
मा. विक्रीकर आयुक्त नांदेड

प्रत: मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

~~कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड/भोकर~~ यांना माहिती व उ

के. टी. पाटील
अधीक्षक अभियंता, (प्र.)

नांदेड.

विषय:- २०१५ ते २२१६ लेखाशिर्षांतर्गत मंजूर शासकिय निवासी/ अनिवासी इमारतीच्या विशेषित दुरुस्ती/विशेष दुरुस्ती व किरकोळ दुरुस्ती कामाच्या प्रस्तावित कार्यक्रमास मान्यता मिळे.

संदर्भ:- १) मेहा.स कार्यालयाचे पत्र क्र. अ.भा.पा/४८ ५५/प्रशा/इमा. ५०३३ दि. २३.०३.२०१५.
२) मेहा.स कार्यालयाचे म.शा.पत्र क्र. प्रशा/इमा ८८३७ दि.२४.१२.२०१४.
३) मेहा.स कार्यालयाचे म.शा.पत्र क्र. प्रशा/इमा २०८३ दि.२८.०४.२०१५.
४) मेहा.स कार्यालयाचे म.शा.पत्र क्र. प्रशा/इमा ७०७० दि.२८.०५.२०१५.

अ.शा. पत्र क्र. प्रशा/इमा/४८२१५ दि. - 6 JUN 2015

प्रिय, श्री.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र-१ पत्रान्वये सा.बां. विभागाचा दायित्व कार्यक्रमास मान्यता घेणे बाबत कळविण्यात आले होते त्याबाबत अद्याप कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. तसेच या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र.-२ अन्वये शासकिय निवासी/अनिवासी इमारतीच्या विशेषित, विशेष व किरकोळ दुरुस्तीसाठीच्या वर्षासाठीच्या एकत्रित कार्यक्रम सादर करण्यासाठी उपभोक्ता विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करावी व त्या बैठकिस मंडळ कार्यालयातील प्रतिनिधी उपस्थित राहण्यासाठी बैठकीचा दिनांक व वेळ मंडळ कार्यालयास कळविण्याबाबत कळवून ही अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही.

मंडळ कार्यालयात दि. ०२-०३-२०१५ ते ०४-०३-२०१५ या कालावधीत २०१५/२२१६ या लेखाशिर्षांतर्गत प्रस्तावित/मंजूर कामांची लेखा तपासणी नागपूर येथिल तपासणी पथकाने केली आहे. त्या अन्वये आपल्या विभागासी संबंधीत मुद्यांच्या अहवाल विभागाकडुन मागविण्यात आला असून तो अद्याप सादर झालेला नाही. त्यामध्ये सुध्दा दुरुस्तीचा कार्यक्रम एकत्रित न मंजूर केल्याबाबत, उपभोक्ता विभागाची बैठक न घेतल्याबाबत मुद्दे उपस्थित केले असल्याने भविष्यात उक्त बाबी टाळण्यासाठी त्यांचे अनुपालन व्हावे.

तसेच विभागाचा दायित्व कार्यक्रम आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस मंजूर न केल्यामुळे, शासनाकडुन प्राप्त निधी वेळेत खर्च करणे शक्य होत नाही. करिता आपल्या विभागाचे दायित्व कार्यक्रम अगोदर मान्यतेस्तव सादर व्हावेत व नविन कार्यक्रमासाठी शासन परिपत्रक क्र. बीडीजी-१०८५/सिआर-४/इमा-२ दि. १५-०४-८५ मधील सुचनेचे पालन व्हावे व विभागाचा अनुज्ञेय कार्यक्रम दायित्व इत्यादी बाबत प्रस्तावित कार्यक्रमासोबत माहिती सादर व्हावी. योग्य कार्यवाहीच्या अपेक्षेसह.

सस्नेह

आपला स्नेहांकित
(के.टी. पाटील)

प्रती,

श्री. व्ही. आर. धारासूरकर,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, भोकर.

प्रती,

श्री. एस. बी. देशपांडे,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, हिंगोली.

प्रती,

श्री. जि. एच. राजपूत,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, नांदेड.

प्रती,

श्री. एस. बी. सोलनकर,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, परभणी.

\\192.168.0.10\dfs\...\EXAMINATION.DOC

...आपल्या विभागाचा दायित्व कार्यक्रम अद्याप मंजूरीस्तव सादर केलेला नसल्याने त्यास मान्यता प्र... आलेली आहे. त्यामुळे BDS प्रणालीवर अशा कामासाठी उपलब्ध झालेला निधी वितरीत करता ...

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

वेबसाईट : www.mahapwd.com
ई-मेल : nanded.se@mahapwd.com
दुरध्वनी क्र : (02462) 253273,254502
फॅक्स : (02462) 253277

कार्यालय : अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड
स्नेहनगर, नांदेड.
पिन : 431 602

जा.क्र.अअनां/2017-18/इमा /
ईमेलद्वारे

दिनांक :

प्रति,

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड / भोकर /देगलूर / परभणी / हिंगोली

विषय : इमारत देखभाल दुरूस्तीच्या कामाचे पेंडींग बिल रजिस्टर ठेवणे बाबत.

संदर्भ : महालेखापाल कार्यालयाची तपासणीत उपस्थित मुद्यांच्या अनुपालनानुसार

आपल्या विभागातर्गत असलेल्या शासकिय इमारत देखभाल दुरूस्तीच्या कामाचे पेंडींग बिल रजिस्टर ठेवलेले नाही त्या बाबत महालेखापाल कार्यालयाने केलेल्या तपासणीत मुद्या उपस्थित केला आहे.

त्याअनुशंगाने आपणास कळवण्यात येते कि आपल्या विभागातर्गत असलेल्या सर्व कामांचे पेंडींग बिल रजिस्टर ठेवण्यात यावे व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

अधीक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

के. टी. पाटील
अधीक्षक अभियंता, (प्र.)

नांदेड.

विषय:- २०१५ व २०१६ लेखाशिर्षांतर्गत मंजूर शासकिय निवासी/ अनिवासी इमारतीच्या विशेषत: दुरुस्ती/विशेष दुरुस्ती व किरकोळ दुरुस्ती कामाच्या दायित्व कार्यक्रमास मान्यता घेणे.

संदर्भ:- १) मंडळ कार्यालयाचे पत्र क्र. अधानी/२.४ ५५/प्रशा/इमा. २०१३ दि. १६.०३.१५.
२) मंडळ कार्यालयाचे अ.शा.पत्र क्र. प्रशा/इमा-८८६५ दि.२४.१२.२०१४.
३) मंडळ कार्यालयाचे अ.शा.पत्र क्र. प्रशा/इमा-२०५३ दि.२८.०४.२०१५.
४) मंडळ कार्यालयाचे अ.शा.पत्र क्र. प्रशा/इमा-२०७८ दि.२८.०५.२०१५.

अ.शा. पत्र क्र. प्रशा/इमा/ ८८२५ दि. - 6 JUN 2015

प्रिय, श्री.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र-१ पत्रान्वये सा.बां. विभागाचा दायित्व कार्यक्रमास मान्यता घेणे बाबत कळविण्यात आले होते त्याबाबत अद्याप कार्यवाही झाल्याचे दिसुन येत नाही. तसेच या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र.-२ अन्वये शासकिय निवासी/अनिवासी इमारतीच्या नियमित, विशेष व किरकोळ दुरुस्तीसाठीचा वर्षासाठीचा एकत्रित कार्यक्रम सादर करण्यासाठी उपभोक्ता विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करावी व त्या बैठकिस मंडळ कार्यालयातील प्रतिनिधी उपस्थित राहण्यासाठी बैठकीचा दिनांक व वेळ मंडळ कार्यालयास कळविण्याबाबत कळवून ही अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही.

मंडळ कार्यालयात दि. ०२-०३-२०१५ ते ०४-०३-२०१५ या कालावधीत २०१५/२०१६ या लेखाशिर्षांतर्गत प्रस्तावित/मंजूर कामांची लेखा तपासणी नागपूर येथिल तपासणी पथकाने केली आहे. त्या अन्वये आपल्या विभागासी संबंधीत मुद्यांच्या अहवाल विभागाकडुन मागविण्यात आला असून तो अद्याप सादर झालेला नाही. त्यामध्ये सुध्दा दुरुस्तीचा कार्यक्रम एकत्रित न मंजूर केल्याबाबत, उपभोक्ता विभागाची बैठक न घेतल्याबाबत मुद्दे उपस्थित केले असल्याने भविष्यात उक्त बाबी टाळण्यासाठी त्यांचे अनुपालन व्हावे.

तसेच विभागाचा दायित्व कार्यक्रम आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस मंजूर न केल्यामूळे, शासनाकडुन प्राप्त निधी वेळेत खर्च करणे शक्य होत नाही. करिता आपल्या विभागाचे दायित्व कार्यक्रम आताच मान्यतेस्तव सादर व्हावेत व नविन कार्यक्रमासाठी शासन परिपत्रक क्र. बीडीजी-१०८५/सिआर-४/इमा-२ दि. १५-०४-८५ मधील सुचनेचे पालन व्हावे व विभागाचा अनुज्ञेय कार्यक्रम दायित्व इत्यादी बाबत प्रस्तावित कार्यक्रमासोबत माहिती सादर व्हावी. योग्य कार्यवाहीच्या अपेक्षेसह.

सस्नेह

आपला स्नेहांकित

(के.टी. पाटील)

प्रती,

श्री. व्ही. आर. धारासूरकर,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, भोकर.

प्रती,

श्री. एस. जी. देशपांडे,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, हिंगोली.

प्रती,

श्री. जि. एच. राजपूत,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, नांदेड.

प्रती,

श्री. एस. बी. सोलनकर,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, परभणी.

S:\P>>

F:\WORD\D.O.1R.DOC

दायित्व कार्यक्रमास अद्याप मंजूरी दिल्याने सादर केलेला नसल्याने त्यास मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे BDS प्रणालीवर अशा कामासाठी उपलब्ध झालेला निधी वितरीत करता

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

वेबसाईट : www.mahapwd.com
ई-मेल : nanded.se@mahapwd.com
दुरध्वनी क्र : (02462) 253273,254502
फॅक्स : (02462) 253277

कार्यालय : अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड
स्नेहनगर, नांदेड.
पिन : 431 602

जा.क्र.अअनां/2017-18/इमा / दिनांक :

ईमेलद्वारे

प्रति,

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड / भोकर /देगलूर / परभणी / हिंगोली

विषय : इमारत देखभाल दुरूस्तीच्या कामाचे पेंडींग बिल रजिस्टर ठेवणे बाबत.

संदर्भ : महालेखापाल कार्यालयाची तपासणीत उपस्थित मुद्यांच्या अनुपालनानुसार

आपल्या विभागातर्गत असलेल्या शासकिय इमारत देखभाल दुरूस्तीच्या कामाचे पेंडींग बिल रजिस्टर ठेवलेले नाही त्या बाबत महालेखापाल कार्यालयाने केलेल्या तपासणीत मुद्या उपस्थित केला आहे.

त्याअनुशंगाने आपणास कळवण्यात येते कि आपल्या विभागातर्गत असलेल्या सर्व कामांचे पेंडींग बिल रजिस्टर ठेवण्यात यावे व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

अधीक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

3·1·11

शासकिय निवासी/अनिवासी इमारतीच्या दुरुस्ती कामाबाबत सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड येथे उपभोक्ता खात्यासोबत दि.२६/०५/२०१५ रोजीच्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री के.टी.पाटील, अधीक्षक अभियंता (प्र), सा.बां, मंडळ, नांदेड.

२) श्री. जि.एच.राजपूत, कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, नांदेड.

३) श्री. व्हि.आर.धारासुरकर, कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, भोकर.

४) डॉ. श्री.एस.व्ही.अन्नपूरे, अधिष्ठाता, शासकिय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड.

५) श्री. अजिमोद्दीन अ.अमिद वरिष्ठ श्रे.लिपीक, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे प्रतिनिधी.

६) श्री. पी.आर.लाठकर, जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी.

७) श्री. एल. टी. जाधव, अधिव्याख्याता शासकिय तंत्रनिकेतन, नांदेड.

८) श्री. आर.आर.आडे, सहा. अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, नांदेड.

९) श्री. पी. पी. देशपांडे, उप-विभागीय अभियंता, सा.बां. उप-विभाग (उत्तर) नांदेड.

१०) श्री. जी. व्ही. भांगे, उप-विभागीय अभियंता, सा.बां. उप-विभाग (दक्षिण) नांदेड.

सदर बैठकीस अनुपस्थित असलेल्या अधिकारी यांचे विभाग.

१) विधी व न्याय विभाग, नांदेड.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, नांदेड.
३) डॉ. शंकरराव चव्हाण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नांदेड.
४) जिल्हा व्यवसाय व शिक्षण अधिकारी, नांदेड.
५) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नांदेड.
६) प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय, किनवट.
७) विक्रिकर विभाग, नांदेड.

बैठकीस सुरुवात करतांना उपभोक्ता खात्याकडील उपस्थित अधिकारी कर्मचारी यांना शासनाकडुन शासकिय निवासी/अनिवासी इमारतीच्या दुरुस्तीसाठी नांदेड जिल्हयासाठी चालु आर्थिक वर्षासाठी उपलब्ध असलेल्या एकूण निधी बाबत माहिती अवगत करुन दिली.

सर्व उपस्थित प्रतिनिधींना शासनाकडुन प्राप्त निधी हा प्रामुख्याने इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठीच असतो उदा. गळती प्रतिबंधक उपाय-योजना, जल/मल निःस्सारण, दरवाजे/खिडक्यांची दुरुस्ती, गिलावा, रंगरंगोटी, तुटलेल्या फरशा बदलने इ. तरी त्यांनी कामे प्रस्तावित

बऱ्याच उपभोक्ता विभागाकडुन मुळ स्वरुपाची कामे उदा. पार्टीशन करणे, छताला फाल्स सिलींग करणे, इमारतीत नविन दरवाजे करणे, अनावश्यक रंगरंगोटी, नविन डिझाईनची फरशी बसविणे अशी कामे व वाहनासाठी गॅरेज बांधने इमारतीतील अंतर्गत रचना बदलणेसाठीचे प्रस्ताव पत्राव्दारे सादर केल्याचे दिसून येते त्यासाठी दुरुस्तीच्या कामासाठी प्राप्त निधी खर्च करता येत नाही. त्यामुळे अशा कामांची आवश्यकता असल्यास वेगळे अंदाजपत्रक तयार करुन शासनाकडुन मान्यता प्राप्त झाल्यास व उपभोक्ता खात्याने स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिल्यास अशा स्वरुपाची कामे करता येतील या अनुषंगाने सूचना दिल्या व तशी कामे आवश्यक असल्यास शाखा अभियंता यांच्या मदतीने अंदाजपत्रके तयार करण्याबाबत सूचविण्यात आले.

उपस्थित प्रतिनिधींना दुरूस्तीची कामे प्रस्तावित करतांना त्यांचा प्राधान्य क्रम निश्चित करूनच कळवावित या बाबत सूचना देण्यात आली. तसेच त्यांच्या विभागाच्या कामाची यादी सोबत आणली असल्यास बैठकीतील सूचनानुसार त्यात सुधारणा करुन देण्याबाबत चर्चा झाली.

नांदेड जिल्हयात विभागनिहाय सा.बां. विभागाच्या PRB रजिस्टर वरील इमारतींची संख्या, एकूण बांधकाम क्षेत्रफळ, सन २०१५-१६ साठी विभागनिहाय निवासी व अनिवासी इमारतींच्या देखभाल व दुरूस्तीसाठी मंजूर व वितरीत अनुदान या बाबतचा तक्ता सोबत माहितीस्तव जोडण्यात येत आहे. त्यानुसार कामे उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेतच प्रस्तावित करावीत.

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सहपत्रः वरील प्रमाणे

जा.क्र/अ.अ.नां/प्रशा इमा/ २८९५

दिनांक :- ६ JUN 2015

अधीक्षक अभियंता (प्र)
सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड.

प्रती.

मा. जिल्हाधिकारी, नांदेड
मा. जिल्हान्यायाधिश, नांदेड
मा. पोलीस अधिक्षक, नांदेड
मा. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड
मा. अधिष्ठाता, डॉ. श. च. श्रा. वै. म. नांदेड
मा. जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड
मा. जिल्हा व्यवसाय व शिक्षण अधिकारी, नांदेड
मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड
मा. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड
मा. प्रकल्प अधिकारी, किनवट
मा. विक्रीकर आयुक्त नांदेड

प्रतः मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

~~मा. अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड/भोकर~~ यांना माहिती व उ

Visit us @ www.mahapwd.com
Ph.No. (02562) 288751
Fax.No. (02562) 288753

जा.क्र. प्रशा-२/ 2285 /सन २०१८
कार्यालय : अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे
E-mail : dhule.se@mahapwd.com
दिनांक : 9/5/२०१८

प्रति,

१) म.जिल्हाधिकारी, धुळे
२) म.पोलीस अधिक्षक, नंदुरबार
३) म.जिल्हा कृषि अधिकारी, धुळे/ नंदुरबार
४) म.प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे
५) म.प्राचार्य शासकिय तंत्र निकेतन, धुळे/ नंदुरबार
६) म.प्राचार्य शासकिय तांत्रीक विद्यालय, धुळे/ नंदुरबार
७) म.अधिष्ठाता, भाऊसाहेब हिरे वैद्यकिय महाविद्यालय, धुळे
८) म.जिल्हा शल्य चिकित्सक, नंदुरबार
९) म.उप संचालक, तांत्रिक शिक्षण व प्रशिक्षण, धुळे
१०) म.प्राचार्य, शासकीय अध्यापक विद्यालय, धुळे / नंदुरबार
११) म.प्राचार्य, शासकीय पब्लिक विद्यालय, धुळे
१२) म.पोलीस अधिक्षक राष्ट्रीय बलगट क्र.५ व ६, धुळे
१३) म.अधिक्षक जिल्हा कारागृह, नंदुरबार
१४) म.कमांडर, एन.सी.सी., धुळे
१५) म.अधीक्षक, विक्री कर व खरेदी विभाग, धुळे / नंदुरबार

विषय : **सा.बां. विभागामार्फत विविध उपभोक्ता विभागांच्या इमारतीचे देखभाल व दुरुस्ती करणेसाठी सन २०१८-१९ मधील कार्यक्रम आराखडा तयार करणेसाठीची बैठक**

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. प्रशा-२/२१३१ दि.१०/०५/२०१८

महोदय,

संदर्भिय पत्रान्वये उपभोक्ता विभागांच्या प्रमुख/प्रतिनिधी समवेत इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीच्या अनुषंगाने या कार्यालयात दि.१४/५/२०१८ रोजी बैठकीचे आयोजन करण्यांत आल्याचे आपणांस कळविण्यात आले होते. मात्र सदरील बैठकीस आपले प्रतिनिधी उपस्थित नव्हते तसेच,आपल्या विभागाकडे इमारतींच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांची यादी व प्राधान्यक्रमानुसार दुरुस्तीच्या कामांची मागणी या कार्यालयास पाठविण्यांत आलेली नाही.

तरी आपणांस पुन्हा विनंती करण्यांत येते की, आपल्या अखत्यारितील इमारतींना आवश्यक असणाऱ्या दुरुस्तीच्या कामांचा तपशिल या कार्यालयास पाठविण्यांत यावा. तसेच दुरुस्तीची कामे सुचविताना अधिक निकडीची कामे प्राधान्यक्रमानुसार सुचविण्यांत यावी,म्हणजे उपलब्ध अनुदानाच्या अनुषंगाने प्राधान्यक्रमानुसार इमारतींच्या दुरुस्तीची कामे हाती घेणे शक्य होईल.

तसेच काही लहान स्वरुपाची नविन कामांची आवश्यकता असेल तर त्याचा तपशिल सुध्दा कळविण्यांत यावा. म्हणजे अशा कामांचे अंदाजपत्रके (MOW) तयार करणे सुकर होईल. कृपया एका आठवड्याच्या सदरील कार्यवाही अपेक्षित आहे.

अधीक्षक अभियंता
सा.बां.मंडळ, धुळे

प्रत: मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांना माहितीस्तव सादर.
प्रत : कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, धुळे / नंदुरबार / शहादा / रो.ह.यो. (सा.बां.) विभाग, धुळे यांना माहितीसाठी व कार्यवाहीस्तव.
प्रत : कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, (विद्युत) , नाशिक / उप अभियंता (विद्युत) उपविभाग, धुळे यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

०/८

Visit us at : www.mahapwd.com
Tele. No.02562-288751
Fax No.02562-288753

दि.14 मे, 2018

बैठकीचे इतिवृत्त

विषय :- **सा. बां. विभागामार्फत विविध उपभोक्ता विभागाच्या इमारतीचे देखभाल व दुरुस्ती करणेसाठी सन २०१८-२०१९ मधील कार्यक्रम निश्चित करणेबाबत आढावा बैठक.**
धुळे व नंदुरबार जिल्हा

उपस्थित अधिकारी –

१. मा. श्री. ए. एच. सैय्यद, जिल्हा व सत्र न्यायाधीश -२, जिल्हा न्यायालय, धुळे
२. श्री. व्ही. एम. भदाणे, कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, धुळे
३. श्री. के. जी. साळुंखे, प्रभारी कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, शहादा
४. श्री. पी. सी. मच्छले, सहाय्यक अधिक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार
५. श्री. सुनीस कुवर, वरिष्ठ तुरुंग अधिकारी, धुळे
६. श्री. पी. के. बागुल, नायब तहसिलदार, नंदुरबार
७. श्री. एच. के. ठाकुर, सहा. अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, धुळे
८. श्री. डी.बी. माळी, कुलप्रमुख, शासकीय विद्यानिकेतन, धुळे
९. श्री. एम.बी. ठाकुर, सहा. अभियंता श्रेणी.१, बांधकाम उपविभाग,पिंपळनेर
१०. श्री. एम. ए. शहा, उप अभियंता, सा. बां. उपविभाग, धुळे
११. श्री. एन. एम. शिंदे, उप कार्यकारी अभियंता, रो.ह.यो. (सा.बां.) विभाग, धुळे
१२. श्री. व्ही. एच. मंगळे, उप अभियंता, सा. बां. उपविभाग क्र.१, शिरपूर
१३. श्री. आर. डी. नंदवालकर, उप अभियंता, बांधकाम उपविभाग, शिरपूर
१४. श्री. एन. एस. चव्हाण, उप अभियंता, सा. बां. उपविभाग क्र.१, नंदुरबार
१५. श्री. आर. एस. निकम, उप अभियंता, सा. बां. उपविभाग क्र.२, नंदुरबार
१६. श्री. पी. जे. वळवी, सहा. अभियंता श्रेणी.१, सा. बां. उपविभाग क्र.२, तळोदा
१७. श्री. एस. एस. गावीत, सहा. अभियंता श्रेणी.१, बांधकाम उपविभाग, नवापूर
१८. श्री. व्ही. व्ही. मोहिते, उप कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, धुळे
१९. श्री. के. एस. पाटील, उप अभियंता, सा. बां. उपविभाग, शहादा
२०. श्री. के.बी. गिरासे, उप अभियंता, सा. बां. उपविभाग, अक्कलकुवा
२१. श्री. यु. आर. वाघ, प्रभारी उप अभियंता, सा. बां. उपविभाग, दोंडाईचा
२२. श्री. एन. डी. इंगळे, शाखा अभियंता, विद्युत उपविभाग, धुळे
२३. कु. पी. एम. मुंदडा, प्रकल्प अधिकारी-२, सा. बां. मंडळ, धुळे.

आज दि.१४ मे, २०१८ रोजी सर्व उपभोक्ता विभागाकडील कामांची आढावा बैठक मंडळ कार्यालयात उपभोक्ता विभागाकडील विभाग प्रमुखांसोबत अधीक्षक अभियंता यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. बैठकीत उपभोक्ता विभागाकडील उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचेकडील नवीन तसेच

दुरुस्ती करावयाच्या कामांची यादी सादर केली. त्यावर खालीलप्रमाणे सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीचे सुरुवातीला अधीक्षक अभियंता यांनी सर्वांचे स्वागत केले व बैठकीस सुरुवात करण्यात आली.

- **न्यायालयीन इमारती, धुळे** :- विषयांकीत बैठकीसाठी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश -२, धुळे उपस्थित होते. त्यांचे समवेत न्यायालयीन निवासी व अनिवासी इमारतींच्या दुरुस्ती कार्यक्रमाबाबत चर्चा करण्यात आली. सद्य:स्थितीत मुख्य इमारतीचे सुरु असलेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे याबाबत मा. न्यायाधिश महोदय यांनी सांगितले. त्याचप्रमाणे जुने न्यायाधिश निवासस्थान पाडून त्या ठिकाणी नवीन निवासस्थानाची इमारत बांधण्यात यावी तसेच अस्तित्वातील न्यायाधिश व कर्मचारी निवासस्थानांची दुरुस्ती करण्यात यावी व आवश्यकता असल्यास जुन्या इमारतींचे Structural Audit करण्यात यावे असे मा. न्यायाधिश महोदय यांनी बैठकीत सांगितले. कार्यकारी अभियंता यांनी दुरुस्तीच्या संयुक्त पाहणी करुन आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबत मंडळ कार्यालयास अवगत करावे असे म.अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सूचित केले.

- **शासकीय विद्या निकेतन, धुळे** :- उपस्थित असलेल्या प्रतिनिधींनी बैठकीत त्यांना आवश्यक असलेल्या कामांच्या यादीचे पत्र बैठकीत सादर केले. सदर पत्रात नमुद केल्याप्रमाणे त्यांनी १५ नवीन स्वच्छता गृह बांधण्याबाबत मागणी केलेली आहे. त्यानुसार कार्यकारी अभियंता यांनी जागेची संयुक्तीक पाहणी करुन या बांधकामाचे अंदाजपत्रके त्वरीत सादर करावेत म्हणजे MOW म्हणून शासनाकडे प्रस्ताव सादर करता येईल. त्याचप्रमाणे या संकुलाच्या आवार भिंतीचे बांधकाम करण्याची मागणी करण्यात आली आहे. आवार भिंतीचे अंदाजपत्रके तयार करुन त्याचा प्रस्ताव सुध्दा MOW म्हणून मंजुरीसाठी सादर करावा. तरी कार्यकारी अभियंता यांनी लवकरात लवकर स्वच्छतागृह व आवार भिंतीचे कामाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यांवर शासकीय विद्या निकेतन, धुळे यांचे विभाग प्रमुखांची स्वाक्षरी घेऊन सक्षम प्राधिकाऱ्यांकडे अंदाजपत्रके मंजुरीसाठी सादर करावीत. सदर इमारत ब्रिटीश कालीन असल्याने इमारत खूप जुनी झालेली आहे व मोठ्या प्रमाणात दुरुस्तीची आवश्यकता असल्याचे कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी बैठकीत सांगितले. कार्यकारी अभियंता यांनी संकुलातील इमारतीची सविस्तर पाहणी करुन, दुरुस्तीचा मास्टर प्लॉन तयार करावा व उपभोक्ता विभागाकडील अधिकाऱ्या समवेत चर्चा करुन दुरुस्तीच्या कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करावा व निधीच्या उपलब्धतेनुसार व कामाच्या निकडीच्या प्राधान्यक्रमानुसार दुरुस्तीचा कार्यक्रम तयार करुन मंजुरीसाठी सक्षम स्तरावर सादर करावा. तसेच या इमारतीचे Structural Audit करुन घेण्यात यावे.

- **जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, धुळे :-** बैठकीत उपस्थित प्रतिनिधी यांनी राखीव पोलीस निरिक्षक दल यांचे पोलीस मुख्यालय येथील निवासी व अनिवासी इमारतींसाठी आवश्यक असलेल्या दुरुस्तीची यादी सदर केली. त्याचप्रमाणे पोलीस अधिक्षक कार्यालय, धुळे अंतर्गत दुरुस्त करावयाच्या कामांचा तक्ता सुध्दा बैठकीत सादर केला. संबंधीत उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी उपभोक्ता विभागाकडील अधिकारी / कर्मचाऱ्यां समवेत संयुक्तरित्या दोन्ही संकुलांची पाहणी करुन करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करुन घ्यावा व उपलब्ध असलेल्या निधीतून कामे करण्यासाठी जॉब क्रमांक प्राप्त करुन घ्यावेत. पोलीस अधिक्षक कार्यालयामार्फत प्राधान्यक्रम निश्चित केलेल्या कामांची यादी मंडळ कार्यालयास व कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, धुळे यांना सादर पाठविण्यांत यावे. जेणेकरुन कामे हाती घेण्याबाबत कार्यवाही करणे सोईचे होईल असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सांगितले. कार्यकारी अभियंता यांनी प्राधान्यक्रमानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार दुरुस्तीचा कार्यक्रम विविक्षीत दुरुस्ती / विशेष दुरुस्ती / किरकोळ दुरुस्ती कार्यक्रमा अंतर्गत कामे करण्याबाबत विभागीय स्तरावर कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे जी काम नवीन कामे सूचविण्यात आली आहे त्यांचे MOW म्हणून अंदाजपत्रके मंजुरीसाठी सादर करण्यात यावीत.

- **जिल्हा कारागृह, धुळे :-** बैठकीत अधिक्षक, धुळे जिल्हा कारागृह वर्ग-१, धुळे यांनी सन २०१८ करीता जिल्हा कारागृह, धुळे येथे दुरुस्ती करावयाच्या कामांची यादी सादर केली आहे. सद्य:स्थितीत जिल्हा कारागृह येथे काही कामे सुरु असून, ती संथ गतीने सुरु असल्याबाबत अधिक्षक महोदय यांनी बैठकीत नमुद केले. सदर कामे ही कारागृहाच्या आत सुरु असल्याने त्या ठिकाणी कामे करण्यास तसेच बांधकाम साहित्य आत नेण्यास बरीच बंधने असल्याने काम संथ गतीने सुरु असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी बैठकीत सांगितले. सदर बाब अधिक्षक महोदय यांनी सुध्दा मान्य केली. तरी कामे लवकर पूर्ण होतील याबाबत उप अभियंता यांनी प्रयत्न करावेत व वेळे बाबतच्या अडचणी समजुन घेण्यासाठी जिल्हा कारगृह प्रशासनाकडून सुध्दा सहकार्य मिळेल अशी अपेक्षा आहे असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सांगितले. पत्रात नमुद केलेल्या सर्व बाबींची दुरुस्ती / कामे करण्याबाबत संबंधीत कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी व कामे लवकर सुरु होतील असे पहावे असे अधीक्षक अभियंता यांनी सूचित केले. कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी अधिक्षक महोदयां समवेत जिल्हा कारागृहाची संयुक्त पाहणी करावी. आवश्यकता असल्यास अधीक्षक अभियंता यांना सुध्दा याबाबत अवगत करावे जेणेकरुन अधीक्षक अभियंता सुध्दा पाहणीचे वेळी हजर राहू शकतील. संयुक्त पाहणी करुन करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करावा व कामे हाती घेण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. कामे पूर्ण

झाल्यानंतर काम पूर्ण केल्याचा दाखला मंडळ कार्यालयास सादर करावा. जिल्हा कारागृहात विद्युतीकरणाची सुध्दा कामे आहेत. उप अभियंता विद्युत यांनी सुध्दा संयुक्त पाहणीचे वेळी उपस्थित रहावे व त्यानुसार कामे करण्याचे नियोजन करावे. विद्युतीकरणाच्या कामांसाठी रु.७१.०० लक्षाचे अंदाजपत्रक संबंधीत विभागास सादर केले असल्याचे बैठकीत शाखा अभियंता (विद्युत) यांनी सांगितले. अद्याप सदर अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली नसल्याचे समजते. मात्र काही ज्या तात्काळ करावयाच्या ज्या किरकोळ स्वरुपातील दुरुस्ती आहेत त्या करुन देण्यात याव्यात असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सांगितले. महिला बॅरेक मधील किरकोळ दुरुस्तीचे कामे, प्रसाधनगृहाचे बांधकाम, पाण्याची मोटर, पॅनल इ. कामे करुन देण्यात आली असल्याचे शाखा अभियंता (विद्युत) यांनी सांगितले.

- **जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार** :- बैठकीत उपस्थित असलेले नायब तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार यांनी जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार अंतर्गत दुरुस्ती आवश्यक असलेल्या कामांची यादी सादर केली. त्यात मध्यवर्ती प्रशासकीय इमारत जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार, तहसिल कार्यालय, शहादा-अक्राणी, जिल्हाधिकारी यांचे शासकीय निवासस्थान, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारा अंतर्गत असलेल्या महसुल अधिकारी व कर्मचारी यांची निवासस्थानांची दुरस्ती कामे सूचविलेली आहेत. त्यांनी सादर केलेल्या यादीनुसार संबंधीत उप अभियंता व शाखा अभियंता यांनी सर्व इमारतींची पाहणी संयुक्तरित्या करावी व करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम ठरवून घ्यावा. जी कामे नव्याने करावयाची आहेत त्या कामांचा MOW अंतर्गत अंदाजपत्रके तयार करुन सादर करावीत. तहसिल कार्यालय, अक्राणी व शहादा येथील इमारत पूर्ण झाली आहे मात्र संबंधीत विभाग सदर इमारत ताब्यात घेत नसल्याबाबत कार्यकारी अभियंता यांनी बैठकीत सांगितले. याबाबत कारण विचारले असता, उपभोक्ता विभागास या ठिकाणी अंतर्गत रस्ते, आवारा भिंत इ. कामे करुन हवी आहेत असे समजते. मात्र त्यांनी मागणी केलेली जादाची कामे मुळ मंजुर अंदाजपत्रकात समाविष्ट नसल्याने ती करणे शक्य नसल्याचे कार्यकारी अभियंता यांनी बैठकीत सांगितले. तसेच या जादाच्या कामांची सविस्तर अंदाजपत्रके मंजुरीसाठी सुध्दा सादर करण्यात आली असल्याचे समजते. कार्यकारी अभियंता यांनी स्वत: जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन किंवा पत्रव्यवहार करुन वस्तुस्थिती निदर्शनास आणून द्यावी व इमारत तात्काळ हस्तांतर होईल याबाबत कार्यवाही करावी असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सूचित केले.

- **न्यायालयीन इमारती, नंदुरबार जिल्हा** :- बैठकीत सहाय्यक अधीक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार हे उपस्थित होते. त्यांनी जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार अंतर्गत दुरुस्ती करावयाच्या कामांची यादी सादर केली. न्यायालयीन इमारतींची दुरुस्ती कामे विहित कालवधीत व चांगल्या प्रकारे पूर्ण होतील याबाबत

कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी वैयक्तीकरित्या लक्ष देणे आवश्यक आहे. दुरुस्तीच्या कामांमध्ये चांगल्या दर्जाचे साहित्य वापरले जाईल याबाबत कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी आवश्यक काळजी घ्यावी. अक्क्लकुवा येथील अस्तित्वातील शिडी काढून त्या जागी पायऱ्या करुन मिळणेबाबत मागणी केलेली आहे. सदर कामाची उप अभियंता यांनी पाहणी करुन कामाचे MOW करुन अंदाजपत्रक तयार करावे व तात्काळ संबंधीत विभागास सादर करण्याची कार्यवाही करावी. तसेच याच ठिकाणी अपंगांना चालण्यासाठी रॅम्पला रेलींग लावण्याबाबत मागणी केलेली आहे. याबाबत सुध्दा आवश्यक ती कार्यवाही करावी असे अधीक्षक अभियंता यांनी आदेशित केले. शहादा येथील सह दिवाणी न्यायाधिश यांचे निवासस्थान दुरुस्त करण्याबाबत सुध्दा संयुक्तरित्या पाहणी करुन निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्य क्रमाने कामे करण्यात यावीत. सादर केलेल्या यादीमध्ये नंदुरबार जिल्हा न्यायालय इमारतीमधील विद्युतीकरणाची सुध्दा कामे आहेत. त्यात उद्वाहक यंत्रणा दुरुस्त करणे, नवीन इलेट्रीक फिटींग करुन देणे, जनरेटरची दुरुस्ती, बोअरवेल मोटर बसविणे अशी कामे आहेत. विद्युत विभागामार्फत सदर कामे हाती घेण्याबाबत सुध्दा आवश्यक ती कार्यवाही करावी. प्रशासकीय इमारत नंदुरबार येथे सुध्दा बरीच किरकोळ स्वरुपाची कामे करावयाची असल्याने त्या ठिकाणी सुध्दा संयुक्त पाहणी करुन कामे हाती घेण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे.

- **सा. बां. विभागाकडील कामे** :- सर्व कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्या विभागांतर्गत सा. बां. विभागाच्या निवासी व अनिवासी इमारतींसाठी ज्या ज्या दुरुस्तींची आवश्यकता आहे त्याबाबतचा अहवाल तयार करावा व तो मंडळ कार्यालयास मंजुरीसाठी सादर करावा. त्यात कार्यालये, विश्रामगृहे, निवासस्थाने या सर्वांना आवश्यक असलेल्या दुरुस्ती कामे समाविष्ट करावीत.

- सर्व कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय इमारतींची पाहणी उपभोक्ता विभागाच्या अधिकाऱ्यां समवेत चर्चा करुन दुरुस्तीच्या कामांचा प्रधान्यक्रम ठरवावा व उपलब्ध निधी व दुरुस्तीच्या कामांची निकड यांचा मेळ घालून दुरुस्तीचा कार्यक्रम Norms प्रमाणे CR / SLR / SDR या कार्यक्रमांतर्गत मंजुरीस्तव सादर करावा. तसेच जी लहान स्वरुपाची कामे नवीन बांधावयाची आहेत त्यांचे अंदाजपत्रके तयार करुन MOW अंतर्गत मंजुरीस्तव सादर करावीत व त्यासाठीच्या निधीची मागणी उपभोक्ता विभागाकडे करण्यात यावी. तसेच ३० वर्षावरील जुन्या इमातरींची पाहणी करुन आवश्यक असणाऱ्या इमारतींचे Structural Audit करण्यात यावे. तसेच इमारतींचे PRB रजिस्टर अद्ययावत करण्यात यावे. त्याचप्रमाणे आजच्या बैठकीमध्ये ज्या उपभोक्ता विभागाकडील अधिकारी किंवा प्रतिनिधी उपस्थित नव्हते त्या उपभोक्ता विभागांना कार्यकारी अभियंता यांनी संपर्क करुन त्यांचेकडील दुरुस्तीच्या

कामांची संयुक्तीक पाहणी करुन घ्यावी व त्यांचेकडील दुरुस्ती कामांचे मागणीपत्र प्राप्त करुन घ्यावी व त्यानुसार कार्यवाही करावी.

सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झाली.

जा.क्र./स्विस/आस्था.२/२२४४ /२०१८
कार्यालय : अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे
E-mail dhule.se@mahapwd.com
दिनांक : १९/०५ /२०१८

(चंद्रकांत वाघ)
अधीक्षक अभियंता

प्रत :- म. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांना माहितीस्तव सादर.

प्रत :- कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, धुळे / नंदुरबार / शहादा / रो.ह.यो. (सा.बां.) विभाग, धुळे यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- जिल्हा व सत्र न्यायाधिश -२, धुळे यांना माहितीस्तव सादर.

प्रत :- जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे / नंदुरबार यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.

प्रत :- सहाय्यक अधिक्षक, जिल्हा व सत्र न्यायालय, नंदुरबार यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- वरिष्ठ तुरुंग अधिकारी, जिल्हा कारागृह, धुळे यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- कार्यालयीन नस्ती.

प्रत :- स्टेनो / मास्टर फाईल.

Visit us at : www.mahapwd.com
Tele. No.02562-288751
Fax No.02562-288753

दि.19 नोव्हेंबर, 2015

बैठकीचे इतिवृत्त

विषय :- सा. बां. विभागामार्फत विविध उपभोक्ता विभागांच्या इमारतींचे देखभाल व दुरुस्ती करणेसाठी सन 2015-2016 मधील कार्यक्रमांचा आराखडा करणेसाठीची आढावा बैठक.
धुळे जिल्हा

उपस्थित अधिकारी / कर्मचारी

१. श्री. व्ही. एम. भदाणे, कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, धुळे
२. श्री. ए. एल. पवार, कार्यकारी अभियंता, रो.ह.यो. (सा. बां.) विभाग, धुळे
३. श्री. एस. डी. सुर्यवंशी, उप अभियंता, सा. बां. उपविभाग क्र.१, धुळे
४. श्री. एल. एम. जोशी, प्रभारी सहाय्यक अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, धुळे.
५. श्री. पी. आर. जोशी, एस. आर.पी.एफ. क्र.६, धुळे.
६. श्री. एस. डी. गोसावी, पोलीस उप अधिक्षक, पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे
७. श्री. एस. जी. बहाळकर, जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यलय, धुळे
८. श्री. वाय. एम. जाधव, वरिष्ठ लिपिक, शासकीय तंत्रनिकेतन, धुळे
९. श्री. सी. एच. महाजन, वरिष्ठ लिपिक, जिल्हा न्यायालय, धुळे
१०. श्री. एम.पी. वाघ, उप अधिक्षक, जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालय, धुळे
११. श्री. डी. एस. मोरे, सहाय्यक अभियंता श्रेणी.२, सा. बां. उपविभाग क्र.१, धुळे
१२. श्री. एन. डी. इंगळे, शाखा अभियंता, विद्युत उपविभाग, धुळे.

दि.१९/११/२०१५ रोजी मंडळ कार्यालयात अधीक्षक अभियंता यांचे सर्व उपभोक्ता विभागाकडील इमारतींची दुरुस्ती कामांचा उपभोक्ता विभागनिहाय सर्व कार्यकारी अभियंता व उपभोक्ता विभागाकडील अधिकारी / कर्मचारी यांचे समवेत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीचे सुरुवातीस अधीक्षक अभियंता यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीची सुरुवात करण्यात आली. बैठकीत खालीलप्रमाणे चर्चा झाली.

- **राज्य राखीव पोलीस बल क्र.६, धुळे (SRPF) :-** बैठकीत आलेल्या अधिकाऱ्यांनी त्यांचे विभागास दुरुस्ती आवश्यक असलेल्या कामांची यादी सादर केली. एस.आर.पी.एफ. आवारामध्ये काही कार्यालये व बॅरेक्स बांधावयाचे असल्याचे त्यांनी बैठकीत सांगितले. यासाठी त्यांचेकडील जागेची पाहणी करण्यासाठी व अंदाजित खर्च सांगण्यासाठी सा. बां. विभागाचे अभियंत्यांची आवश्यकता असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यानुसार उप अभियंता, सा. बां. उपविभाग क्र.१, धुळे यांना बैठकीत सूचना देण्यात आल्या. रु.५०.०० लक्ष किंमतीच्या वर कामाची किंमत असल्यास सदर काम हे पोलीस हाऊसिंग यांचेकडे पाठविण्यात येईल. एस.आर.पी.एफ. कडील जी कामे करावयाची आहेत त्या सर्व कामांची अंदाजपत्रके पोलीस महासंचालक यांचेकडे पाठविण्यात आली आहेत. असे बैठकीत सांगण्यात आले. विद्युतीकरणाशी संबंधीत बऱ्याच अडचणी असल्याचे उपस्थित अधिकाऱ्यांनी बैठकीत सांगितले. उप अभियंता विद्युत यांनी याबाबत त्वरीत आवश्यक ती कार्यवाही करावी असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत आदेशित केले.

- **जिल्हा पोलीस प्रशिक्षण केंद्र, धुळे :-** बैठकीत आलेल्या अधिकाऱ्यांचे संदर्भात दुरुस्तीसाठी आवश्यक असलेल्या इमारतींच्या कामांची यादी बैठकीत सादर केली. पोलीस प्रशिक्षण केंद्रात क्रिडांगण तयार करणेबाबत

उपभोक्ता विभागाची मागणी मात्र या कामाचे अंदाजपत्रक अद्याप प्राप्त झाले नसल्याचे उपभोक्ता विभागाकडील अधिकाऱ्यांनी सांगितले. या कामासाठी उप अभियंता, सा. बां. उपविभाग क्र.१, धुळे हे यांनी भेट दिली होती मात्र क्रिडांगणाची मापे उपलब्ध न झाल्याने अंदाजपत्रक तयार करता आले नाही असे त्यांनी बैठकीत सांगितले. उपभोक्ता विभागाने क्रिडांगणाची मापे तात्काळ उपलब्ध करुन द्यावी याबाबत अडचणी असल्यास जिल्हा क्रिडा अधिकारी यांचेकडून सुध्दा सदर मापे उपलब्ध होऊ शकतील. दोन्ही विभागांच्या अधिकाऱ्यांनी एकमेकांच्या संपर्कात राहून कामे करतांना येणाऱ्या अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करावा.

याच ठिकाणी पोलीस प्रशिक्षण केंद्रात पहिल्या मजल्याचे बांधकाम व कँन्टीनेच विस्तारिकरण करावयाचे आहे. या कामाचे ब्लॉक प्लॅन अंदाजपत्रक तयार करुन उपभोक्ता विभागाकडे सादर करावे जेणेकरुन ते अंदाजपत्रक पोलीस हाऊसिंगला पुढे सादर होईल. त्याचप्रमाणे पोलीस शिपाई पुतळा सुशोभिकरण, पोलीस प्रशिक्षण केंद्रात वैद्यकीय तपासणी कक्ष या कामांची अंदाजपत्रके सुध्दा तयार करण्यात यावीत अशी मागणी केली.

- **जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, धुळे :-** पोलीस अधिक्षक कार्यालयामार्फत आलेल्या प्रतिनिधींनी त्यांचेकडील १२ कामांची यादी बैठकीत सादर केली. त्याबाबत बैठकीत कार्यकारी अभियंता यांचे समवेत चर्चा करण्यात आली. पोलीस अधिक्षक यांचे निवासस्थानाच्या दुरुस्ती काम तात्काळ एस.डी.आर. कार्यक्रमातून मंजुरीचा प्रस्ताव पाठवून मंजुर करुन आणावे असे कार्यकारी अभियंता यांना सूचना दिल्या. पोलीस निवासी इमारतीच्या सांडपाणी व्यवस्थेबाबत तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे बैठकीत उपस्थित प्रतिनिधी यांनी सांगितले. पोलीस हाऊसिंग माफत बांधण्यात आलेल्या नवीन इमारतींचे कामे करतांना सदर इमारती सा. बां. विभागाच्या पी.आर.बी. वर आहेत किंवा नाही याबाबत खात्री करुन घ्यावी. त्याचप्रमाणे पोलीस विभागाकडील कामांसाठी अनुदानाची अडचण आहे. पोलीस विभागाकडील निवासी व अनिवासी कामे मंजुर आहेत. त्यामध्ये एकूण ६१ कामे ही दुरुस्तीची आहेत. त्यापैकी ५ कामे पूर्ण देखील करण्यात आली आहेत या कामांची देयके अनुदाना अभवी प्रलंबित आहेत. अनुदान नसल्याने ६१ पैकी पुढील उर्वरित कामे हाती घेण्यात आलेली नाहीत. झालेल्या कामांसाठी व उर्वरित कामांचा निधी त्वरीत उपलब्ध झाल्यास सर्व कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात येतील. त्यासाठी पोलीस अधिक्षक कार्यालयामार्फत वरिष्ठ स्तरावर पत्रव्यवहार करुन निधी उपलब्ध होणेबाबत विनंती करण्यात यावी. ही बाब वरिष्ठ कार्यालयास कळविण्यात आली असल्याचे उपस्थित प्रतिनिधी यांनी बैठकीत सांगितले.

किरकोळ स्वरुपाची कामे तात्काळ करण्याबाबत संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी तात्काळ कार्यवाही करावी. पोलीस कर्मचारी निवासस्थान इमारतीमधील सिमेंटची पाण्याची टाकी नादुरुस्त झाली असल्याने पाणीपुरवठ्याची अडचण निर्माण झाली असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. संबंधीत उप अभियंता यांनी प्रत्यक्ष कामाची पाहणी करावी, अस्तित्वातील कामाचे फोटोग्राफ्स घ्यावेत व अंदाजपत्रक तयार करुन उपभोक्ता विभागाकडे तात्काळ सादर करावे.

पोलीस प्रशिक्षण इमारतीतील एकूण १५ दुरुस्तीची कामे असल्याबाबत पत्रावरुन दिसते. वर्ग खोली व मेस यांचे रंगकाम करणे, भिंती खराब झालेल्या आहेत इत्यादी कामे सूचविलेली आहेत. सदर कामे ही मोठ्या स्वरुपाची असून, किरकोळ दुरुस्तीच्या कार्यक्रमा अंतर्गत होणे शक्य नसल्याचे उप अभियंता यांनी बैठकीत

सांगितले. तरी त्यातल्या त्यात जी किरकोळ कामे आहेत जसे की, फुटलेल्या काचा बदलणे, रंगकाम करणे इत्यादी कामे त्वरीत करुन घ्यावीत व विशेष व विविक्षीत दुरुस्ती आवश्यक असलेल्या कामांचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करुन सादर करावे व मंजुरीनंतर काम सुरु करावे असे अधीक्षक अभियंता यांनी सूचित केले.

पोलीस विभागामार्फत सादर झालेल्या देखभाल व दुरुस्ती कामांची जी यादी प्राप्त झाली आहे त्यात विद्युत विभागाशी संबंधीत बरीच कामे आहेत. उप अभियंता, विद्युत यांनी सदर कामांबाबत स्वत: पाहणी करावी व कामे त्वरीत होतील याबाबत कार्यवाही करावे असे अधीक्षक अभियंता यांनी सांगितले.

- **शासकीय तांत्रिक विद्यालय, धुळे :-** शासकीय तंत्रनिकेतन विभागामार्फत एकूण ११ कामांची यादी बैठकीत सादर करण्यात आली. शासकीय तंत्रनिकेतन इमारती मधील सांडपाणी व्यवस्था अतिशय जीर्ण झाली असल्याचे उपस्थित प्रतिनिधी यांनी सांगितले. त्याचप्रमाणे वर्ग खोल्या, पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम कार्यशाळा, भांडार / इलेक्ट्रॉनिक्स विभाग, चुतुर्थ श्रेणी कर्मचारी निवासस्थानाने या ठिकाणचे सिमेंट पत्रे बदलून Metacolour पत्रे बसविणे याबाबत मागणी आहे. या कामाचे अंदाजपत्रक तयार करावे व सक्षम स्तरावर या अंदाजपत्रकास मंजुरीसाठी सादर करावे.

संस्थेच्या आवारातील इमारतींचे फुटलेल्या काचा बदलणे, खिडक्यांची दुरुस्ती, खिडक्यांना जाळ्या लावणे, मुख्याध्यापक यांचे निवासस्थानातील शौचालय पाईपलाईन दुरुस्ती, विहिरीतील गाळ काढणे इ. कामे ही किरकोळ दुरुस्ती कार्यक्रमातून पूर्ण् करण्यात यावीत. मोठ्या स्वरुपाच्या कामांची अंदाजपत्रके तयार करुन सदर कामे करण्याबाबत कार्यवाही करावी.

- **जिल्हा न्यायालय, धुळे :-** न्यायालयीन विभागाशी संबंधीत सर्व निवासी व अनिवासी इमारतींमधील ४२ प्रकारच्या दुरुस्तीच्या कामांची यादी बैठकीत सादर करण्यात आली. सर्व उप अभियंता यांनी जिल्हा व तालुका स्तरावरील त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या इमारतींची पाहणी करावी व दुरुस्तीबाबतची सद्य:स्थिती जाणून घ्यावी. जिल्हा स्तरावरील इमारतींची पाहणी करण्यात आली असून, तालुकास्तरीय इमारतींची पाहणी करावयाची आहे असे कार्यकारी अभियंता यांनी बैठकीत सांगितले.

विद्युतीकरणाशी संबंधीत असलेल्या कामांबाबत उप अभियंता, विद्युत यांनी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करावी. किरकोळ स्वरुपाची दुरुस्तीची कामे विशेष दुरुस्ती व विविक्षीत दुरुस्तीची कामे करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी. शिरपूर येथील उपहारगृहाचे कामाबाबत स्वतंत्र जॉबची आवश्यकता असल्याने कामाचे सुधारीत अंदाजपत्रक मंत्रालयात सादर करण्यात येणार असल्याचे उप अभियंता यांनी बैठकीत सांगितले. विद्युत विभागाकडील सुध्दा बरीच कामे करावयाची आहेत जसे की, ट्युब सेट नवीन बसविणे, पंखे बसविणे इ. त्याचप्रमाणे धुळे जिल्हा न्यायालय आवारात काही कार्यालयांना अपूर्ण स्वरुपाचा विद्युत पुरवठा मिळत असल्याने सर्व ट्युब, पंखे व संगणक सुरु होत नाहीत. विद्युत प्रवाह कमी जास्त होत असतो तरी सदर समस्या दुर करण्याबाबत उपाययोजना करावी.

धुळे येथे एक वर्षापूर्वी ४ न्यायीक अधिकाऱ्यांचे निवासस्थानांचे बांधकाम करण्यात आले होते. सदर इमारत ही मोठ्या प्रमाणात नादुरुस्त झाली असल्याचे उपस्थित प्रतिनिधी यांनी सांगितले. टाईल्सचे काम खराब झाले असून, दरवाजे खिडक्या सुध्दा ना दुरुस्त झालेल्या आहेत. कार्यकारी अभियंता व उप अभियंता

यांनी या कामाची पाहणी करावी व आवश्यक ते दुरुस्तीचे काम डी.एल.पी. मधून करुन घेणेबाबत कार्यवाही करावी. या बाबत यापूर्वी सुध्दा मा. जिल्हा न्यायाधिश यांचेशी चर्चा करण्यात आली असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले. या कामाचे कंत्राटदार श्री. अग्रवाल यांचेकडून हे काम करुन घेणेबाबत पाठपुरावा करावा न केल्यास त्यांचे विरुध्द आवश्यक ती कार्यवाही योजावी व सदर कंत्राटदाराचे नाव काळ्या यादीत टाकण्याचा प्रस्ताव मंडळ कार्यालयास सादर करावा. कंत्राटदाराचे अनामत रक्कमेतून सदर दुरुस्तीचे काम करुन घेण्यात यावे असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सांगितले.

शिंदखेडा येथील अतिक्रमण काढणे व परिसर स्वच्छ करणेबाबतचे कामाबाबत न्यायाधिश महोदय यांचेशी याबाबत १५ दिवसापूर्वी चर्चा करण्यात आली आहे असे कार्यकारी अभियंता यांनी सांगितले.

- **जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालय, धुळे :-** बैठकीस उपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांनी देखभाल व दुरुस्ती आवश्यक असलेल्या एकूण ७ प्रकारच्या दुरुस्ती करावयाची यादी सादर केली. अस्तित्वातील इमारतीवर पहिल्या मजल्यावर एका रुमचे बांधकाम करावयाचे आहे. या कामाचे अंदाजपत्रक तयार संबंधीत विभागास करुन सादर करण्यात यावे. अस्तित्वातील विद्युतीकरणाची वायरिंग खराब झालेली आहे ती दुरुस्त करुन घ्यावी हे महत्वाचे काम आहे. शाखा अभियंता, विद्युत उपविभाग, धुळे यांनी सदर कामाची आजच पाहणी करावी व सदर काम त्वरीत करुन घ्यावे असे अधीक्षक अभियंता यांनी आदेशित केले. कार्यालयातील स्वच्छतागृहाची दुरुस्ती, तुटलेल्या खिडक्यांची तावदाने दुरुस्त करणे, फरशीचे काम करणे याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. महिलांसाठी अस्तित्वातील स्वच्छतागृह हे खालील मजल्यावर आहे. उपभोक्ता विभागास महिलांसाठी पहिल्या मजल्यावर स्वच्छतागृहाची आवश्यकता आहे. सदर बाब अत्यंत महत्वाची आहे तरी याबाबत त्वरीत कार्यवाही करावी.

सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झाली.

जा.क्र./स्विस/चौकशी/ ६१९५ /२०१५
कार्यालय : अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे
E-mail dhule.se@mahapwd.com
दिनांक : १० / १२ /२०१५

अधीक्षक अभियंता,
सा. बां. मंडळ, धुळे.

प्रत :- मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नाशिक यांना माहितीस्तव सादर.

प्रत :- कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, धुळे / रो.ह.यो. (सा.बां.) विभाग, धुळे यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- उपविभागीय अभियंता, विद्युत उपविभाग, धुळे यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- कार्यालयीन नस्ती.

Visit us at : www.mahapwd.com
Tele. No.02562-288751
Fax No.02562-288753

दि.19 नोव्हेंबर, 2015

बैठकीचे इतिवृत्त

विषय :- सा. बां. विभागामार्फत विविध उपभोक्ता विभागांच्या इमारतींचे देखभाल व दुरुस्ती करणेसाठी सन 2015-2016 मधील कार्यक्रमांचा आराखडा करणेसाठीची आढावा बैठक.
नंदुरबार जिल्हा

उपस्थित अधिकारी / कर्मचारी

१. श्री. ए. बी. गावीत, कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, शहादा
२. श्रीमती. वर्षा अहिरे पवार, कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, नंदुरबार
३. श्री. पी. व्ही. महाजन, उप अभियंता, सा. बां. उपविभाग क्र.१, नंदुरबार
४. श्री. एस. जी. पाटील, उप अभियंता, बांधकाम उपविभाग, शहादा
५. श्री. एल. एम. जोशी, प्रभारी सहाय्यक अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, धुळे.
६. श्री. एस. आर. आहेर, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नंदुरबार
७. श्री. अनंतराव राजाराम महाजन, अधिव्याख्याता, शासकीय तंत्रनिकेतन, नंदुरबार
८. श्री. आर. एम. चव्हाण, शिक्षक, शासकीय तंत्रनिकेतन, नंदुरबार
९. श्री. एस. डी. भोये, पोलीस निरिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय, नंदुरबार
१०. श्री. पी. एम. देवरे, लिपिक, पोलीस अधिक्षक कार्यालय, नंदुरबार
११. श्री. पी.सी. मच्छके, सहाय्यक अधिक्षक, जिल्हा न्यायालय, नंदुरबार
१२. श्री. आर. व्ही. पाडवी, कार्यालय अधिक्षक, जिल्हा रुग्णालय, नंदुरबार
१३. श्री. एस. एम. सोनवणे, तुरुंग अधिकारी, जिल्हा कारागृह, नंदुरबार.

दि.१९/११/२०१५ रोजी मंडळ कार्यालयात अधीक्षक अभियंता यांचे नंदुरबार जिल्ह्यातील सर्व उपभोक्ता विभागाकडील इमारतींची दुरुस्ती कामांचा उपभोक्ता विभागनिहाय सर्व कार्यकारी अभियंता व उपभोक्ता विभागाकडील अधिकारी / कर्मचारी यांचे समवेत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीचे सुरुवातीस अधीक्षक अभियंता यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीची सुरुवात करण्यात आली. बैठकीत खालीलप्रमाणे चर्चा झाली.

- **पोलिस अधिक्षक कार्यालय, नंदुरबार :-** बैठकीत उपस्थित अधिकारी / कर्मचारी यांनी पोलीस विभागाकडील एकूण १७ इमारतींना वेगवेगळ्या स्वरुपाच्या दुरुस्ती करावयाच्या निवासी / अनिवासी इमारतींची यादी सादर केली. पोलीस अधिक्षक कार्यालयातील प्रसाधनगृहाची बेसीन व टाईल्स बसविण्याचे कामाबाबत विभागीय स्तरावरुन काम करणेबाबत संबंधीतांना सूचना द्याव्यात व संबंधीत उप अभियंता यांनी काम करणेबाबत कार्यवाही करावी. तसेच पोलीस अधिक्षक यांचे निवास्थानाचे दुरुस्तीचे काम त्वरीत करण्याबाबत कार्यवाही करावी.

पोलीस वसाहतीमधील व्ही.आय.पी. विश्रामगृह, गंधर्व मंगल कार्यालय, नैवैद्यम भोजनालय, प्रशिक्षण हॉल, नियंत्रण कक्ष, पोलीस वसाहत व परिसरातील निवासस्थाने येथील पाण्याच्या टाक्यांचे कामे करावयाची आहेत. सदर कामांचे अंदाजपत्रक तयार करावे व सक्षम स्तरावर त्यास मंजुरी घेऊन कामे करावीत.

शहादा अंतर्गत तोरखेडा व प्रकाशा दुरक्षेत्र पोलीस कर्मचारी निवासस्थान येथे ड्रेनेजची दुरुस्ती करण्याचे काम करावयाचे आहे. सारंगखेडा येथील कर्मचारी निवास्थानांचे कौले तुटलेली आहेत तसेच ड्रेनेजची दुरुस्ती करण्याचा जॉब मंजुर आहे. सदर काम तात्काळ सुरु करावे. दुरुस्ती कामांचे अंदाजपत्रके तयार करतांना कामांची किंमत रु.५०.०० लक्षापेक्षा जास्त होत असल्यास त्या कामांचे फक्त अंदाजपत्रके तयार करुन द्यावीत व सदर कामे पोलीस हाऊसिंगकडे पाठविण्याबाबत उपभोक्ता विभागास कळवावे.

नंदुरबार येथील शहर पोलीस स्टेशन इमारत जुनी झाली असल्याने उपभोक्ता विभागाने नवीन इमारत बांधण्याबाबत वरिष्ठ कार्यालयास पत्र व्यवहार करावा असे अधीक्षक अभियंता यांनी सूचित केले.

विभागीय स्तरावरुन पोलीस विभागांच्या मोठ्या इमारतीसाठी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक / कनिष्ठ अभियंता यांची नियुक्ती करण्यात यावी. सदर कर्मचाऱ्यांनी महिन्यातून १ किंवा २ वेळा सर्व इमारतीची पाहणी करावी व इमारतींची नोंद ठेवावी. त्यात नादुरुस्त इमारतींचे फोटो सुध्दा ठेवावेत व सदर बाबी सा.बां. विभागाच्या अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणून द्याव्यात व किरकोळ स्वरुपाची कामे ही तात्काळ होतील याबाबत काळजी घ्यावी. केलेल्या कामांची नोंद रजिस्टर मध्ये ठेवण्यात यावी. त्यावर उपभोक्ता विभागाकडील संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात. अशा सूचना देण्यात आल्या.

पोलीस अधिक्षक कार्यालयाजवळ वाहन पार्कींग व्यवस्था करणे या कामास प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे. परंतु निधीची आवश्यकता आहे. सदर कामास अनुदान उलपब्ध होण्यासाठी उपभोक्ता विभागामार्फत वरिष्ठ कार्यालयास पत्र लिहण्यात यावे जेणेकरुन काम सुरु करणे शक्य होईल. सदर कामासाठी पुढील महिन्यात अनुदान उपलब्ध होण्याची शक्यता आहे असे उपभोक्ता विभागाकडील उपस्थित प्रतिनिधींनी सांगितले.

शहादा येथील पोलीस स्टेशनसाठी प्रशासकीय इमारत बांधणे या कामाची किंमत जवळपास रु.१.५० कोटी असून, रु.५०.०० लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर अनुदान आता उपलब्ध आहे त्यामुळे या किंमतीत जे काम करणे शक्य आहे ते काम उपभोक्ता विभागाशी चर्चा करुन तात्काळ सुरु करण्याची कार्यवाही करावी. त्याच प्रमाणे धडगांव येथील प्रशासकीय इमारतीबाबत सुध्दा याचप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. या कामांचे अंदाजपत्रके तयार आहेतच. ही दोन्ही कामे मार्गी लावण्यासाठी या कामांना १५ दिवसांत तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी.

मोलगी पोलीस स्टेशन अंतर्गत पिंपळखुटा दुरक्षेत्र हे काम मंजुर असून, कामास रु.१०.०० लख अनुदान उपलब्ध आहे व ते विभागास हस्तांतर केल्याचे बैठकीत सांगण्यात आले. सदर काम लवकरात लवकर पूर्ण् करण्याच्या दृष्टीने कार्यकारी अभियंता यांनी नियोजन करावे. सदर काम डिसेंबर, २०१५ अखेर हस्तांतर होईल असे कार्यकारी अभियंता श्री. गावीत यांनी सांगितले.

म्हसावद पोलीस स्टेशन अंतर्गत रायखेड दुरक्षेत्र हे काम सुध्दा एक महिन्यात पूर्ण करण्यात येईल असे कार्यकारी अभियंता श्री. गावीत यांनी बैठकीत सांगितले. डिसेंबर, २०१५ अखेर काम हस्तांतर होईल या दृष्टीने कार्यवाही करावी असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सूचित केले.

तळोदा पोलीस स्टेशन अंतर्गत कोठार दुरक्षेत्र हे काम पूर्ण होऊन हस्तांतरीत झाले असल्याचे सांगण्यात आले.

म्हसावद पोलीस स्टेशन अंतर्गत तोरणमाळ दुरक्षेत्र हे काम एक वर्षापासून अपूर्ण स्थितीत आहे. उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी याबाबत पाहणी करुन त्वरीत अहवाल सादर करावा व काम पूर्ण होणेबाबत कार्यवाही करावी असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सूचित केले.

पोलीस अधिक्षक कार्यालय दुचाकी वाहन पार्कींग कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. मात्र या कामास अनुदान प्राप्त नाही. याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

- **न्यायालयीन इमारती** :- प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश यांचे कार्यालयामार्फत आलेल्या प्रतिनिधींनी त्यांचेकडील एकूण १४ ठिकाणच्या इमारतींना दुरुस्ती करावयाच्या कामांची यादी बैठकीत सादर केली. नंदुरबार जिल्हा न्यायालयात नवीन वॉटर कुलर ठेवण्यासाठी ओटा तयार करण्यांत आला आहे. पाण्याच्या टाक्या सुध्दा आहे मात्र नळ फिटींग न झाल्याने ते वापरात येत नसल्याचे बैठकीत सांगण्यात आले. टाक्या ओट्यावर ठेऊन नळ जोडणी करुन देण्यात यावी व पिण्याच्या पाण्याची सोय त्वरीत करण्यात यावी असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सांगितले.

शहादा जिल्हा न्यायाधिशांचे न्यायालयास किरकोळ दुरुस्ती अंतर्गत फक्त आतील बाजुस रंगकाम करण्यात आले व बाहेरुन रंग देणे बाकी असल्याचे उपस्थितांनी सांगितले. उप अभियंता यांनी किरकोळ दुरुस्ती अंतर्गत बाहेरील बाजुन रंग देण्याचे काम करुन घ्यावे. असे अधीक्षक अभियंता यांनी सूचित केले. तसेच या ठिकाणी पक्षकारांना बसण्याचा बाक दुरुस्त करावयाचा आहे. हे अत्यंत किरकोळ स्वरुपाचे काम असल्याने सदर काम दुरुस्ती करण्याच्या कामा मध्ये समाविष्ट होणे ही योग्य बाब नाही तरी हे काम तात्काळ करुन घ्यावे.

नवापूर व तळोदा येथील दिवाणी न्यायालयात वॉटर कुलरची जोडणी करुन द्यावी. नंदुरबार जिल्हा न्यायालयातील लिफ्टचा दरवाजा तुटलेला असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. सदर दरवाजा दुरुस्ती करण्याबाबत विद्युत विभागाने कार्यवाही करावी. कार्यकारी अभियंता यांनी विभागीय स्तरावरुन सुध्दा उप अभियंता, विद्युत यांना दरवाजा बसविणेबाबत पत्र द्यावे असे अधीक्षक अभियंता यांनी सूचित केले.

नंदुरबार, अक्कलकुवा, तळोदा, नवापूर, शहादा येथील रु.१४.०० लक्ष किंमतीची जवळपास एकूण १५ ते २० कामे करावयाची आहेत. या कामांबाबत कार्यकारी अभियंता यांनी आढावा घेऊन २ दिवसात अहवाल सादर करावा. सदर कामे सक्षम स्तरावर मंजुरीबाबतची तात्काळ कार्यवाही करुन कामे सुरु करुन एक महिन्यात काम पूर्ण करावे असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सांगितले.

- **शासकीय तंत्रनिकेतन, नंदुरबार** :- शासकीय तंत्रनिकेतन, नंदुरबार संस्थेचे प्राचार्य यांनी बैठकीत १८ प्रकारच्या दुरुस्तीच्या कामांची यादी सादर केली. तसेच ६ ठिकाणी विद्युत दुरुतीच्या कामांची यादी सादर केली. सदर इमारत ही सुमारे ६ वर्षापूर्वी बांधलेली आहे. या इमारतीच्या कामाचे कंत्राटदाराचे देयक २ वर्षापासून प्रलंबित असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी बैठकीत सांगितले. या ठिकाणी इमारतीचे रंगकाम खराब झाले आहे,

रंगकाम करण्याचे काम करुन घ्यावे असे अधीक्षक अभियंता यांनी सूचित केले. संस्थेच्या इमारतीमध्ये सिल हाईट पर्यंत टाईल्स बसविण्याबाबत प्राचार्यांनी बैठकीत विनंती केली. सदर कामासाठी जास्त खर्च लागणार असल्याने सदर काम किरकोळ दुरुस्तीमधून करणे शक्य नाही. या कामासाठी जिल्हा नियोजन समीतीमार्फत अनुदान उपलब्ध झाल्यास सदर काम करता येईल, जो पर्यंत सदर काम मंजुर होत नाही तोपर्यंत या ठिकाणी ऑईल पेंटचे काम करुन घ्यावे असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सूचित केले.

संस्थेच्या इमारतीत विविध ठिकाणी पाण्याच्या टाक्या बसविल्या आहेत. बरेच वॉल हे नादुरुस्त झालेले आहेत. सदर वॉल बदलून देण्याची विनंती करण्यात आली आहे, या ठिकाणी पी.व्ही.सी. वॉल बसविण्यात यावेत. संस्थेच्या स्वच्छतागृहामध्ये सांडपाणी वाहून जाण्यासाठी उतार नसल्याने सांडपाण्याचा निचरा होत नाही व ते त्याच ठिकाणी साचून राहते. ही बाब आरोग्याच्या दृष्टीने गंभीर स्वरुपाची असल्याने याबाबत "तात्काळ कार्यवाही" करण्यात यावी असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सूचित कले.

संस्थेच्या इमारतीसाठी संरक्षण भिंतीचे काम करण्यास विनंती करण्यात आली आहे. या कामाचे अंदाजपत्रक त्वरीत तयार करुन उपभोक्ता विभागाकडे सादर करावे व निधीच्या उपलब्धतेबाबत उपभोक्ता विभागाकडून शासनाकडे पत्रव्यवहार करण्यात यावा असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सांगितले. इमारतीच्या बाजुस असलेल्या अतिक्रमणाबाबत उपभोक्ता विभागाने जिल्हाधिकारी कार्यालयास पत्र लिहावे व नियमानुसार सदर अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी अशा सूचना दिल्या.

संस्थेच्या इमारतीत छताच्या मोकळ्या ठिकाणी प्लास्टीकचे पत्रे (FRPC Sheet) बसविण्यात आले असून, ते लहान आकाराचे आहेत त्यामुळे त्या ठिकाणाहून पावसाचे पाणी इमारतीत पडून संपूर्ण इमारतीत पाणी साचते. सदर काम हे एक वर्षा पूर्वीचे केले असल्याचे बैठकीत उप अभियंता यांनी सांगितले. अशा प्रकारचे अपूर्ण काम कंत्राटदाराने कसे केले, सदर काम हे अयोग्य प्रकारे झाले आहे काय? याबाबत कार्यकारी अभियंता यांनी चौकशी करावी. सदर काम तात्काळ कंत्राटदाराचे खर्चाने व्यवस्थीत करुन घ्यावे.

पाण्याची अडचण असल्याने या ठिकाणी भुजल सर्वेक्षण विभागाकडून पाहणी करुन घ्यावी व पाणी ज्या ठिकाणी उपलब्ध आहे त्या ठिकाणी बोअरवेलचे काम करण्यासाठी जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभागाकडे पाठपुरावा करावा. कार्यशाळा इमारतीमध्ये टर्बो व्हेंटीलेटर्स बसविण्यात आले होत मात्र ते हवेने उडून गेले. त्यामुळे मोकळी झालेली जागा ही इतर व्यवस्था करुन तात्काळ बंद करण्यात यावी.

संस्थेत अपंगांसाठी रॅम्प बनविण्यात आले आहेत. परंतु सदर रॅम्प हा इमारतीच्या मागील बाजुस असून, त्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसल्याने त्याचा उपयोग होत नाही. सदर रॅम्प हा चूकीच्या ठिकाणी बनविण्यात आला असल्याचे चर्चेवरुन दिसून येते, अधीक्षक अभियंता यांचे नंदुरबार येथील दौऱ्याचे वेळी सदर काम अधीक्षक अभियंता यांना दाखविण्यात यावे असे अधीक्षक अभियंता यांनी कार्यकारी अभियंता यांनी सांगितले. काही दिवसापूर्वी संस्थेच्या इमारतीत ३ दिवस विद्युत पुरवठा बंद होता. संस्थेमार्फत उप अभियंता, विद्युत विभाग यांना पत्र व्यवहार करण्यात आला होता तसेच दूरध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न

केला असता ते उपलब्ध झाले नाही असेही उपभोक्ता विभागामार्फत सांगण्यात आले. विद्युत विभागाने चौकशी करुन अहवाल सादर करावा.

सदर इमारतीत असलेल्या अडी अडचणीबाबत व आवश्यक असलेल्या दुरुस्तीबाबत सविस्तर यादी बैठकीत सादर केली. कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांना सदर कामांची यादी बैठकीत देण्यात आली. या कामांबाबत उप अभियंता यांनी आवश्यक ती उपाययोजना करावी.

सदर इमारतीत अनेक प्रकारच्या अडचणी आहेत. सदर इमारतीची कार्यकारी अभियंता यांचे सवमेत अधीक्षक अभियंता हे स्वत: पाहणी करतील. सदर पाहणीचे वेळी उप अभियंता, विद्युत यांनी सुध्दा उपस्थित रहावे असे अधीक्षक अभियंता यांनी सूचित केले.

- **शासकीय तांत्रिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, नंदुरबार** :- बैठकीस उपस्थित असलेल्या प्रतिनिधींनी दुरुस्ती १२ कामांची यादी बैठकीत सादर केली. संस्थेतील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत उपस्थितांनी बैठकीत सांगितले. सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करावे व प्रस्ताव सादर करावा. वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची स्वच्छता करणे, कार्यशाळा व संगणक कक्षातील विद्युत वायरिंग बदलणे, छताची तसेच जाळी दुरुस्ती व दरवाजे बदलणे, रोलींग शटर दुरुस्ती करणे, खिडक्यांची तावदाने बदलणे, छताला वॉटर फ्रुफींग करणे, पाईप लाईन दुरुस्ती करणे, आवाराती पाण्याच्या टाकीची दुरुस्ती, संरक्षक भिंतीची उंची वाढविणे, पथ दिव्यांची दुरुस्ती करणे, रंगकाम करणे या कामातील जी कामे किरकोळ दुरुस्ती कार्यक्रमा अंतर्गत करणे शक्य आहेत ती सर्व कामे उप अभियंता यांनी तात्काळ सक्षम स्तरावर मंजुर घेऊन कामे करण्याबाबत कार्यवाही करावी व मोठ्या कामांची अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करुन विभागीय कार्यालयामार्फत सादर करावीत अशा सूचना अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत दिल्या.

- **जिल्हा कारागृह, नंदुरबार** :- बैठकीस उपस्थित असलेल्या प्रतिनिधींनी एकूण १२ कामे दुरुस्तीची व ९ विद्युत दुरुस्ती कामांची यादी बैठकीत सादर केली. नंदुरबार येथील जिल्हा कारागृह हे दि.१/११/२०१४ रोजी कार्यान्वीत झाले असून, सदर इमारत वापरात असल्याचे सांगण्यात आले. सदर कार्यालयीन इमारत व इतर संलग्न निवासी इमारती याबाबत असलेल्या अडचणींबाबत श्री. सोनवणे, तुरुंग अधिकारी यांनी बैठकीत माहिती दिली. सदर इमारतीत ड्रेनेज लाईनचे काम हे मंजुर असून, अनुदाना अभावी प्रलंबित आहे. त्याचप्रमाणे नाविण्य पूर्ण कामे अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सदर इमारतीसाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार असून, कामे मंजुर करण्यात आली आहेत. सदर इमारतीतील सर्व कामांची पाहणी अधीक्षक अभियंता हे कार्यकारी अभियंता यांचे समवेत येत्या ८ दिवसात करतील असे अधीक्षक अभियंता यांनी बैठकीत सांगितले. सदर पाहणीचे वेळी उप अभियंता, विद्युत यांनी सुध्दा उपस्थित रहावे. उपभोक्ता विभागामार्फत प्राधान्य क्रमाची यादी बैठकीत सादर करण्यात आली त्यानुसार कार्यवाही करावी.

- **जिल्हा रुग्णालय, नंदुरबार** :- बैठकीत उपस्थित असलेल्या प्रतिनिधींनी ३ इमारतींची दुरुस्तीची कामे सादर केली. जिल्हा रुग्णालय, नंदुरबार येथे १०० खाटांचे महिला रुग्णालय व धर्मशाळेचे बांधकाम करणे या कामाचे अंदाजपत्रक तयार करुन सादर करण्यात आले असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. सदर अंदाजपत्रक सुधारीत

करुन सादर करावयाचे आहे. नवीन अंदाजपत्रक तयार करुन जिल्हा रुग्णालयास सादर करावे. महिला रुग्णालयाचे काम अर्थसंकल्पात समाविष्ट होते मात्र नंतर ते वगळण्यात आले होते. सदर काम पुन्हा अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यासाठी उपभोक्ता विभागाने पाठपुरावा करावा. त्याच प्रमाणे कार्यकारी अभियंता यांनी सुध्दा विभागीय स्तरावरुन अर्थसंकल्पात काम समाविष्ट करण्यासाठी पाठपुरावा करावा अशा सूचना देण्यात आल्या.

धडगांव येथील ६० खाटांचे महिला रुग्णालयाचे काम प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत इमारतीचा स्लॅब पूर्ण झाला असल्याचे कार्यकारी अभियंता यांनी बैठकीत सांगितले. सदर काम कोणत्या स्तरावर आहे याबाबत उपभोक्ता विभागास सद्य:स्थिती फोटोग्राफ्ससह कार्यकारी अभियंता यांनी कळवावी. त्याचप्रमाणे काम केंव्हा पूर्ण होऊन हस्तांतर होणार आहे याबाबत सुध्दा अवगत करुन द्यावे असे अधीक्षक अभियंता यांनी सूचित केले.

ग्रामीण रुग्णालय, खोंडामळी येथे अधिकारी व कर्मचारी यांची निवासस्थाने अद्याप उपभोक्ता विभागास हस्तांतर झालेली नाहीत. सदर निवासस्थाने ताब्यात घेण्यापूर्वीच नादुरुस्त झाल्याचे उपभोक्ता विभागामार्फत सांगण्यात आले. उप अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी याची पाहणी करावी व आवश्यक ती कार्यवाही करुन अहवाल मंडळ कार्यालयास सादर करावा.

सर्व उपस्थितांचे आभार मानुन बैठक समाप्त झाली.

जा.क्र./स्विस/चौकशी/ ६९४ /२०१५
कार्यालय : अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, धुळे
E-mail dhule.se@mahapwd.com
दिनांक : ७ /१२ /२०१५

अधीक्षक अभियंता,
सा. बां. मंडळ, धुळे.

प्रत :- कार्यकारी अभियंता, सा. बां. विभाग, नंदुरबार / शहादा यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- उपविभागीय अभियंता, विद्युत उपविभाग, धुळे यांना माहिती व कार्यवाहीसाठी.

प्रत :- कार्यालयीन नस्ती.

श्री.एस.व्ही.सोनटक्के, अधीक्षक अभियंता,सा.बां.मंडळ,यवतमाळ यांच्या दालनात दिनांक १६/५/२०१८ रोजी झालेल्या आढावा बैठकीचे कार्यवृत्त.

विषय:- सा.बां.मंडळाच्या कार्यक्षेत्रामधील शासकीय निवासी/अनिवासी इमारतींच्या दुरुस्ती बाबत.

बैठकीत खालील अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

१	किर्ती चिंतामणी	अधीक्षक,कारागृह विभाग, यवतमाळ
२	सिमा एच. काळे	कोषागार अधिकारी,कोषागार कार्यालय,यवतमाळ
३	श्री.शेख युसुफ	सहा.कोषागार अधिकारी कोषागार कार्यालय,यवतमाळ
४	डॉ.हर्षल एस.पाचपोर	निवासी वैद्यकिय अधिकारी,यवतमाळ
५	श्री. व्ही.आर.बंगाले	अधीक्षक,जिल्हा न्यायालय यवतमाळ
६	श्री. एस.एस.हुसकर	सहा.कोषागार अधिकारी कोषागार विभाग, यवतमाळ
७	श्री. डि.एस.कांबळे	ई.ई.ओ. प्रकल्प अधिकारी कार्यालय, पांढरकवडा
८	श्री. व्ही.आर.बैस	शाखा अभियंता,सा.बां.विभाग,पांढरकवडा
९	श्री. एस.डी.ढेंगळे	कनिष्ठ अभियंता,सा.बां.उपविभाग,पांढरकवडा
१०	श्री.डि.के.डोंगरे	वरीष्ठ लिपीक, एस.पी.ऑफीस,यवतमाळ
११	कु.पी.टी.पठठे	कनिष्ठ अभियंता,सा.बां.वि.यवतमाळ
१२	कु.ए.एच.वाडकर	सहा.अभियंता,श्रेणी. २ सा.बां.मंडळ यवतमाळ
१३	श्री.एम.जी.कचरे	उपविभागीय अभियंता,सा.बां.उपविभाग क्र.२ यवतमाळ
१४	श्री. सी.व्ही.इंगोले	उप अभियंता,(विद्युत) विभाग, यवतमाळ
१५	श्री. एल.आर.वाघमारे	उप अभियंता,सा.बां.उपविभाग, राळेगांव
१६	श्री.महेशकुमार डी.सिडाम	निरीक्षक डीव्हीईटी कार्यालय, यवतमाळ
१७	डॉ. जे.एस.धोटे	जिल्हा शल्य चिकीत्सक अधिकारी, यवतमाळ
१८	श्री. आर.एम. क्षिरसागर	शाखा अभियंता, सा.बां. उपविभाग क्र.१, यवतमाळ

दि.१६/५/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मंडळ कार्यालयांत वरील विषया बाबत बैठक आयोजीत करण्यांत आली होती . सा.बां.मंडळ.यवतमाळ अंतर्गत असलेले कार्यकारी अभियंता व उपस्थित असलेले अधिकारी /कर्मचारी यांच्या सोबत बैठकीत शासकीय कार्यालयीन /निवासी दुरुस्ती बाबत चर्चा करण्यांत आली.

सर्वप्रथम अधीक्षक अभियंता यांनी सर्वांचे स्वागत केले व बैठकीचा उददेश समझुन सांगितला. शासनाकडून उपलब्ध निधी व कामांचा प्राधान्यक्रम ठरवुन अतिमहत्वाची कामे /कार्यक्रम तसेच संबंधीत विभागाकडून बैठकीत प्राप्त झालेल्या कामाच्या याद्या नुसार महत्वाच्या कामे प्राधान्यक्रमाने करण्याबाबत सर्व कार्यकारी अभियंता यांना निर्देश देण्यांत आले.

१) **कारागृह विभाग, यवतमाळ**

कारागृह विभाग व पोलीस विभागातील दुरुस्तीची व इतर बांधकामाची कामे ही पोलीस गृहनिर्माण विभागा मार्फत केली जाणार असल्याने नविन कुठलेही कामे नव्याने घेतली जाणार नाही. परंतु जी कामे प्रगतीपथावर आहे ती तातडीने पुर्ण करण्यांत यावे. सदर कार्यालयाचे पत्र क्र.११०६ दि.९/५/२०१८ रोजी प्राप्त झालेल्या पत्रामधील कामांची यादीनुसार कामे प्राधान्याने करण्यांत यावी असे निर्देश दिलेत.

२) **कोषागार कार्यालय, यवतमाळ**

या विभागाकडे असलेल्या जिल्हा कोषागार कार्यालय यवतमाळ इमारतींमध्ये आवश्यक असलेली दुरुस्ती व किरकोळ दुरुस्ती तसेच विद्युतीकरणाची कामे कार्यकारी अभियंता यांनी संबंधीत विभागाचे अधिकारी यांचेशी समन्वय साधुन व पाहणी करुन तातडीने करुन देण्यांत यावी असे निर्देश दिलेत. तसेच त्यांनी बैठकीत सादर केलेल्या यादी प्रमाणे श्री. क्षिरसागर, शा.अ. यांनी संपर्क साधुन आवश्यक ती कार्यवाही करावी.

उपभोक्ता खात्याच्या निकडी नुसार कंपाऊंड वॉलची ऊंची वाढविणे, पाण्याची व्यवस्था करुन देणे, या करिता अंदापजत्रक तयार करुन उपभोक्ता खात्याला प्रशासकीय मान्यता व निधीच्या मान्यते करिता सादर करावे.

उपकोषागार कार्यालय आर्णि,महागांव, कळंब, घाटंजी, दिग्रस व बाभुळगांव या कार्यालयातील सादर केलेला यादी प्रमाणे किरकोळ दुरुस्ती व विद्युतीकरणा बाबत असलेली कामा बाबत संबंधीत अधिकारी यांचेशी संपर्क साधुन तातडीने करुन देण्याबाबत संबंधीत उपअभियंता यांना निर्देश दिलेत.

तसेच उपकोषागार कार्यालय बाभुळगांव येथील सुरक्षा कक्षाच्या दरवाजे, खिडक्याच्या तुटलेल काचा व किरकोळ दुरुस्ती तातडीने करुन देण्यांत यावी जेणेकरुन सुरक्षेच्या दृष्टीने योग्य राहील त्यामुळे प्राधान्यक्रमाने कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिलेत.

अजंठा इमारती मधील पाण्याची पाईपलाईनची दुरुस्ती तसेच गेटची व्यवस्था करुन देण्यांत यावी या बाबत बैठकीत सांगितले तरी ही कामे करुन देण्यांत यावी असे निर्देश दिलेत.

३) **शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ**

या विभागाकडे असलेल्या इमारतींची दुरुस्ती, विद्यार्थ्यांचे वस्तीगृह, दरवाजे, टॉयलेट ब्लॉक, सॅनिटरी पाईपलाईन, प्लोरींग , मुलांच्या वस्तीगृहामधील खिडक्यांची काचे फुटलेली आहे तसेच ड्रेनेजलाईनची व्यवस्थ्या या सर्व समस्या असल्याबाबत संबंधीत विभागाचे अधिका-यांनी चर्चेदरम्यान सांगितले. तरी या बाबत उपभोक्ता विभागातील संबंधीत अधिकारी यांच्याशी त्या परीसराची पाहणी करुन दुरुस्ती अंतर्गत मंजुर झालेली कामे ताबडतोब सुरु करुन प्राधान्यक्रमानेपुर्ण करावी.

तसेच उपभोक्ता खात्याने मागणी केलेली मुळ कामांची (एम.ओ.डब्ल्यु.) अंदाजपत्रक उपविभागीय अभियंता यांनी उपभोक्ता खात्याशी चर्चा करुन प्रशासकीय मान्यता व निधीच्या उपलब्धतते करिता त्वरीत सादर करावी.तयार

मुलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वर्कशॉप बिल्डींगचे दरवाजे/खिडक्यांची दुरुस्ती तातडीने करुन देण्यांत यावी असे संबंधीत अधिकारी यांनी सांगितले. एस.एल.आर./एस.डी.आर या कार्यक्रमा अंतर्गत मंजुर करुन द्यावे व त्या प्रमाणे कार्यवाही करावी

४) **न्याय विभाग, यवतमाळ**

या विभागाकडे असलेल्या यवतमाळ जिल्हया अंतर्गत असलेली न्यायालयीन ईमारती मधील नमुद केलेली कामे करुन देण्याबाबत संबंधीत अधिकारी यांनी चर्चे दरम्यान सांगितले. तरी न्यायालयीन इमारतीची कामाबाबत विभागाने सादर केलेल्या यादी प्रमाणे कामे करुन देण्याबाबत संबंधीत कार्यकारी अभियंता यांना निर्देश दिलेत.

तसेच केळापुर,दारव्हा,वणी,झरी जामणी, कळंब, नेर, मारेगांव, पुसद येथील संबंधीत विभागाने सादर केलेला यादी प्रमाणे किरकोळ दुरुस्ती व विद्युतीकरणा बाबत असलेली कामा बाबत संबंधीत उपअभियंता यांनी प्राधान्यक्रमाने करुन देण्यांबाबत संबंधीत उपअभियंता यांना निर्देश दिलेत.

५) **वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय व परीसर, यवतमाळ**

या विभागाची देखभाल दुरुस्ती अंतर्गत सुरु असलेल्या कामांची माहिती संबंधीत विभागाने सादर केली या मध्ये इमारतीची रंगरंगोटीची कामे , मेन गेट , वस्तीगृहातील पाईपलाईनची दुरुस्त, ग्रंथालय, वातानुकलीन कक्षातील वातानुकुलीन होण्याच्या दृष्टीने सिलींग करुन देण्याबाबत संबंधीत अधिकारी यांनी सांगितले तरी कार्यवाही करण्यांत यावी. तसेच संबंधीत विभागाचे परिसरात जनावरे येऊ नये या दृष्टीने कॅटल ट्रॅपची व्यवस्था करुन देण्यांबाबत सांगितले, सादर केलेल्या यादी प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कार्यकारी अभियंता यांना निर्देश दिलेत.

६) **प्रकल्प विभाग कार्यालय, पांढरकवडा**

या विभागाकडे असलेल्या इमारतींची कुठली कामे शिल्लक नसल्याचे उपस्थित अधिकारी यांनी बैठकीत सांगितले.

७) **पोलीस विभाग, यवतमाळ**

संबंधीत विभागाचे अधिकारी यांनी पोलीस विभागाच्या इमारतीं १०० वर्षा पूर्वीच्या असल्याचे सांगितले तरी या इमारती मध्ये असलेल्या दुरुस्ती बाबत पाहणी करुन कार्यक्रम मंजुर करुन कार्यवाही करावी असे निर्देश दिलेत.

तसेच ज्या पोलीस विभागाच्या इमारतीच्या दुरुस्ती बाबतची यादी संबंधीत विभागाने या कार्यालयास सादर करावी व सर्व कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांनी त्याप्रमाणे कार्यवाही करावी असे निर्देश दिलेत.

८) **जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण संस्था, यवतमाळ**

या विभागाकडील शासकीय तंत्र माध्यमीक शाळा केंद्र यवतमाळ येथील इमारती मधील दरवाजे/ खिडक्या दुरुस्ती तसेच इमारतीची रंगरंगोटी तसेच किरकोळ दुरुस्ती बाबत सांगितले तरी कार्यकारी अभियंता यांनी प्राधान्यक्रमाने कार्यवाही करावी असे निर्देश दिलेत. तसेच शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्था राळेगांव येथील संपुर्ण इमारतीची अंदाजपत्रका प्रमाणे दुरुस्ती करुन देण्याबाबत सांगितले तरी संबंधीत उपअभियंता यांनी कार्यवाही करावी असे निर्देश दिलेत.

९) **सामाजिक न्याय विभाग, यवतमाळ**

या विभागाकडे असलेल्या इमारत बांधकामाचे अंदाजपत्रक सादर करण्याकरिता उपविभागनिहाय यादी संबंधीत अधिकारी यांनी सादर केली तरी नमुद केलेली सर्व या मागणी प्रमाणे पुढील १५ दिवसांत मुळ कामाचे अंदाजपत्रके सादर करावी असे सर्व कार्यकारी अभियंता यांना अधीक्षक अभियंता यांनी निर्देश दिलेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यक्षेत्रातील शासकीय निवासी / अनिवासी इमारतींच्या दुरुस्तीबाबत उपभोक्ता खात्याकडून वारंवार तक्रारी प्राप्त होतात परंतु सदरच्या दुरुस्ती बाबत पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्यामुळे बरीचशी कामे प्रलंबित राहतात, या बाबत संबंधीतांना अवगत करण्यांत आले. सर्व खात्यांच्या प्रतिनिधी सोबत दुरुस्तीच्या मागण्या बाबत चर्चा करण्यांत आली.

उपस्थित असलेल्या खात्यांच्या अधिका-यांकडून / प्रतिनिधी कडून त्यांनी आणलेले दुरुस्तीच्या प्रस्तावात १० दिवसांत प्राधान्यक्रम ठरवून त्याप्रमाणे कामांची यांदी संबंधीत कार्यकारी अभियंता यांना देण्याबाबत सुचित करण्यांत आले. सदर याद्या प्राप्त होताच संबंधीत कार्यकारी अभियंता यांनी किरकोळ दुरस्ती ,विशेष दुरुस्ती व विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत समाविष्ठ करुन सन २०१८-१९ च्या आर्थिक वर्षात कार्यक्रम मंडळ कार्यालया कडे सादर करावे.

कार्यकारी अभियंता यांनी विद्युत उपविभागाशी संपर्क साधुन आपल्या कार्यक्षेत्रातील विद्युतीकरणाच्या दुरुस्तीची कामे आढावा घेऊन त्याप्रमाणे संबंधीतांना अवगत करावे. निधीच्या उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रम ठरवुन कार्यक्रम सादर करावा तसेच मुळ बांधकामांची अंदाजपत्रके उपभोक्ता खात्याकडे प्रशासकीय मान्यता तथा निधी उपलब्धते करिता १५ दिवसांच्या आंतमध्ये सादर करावे.

वरील सर्व अधिकारी/ प्रतिनिधींचे आभार व्यक्त करुन सभा आटोपल्याचे जाहीर करण्यांत आले.

सहपत्र:- संबंधीत विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीची छायाप्रत

(एस.व्ही.सोनटक्के),
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
यवतमाळ.

कार्यालय अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,यवतमाळ
जा.क्र.२०९७ /स्टेनो/प्रअ.४/दि.१९/५/२०१८
दुरध्वनी क्र.०७२३२/२४२२०६ फॅक्स २४६०४३
Email:yavatmal.se@mahapwd.com

प्रतिलिपी:-

१) मा.मुख्य अभियंता,सा.बां.प्रा.विभाग अमरावती यांना माहितीस्तव सादर
१) मा.जिल्हाधिकारी, कार्यालय यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
२) जिल्हा शल्यचिकीत्सक यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
३) जिल्हा पोलीस अधीक्षक यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
४) मा.जिल्हा प्रमुख न्यायाधीश न्याय विभाग, यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
५) उपवनसंरक्षक, वन विभाग, यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
६) सहा.आयुक्त,समाज कल्याण विभाग, यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
७) जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण अधिकारी गोधनी रोड यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
८) प्रकल्प अधिकारी आदिवासी विभाग, पांढरकवडा/पुसद यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
९) उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
१०) प्राचार्य तंत्रनिकेतन यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
११) प्राचार्य औद्योगीक प्रशिक्षण संस्था यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
१२) जिल्हा कोषागार कार्यालय,यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
१३) अधीक्षक,जिल्हा कारागृह, यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
१४) उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
१५) अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
१६) जिल्हा माहिती अधिकारी, कार्यालय,यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
१७) जिल्हा क्रिडा अधिकारी, कार्यालय,यवतमाळ यांना माहिती व कार्यवाहीस्तव सविनय सादर.

कृपया आपल्या खात्याच्या अधीनस्त संपुर्ण इमारतींच्या दुरुस्तींच्या कामांची यादी प्राधान्यक्रमानुसार ताबडतोब सादर करण्यांत यावी ही विनंती

१२) कार्यकारी अभियंता सा.बां.वि.यवतमाळ/पुसद/पांढरकवडा/वि.प्र.वि.यवतमाळ यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित. आपण स्वत: इमारतींची पाहणी करुन दुरुस्ती कार्यक्रम अग्रक्रमाने सादर करावा. कार्यक्रम त्वरीत सादर होईल हे पहावे.
१३) कार्यकारी अभियंता,विद्युत विभाग,(सा.बां.वि.)सा.बां.वि.परिसर अमरावती
१४) उपअभियंता,सा.बां.विद्युत उपविभाग वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय परीसर यवतमाळ

महाराष्ट्र शासन

शासकीय तंत्र माध्यमिक शाळा केंद्र
तथा कनिष्ठ महाविद्यालय.गोदणी रोड यवतमाळ
E_mail address:- gths.yavatmal@dvet. gov.in **Phone No. :** *07232-244252*

क्रमांक/आस्था/इमारतदुरुस्ती/२०१८/३३२
दिनांक :- १५/०५/२०१८

15 MAY 2018

प्रति,
मा.जिल्हा व्यवसाय शिक्षण
व प्रशिक्षण अधिकारी,यवतमाळ.

विषय :- दिनांक १६/०५/२०१८ रोजी आयोजित केलेली शासकीय इमारतीच्या दुरुस्ती बाबतची बैठक
संदर्भ :- आपले पत्र क्र./नियो/सं.स.जिवायो/इमा.दुरु/२०१८/७४७ दिनांक १४ मे २०१८

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास सविनय कळवू इच्छीतो की, या संस्थेतील शासकी निवासी व अनिवासी इमारतीमध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

०१) वर्कशॉप बिल्डींगचे दरवाजे/ खिडक्या दुरुस्ती करणे
०२) वर्गखोल्यांचे दरवाजे / खिडक्यांची फुटलेली काचा बसविणे
०३) फलोरींगची दुरुस्ती करणे.
०४) इमारतीची रंगरंगोटी करणे
०५) टॉयलेटचे दरवाजे दुरुस्ती करणे
०६) लेडीज टॉयलेटची पूर्ण दुरुस्ती व नळाचे कनेक्शन जोडणे.
०७) संस्थेत चौकीदार कक्ष तयार करणे
०८) नविन इमारतीच्या खिडक्यांना काचा बसविणे
आपले माहितीस व पुढील कार्यवाहीस सविनय सादर.

आपला विश्वासु,

मुख्याध्यापक,
शासकीय तंत्र माध्यमीक शाळा
केंद्र यवतमाळ

प्रतिलीपी:-मा.सहा.अधिक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ,यवतमाळ यांना माहिती व पुढील कार्यवाही करिता सविनय सादर.

प्रपत्र-क

२०१८-२०१९ च्या प्रस्तावित बांधकामाच्या कार्यक्रम (यादी) पांढरकवडा आदिवासी उपविभाग (TSP)

अ.क्र.	योजनेचे नाव	सीआरसी (संगणक) संकेतांक	उद्दिष्ट शिर्ष संकेतांक	योजनेचे /कामाचे नाव		एकुण अंदाजित किमत (अलिकडील सुधारीत)सुधारीत अंदाजीत किंमतीचा दिनांक	मार्च-१७ अखेर पर्यंतचा एकुण खर्च	सन १७-१८ मधील अपेक्षित खर्च	उर्वरीत किंमत (स्तंभ ६-८+९)	२०१८- १९ करीता प्रस्तावित तरतुद	योजना/काम पुर्ण होण्याचा अपेक्षित दिनांक
१	२	३	४	५	देखभाल दुरुस्ती	६	७	८	९	१०	११
१	ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम व विस्तारीकरण.	४२१००३८२		उपजि रु पांढरकवडा	१)वैद्यकिय अधिक्षक निवासस्थान	२०.००					
					२)वैद्यकिय अधिकारी वर्ग-२ निवासस्थान	३०.००					
					३)अधिपरीचारीका४ निवासस्थाने बांधणे	५०.००					
					४)मिटिंग हॉल	२०.००					
					५)एन.आर.सी.च्यासमोर पेविंग ब्लॉक व सुरक्षाभिंत	२५.००					
					६)न्यु बॉर्न स्टेबलायझेशन युनिट व अटॅच रुम	५.००					
					७)न्यु बॉर्न स्टेबलायझेशन युनिट व अटॅच रुम	५.००					
					८)मुख्य ईमारत लिकेज स्लॅब दुरुस्ती	५.००					
					९)एकुण १४ निवासस्थान नुतनीकरण	८०.००					
					१०)मुख्य इमारत वाटर पाईप लाईन व नळ सुविधा	३.००					
					११)मुख्य ईमारतीचे रंगरंगोटी	४.००					
					१२)रुग्णालयातील जुन्या वॉर्डला व्हेट्रीफाईड स्टाईल बसविणे ॲल्युमिनिअम विंडोसह.	१५.००					
					१३)मुख्य इमारतीचे संडास बाथरुम चे नुतनीकरण करणे	१०.००					
					एकुण	२७२.००					

२				ग्रामीण रुग्णालय वणी	१)वाळंतकक्ष व शल्यगृह विस्तारीकरण करणे	२०.००					
					२)सुरक्षा भिंतीचे बांधकाम	३०.००					
					३)वेविंग ब्लॉक(मुख्यईमा.भिंतीच्या बाजुला)	१०.००					
					४)मुख्य ईमारतीचे नुतनीकरण करणे व्हेट्रीफाईड स्टाईल व ॲल्युमिनिअम विंडोसह	१०.००					
					५)विद्युत नुतनीकरण करणे.	५.००					
					६)ड्रनेज सिस्टीम दुरुस्त करणे.	५.००					
					एकुण	**८०.००**					
३				ग्रामीण रुग्णालय राळेगाव	रुग्णालयाचे वॉर्ड सोडुन मुख्य इमारतीच्या उर्वरीत भागात व्हेट्रीफाईड टाइल्स व भिंतीला ५ फटापर्यंत व्हेट्री.टाईल्स व ॲल्युमिनिअम विंडोस मिटींग हॉलमध्ये पार्टीशनव्दारे लेबर रुम करुन वॉर्ड ला जोडणे.	१०.००					
					शवविच्छेदन गृहाचे विस्तारीकरण करणे.	५.००					
					२३ निवासस्थानाचे नुतनीकरण करणे सज्जास बाथरुम च्या नविण ड्रेनेज सिस्टीम सह	५०.००					
					एकुण	**६५.००**					
४				ग्रा.रु. मारेगाव येथील कामे	बाळंतकक्षाचे व शल्यगृहाचे नविण बांधकाम	२०.००					
					रुग्णालयाचे नुतनीकरण,मुख्य इमारतीला व्हेट्रीफाईड टाइल्स रंगरंगोटी सह	१०.००					
					१० निवासस्थानाचे नुतनीकरण करणे	२०.००					
					एकुण	**५०.००**					
						३८७.००					

सर्वसाधारण (डे.पी.डी.सी.)

२०१८-२०१९ च्या प्रस्तावित बांधकामाच्या कार्यक्रम (यादी)

अ.क्र.	योजनेचे नाव	सीआरसी (संगणक) संकेतांक	उद्दिष्टनिर्देश संकेतांक	योजनेचे /कामाचे नाव		एकुण अंदाजित किंमत (अतिरिक्त सुधारीत)सुधारीत अंदाजीत किंमतीचा तिमाही	मार्च-१७ अखेर पर्यंतचा एकुण खर्च	सन १७-१८ मधील अपेक्षित खर्च	उर्वरीत किंमत (स्तंभ ६-८+९)	२०१८-१९ करीता प्रस्तावित तरतुद	योजना/काम पुर्ण होण्याचा अपेक्षित दिनांक
१	२	३	४	५		६	७	८	९	१०	११
१	ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम व विस्तारीकरण.	४२१००३८२		ग्रामीण रुग्णालय कळंब यथील देखभाल दुरुस्ती	१)बाळंतकक्षाचे नुतनीकरण विस्तारीकरण.	२०.००				रु.३६६.००	
					२)शल्यगृह नुतनीकरण	२०.००					
					३)न्यु बॉर्न स्टेबलायझेशन युनिट.	०५.००					
					४)छवविच्छेदनगृहाचे विस्तारीकरण	५.००					
					५)रुग्णवाहिके करीता गैरेज बांधणे	५.००					
					६)मुख्य ईमारतीच्या मागील संरक्षन भिंतीचे बांधकाम करणे	१२.००					
					७)मुख्य इमारतीस ॲल्युमिनिअम विंडोसह दुरुस्ती.	५.००					
					एकुण	७२					
				ग्रामीण रुग्णालय नेर यथील देखभाल दुरुस्ती	१)वॉर्ड च्या समोर पेविंग ब्लॉक करणे.	५.००					
					२)रुग्णालयाच्या मुख्य ईमारतीचे नुतनीकरण मुख्य इमारतीला व्हेट्रीफाईड स्टाईल्स व रंगरंगोटी करणे.	१०.००					
					३)नविण बाळंतकक्ष व ओ.टी कॉम्पलेक्स मागच्या बाजुला तयार करणे.	२०.००					
					४)रुग्णालयातील नविज ड्रेनेज सिस्टिम करणे.	१०.००					
					एकुण	४५.००					
				ग्रामीण रुग्णालय घाटंजी यथील देखभाल दुरुस्ती	लेबर रुम कॉम्पलेक्स १५० स्क्वे.फुट	२५.००					
					ओ.टी.कॉम्पलेक्स १५० स्क्वे.फुट	१५००					
					रुग्णालयाच्या संरक्षन भिंतीचे काम	१२५.००					
					छवविच्छेदन गृहाचे विस्तारीकरण	५.००					
					मुख्य ईमारतीचे रंगरंगोटी करणे	४.००					
					संडास बाथरुमचे नुतनीकरण करणे	५.००					
					सर्व निवासस्थानाची डागडुजी व इतर कामे.	७०.००					
					एकुण	२४९.००					
					एकुण रक्कम	३६६.००					

प्रपत्र-क

२०१८-२०१९ च्या प्रस्तावित बांधकामाच्या कार्यक्रम (यादी) पुसद बिगर आदिवासी उपविभाग (OTSP)

अ.क्र.	योजनेचे नाव	सीआरसी (संगणक) संकेतांक	उद्दिष्ट शिर्ष संकेतांक	योजनेचे /कामाचे नाव		एकुण अंदाजित किंमत (अलिकडील सुधारीत)सुधारीत अंदाजीत किंमतीचा दिनांक	मार्च-१७ अखेर पर्यंतचा एकुण खर्च	सन १७-१८ मधील अपेक्षित खर्च	उर्वरीत किंमत (स्तंभ ६-८+९)	२०१८- १९ करीता प्रस्तावित तरतुद	योजना/काम पुर्ण होण्याचा अपेक्षित दिनांक
१	२	३	४	५	देखभाल दुरुस्ती	६	७	८	९	१०	११
१	ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम व विस्तारीकरण.	४२१००३८२		उपजि रु पुसद	१)मुख्य ईमारत लिकेज स्लॅब दुरुस्ती	५.००					
					२)एकुण १२ निवासस्थान नुतनीकरण	४०.००					
					३)मुख्य इमारतीचे संडास बाथरुम चे नुतनीकरण करणे	१०.००					
					४)रुग्णालयातील बॉईला चेट्रीफाईड स्टाईल बसविणे ॲल्युमिनिअम विंडोसह.	१४.००					
					५)वाटर पाईप लाईन व टॅक रिपेअर	४.००					
					६)पेविंग ब्लॉक तयार करणे.	१०.००					
					एकुण	८३.००					
				ग्रामीण रुग्णालय दिग्रस	१)ग्रा.रु.दिग्रस येथील रुग्णालयाचे नुतनीकरण ,ॲल्युमिनिअम विंडोसह.	१०.००					
					एकुण	१०.००					
				उपजिल्हा रुग्णालय दारव्हा	वैद्यकिय अधिक्षक निवासस्थान बांधणे-१	२०.००				२५७.००	
					वैद्यकिय अधिकारी निवासस्थान बांधणे-२	३०.००					
					मुख्य ईमारतीचे लिकेज स्लॅब दुरुस्ती करणे	३.००					
					सर्व निवासस्थानाची दुरुस्ती एकुण-२३	५०.००					
					पेविंग ब्लॉक तयार करणे.	१०.००					
					सर्व ईमारतीचे रंगरंगोटी	५.००					
					एकुण	११८.००					

२				ग्रा.रु.आर्णी येथील कामे	धर्मशाळेच्या ठिकाणी औषधी भांडार बांधणे व धर्मशाळा बाजुला नेणे.	२०.००					
					शवविच्छेदनाचे नुतनीकरण करणे.	५.००					
					एकुण	२५.००					
				कु.रु. उमरखेड	शवविच्छेदन नुतनीकरण करणे	८.००					
					लेबर रुमचे विस्तारीकरण करणे.	८.००					
					रुग्णालयाच्या संडास बाथरुम चे नुतनीकरण करणे.	५.००					
						२१.००					
					एकुण रक्कम	२५७.००					

13.1.11

शासकिय निवासी/अनिवासी इमारतीच्या दुरुस्ती कामाबाबत सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड येथे उपभोक्ता खात्यासोबत दि.२६/०५/२०१५ रोजीच्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

सदर बैठकीस खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री के.टी.पाटील, अधीक्षक अभियंता (प्र), सा.बां, मंडळ, नांदेड.

२) श्री. जि.एच.राजपूत, कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, नांदेड.

३) श्री. व्हि.आर.धारासुरकर, कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, भोकर.

४) डॉ. श्री.एस.व्ही.अन्नपूरे, अधिष्ठाता, शासकिय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड.

५) श्री. अजिमोद्दीन अ.अमिद वरिष्ठ श्रे.लिपीक, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे प्रतिनिधी.

६) श्री. पी.आर.लाठकर, जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी.

७) श्री. एल. टी. जाधव, अधिव्याख्याता शासकिय तंत्रनिकेतन, नांदेड.

८) श्री. आर.आर.आडे, सहा. अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, नांदेड.

९) श्री. पी. पी. देशपांडे, उप-विभागीय अभियंता, सा.बां. उप-विभाग (उत्तर) नांदेड.

१०) श्री. जी. व्ही. भांगे, उप-विभागीय अभियंता, सा.बां. उप-विभाग (दक्षिण) नांदेड.

सदर बैठकीस अनुपस्थित असलेल्या अधिकारी यांचे विभाग.

१) विधी व न्याय विभाग, नांदेड.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, नांदेड.
३) डॉ. शंकरराव चव्हाण शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नांदेड.
४) जिल्हा व्यवसाय व शिक्षण अधिकारी, नांदेड.
५) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नांदेड.
६) प्रकल्प अधिकारी, एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय, किनवट.
७) विक्रिकर विभाग, नांदेड.

बैठकीस सुरुवात करतांना उपभोक्ता खात्याकडील उपस्थित अधिकारी कर्मचारी यांना शासनाकडुन शासकिय निवासी/अनिवासी इमारतीच्या दुरुस्तीसाठी नांदेड जिल्हयासांठी चालु आर्थिक वर्षासाठी उपलब्ध असलेल्या एकूण निधी बाबत माहिती अवगत करुन दिली.

सर्व उपस्थित प्रतिनिधींना शासनाकडुन प्राप्त निधी हा प्रामुख्याने इमारतीच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामांसाठीच असतो उदा. गळती प्रतिबंधक उपाय-योजना, जल/मल निःस्सारण, दरवाजे/खिडक्यांची दुरुस्ती, गिलावा, रंगरंगोटी, तुटलेल्या फरशा बदलने इ. तरी त्यांनी कामे प्रस्तावित

बऱ्याच उपभोक्ता विभागाकडुन मुळ स्वरुपाची कामे उदा. पार्टीशन करणे, छताला फाल्स सिलींग करणे, इमारतीत नविन दरवाजे करणे, अनावश्यक रंगरंगोटी, नविन डिझाईनची फरशी बसविणे अशी कामे व वाहनासाठी गॅरेज बांधने इमारतीतील अंतर्गत रचना बदलणेसाठीचे प्रस्ताव पत्राव्दारे सादर केल्याचे दिसून येते त्यासाठी दुरुस्तीच्या कामासाठी प्राप्त निधी खर्च करता येत नाही. त्यामुळे अशा कामांची आवश्यकता असल्यास वेगळे अंदाजपत्रक तयार करुन शासनाकडुन मान्यता प्राप्त झाल्यास व उपभोक्ता खात्याने स्वतंत्र निधी उपलब्ध करून दिल्यास अशा स्वरुपाची कामे करता येतील या अनुषंगाने सूचना दिल्या व तशी कामे आवश्यक असल्यास शाखा अभियंता यांच्या मदतीने अंदाजपत्रके तयार करण्याबाबत सूचविण्यात आले.

उपस्थित प्रतिनिधींना दुरूस्तीची कामे प्रस्तावित करतांना त्यांचा प्राधान्य क्रम निश्चित करूनच कळवावित या बाबत सूचना देण्यात आली. तसेच त्यांच्या विभागाच्या कामाची यादी सोबत आणली असल्यास बैठकीतील सूचनानुसार त्यात सुधारणा करुन देण्याबाबत चर्चा झाली.

नांदेड जिल्हयात विभागनिहाय सा.बां. विभागाच्या PRB रजिस्टर वरील इमारतींची संख्या, एकूण बांधकाम क्षेत्रफळ, सन २०१५-१६ साठी विभागनिहाय निवासी व अनिवासी इमारतींच्या देखभाल व दुरूस्तीसाठी मंजूर व वितरीत अनुदान या बाबतचा तक्ता सोबत माहितीस्तव जोडण्यात येत आहे. त्यानुसार कामे उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेतच प्रस्तावित करावीत.

सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहीर केले.

सहपत्र: वरील प्रमाणे

जा.क्र/अ.अ.नां/प्रशा इमा/ 2e-9y

दिनांक :- - 6 JUN 2015

अधीक्षक अभियंता (प्र)
सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड.

प्रती.

मा. जिल्हाधिकारी, नांदेड
मा. जिल्हान्यायाधिश, नांदेड
मा. पोलीस अधिक्षक, नांदेड
मा. अधिष्ठाता, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड
मा. अधिष्ठाता, डॉ. श. च. शा. वै. म. नांदेड
मा. जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड
मा. जिल्हा व्यवसाय व शिक्षण अधिकारी, नांदेड
मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड
मा. जिल्हा समाजकल्याण अधिकारी, नांदेड
मा. प्रकल्प अधिकारी, किनवट
मा. विक्रीकर आयुक्त नांदेड

प्रत: मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

~~मा. अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड/भोकर यांना माहिती व उ~~

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

वेबसाईट : www.mahapwd.com
ई-मेल : nanded.se@mahapwd.com
दुरध्वनी क्र : (02462) 253273,254502
फॅक्स : (02462) 253277

कार्यालय : अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड
स्नेहनगर, नांदेड.
पिन : 431 602

जा.क्र.अअनां/2017-18/इमा /
ईमेलद्वारे

दिनांक :

प्रति,

कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
नांदेड / भोकर /देगलूर / परभणी / हिंगोली

विषय : इमारत देखभाल दुरूस्तीच्या कामाचे पेंडींग बिल रजिस्टर ठेवणे बाबत.

संदर्भ : महालेखापाल कार्यालयाची तपासणीत उपस्थित मुद्यांच्या अनुपालनानुसार

आपल्या विभागातर्गत असलेल्या शासकिय इमारत देखभाल दुरूस्तीच्या कामाचे पेंडींग बिल रजिस्टर ठेवलेले नाही त्या बाबत महालेखापाल कार्यालयाने केलेल्या तपासणीत मुद्या उपस्थित केला आहे.

त्याअनुशंगाने आपणास कळवण्यात येते कि आपल्या विभागातर्गत असलेल्या सर्व कामांचे पेंडींग बिल रजिस्टर ठेवण्यात यावे व त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

अधीक्षक अभियंता
सार्वजनिक बांधकाम मंडळ, नांदेड

के. पी. पाटील
अधीक्षक अभियंता, (प्र.)

प्रति

विषय:- २०१५ व २०१६ लेखाशिर्षांतर्गत मंजूर शासकिय निवासी/ अनिवासी इमारतीच्या विशेषित मुरुती/विशेष मुरुती व किरकोळ दुरुती कामाच्या दायित्व कार्यक्रमास मान्यता मिळे.

संदर्भ:- १) मेसर्स कानोलसाचे पत्र क्र. अ.भा.सी/१८-१५/प्रशा/इमा. दि. २३-०३-१५
२) मेसर्स कानोलसाचे म.शा.पत्र क्र. प्रशा/इमा-८८५, दि.२८-१-२०१५.
३) मेसर्स कानोलसाचे म.शा.पत्र क्र. प्रशा/इमा २०५.३ दि.२८-०४-२०१५.
४) मेसर्स कानोलसाचे म.शा.पत्र क्र. प्रशा/इमा-[illegible] दि.२८-०५-२०१५.

अ.शा. पत्र क्र. प्रशा/इमा/[illegible] दि. - 6 JUN 2015

विष, श्री.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र-१ मध्यान्वये सा.बां. विभागाचा दायित्व कार्यक्रमास मान्यता घेणे बाबत कळविण्यात आले होते त्याबाबत अद्याप कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही. तसेच या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र.-२ अन्वये शासकिय निवासी/अनिवासी इमारतीच्या विशेषित, विशेष व किरकोळ दुरुस्तीसाठीच्या वर्षासाठीच्या एकत्रित कार्यक्रम सादर करण्यासाठी उपभोक्ता विभाग प्रमुखांची बैठक आयोजित करावी व त्या बैठकिस मंडळ कार्यालयातील प्रतिनिधी उपस्थित राहण्यासाठी बैठकीचा दिनांक व वेळ मंडळ कार्यालयास कळविण्याबाबत कळवून ही अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही.

मंडळ कार्यालयात दि. ०२-०३-२०१५ ते ०४-०३-२०१५ या कालावधीत २०१५/२०१६ या लेखाशिर्षांतर्गत प्रस्तावित/मंजूर कामांची लेखा तपासणी नागपूर येथिल तपासणी पथकाने केली आहे. त्या अन्वये आपल्या विभागासी संबंधीत मुद्यांच्या अहवाल विभागाकडुन मागविण्यात आला असून तो अद्याप सादर झालेला नाही. त्यामध्ये सुध्दा दुरुस्तीचा कार्यक्रम एकत्रित न मंजूर केल्याबाबत, उपभोक्ता विभागाची बैठक न घेतल्याबाबत मुद्दे उपस्थित केले असल्याने भविष्यात उक्त बाबी टाळण्यासाठी त्यांचे अनुपालन व्हावे.

तसेच विभागाचा दायित्व कार्यक्रम आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस मंजूर न केल्यामुळे, शासनाकडुन प्राप्त निधी वेळेत खर्च करणे शक्य होत नाही. करिता आपल्या विभागाचे दायित्व कार्यक्रम अत्यावश्यक मान्यतेस्तव सादर व्हावेत व नविन कार्यक्रमासाठी शासन परिपत्रक क्र. बीडीजी-१०८५/सिआर-४/इमा-२ दि. १५-०४-८५ मधील सुचनेचे पालन व्हावे व विभागाचा अनुज्ञेय कार्यक्रम दायित्व इत्यादी बाबत प्रस्तावित कार्यक्रमासोबत माहिती सादर व्हावी. योग्य कार्यवाहीच्या अपेक्षेसह.

सस्नेह

आपला स्नेहांकित
(के.पी. पाटील)

प्रती,

श्री. व्ही. आर. धारासूरकर,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, भोकर.

प्रती,

श्री. एस. जी. देशपांडे,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, हिंगोली.

प्रती,

श्री. जि. एच. राजपूत,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, नांदेड.

प्रती,

श्री. एस. बी. सोलनकर,
कार्यकारी अभियंता
सा.बां. विभाग, परभणी.

[illegible]

आपल्या विभागाचा दायित्व कार्यक्रम अद्याप मंजूरीसाठी सादर केलेला नसल्याने त्यास मान्यता देणे राहिलेली आहे. त्यामुळे BDS प्रणालीवर अशा कामासाठी उपलब्ध झालेला निधी वितरीत करता येत नाही.

परिशिष्ट - ब

मंगळवार, दिनांक १० एप्रिल २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १० एप्रिल २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ५-१५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(८) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(९) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.

(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(११) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

(४) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्री. राजदिप सिंह, महालेखाकार, नागपूर कार्यालय

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

सार्वजनिक बांधकाम विभाग :-

(१) श्री. आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

(२) श्री. च.प्र.जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग

(३) श्री. अ.अ.सगुणे, सचिव (बां.), सार्वजनिक बांधकाम विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.१, ३.६, ३.७, ३.८ व ३.९ संदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १७ एप्रिल २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १७ एप्रिल २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरु होऊन दु. २-४० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(८) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१२) श्री.अशोक उर्फ भाई जगताप, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्री. राजदिप सिंह, महालेखाकार, नागपूर कार्यालय

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

सार्वजनिक बांधकाम विभाग :

(१) श्री. आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

(२) श्री. च.प्र.जोशी, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग

(३) श्री. अ.अ.सगुणे, सचिव (बां.), सार्वजनिक बांधकाम विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.१, ३.६, ३.७, ३.८ व ३.९ संदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १५ मे २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १५ मे २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ५-५० वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित :

(१२) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव
(४) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :

श्री. राजदिप सिंह, महालेखाकार, नागपूर कार्यालय

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

सार्वजनिक बांधकाम विभाग :

(१) श्री. आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(२) श्री. सी.पी.जोशी, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(३) श्री. सगुणे, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.१, ३.६, ३.७, ३.८ व ३.९ संदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २३ मे २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २३ मे २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी १-०० वाजता सुरु होऊन दुपारी ३-०५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(७) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.

(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(२) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :

श्री. राजदीप सिंह, महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले व को) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

सार्वजनिक बांधकाम विभाग :

(१) श्री. मनोज सौनिक, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

(२) श्री. अ.अ.सगुणे, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग

(३) श्री. चं.प्र.जोशी, सचिव, (रस्ते)

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.१, ३.६, ३.७, ३.८ व ३.९ संदर्भात प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक २९ ऑक्टोबर २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक २४ ऑक्टोबर २०१८ रोजी विधानभवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४-१५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

(४) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.१, ३.६, ३.७, ३.८ व ३.९ सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला.

(शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई)